सं. १. २०१
दा. क्र. १५८१

# कौन्ट टॉलस्टॉय.

## तृतीय खण्ड.

| प्रकाशकः<br>…ाकर श्रीपत भसे,<br>…-भा. गौ. ग्रंथमाला,<br>गिरगांव–मुंबई. | १९२०. | मुद्रकः<br>के. रा. गोंधळेकर,<br>जगद्धितेच्छु प्रेस,<br>५०७ शनवार, पुणें. |
|---|---|---|

भारत-गौरव-ग्रंथमाला—पुष्प बत्तिसावें.

# कौंट टॉलस्टॉय.

## ( तृतीय खण्ड )



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।

—भगवान् श्रीकृष्ण.

REFBK-0001761

( सर्व हक्क स्वाधीन. )

साधी प्रत चवदा आणे.] [कापडी प्रत सव्वा रुपया.

PUBLISHER :

P. S. BHASE,

*Manager,*

BHARAT GOURAV GRANTH MALA,

Girgaon, Bombay.

Printed by

Keshav Ravaji Gondhalekar

at his

*JAGADHITECHHU PRESS*

507 Shanwar Peth, Poona.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

भारत-गौरव-ग्रंथमालेचें हें बत्तीसावें पुष्प तयार झालें असून तें आम्हीं आश्रयदात्यांच्या हातीं आदरपूर्वक देत आहों. ग्रंथमालेचीं पुस्तकें शक्य तितक्या लवकर छापून प्रसिद्ध व्हावींत यासाठीं आजवर प्रयत्नांत म्हणून आळस केला नाहीं. तथापि या बाबतींत यश मिळालें नाहीं, ही गोष्ट आम्हीं मोकळ्या मनानें कबूल करतों. यापुढें ही उशिराची सबब कांहीं अंशानें तरी दूर करतां येईल अशी आम्हांस बरीच उमेद होती, परंतु हळू हळू दिवसेंदिवस वाढत गेलेल्या बेसुमार महागाईनें छापखाने-वाल्यांचीही मोठी अनुकंपनीय स्थिति झाली आहे. पगार पोटाला पुरत नाहीं, या सबबीवर पूर्वीचे नौकर आस्ते आस्ते दुसऱ्या धंद्यांत शिरत आहेत आणि त्यांची जागा भरून काढण्यास नवीन माणसें मिळत नाहींत. या परिस्थितीनें महाराष्ट्रांतील बहुतेक छापखाने कसेबसे चालले असून छपाईचीं कामें विलक्षण दिरंगाईनें होऊं लागलीं आहेत. महाराष्ट्र साहित्यांत खरोखर चांगल्या अशा पुस्तकांची भर फारच थोडी पडते. त्यांत छापखान्यांच्या या बिकट स्थितीनें दरसाल हाताच्या बोटांवर मोज-ण्याइतकीं तरी चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध होतील कीं नाहीं, याची आम्हांस खरोखर मोठी काळजी वाटते. ग्रंथप्रकाशनावर ही एक आपत्ति तर खरीच; परंतु तेवढ्यानें नाउमेद होऊन चालणार नाहीं. संकटें हींच उमेद वाढ-वितात, निराशेंतूनच आशेचे मार्ग सांपडतात आणि हा आमचा स्वतःचा इतके दिवसांचा अनुभव असल्यामुळें संकटांतच ग्रंथमालेचें यश सामा-वलेलें आहे, असें आम्हांस वाटतें. अगोदरच ग्रंथमालेच्या पुस्तकांस उशीर होतो, त्यांत आतां या वरील अडचणीनें तो आणखी होणार, हें खरें; परंतु ग्रंथमालेची अंतरसृष्टि नेहमींप्रमाणेंच—कदाचित् नेहमींपेक्षांहि अधिक सर्वांगसुंदर—असणार, इकडे लक्ष देऊन आश्रयदात्यांनीं आपल्या अंगच्या सौजन्यानें मालेस कार्यक्षम करून घ्यावे, अशी त्यांना आमची प्रेमपूर्वक विनंति आहे.

इतके दिवसांच्या अनुभवानें-केवळ ग्रंथप्रकाशनाचा धंदा या दृष्टीनें-आम्हीं बऱ्याच गोष्टी शिकलों आणि कदाचित् पुढेंहि कांहीं शिकाव्या लागतील. या बाबतींत आमचे गुरु दुसरे कोणी नसून व्ही. पी. परत करणारे वगैरे आमचेच सज्जन आश्रयदाते आहेत. त्यांनीं ज्या अनुभव-जन्य ज्ञानाची जोड आम्हांस मिळवून दिली, त्याबद्दल त्यांचे आम्हीं खरोखरच फार उपकारी आहों, त्यांनीं जर व्ही. पी. परत करण्याचा सरळ पुण्यमार्ग स्वीकारला नसता, तर या असल्या धंद्यांत प्रवेश-फीचें कांहीं कारण आहे; ही गोष्ट आमच्या लक्षांतहि आली नसती. तेव्हां गेल्या पुस्तकापासून एक रुपया प्रवेश-फी केल्याबद्दल जे कित्येक आम्हांस दोष देतात, त्यांनीं यांत खरोखर अपराध कोणाचा आहे, याचा शांतपणें विचार करावा. अशाच अन्य कारणामुळें ग्रंथमालेच्या पूर्वीच्या नियमांत जो कांहीं फेरफार केला आहे, तो आश्रयदात्यांच्या लक्षांत यावा म्हणून या पुस्तकाच्या शेवटीं माहिती-पत्रकाची एक प्रत जोडली आहे. ती आश्रयदात्यांनीं काळजीपूर्वक वाचून पहावी. ग्रंथमालेनें आणखी कांहीं कार्यें हातीं घेण्याचें योजिलें आहे, हेंहि त्या माहितीपत्रकावरून कळून येईल. माहितीपत्रकांत विनंति केल्याप्रमाणें आश्रयदाते आम्हांस मदत करतील अशी पूर्ण उमेद आहे. निदान एकेक नवीन वर्गणीदाराची तरी मदत प्रत्येक आश्रयदात्याकडून मिळाल्यास फार उपकार होतील. कागद पूर्वीपेक्षांहि महाग झाला असून छापखान्यांच्या छपाईचे दर पूर्वीपेक्षां दुप्पट झाले आहेत. अशा अडचणीच्या स्थितींत छत्रपति शिवाजी महाराजांच्या चरित्राचें कार्य ग्रंथमालेनें हातीं घेतल्यामुळें जितके अधिक आश्रयदाते मिळतील तितके आम्हांस पाहिजे आहेत. आमचे आश्रयदाते निदान खटपटीला तरी आळस करणार नाहींत, अशी उमेद आहे.

कांहीं कांहीं पुस्तकांची दुसरी आवृत्ति काढावी म्हणून पुष्कळ आश्रय-दात्यांनीं आम्हांस सुचविलें आहे; परंतु एक तर कागद फार महाग आणि छपाईचीहि फार अडचण. अशा स्थितींत फार तर जाईचा मंडप आम्हांस पुन्हां छापतां येईल. ही कादंबरी संपून बरींच वर्षें झालीं आणि तेव्हांपासून हा वेळपर्यंत तिची मागणी नव्या जुन्या सर्वच आश्रयदात्यांकडून झाली आहे,

असें म्हटलें तरी चालेल. ग्रंथमालेच्या सर्व आश्रयदात्यांना ही कादंबरी पाहिजे आहे, असें आम्हीं गृहित धरलें आहे. तेव्हां ज्यांना ही कादंबरी हवी असेल त्यांनीं मागणी करण्याचें कांहीं कारण नाहीं; परंतु ज्यांना ही कादंबरी नको असेल, त्यांनीं मात्र तसें कळविण्याची मेहेरबानी करावी. म्हणजे ही कादंबरी पुन्हां छापविणें शक्य आहे कीं नाहीं, तें आम्हांस ठरवितां येईल व जुळल्यास लवकरच ही कादंबरी प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करूं. पूर्वीं ही कादंबरी दोन स्वतंत्र खंडांत प्रसिद्ध केली होती; परंतु आतां हे दोन्ही खंड एकत्र बांधून प्रसिद्ध केली जाईल. किंमत प्रत्येक खंडास दहा आण्यांप्रमाणें सव्वा रुपया ठेवावी लागेल. याबद्दल आम्हीं विचार करीत आहों.

टॉलस्टॉय यांचें चरित्र आतां बहुतेक संपत आलें असून आणखी फार तर एकादा खंड होईल. त्यांचें नुसतें चरित्रच घ्यावयाचें असतें, तर तें एका भागांतहि संपवितां आलें असतें; परंतु खरी उपयुक्तता त्यांच्या चरित्रांत नसून त्यांच्या कार्यांत व त्यांच्या ग्रंथांत असल्यामुळें त्यांचें चरित्र आणि त्यांचें एकंदर कर्तृत्व यांची आम्हांस सांगड घालावी लागली. असें केल्यानें हें चरित्र मोठें झालें हें खरें; परंतु असें करणें हें ग्रंथमालेचें कर्तव्यच होतें. केवळ चटकदार कादंबऱ्या वाचण्यास चटावलेल्या वाचकांचा यामुळें कांहींसा विरस झाला असेल हें खरें; परंतु आम्हीं जर या आमच्या कर्तव्यास जागलों नसतों, तर हें राष्ट्रीय पाप आम्हांस ओघानेंच शिरावर घ्यावें लागलें असते आणि आपलें ब्रीद ग्रंथमालेनें सोडलें, असाहि आरोप आमच्यावर आश्रयदात्यांनीं केला असता. रंगेल रंगरावाच्या किंवा चटकचांदणीच्या कादंबऱ्या प्रसिद्ध करण्याचें अभिवचन आम्हीं केव्हांहि दिलें नाहीं. तेव्हां असल्या कादंबऱ्या प्रसिद्ध न करण्याच्या अपराधाबद्दल जे आमच्यावर रागावले असतील, त्यांच्याकडे क्षमेची याचना करण्याचें कारण आहे, असें आम्हांस वाटत नाहीं.

दारिद्र्यरूपी रोगानें आमचा देश अगोदरच पीडिलेला आहे, त्यांत आणखी युद्धजन्य महागाईनें व वारंवार उद्भवणाऱ्या दुष्काळासारख्या आपत्तीनें हा रोग विकोपास गेला आहे. अशा स्थितींत ज्यानें वाङ्मयसेवेचें व्रत स्वीकारलें असेल त्यानें आपल्या देशाला पथ्यकर होईल असें

साहित्य निर्माण करावें कीं कुपथ्यकर साहित्य निर्माण करावें, याचा विचार विचारवंतांनींच करावा. अशा स्थितींत कुपथ्यकर रंगेल पुस्तकें वाचण्यासाठीं ज्यांचा जीव लालचावतो व तसलीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा लोभ ज्यांना उत्पन्न होतो, त्यांनीं आपण आपल्या मायदेशाशीं कृतघ्नतेनें वागत आहों कीं, कृतज्ञतेनें वागत आहों, हें एकाद्या राष्ट्रीय पंचाक्षऱ्यास अवश्य विचारावें. सगळा रशिया जुलुमानें गांजलेला होता, देशांत धान्याचे ढीगच्या ढीग उत्पन्न होऊन सगळा शेतकरी व मोलमजुरी कर-करणारा वर्ग उपाशी मरत होता व त्यांना धड वस्त्र देखील मिळत नव्हतें. अशा स्थितींत गरिबांच्या ताटांत सबंध भाकरी कशी पडेल व त्यांना आंगभर वस्त्र कसें मिळेल, हा विषय टॉलस्टॉय यांनीं हातीं घेऊन गरि-बांचा जीवनक्रम अधिक सुखसोईचा व्हावा म्हणून त्यांनीं स्वानुभवानें अनेक ग्रंथ लिहिले व हे ग्रंथ आज जगांतल विद्वान् वेदतुल्य मानीत आहेत. टॉलस्टॉय यांच्या विचार–विनिमयाची आज हिंदुस्थानला केवढी आवश्यकता आहे, हें विशद करून सांगण्याची जरूर नाहीं. आज हिंदु-स्थानानें त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे, त्यांच्या विचारांचें आम्हीं मनन केलें पाहिजे आणि त्यांच्या तत्वांचा आम्हांस निजिध्यास लागला पाहिजे. अशा स्थितींत ही साधनसामग्री महाराष्ट्रीयांपुढें ठेवणें आमचें कर्तव्य होय. तिच्या परिशीलनानें एकादा विद्यार्थी जरी आपल्या कर्त-व्यास जागून दुःखितांचें दुःख दूर करण्याच्या उद्योगास लागला, तरी तेवढ्यानें देखील आमच्या श्रमाचें सार्थक झालें असें आम्हीं मानूं.

प्रवृत्ति आणि निवृत्ति ही कादंबरी बरेच दिवस झाले, तशीच मागें पडून राहिली होती. तीच आतां हातीं घेतली आहे आणि ती आश्रय-दात्यांच्या हातींहि लवकरच पडेल, अशी आम्हांस उमेद आहे. आश्रय-दात्यांनीं एकंदर स्थितीचा विचार करून ग्रंथमालेवर दयादृष्टि ठेवावी आणि शक्य तो प्रयत्न करून कांहीं नवीन आश्रयदात्यांची जोड मिळवून द्यावी.

गिरगांव–मुंबई.
चैत्र शुद्ध १ शके १८४२

सर्वांचा नम्र साहित्यसेवक,
**प्रभाकर श्रीपत भसे.**



कांउट टॉलस्टॉय.

इ. पं. २०

# कौंट टॉलस्टॉय.

## ( तृतीय खण्ड )

१५६७

### प्रकरण पहिलें.

### तत्वानुसंधान.

मागील खंडावरून पुढें चालू.

शपथ वाहूं नका ! अशी एक ख्रिस्ताची आज्ञा आहे. सामान्य व्यवहारांत, साध्या बोलण्यांतहि शपथ हा शब्द आपण पुष्कळ वेळां उच्चारतों. मग तेवढ्यानें आपली नीति बिघडते काय ? असा आक्षेप कित्येक घेतात. यावर टॉलस्टॉय उत्तर देतात, 'तुमची वर्तणूक व्यवस्थित राहण्याच्या कामीं, मदत करण्याकरतां परमेश्वरानें तुम्हांस विवेकबुद्धि दिली आहे. ही बुद्धि बाजूला ठेवून तुम्हीं आपलें वचन कोणालाहि गुंतवूं नका, असा या आज्ञेचा अर्थ आहे. कल्पना करा कीं, एकादा झार, बादशहा, केसर, राजा, राणी, अध्यक्ष अथवा सेनापति यांच्या वचनांत राहण्याची शपथ तुम्हीं घेतली आणि यांपैकीं कोणीं भलताच गुन्हा करण्याची आज्ञा तुम्हांस दिली, तर तुम्हीं पेंचांत पडणार नाहीं काय ? आपल्या बांधवांचा वध करा, अशी आज्ञा या शपथेच्या जोरावर एकाद्या झारनें किंवा केसरनें दिली, तर परमेश्वराचा आज्ञाभंग अथवा स्वतःचा वचनभंग यांपैकीं कोणतें तरी एक पातक, तुम्हांस निश्चित पत्करावें लागेल. अशा स्थितींत तुम्हीं काय कराल ? याकरतां असा पेंच पुढें उत्पन्न होऊं नये, अशी व्यवस्था अगाऊच करणें, इष्ट नाहीं काय ?

" जर्मन बादशहा दुसरा वुइलियम यानें नव्या भरती झालेल्या सैनिकांकडून शपथ घेववित्यानंतर तो त्यांना उद्देशून म्हणाला, ' माझी आज्ञा पाळण्याची शपथ तुम्हीं घेतली आहे, हें पक्कें लक्षांत ठेवा. आतां प्रत्यक्ष बापावर गोळी झाडण्याचा हुकूम मीं तुम्हास केला, तरी तो सुद्धां तुम्हीं अमान्य करतां कामा नये. "

" युद्धासारखा सरसहा मनुष्यवधाचा धंदा असल्या प्रकारच्या शपथांवर अवलंबून आहे. लोकांनीं आपलीं सदसद्विवेकबुद्धि अशा प्रकारें शास्त्यांच्या हवालीं अगाऊच करण्याची व्यवस्था सर्व देशांत होत असल्यामुळें हा घोर प्रकार जिवंत राहिला आहे. "

" तुमचें कोणीं वाईट केलें तर त्याचा प्रतिकार न करतां तुम्ही शांति धारण करा, असा खिस्ताचा उपदेश आहे. खिस्त म्हणतो, 'तुमच्या उजव्या गालावर कोणीं मारलें, तर डावा गालहि पुढें करा.' खिस्ताच्या या वचनाचा अर्थ हाच कीं, तुम्हास नापसंत असलेल्या मार्गानें कोणीं जात असेल, तर त्याचा प्रत्यक्ष हातानें प्रतिकार करूं नका. खिस्ताच्या इतर आज्ञांच्या संगतीनें ही आज्ञा वाचली म्हणजे हिच्यांत याहूनहि गूढ अर्थ आहे, असें दिसून येईल."

" कोणत्याहि मताचा प्रसार जगांत करण्यास दोन मार्ग असून ते परस्परांच्या विरुद्ध आहेत. बुद्ध, जीझस् यांच्या सारख्या लोकोत्तर पुरुषांनीं स्वीकारलेला हा एक मार्ग होय. सत्याच्या शोधासाठीं अविरत उद्योग करणें, जें सत्य आपणास पटलें असेल, तें निर्भयपणें बोलून दाखविणें, व स्वतःची वर्तणूक त्या तत्वाला तंतोतंत अनुकूल अशी ठेवण्यासाठीं शक्य तो प्रयत्न करणें, हा एक मार्ग आहे. इतरांनीं हा मार्ग स्वीकारावा, यासाठीं कोणताहि जोरजुलूम या लोकोत्तर पुरुषांनीं केला नाहीं. मेघांतून पडलेलें पाणी, आणि सूर्याचा प्रकाश यांचा परिणाम वनस्पतींवर ज्याप्रमाणें अवश्य होतोच, त्याचप्रमाणें लोकोत्तर पुरुषांच्या प्रत्यक्ष उदाहरणाचा परिणाम जनतेवर झाल्यावांचून रहात नाहीं. त्यांचें सूक्ष्म तेज एका देशांतून दुसऱ्या देशांत प्रवेश करतें आणि त्याचा परिणाम यथा-

काल घडत असतो. हा परिणाम तावडतोब नजरेस येत नाहीं; पण त्याचें स्वरूप कालांतरानें स्पष्ट झाल्यावांचून रहात नाहीं."

"आतां याशिवाय दुसराहि एक मार्ग आहे. तो मार्ग म्हणजे, आपणास पटलेलीं मतें मनगटाच्या जोरावर दुसऱ्यावर लादणें हा होय. 'आहाब' 'आटिला' 'सीझर' 'नेपोलियन' आणि अर्वाचीन काळांतील तरवारीच्या जोरावर चाललेलीं साम्राज्यें हीं या दुसऱ्या मार्गाचीं उदाहरणें होत. जेथपर्यंत यांच्या तरवारीचा हात पोहोंचूं शकतो, तेथपर्यंतच यांचें वजन लोकांवर असतें आणि तेंहि क्षणिक. याशिवाय यांचा अस्त झाला म्हणजे पाठीमागें क्रोध, असूया, द्वेष इत्यादि विकारांचें साम्राज्य मात्र शिल्लक उरतें. अशा रीतीनें हे दोन्ही मार्ग आरंभापासून अंतापर्यंत परस्परांच्या विरुद्ध आहेत. एकादें तत्त्व चांगलें असलें, तरी त्याचा प्रसार जुलमानें करणें मूर्खपणाचें आहे. जुलमानें अंगावर पडलेल्या तत्त्वाचा अंगीकार कोणीहि मनुष्य बुद्धिपुरस्सर करीत नाहीं. हा जुलमाचा रामराम आहे, ही जाणीव त्याला निरंतर शल्याप्रमाणें टोंचते."

"कोणीं तुझ्या अंगांतला अंगरखा घेतला आणि त्यासाठीं कायद्याच्या कोर्टांत तुझ्याशीं तो भांडूं लागला, तर त्याला आपला सद्राहि देऊन टाक, या खिस्ताच्या आज्ञेंतील मर्म अगदीं स्पष्ट आहे. एका मनुष्यानें प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष जुलूम करूं नये, असें खिस्ताचें स्पष्ट मत दिसतें. याकरतां कायद्यांचीं कोर्टें, पोलीस, तुरुंग आणि जुलमाचीं इतर साधनें हीं खिस्ताच्या दृष्टीनें त्याज्य ठरतात."

"आपल्या शेजाऱ्याप्रमाणेंच आपल्या शत्रूवरहि प्रेम कर, अशीहि खिस्ताची एक आज्ञा आहे. खिस्त म्हणतो, 'आपल्या मित्रावर प्रेम करण्यांत अधिक तें काय? सर्व लोक तसें करतातच; पण सर्वांचा पिता परमेश्वर हा ज्याप्रमाणें सुष्ट आणि दुष्ट व न्यायी आणि अन्यायी यांजवर आपला पाऊस सारखाच पाडतो, त्याचप्रमाणें तुम्हींहि केलें पाहिजे. तसें तुम्ही कराल, तरच तुम्ही त्याचीं मुलें शोभाल.—"

"खिस्तानें आपल्या आज्ञा स्पष्ट शब्दांनीं सांगितल्या आणि त्याप्रमाणें स्वतः वागूनहि दाखविलें. कोणाचाहि गैरसमज होईल, अशा

प्रकारची संदिग्धता त्याच्या उपदेशांत नाहीं. त्याच्या वचनांचा विपर्यास करण्याची खटपट पुष्कळ टीकाकारांनीं केली आहे; पण या बाबींत यश मिळविणें, अशा टीकाकारांना दिवसेंदिवस अधिक जड जाईल. ख्रिस्ताचे शब्द आणि त्याची प्रत्यक्ष वर्तणूक यांनीं दाखविलेला मार्ग अंधूक नसून अगदीं स्पष्ट आहे."

ख्रिस्ताच्या उपदेशावर प्राचीन काळच्या साधुसंतांनीं व कांहीं अर्वाचीन काळच्या धर्मोपदेशकांनीं केलेल्या टीका आणि टॉलस्टॉय यांची टीका यांत एक मोठा फरक आहे. ख्रिस्ताच्या मनांत काय सांगावयाचें होतें, हें प्राचीन टीकाकारांपेक्षां टॉलस्टॉय यांस अधिक अवगत झालें असेल असें नाहीं; तथापि त्यांच्या टीकेंत जो स्पष्टपणा आहे, तो पूर्वींच्या टीकांत नाहीं. त्याचप्रमाणें धर्म आणि व्यवहार यांची जी फारकत प्राचीन टीकाकारांत दिसून येते, तशी टॉलस्टॉय यांच्या टीकेंत नसून धर्म हें आपल्या रोजच्या वागणुकीचें शास्त्र आहे, ही गोष्ट आपल्या टीकेंत टॉलस्टॉय यांनीं स्पष्ट केली आहे. त्याचप्रमाणें आपणास समजणारीं प्रमेयें कोणतीं आणि आपल्या बुद्धीच्या आंवाक्या बाहेरचीं कोणतीं हेंहि त्यांनीं आपल्या टीकेंत स्पष्ट केलें आहे. परमेश्वराचें स्वरूप, त्याचे गुण, सृष्टीची उत्पत्ती, आणि जगाचें तारण, या गोष्टी बुद्धिगम्य नाहींत, हें ओळखून त्यांजसंबंधीं टॉलस्टॉय यांनीं कोणतेंहि निश्चित मत प्रकट केलेलें नाहीं. आपलें या जगांत कर्तव्य काय आहे, आणि आपणाहून उच्चतर अशी जी विश्वशक्ति आपल्या बुद्धीच्या व सारासार विचारशक्तीच्या द्वारां प्रकट होते, तिच्यासंबंधीं आपलें कर्तव्य काय आहे, हें मात्र त्यांनीं स्पष्ट दाखविलें आहे. विश्वाची चालकशक्ति आणि सामान्य मनुष्य यांच्यांतील संबंध आजपर्यंत अनेक साधु पुरुषांच्या अनुभवास स्पष्टपणें आला असून आपणासारख्या सामान्य मनुष्यांच्या अनुभवासहि अंधुकपणें तो येत असतो. जगांत नीति आणि अनीति असले प्रकार कांहींच मानावयाचे नाहींत, असें म्हटल्यास सर्वच गोंधळ होईल. ही गोष्ट साक्रेटीस, इमर्सन व बहुधा साऱ्या धर्मांतील साधु पुरुष यांच्या नजरेस आली, आणि मनुष्य व विश्वशक्ति त्यांच्यांतील नित्यसंबंध जितक्या प्रमाणानें आपण

ओळखूं, तितक्या प्रमाणानें सत्याच्या अधिक सन्निध आपण जातों, ही गोष्ट टॉलस्टॉय यांनीं केवळ स्वबुद्धीच्या बलावर जाणली आणि हें तत्त्व त्यांनीं प्रत्यक्ष आचरूनहि दाखविलें; पण हें एक तत्त्व जाणण्यास त्यांना जीवाचा केवढा आटापीट करावा लागला, व तें प्रत्यक्ष आचरतांना केवढें भयंकर तप त्यांना करावें लागलें, याचा विचार केला म्हणजे, सामान्य मनुष्याची तर गाळणच उडेल. जुन्या कर्मठ पंथाच्या धर्मोपदेशकांबरोबर प्रचंड रणसंग्राम त्यांना करावे लागले. भिक्षुकांच्या बाजूला बहुधा सारें लोकमत आणि अवश्य तेव्हां सरकारचा सशस्त्र हात त्यांच्या मदतीला नित्य उभा होता आणि उलट बाजूला टॉलस्टॉय यांना पाठिंबा देण्याला एकाददुसराहि जोडीदार नव्हता. कर्मठ भटांनीं त्यांना धर्मलंड ठरविलें. हा नास्तिक आहे, असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें. त्याचप्रमाणें कांहीं शिष्ट लोक त्यांना धर्मवेडे म्हणून त्यांचा उपहास करूं लागले. टॉलस्टॉय यांस बुद्धिभ्रंश झाला आहे, असेंहि कांहींचें मत पडलें. अशा प्रकारच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं केवढें कार्य साधलें, याचा विचार केला म्हणजे त्यांस धन्यवाद दिल्यावांचून राहवत नाहीं.

केवळ बापदाद्यांनीं अमुक प्रकारें आचरण केलें, म्हणून आपणहि तसेंच केलें पाहिजे, ही जी अंधपरंपरा सर्वत्र आढळून येते, तीच धर्मज्ञानाच्या अभावाचें कारण होय. अशा अंधपरंपरेमुळें बुद्धीला सर्वथैव पटणाऱ्या धर्मतत्त्वांचा प्रसारहि लवकर होऊं शकत नाहीं. तथापि ज्यांच्या ठिकाणीं ही अंधपरंपरा नाहींशी झाली आहे, ते लोक धर्मलंड बनलेले असतातच असें नाहीं. पूर्वपरंपरा गेली आणि त्या जागीं नवें कांहींच आलें नाहीं, असें कित्येकांच्या ठिकाणीं घडत असलें, तथापि कांहींच्या ठिकाणीं पूर्वपरंपरा नष्ट झाली असतांहि जागृति कायम राहिल्यामुळें ते नास्तिक बनत नाहींत आणि उलट खऱ्या तत्त्वाचा शोध अंतःकरणपूर्वक ते करूं लागतात. हेच लोक सामान्य जनतेचे खरे वाटाडे होत. अशांच्याच ठिकाणीं खरें धर्मज्ञान उत्पन्न होतें आणि तेहि उदारपणें हें ज्ञान लोकांस मनमुराद देतात. टॉलस्टॉय हे या प्रकारच्या वाटाड्यांपैकींच एक होत.

प्राचीन तत्त्वज्ञानाची संगति लावण्याचें काम अत्यंत दुर्घट असून तसें करूं पहाणारा मनुष्य अखेरीस गोंधळांत पडल्यावांचून रहात नाहीं, ही गोष्ट टॉलस्टॉय यांच्या लक्षांत आरंभींच आली. यामुळें अशा प्रकारच्या भानगडींत ते आरंभापासूनच पडले नाहींत. ज्या गोष्टी आपल्या बुद्धीच्या पलीकडच्या आहेत, त्यांचा कीस काढूनहि अखेरीस उपयोग कांहीं नाहीं, ही गोष्ट आरंभींच त्यांच्या लक्षांत आली. याकरतां बुद्धिगम्य आणि आवश्यक असें तत्त्व काय आहे, एवढ्याचाच विचार करून आपल्या विवेकबुद्धीला पटेल असें धर्माचें स्वरूप त्यांनीं निर्माण केलें. आपण सांगितलेल्या तत्त्वांवर अंधविश्वास ठेवा, असें कधींहि न म्हणतां, त्यांचा खरेखोटेपणा स्वतःच्या अनुभवानें पारखून घ्या, असें ते म्हणत.

इ. स. १८८० च्या सुमारास धर्मदृष्ट्या रशियाची स्थिति मोठी नाजूक झाली होती. परस्परांशीं अगदीं विसदृश किंबहुना परस्पर विरोधी अशा गोष्टी तेथें एकत्र नांदत होत्या. पोलिसांच्या सहाय्यानें चालणारा जुना धर्मपंथ तेथें अस्तित्त्वांत असून लक्षावधी अडाणी शेतकरी या पंथाचे भक्त होते आणि त्याच वेळीं नास्तिकांचा पंथहि तेथें जोर धरूं पहात होता. डार्विनच्या सिद्धांताचा प्रसार झाल्यामुळें चार्वाकवादाला मोठा जोर येऊन पुष्कळ सुशिक्षित लोक चार्वाक शिष्य बनले होते. अर्वाचीन शास्त्रांचा अखेरीस जय होऊन जीवात्मा ही काय वस्तू आहे, हें तीं शास्त्रें अणुपरमाणूंच्या पृथक्करणानें आपणांस स्पष्ट करून दाखवितील अशी पुष्कळ सुशिक्षितांची खात्री झाली होती. दोन्ही बाजूंला अशा प्रकारचा विलक्षण विरोध असतां टॉलस्टॉय यांचीं मतें नुसतीं ऐकून घेण्यासहि कोणी तयार नव्हता, यांत नवल नाहीं. एका बाजूला आपल्या शास्त्रज्ञानाच्या घमेंडींत गर्क असलेला आणि बाकीच्या जगाकडे तुच्छतेनें पाहणारा सुशिक्षितवर्ग आणि दुसऱ्या बाजूकडे मेंढरांसारखा शेतकऱ्यांचा कळप. टॉलस्टॉय यांचें तत्त्वज्ञान समजून घ्यावें ही इच्छा सुशिक्षितांना नव्हती आणि तसें करण्याची पात्रता शेतकऱ्यांच्या अंगीं नव्हती.

अशा स्थितींतहि आपला मार्ग न सोडतां बुद्धिगम्य धर्मपंथ टॉलस्टॉय यांनीं निर्माण केला, यांतच त्यांची थोरवी आहे. जुन्या पंथांतील

अंधपरंपरा पूर्णपणें बाजूस ठेवल्यावांचून नव्या मार्गाच्या शोधाला लागणें त्यांना शक्य नव्हतें. जुन्या पंथाचा त्याग करावयाचा, तर त्याचें फसवेगिरीचें रूप लोकांपुढें उघड मांडणें अवश्य होतें. धर्माच्या सोंवळ्या नांवाखालीं कोण भोंदू लोकांसमोर वावरत आहे, हें लोकांस सांगणें जरूर होतें. याकरतां जुन्या पंथावरील हा धर्माचा बुरखा बाजूस ओढणें त्यांना प्राप्त झालें. त्याचप्रमाणें, नव्या चार्वाक वाद्यांचीहि कानउघडणी करणें, त्यांस अवश्य होतें, अनेक शरीरांची चिरफाड अर्वाचीन शास्त्रांनीं केली, तरी त्यांच्या आंवाक्या बाहेर असें जें कांहीं शिल्लक उरतें त्याच्यासंबंधीं आम्हास उपदेश करण्याची अथवा मार्ग दाखविण्याची पात्रता या शास्त्रांच्या ठिकाणीं नाहीं, हेंहि त्यांना सिद्ध करावयाचें होतें. अर्वाचीन शास्त्रांनीं सृष्टीवर कितीहि जय मिळविले असले, तरी तेवढ्यानें उंडारून जाण्याजोगी स्थिति त्यांना प्राप्त झाली नसून पुष्कळ गोष्टी त्यांच्या आंवाक्या बाहेर आहेत व धर्म ही बाबहि त्यांतलीच एक आहे. हें त्यांस सिद्ध करावयाचें होतें. मनुष्यजातीला धर्मज्ञानाची अत्यंत आवश्यकता आहे. हें एका बाजूनें सिद्ध करीत असतां चालू पंथ धर्मज्ञानदानाच्या कामीं निरुपयोगी आहे, हेंहि त्यांस दाखवावयाचें होतें. यावरून टॉलस्टॉय यांचें कार्य किती अडचणींनें भरलेलें होतें, हें सहज लक्षांत येईल. दोन्ही बाजूंस तुटलेले कडे असून दोन टोंकें जोडणाऱ्या मधल्या बारीकशा तारेवरून पलीकडे जावयाचें कार्य त्यांस करावयाचें होतें.

कांहीं तत्त्वांची केवळ पुस्तकी चर्चा करावी, इतकाच टॉलस्टॉय यांचा उद्देश नव्हता; अथवा कांहीं तत्त्वज्ञ ज्याप्रमाणें आपलें ज्ञान लोकांसमोर फेंकून देऊन स्वतः खुशाल बाजूला जाऊन बसतात, तसेंहि त्यांस करावयाचें नव्हतें. मानवी जीविताचा अंतिम हेतु निश्चित करून तो साधण्याचा मार्ग शोधून काढणें, व लोकांच्या बुद्धीला तो पूर्णपणें पटविणें हें त्यांचें कार्य होतें. त्या मार्गानें न चालल्यास मानवी जीवित निश्चयानें विफल होईल, ही गोष्ट लोकांच्या गळीं त्यांस उतरून द्यावयाची होती.

कोणतेंहि धर्मतत्त्व झालें, तरी त्याचा अंगिकार करणें, अवश्य कां

आहे, हें मनुष्याला समजल्याशिवाय त्या तत्त्वानुरूप आचार करण्यास तो प्रवृत्त होत नाहीं. कोणतीहि गोष्ट त्याज्य कां अथवा ग्राह्य कां ह्याचा उलगडा त्याला हवा असतो. अमुक एक प्रकारें तूं वर्तन कर, असें एकाद्याला कोणीं सांगितलें, तर 'कां ?' हा प्रश्न आपोआपच पुढें येतो, आणि या प्रश्नाला मिळालेलें उत्तर मनुष्याच्या सामान्य जीवनक्रमाशीं सुसंगत असावें लागतें. टॉलस्टॉय यांच्या पंथांत आणि इतर पंथांत जो मोठा भेद आहे, तो हाच. जुनाट पंथ तुमच्या प्रश्नाची पर्वाच करीत नाहीं. आपण दिलेलीं उत्तरें लोकांच्या बुद्धीला पटतात कीं नाहीं, हेंहि तो पहात नाहीं. केवळ मनगटाच्या जोरावर आपलीं तत्त्वें लोकांस तो आचरावयाला लावतो. अर्वाचीन तत्त्ववेत्ते आणि नीतिशास्त्रपंडित लोकांसमोर आपलीं तत्त्वें मांडून मोकळे होतात. सामान्य व्यवहारांत तीं कशीं आणतां येतील, याचा विचार लोकांस ते सांगत नाहींत. अथवा तीं आचरलींच पाहिजेत, असाहि स्पष्ट उपदेश ते करीत नाहींत. यामुळें त्या तत्त्वांची प्रत्यक्ष व्यवहाराशीं बहुधा फारकत झालेली आढळते. टॉलस्टॉय यांच्या पंथांत आणि बाकीच्या पंथांत भिन्नता कोठें आहे, हें वाचकांच्या लक्षांत आतां आलें असेलच. आपल्या मतांचें प्रतिपादन करतांना संदिग्धता अथवा दुटप्पीपणा यांचा आश्रय त्यांनीं कोठेंहि केलेला नाहीं. आपलीं तत्त्वें विवेकबुद्धीशीं सुसंगत आहेत, हें ज्याप्रमाणें त्यांनीं दाखविलें, त्याचप्रमाणें त्यांचें प्रत्यक्ष आचरण करणें अवश्य आहे व अशा आचरणाच्या अभावीं मनुष्य निश्चयानें अवनतीस जाईल, हेंहि त्यांनीं सिद्ध केलें. आपलीं तत्त्वें केवळ वाऱ्यावर न सोडतां तीं एकत्र गुंफून त्यांची सुंदर माला त्यांनीं तयार केली. टॉलस्टॉयप्रणीत ख्रिस्ती धर्मांतील विशेष हाच होय.

बायबलांतील जुना करार, या भागांत टॉलस्टॉय यांच्या मतें चांगल्याची व वाईटाची खिचडी झाली आहे. यांत कांहीं तत्त्वें मधून मधून आढळतात, व बाकीचा बराचसा भाग त्यांच्या मतें अशास्त्रीय व ग्राम्यहि आहे.

नव्या करारापैकीं पॉल यानें लिहिलेला भाग टॉलस्टॉय यांस मुळींच

मान्य नाहीं. त्याच्या टीकेमुळें खिस्तानें सांगितलेल्या धर्माला अत्यंत विकृत स्वरूप प्राप्त झालें, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. धर्माच्या बाबींत भटभिक्षुकें व सरकार यांचें संगनमत होऊन बाकीची सामान्यजनता वेगळी पडली आणि यामुळें खिस्तानें सांगितलेल्या धर्माला ती पारखी होऊन त्याच्या ऐवजीं सरकारच्या बलावर चाललेल्या भिक्षुकांच्या धर्माला तिला बळी पडावें लागलें. हा अनर्थ पॉलकृत खिस्ती धर्मानें झाला, असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें आहे.

सरकारी सत्तेचा उगम परमेश्वरापासून झाला आहे, या पॉलच्या तत्त्वाचा निषेध टॉलस्टॉय यांनीं अत्यंत कडक शब्दांनीं केला आहे. अत्यंत जुलमी राजाच्या सत्तेचा उगमहि परमेश्वरापासूनच झाला आहे काय? असा उचित प्रश्न पॉल यांस टॉलस्टॉय यांनीं केला आहे. मनुष्यानें फक्त परमेश्वराचीच आज्ञा मानावी व त्याशिवाय इतर कोणाहि व्यक्तीपुढें मान वांकवूं नये, असें टॉलस्टॉय यांचें स्पष्ट मत आहे. कोणाहि राजाचा हुकूम मानण्यास आपण वचनबद्ध झालों, तर ईश्वराचे कायदेहि मोडण्याचा प्रसंग येतो, याची वाट काय? असा टॉलस्टॉय यांचा प्रश्न आहे. कोणाहि व्यक्तीवर कसल्याहि प्रकारचा जुलूम करावयाचा नाहीं, हें टॉलस्टॉय यांच्या मतें खिस्ताच्या उपदेशांतील आदितत्त्व होय. या तत्त्वाचें उल्लंघन करणें म्हणजे खिस्ताचा धर्म सोडणें होय. याकरतां सरकार आणि धर्माधिकारी यांनीं एक जूट करून ज्या दिवशीं लोकांवर आपलीं तत्त्वें जुलुमानें लादलीं त्याच दिवशीं खरा खिस्तीधर्म बुडाला, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे.

मृत्यूनंतर जीवित आहे कीं काय? या प्रश्नासंबंधीं टॉलस्टॉय यांचे विचार आरंभीं बऱ्याच मुग्धावस्थेंत होते. मृत्यूनंतर जीवित असण्याचें कारण तरी काय? याचा उमज त्यांच्या बुद्धीला पडला नव्हता. पण पुढें या प्रश्नाचाहि उलगडा त्यांना झाला. जीवात्मा हा विश्वात्म्याचाच एक सूक्ष्म अंश आहे, व याकरतां देहपातानंतराहि त्याचें अस्तित्व राहील ही गोष्ट त्यांच्या बुद्धीला पटली. आतां देहपाताचें जीवित कोणत्या स्वरूपाचें असूं शकेल, या प्रश्नाचें उत्तर मात्र त्यांनीं दिलेलें नाहीं. हा प्रश्न आपल्या बुद्धीच्या आंवाक्याबाहेरचा असल्यामुळें त्याचें ठाम उत्तर देणें शक्य नाहीं

व जेथें निश्चित उत्तर नाहीं, तेथें धरसोडीचें, उडवाउडवीचें अथवा काल्पनिक उत्तर द्यावयाचें नाहीं, असा टॉलस्टॉय यांचा बाणा होता. देहपातानंतर तो जीवात्मा कांहीं वायुमय स्थितींत राहील कीं विश्वात्म्याशीं एकरूप होईल, कीं मानवदेह तो पुन्हां धारण करील, याचा निश्चय करणें, आपल्या बुद्धीच्या बाहेरचें असल्यामुळें त्या भानगडींत ते पडलेच नाहींत. ते म्हणतातः—" भविष्यकाळचें हें स्वरूप काय असेल, याचा निश्चय आपणास करतां न आला तरी त्यांत आपलें नुकसान काय? भविष्यत् काळ कसाहि असला तरी चालू जीवितांत आणि चालू क्षणीं परमेश्वराचें सुखमय साम्राज्य पृथ्वीवर निर्माण करण्यासाठीं धडपड करणें, हेंच प्रत्येकाचें कर्तव्य आहे, आणि आपण तें करूं या."

सूक्ष्मेंद्रियशास्त्र, विद्युन्मानसशास्त्र, अथवा स्पिरिच्युआलिझम असल्या प्रकारच्या गारुडी विद्येची आवड टॉलस्टॉय यांस कधींच नव्हती. असल्या प्रकारच्या विद्यांसंबंधीं त्यांना पूर्ण तिटकारा होता. यामुळें मनुष्याच्या विचारसरणींत अनंत घोंटाळे उत्पन्न होऊन मुख्य मुद्याचा प्रश्न अखेरीस बाजूलाच रहातो, असें ते म्हणत.

ख्रिस्ती धर्मशास्त्रांत ख्रिस्तानें घडविलेले म्हणून कांहीं चमत्कार सांगितले आहेत. अशा चमत्कारांच्या पोटीं तत्त्व काय आहे, इतक्याच दृष्टीनें त्यांचा विचार करावयाचा असतो, असें टॉलस्टॉय यांचें मत होतें. एकाद्या मनुष्याला समुद्रावरून चालून दाखवितां येत असलें, तरी तेवढ्यावरून सत्याशीं त्याची भेट झाली आहे, असें सिद्ध होत नाहीं, असें टॉलस्टॉय म्हणत. समुद्रावरून चालणें अथवा आकाशांत उडणें ही विद्या कितीहि मोठी असली, तरी ती जड विद्या आहे, आणि सत्याच्या रहस्याचें कथन करणें, ही पराविद्या होय. अपरा अथवा जड विद्येंत कितीहि नैपुण्य कोणीं संपादन केलें, तरी तेवढ्यानें पराविद्येचीं मूळाक्षरेंहि त्याला अवगत नसण्याचा संभव आहे.

चमत्कारांची संगती लावण्याचा यत्न करणें म्हणजे निष्फळ उद्योग करण्यासारखें होय, असें टॉलस्टॉय यांचें मत असल्यामुळें आपल्या बायबलाच्या भाषांतरांतून चमत्कारांचा भाग त्यांनीं मुळींच काढून टाकला

आहे. खिस्तानें कांहीं तत्त्वें कदाचित् रूपकांच्या भाषेंत सांगितलीं असावींत व कालांतरानें या रूपकांतूनच चमत्कारांच्या गोष्टी बनल्या असाव्यात असें टॉलस्टॉय यांचें मत होतें.

मनुष्याचें शारीरस्वास्थ्य आणि धर्मतत्त्वें यांचा संबंध जोडण्याचा यत्न कांहीं भौतिक शास्त्रांनीं केला आहे. हा प्रकारहि टॉलस्टॉय यांस मुळींच संमत नाहीं. धर्मतत्त्वांचा संबंध फक्त आत्म्यापुरताच असून ओढूनताणून तो शरीराकडे लावणें वेडेपणाचें आहे, असें ते म्हणत. रोगराई, अशक्तपणा आणि मृत्यु या गोष्टी आत्मकल्याणाकरतां आवश्यक आणि अपरिहार्यहि आहेत, असें त्यांचें मत होतें. धर्माचरण केलें असतां शारीरस्वास्थ्य उत्तम राहील, या मताचा मोह टॉलस्टॉय यांस कधींच पडला नाहीं.

धर्माचें मुख्य अवतारकार्य काय ? या एकाच मुख्य महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्यांचें चित्त वेधलें होतें. यामुळें खिस्ताचा महत्त्वाचा उपदेश काय ? इतकाच विचार त्यांनीं केला. खिस्तानें आंधळ्यांना डोळे दिले, लंगड्यांना पाय दिले, आणि अजाऱ्यांना बरें केलें, असल्या गोष्टींकडे त्यांचें लक्ष मुळींच गेलें नाहीं. तथापि मन आणि शरीर यांचे संबंध परस्परांशीं अविभाज्य स्वरूपानें असून परस्परांचे परिणाम परस्परांवर घडत असतात, हेंहि निर्विवाद आहे. मन उत्तम स्थितींत राहिल्यास शरीराचा कमकुवतपणा दूर होतो, ही गोष्ट आपणांपैकीं पुष्कळांच्या ध्यानींहि आली असेल. फार काय ? पण खुद्द टॉलस्टॉय यांस सुद्धां असा अनुभव आला नव्हता असें म्हणवत नाहीं. टॉलस्टॉय यांची उदात्त, गंभीर व प्रोत्साहक विचारसरणी ज्यांनीं आपलीशी केली, असे पुष्कळ लोक आरंभीं विकृत स्थितींत असतां पुढें सुदृढ बनले, हें पुष्कळांस माहीत आहे; पण टॉलस्टॉय देहातीत होऊं पहात होते. देह कोणत्याहि स्थितींत राहिला, तरी त्याचा कोणताहि दुष्परिणाम चित्तावर न घडतां तें सुस्थितींत कसें राहील, इतकाच विचार ते करीत असल्यामुळें धर्मतत्त्वें आणि देहपरिचर्या यांच्यांतील संबंधाकडे त्यांचें दुर्लक्ष झालें, हेंहि स्वाभाविकच आहे. केवळ ईश्वरसेवा करावी, ही भावना ज्यांच्या ठिकाणीं प्रबळ झाली, त्यांच्या ठिकाणीं देह-

स्वास्थ्याचा विचार कोठून रहाणार! किंबहुना मला देह आहे, ही भावना-सुद्धां त्यांच्या चित्तांतून विराम पावण्याच्या मार्गास लागलेली असते.

जगांत जडपणें वावरणाऱ्या आणि स्पष्ट दिसणाऱ्या शक्तीपलीकडचें जें शक्तीचें सूक्ष्मरूप आहे, त्याचा शोध लावण्याकरतां युरोपांतील कांहीं शास्त्रज्ञ धडपडत आहेत. आपल्या चालू ज्ञानाला अगम्य अशा गोष्टी विश्वांत घडतात व विश्वशक्तीच्या ज्या कायद्यानें त्या घडतात, त्या कायद्याचें पूर्ण अज्ञान आज आपल्या ठिकाणीं वसत आहे, इतकी गोष्ट मात्र या पंडितांस सध्यां पटली आहे.

कोणत्याहि राजाला अथवा सरकाराला वचनबद्ध न होतां स्वतःच्या इच्छेप्रमाणें वर्तन करण्यास मोकळें राहणें हें मनुष्याच्या मानसिक वाढीला अत्यंत आवश्यक आहे, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. या मताला अनुकूल आणि प्रतिकूल अशीं दोन्ही प्रमाणें दाखवितां येण्याजोगीं आहेत. केवळ उपपत्तीच्या दृष्टीनें टॉलस्टॉय यांचें म्हणणें बरोबर असलें, तरी सर्व प्रतींच्या माणसांस प्रत्यक्ष व्यवहारांत तें सारखेंच लागू केलें तर त्यापासून मनुष्यजातीचें कितपत हित होईल, हा प्रश्न मोठ्या घोंटाळ्याचा आहे. याचें ठाम उत्तर देणें शक्य नाहीं. टॉलस्टॉय म्हणतात, 'जगांत मनुष्यें जीं अपकृत्यें करतात, तीं केवळ स्वेच्छेनें करतात असें नाहीं, तर त्यांनीं पतकरलेल्या नौकरीच्या अटींमुळें तशीं कृत्यें करणें त्यांना भाग पडतें. युद्धामुळें रक्तपात करणें अथवा जाळपोळीचे अत्याचार करणें ही गोष्ट सामान्य मनुष्याच्या स्वप्नींहि येण्यासारखी नाहीं; पण बादशहा, राजे, प्रधान अथवा सेनापति यांच्या हुकुमांनीं असलीं घोर कृत्यें करण्यास तयार होणें मनुष्यांस भाग पडतें. जे बादशहा अथवा राजे असलीं कृत्यें दुसऱ्याकडून करवितात, ते असल्या कृत्यांनीं आपले हात कधींहि मळवीत नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. फार काय; पण असलीं कृत्यें आपल्या हुकुमानें होत असतां आपल्या नजरेसहि ते तीं पडूं देत नाहींत. यावरून असल्या कृत्यांना मनुष्य स्वाभाविकपणेंच किती पापमय समजतो, हें लक्षांत येतें. त्याचप्रमाणें कायद्याच्या अथवा धंद्याच्या नांवाखालीं असलेच अनन्वित प्रकार घडत असतात.'

टॉलस्टॉय यांचें हें म्हणणें केवळ उपपत्तीच्या दृष्टीनें पूर्णपणें खरें आहे; पण व्यावहारिक माणसांच्या दृष्टीनें येथें एक प्रश्न असा उद्भवतो कीं, मनुष्याच्या सांप्रतच्या स्थितींत कोणत्याहि प्रकारचे, कायद्याचे, समाजाचे अथवा धर्माचे निर्बंध मनुष्याला न घालतां त्याला अगदीं मोकळा सोडला तर हल्लींहून त्याची स्थिति सुधारेल कीं काय? जो स्वभावतःच दुर्वृत्त आहे, तो कायद्याच्या बंधनानें सुधारेल कीं अगदीं मोकळा सोडला असतां तो सुधारेल, या प्रश्नाचें निश्चित उत्तर देणें मोठें कठिण आहे.

पौर्वात्य आणि पाश्चात्य विचारसरणी या बाबींत एक मोठा भेद आहे. पौर्वात्य विचारसरणी केवळ व्यक्तीपुरताच विचार करणारी आहे. मला स्वतःला बरें काय वाटतें? माझी व मानसिक वाढ कोणत्या कृत्यानें होते, माझ्या कोणत्या कृत्याचा हिशोब ईश्वरापाशीं द्यावा लागेल, हें ठरवून केवळ स्वतःला अनुकूल अशा कृत्याला प्रवृत्त होणें, ही पौर्वात्य विचारसरणी आहे. एका व्यक्तीखेरीज इतर समाजाचें अस्तित्व ही विचारसरणी लक्षांत घेत नाहीं. एका व्यक्तीच्या कृत्याचे परिणाम समाजावर काय होतील व त्या व्यक्तीच्या कृतीमुळें समाजबंधनें कायम राहतील कीं शिथिल होतील याचा विचार या पौर्वात्य सरणींत कोठें दिसत नाहीं.

ग्लॅडस्टन म्हणतात—“माझ्या वयाचा मध्यभाग उलटून जाईपर्यंत स्वतःच्या वागणुकीचा विचार केवळ स्वतः पुरताच मी करीत होतों. माझी वागणूक माझ्या दृष्टीनें सरळ आहे, असें दिसलें, म्हणजे तदनुरूप मी खुशाल विचार करीत असें. माझ्या वागणुकीचा अर्थ लोक काय करतील व त्यांच्या चित्तावर तिचा परिणाम काय होईल, याचा विचार पूर्ववयांत मीं कधींच केला नाहीं. आपल्या वर्तणुकीचा मार्ग आंखतांना त्याकडे केवळ स्वतःच्याच दृष्टीनें न पाहतां बाकीच्या समाजाचेंहि अस्तित्व लक्षांत घेतलें पाहिजे, हें माझ्या लक्षांत आले नव्हतें. समाजांत परस्पर सहकारितेची भावना दृढमूल असल्याशिवाय समाजाचा एकोपा कायम राहणार नाहीं. एकोपा कायम न राहिल्यास समाज विस्कळित होऊन नाशाच्या मार्गास लागेल. ही आपत्ति टाळण्याकरतां समाजांतील प्रत्येक घटकानें आपला मार्ग सर्व समाजाच्या दृष्टीनें आंखला पाहिजे.”

ग्लॅडस्टन यांच्या या उद्गारांत पाश्चात्य विचारसरणीचें प्रतिबिंब बरोबर पडलें आहे. टॉलस्टॉय यांची विचारसरणी याहून भिन्न आहे. परमेश्वराला भिऊन आणि आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून आपण आपलें आचरण ठेवावें, अशा प्रकारची प्रवृत्ति सामान्य जनतेंत रूढ केल्यास एकाद्या देशाचेंच काय; पण सर्वंध मनुष्यजातीचें कल्याणहि या मार्गानें होईल आणि मनुष्यांतील बंधुभाव जागृत होऊन त्यांच्यांतील एकोपा वाढेल, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत हें मत खरें ठरलें असतें, तर किती चांगलें झालें असतें ? पण या मताला अनुसरून व्यवहार चालू ठेवण्याची पात्रता सामान्य मनुष्यजातींत अद्यापि आलेली नाहीं. टॉलस्टॉय हे स्वतःवरून जगाची परीक्षा करीत आहेत; पण त्यांच्या स्वतःच्या ठिकाणीं असलेली विवेकजागृति, त्यांची परोपकारबुद्धि आणि त्यांचें औदार्य हे गुण सामान्य जनांत कितपत आढळतात, याचा विचार केला, म्हणजे टॉलस्टॉय यांचें तत्त्व व्यावहारिक दृष्ट्या उपयोगी पडेल असें दिसत नाहीं. एकादी उपपत्ति वरून कितीहि चांगली दिसली आणि तर्कशास्त्राला तिचे सिद्धांत कितीहि पटत असले, तरी तिची खरी परीक्षा व्यवहारावांचून होत नाहीं. तिची खरी उपयुक्तता प्रत्यक्ष व्यवहारांतच ठरते. या दृष्टीनें विचार केला, म्हणजे मनुष्यजातीचे गुणदोष लक्षांत घेऊन समाजाची रचना करणें अवश्य आहे. आपलें स्वतःचें आचरण ठरवितांना आजूबाजूची परिस्थिति ध्यानांत घेणें व आपल्या आचरणाचा परिणाम इतरांवर काय होईल, याचा विचार करणें अवश्य आहे. एकादा तत्त्वज्ञ केवळ स्वमताचरणाकरतां लोकबाह्य रीतीनें वागूं लागला, तर समाजाची घडी शिथिल करण्याचें पाप त्याच्या माथीं आल्यावांचून राहणार नाहीं. याकरतां समाजबंधनें कायम राहण्यासाठींच शहाण्या मनुष्यानेंहि आपल्या आचरणाचा मार्ग लोकसंग्रहाच्या दृष्टीनें ठरविला पाहिजे.

यावर टॉलस्टॉय एक आक्षेप घेतात तो असा कीं, जो सिद्धांत सत्य म्हणून स्वतःच्या मनाला पटला, तो आचारांत आणण्याची तयारी आपल्या समाजांतील लोकांत नाहीं, एवढ्याच करतां त्याचा आचार स्वतः कराव-

याचा नाहीं, असें आपण ठरविलें, तर आपणाला तत्त्वव्यभिचाराचा दोष ताबडतोब लागतो. अशा रीतीनें एकेका तत्त्वाचा त्याग आपण करूं लागलों, तर ही आपली घसरगुंडी कोठें थांबेल, हें कोणीं सांगावें ? आज केवळ समाजाकरतां म्हणून आपण स्थानभ्रष्ट झालों, तर उद्यां केवळ स्वार्थपरायण बुद्धीनें आपण दुसऱ्या एकाद्या तत्त्वाचा त्याग करणार नाहीं, असें कोणीं म्हणावें ? केवळ परमेश्वराकडे नजर ठेवूनच समाजाच्या अथवा दुसऱ्या कोणाच्याहि लोभांत न पडतां आपण आपल्या मार्गानें चालत राहिलों, तरच त्या तत्त्वाची अव्यभिचारी भक्ति आपल्या ठिकाणीं कायम राहील, असें त्यांचें मत आहे.

पण आमच्या सारख्या सामान्य मनुष्याला यावरहि एक शंका येते. ती अशी कीं, टॉलस्टॉय यांची ही विचारसरणी, कधीं काळीं तरी प्रत्यक्ष अमलांत आली असती, तर मानव जातीची स्थिति सांप्रतच्याहून अगदींच भिन्न दिसली असती. त्यांच्या तत्त्वाचा खरेपणा, त्यांच्या सारख्या उच्च स्थितींतल्या माणसांपुरता खरा असला, तरी सामान्य मनुष्यांच्या ठिकाणीं त्याचा व्यवहार होणें शक्य दिसत नाहीं. आपला आंवाका न ओळखतां, अशी उंच उडी मारण्याचा यत्न एकाद्यानें केला, तर प्रसंगीं अशा मनुष्याचे दांत कसे पडतात, याचा अनुभव व्यवहारांत आपणास नेहमीं येतोच. साधु साधु म्हणून उच्च वातावरणांत तरंगू पाहणारे लोक प्रसंगीं कसे घसरतात, व अखेरीस भोंदू आणि ठक या नांवाला कसे पात्र होतात, हें आपण पाहतोंच. याकरतां टॉलस्टॉय यांचीं हीं तत्त्वें त्यांच्या सारख्या उच्च कोटींतल्या लोकांपुरतींच खरीं आहेत. केवळ तत्त्वाचरणा करतांच ज्यानें घरादाराचाहि त्याग अखेरीस केला, अशा टॉलस्टॉय सारख्या लोकोत्तर पुरुषाला करण्यास अशक्य असें कांहींच नव्हतें; पण एवढ्यावरून त्यांचीं तत्त्वें सामान्य माणसांच्या उपयोगीहि तितकींच पडतील, असें मानणें मात्र चुकीचें होईल. याकरतां आपला आंवाका पाहून लोकसंग्रहाच्या दृष्टीनें सामान्य मनुष्यानें वर्तावें व टॉलस्टॉय यांच्या सारख्या पुरुषाचें चरित्र हें आपलें अखेरचें ध्येय म्हणून आपल्या दृष्टिसमोर सतत ठेवावें, हेंच त्याला उचीत होय.

कोणत्याहि प्रसंगीं जोरजुलुमाचा उपयोग मुळींच करावयाचा नाहीं, टॉलस्टॉय याचें एक मोठें तत्त्व आहे. त्यांच्या मतें राजव्यवहारांत, ीमधंद्यांत, तुरुंगांत, शाळांत अथवा सामान्य घरसंसारांतहि जुलुमाचा ायोग होतां कामा नये; पण वरील विवेचन या तत्त्वालाहि तितकेंच गू पडतें. अशा जोरजुलुमावांचून ज्या समाजाचा व्यवहार सुरळीत लत असेल, तो समाज नीतिदृष्ट्या फार उच्च स्थितींत असला हिजे, हें उघड आहे; पण मानवसमाजाची स्थिति आज मित्तीला ाकी आदर्शवत् झाली आहे, असें म्हणवत नाहीं.

या बाबतींत टॉलस्टॉय हे शुद्ध हट्टवादी आहेत, असें म्हटलें असतांहि तेशयोक्ति होणार नाहीं. अशा प्रकारची हट्टवादाची वर्तणूक येशु-स्तासारख्या अथवा बुद्धासारख्या एकाद्या महात्म्याच्या ठिकाणीं प्रत्यक्ष सत असली, तरी ती व्यावहारिक होऊं शकत नाहीं. टॉलस्टॉय यांचा हट्ट त्यांना शोभण्यासारखा आहे, किंबहुना तो त्यांच्या ठिकाणीं होता, गूनच ते जगद्वंद्य झाले हेंहि खरें; तथापि त्यांचें म्हणणें व्यवहारांत आणणें म्हणजे गुणाचा अतिरेक करून अखेरीस त्याला दोषाचें स्वरूप आणणें होय.

टॉलस्टॉय यांनीं आपल्या मतांची मांडणी इतक्या साध्या, सोप्या आणि सुबक रीतीनें केली आहे कीं, केवळ वाचतां वाचतां त्यांचीं तत्त्वें समजुतीला भराभर पटत जातात; पण तीं प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याच्या कामीं अडथळे इतके भयंकर आहेत कीं, त्यांची पूर्णपणें कल्पनासुद्धां होत नाहीं. परमेश्वरानें आणि आपल्या सद्बुद्धीनें दाखविलेले नियम सर्व मनुष्यांनीं पाळले, तर मनुष्यकृत कायद्याची गरजच न उरतां सर्व मनुष्य-जात आनंदानें व शांतीनें कालक्रमणा करील, असे टॉलस्टॉय म्हणतात; पण आपणांपैकीं प्रत्येकानें हा नियम अवलंबावयाचा असें मनांत आणलें, तरी सुद्धां मनुष्यकृत निर्बंध लागावयाचे नाहींत, असें नाहीं. मनुष्यकृत निर्बंध जगांतून मुळींच नाहींसे केले तर आपल्या अडचणी संपावयाच्या ऐवजीं त्या किती तरी पटीनें अधिक मात्र वाढतील. एकाद्या सत्कार्याच्या सिद्धीसाठीं दहापांच माणसें एकत्र जमून काम करूं लागलीं म्हणजे

नं. ......
ता. ...
ठाणे.



काउंटेस टॉलस्टॉय.

त्यांच्यांत तेढ कशी उत्पन्न होते, याचा अनुभव आपणास नित्य येतोच. आपलें उद्दिष्ट कार्य बिघडावें, असा दुष्ट हेतु यांपैकीं एकाच्याहि मनांत नसतो. किंबहुना हातीं घेतलेलें कार्य उत्तम रीतीनें यशस्वी करण्याकरतांच त्यांपैकीं प्रत्येक जण आपापल्या परी खटपट करीत असतो. परंतु प्रत्येकाचा दृष्टिकोण वेगळा असल्यामुळें त्यांच्यांत फूट पडून मतभेद होतात व अखेरीस कार्य बिघडतें. या दहापांच माणसांत त्या कार्यासंबंधीं विशेष माहिती एकाद्याला असते, तर दुसऱ्या एकाद्याला ती मुळींच नसते. एकाच वेळीं अनेक साधनांचा उपयोग करण्याची आवड एकाद्यास असते, तर एकाच साधनामागें लागणें दुसऱ्याला पसंत पडतें. एकादा भित्र्या स्वभावाचा असतो आणि प्रत्येक पाऊल पूर्ण विचार केल्याशिवाय तो टाकीत नाहीं. दुसरा एकादा उतावळ्या स्वभावाचा असतो आणि कार्याच्या सिद्धीसाठीं एकसारखी धडपड करीत असतो. एकादा समजूतदार असला, तर एकादी गोष्ट त्याला लवकर समजते, तर दुसऱ्या एकाद्याच्या बुद्धीला ती मुळींच पटत नाहीं आणि तिसऱ्याच्या बुद्धींत तिचा विपर्यास सुद्धां होतो. अनेक भेद केवळ व्यक्तिगत बुद्धिभेदामुळें उत्पन्न होतात. याकरतां या साऱ्या दहापांच मनुष्यांचें केंद्रीभवन जेथें होईल, अशी एकादी नियामक मध्यवर्ती शक्ति उत्पन्न करून ठेवणें, जरूरीचें असतें. अशा नियामक शक्तीमुळें त्वयार्धं मयार्धं हें तत्त्व मनुष्याच्या ध्यानांत येऊन त्याच्या आंगवळणी पडतें व संहतीनें कार्य साधण्यास तो पात्र होतो. याकरतां जगाचा व्यवहार सुरळीत चालण्यासाठीं स्पष्ट आणि नीटनेटका कायदा आणि नियमबद्ध रचना यांची जरूरी आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत कित्येक वेळां कायद्यांचा फाजील कडकपणा अनुभवास येऊन हिताऐवजीं अहित अधिक होतें, असाहि अनुभव येतो. हें खरें; पण याला उपाय म्हणून कायद्यांचें बंधन मुळींच काढून टाकल्यास सध्यां होत असलेलें हितहि न साधतां अहित मात्र हटकून होईल.

एकाद्या पक्वान्नाचें खरें सौंदर्य रुचींत आहे, अशा अर्थाची इंग्रजींत एक म्हण आहे. ज्या ठिकाणीं मोठा जनसमूह मनुष्यकृत कायदा समजण्याच्या अवस्थेंत आहे व सरकारी कायदा पाळण्यापलीकडे अधिक कांहीं

कर्तव्य आपणास आहे, अशी जाणीवच ज्या ठिकाणीं नाहीं, त्या ठिकाणीं समाजाचें अस्तित्व सरकारी कायद्याच्या अस्तित्वावर अवलंबून असणार हें उघड आहे. स्वतःच्या स्वातंत्र्याला आळा किती घालावा, आणि स्वतःचे तंटे कसे तोडावेत, हें ठरविण्याचें माप सरकारी कायद्यापलीकडे नाहीं, अशी भावना ज्या समाजांत असेल, तो समाज नुसत्या सद्सद्विवेकबुद्धीच्या नीतिनिर्बंधावर एकत्र राहूं शकणार नाहीं. अशा प्रकारें कोणत्याहि रीतीचा मनुष्यकृत कायदा अस्तित्वांत न आणतां समाजबंधन अस्तित्वांत ठेवण्याचे यत्न आजपर्यंत जितके झाले तितके फोल ठरले आहेत.

या प्रश्नाचा विचार आणखीहि एका बाजूनें करतां येण्यासारखा आहे. एकादें बिकट सामाजिक कार्य तांतडीनें करावयाचें आहे, असें समजा. अशा वेळीं कार्यसिद्धि लवकर करण्याची जरूर असल्यामुळें कोरड्या वादविवादांत वेळ घालविणें इष्ट नसतें. अशा प्रसंगीं त्या कार्यांत पडणाऱ्या अनेक माणसांचे मतभेद कडाक्याच्या वादविवादानें तोडीत बसण्यापेक्षां अगाऊ सिद्ध असलेल्या नियमानें ते तोडणें, अधिक इष्ट आणि अधिक सुखावह आहे. हे मतभेद केवळ वादविवादानें संपवावयाचे असें म्हटलें, तर भांडण विकोपास जाऊन कालातिक्रम होतो, कार्य बिघडतें व प्रसंगीं शाब्दिक भांडणाचें रूपांतर दंडादंडींत होऊन मनुष्यहानि होण्याचा संभव उत्पन्न होतो. यापेक्षां समाजनिर्बंध अगोदर सिद्ध करून जनसमूहाला ते पाळावयास लावणें, हेंच अधिक हितावह आहे. भांडणाचा निकाल न होतां, तें तसेंच आधांतरीं लोंबत राहिलें, तर त्यापासून समाजाचें नैतिक नुकसानहि अधिक होतें.

टॉलस्टॉय यांच्या विचारसरणींत जो एक मोठा दोष शिरलेला आहे, तो हा कीं, सामान्य मनुष्यप्राण्यांबद्दल त्यांच्या चित्तांत फारशी पूज्यभावना नाहीं. मनुष्यप्राणी शुद्ध दांभिक व स्वार्थी आहे, असें त्यांचें ठाम मत असल्याचें दिसतें. यामुळें मनुष्यकृत कोणत्याहि नियमांत दांभिकपणावांचून दुसरें कांहींहि त्यांना दिसत नाहीं. सरकार ही संस्था लोककल्याणार्थ निर्माण झाली नसून स्वतःचा बडेजाव वाढविण्याकरतांच ती

अस्तित्वांत आली आहे, हें टॉलस्टॉय यांचें मत यामुळेंच बनलें आहे. यामुळेंच मनुष्यांनीं आजपर्यंत धडपड करून संस्कृतीचें जें कांहीं स्वरूप निर्माण केलें आहे, त्यांतील चांगला असा कोणताच भाग त्यांच्या नजरेस न येतां वाईट भाग तेवढा त्यांना हटकून दिसतो. टॉलस्टॉय यांजसारख्या उदार अंतःकरणाच्या व कुशाग्रबुद्धीच्या पुरुषाला अशी मनोविकृति असावी, ही खरोखर मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय; पण असें होण्यास त्यांच्या भोंवतालची परिस्थिति कारण झाली नसेल, असें तरी कशावरून ? मनास वाटेल तें बोलावें अथवा लिहावें, त्याला प्रत्यंतर पुरावा पाहूं नये, अशी टॉलस्टॉय यांची वृत्ति नव्हती. अनुभवानें स्वतःच्या बुद्धीला पटेल, तें स्पष्टपणें लोकांपुढें मांडण्याचा त्यांचा बाणा होता. मग अर्वाचीन संस्कृतीबद्दल त्यांचें मन इतकें विकृत होण्यास रशियन सरकारची राज्य-पद्धति कारण झाली असावी काय ? तसेंहि कदाचित् असेल.

टॉलस्टॉय यांची विचारसरणी विशेषतः पाश्चात्य लोकांना नीटशी पटावयाची नाहीं. ऐहिक सुखें प्राप्त करून घेणें हीच मानवी जीवनाची इतिकर्तव्यता आहे, हा सिद्धांत ज्यांनीं उराशीं बाळगला असेल, त्यांना टॉलस्टॉय यांचें अप्रतिकाराचें तत्त्व कालत्रयींहि मान्य व्हावयाचें नाहीं. या दृश्य देखाव्यापलीकडे कांहीं अस्तित्व म्हणून आहे, ही कल्पना सुद्धां ज्यांच्या चित्ताला शिवलेली नाहीं, त्यांनीं इंद्रियगत सुखाच्या मागें लागावें, व त्याकरतां हवे ते अत्याचार करावे, यांत नवल नाहीं. अशा लोकांना अप्रतिकार पटणार नाहीं, आणि पचणारहि नाहीं.

पुराणमताच्या धर्मपंथाच्या ग्रंथावरील टीका लिहून झाल्यानंतर टॉलस्टॉय यांनीं बायबलचें आपलें भाषांतर प्रसिद्ध केलें. चार संतांनीं लिहिलेल्या चार शुभ वर्तमानांचें भाषांतर करून त्यांतील मुद्यांची एकवाक्यता करण्याचा यत्न या ग्रंथांत टॉलस्टॉय यांनीं केला आहे. हा ग्रंथ एकंदर तीन खंडांत प्रसिद्ध झाला. पुराणपंथावरील टीकाग्रंथाप्रमाणेंच हा ग्रंथहि प्रथम जिनिव्हा येथें छापला गेला. याचा पहिला भाग इ. स. १८९१ मध्यें प्रसिद्ध झाला व यानंतर याची रशियन आवृत्ति मास्को येथें इ. स. १९०८ मध्यें प्रसिद्ध झाली. मध्यंतरींच्या काळांत तो प्रसिद्ध करण्याची

परवानगी सरकारकडून मिळाली नाहीं. इ. स. १९०५ च्या नव्हेंबर महिन्यांत नव्या सनदशीर राज्यपद्धतींत पूर्वींच्या कांहीं बहिष्कृत ग्रंथांस प्रसिद्धीची परवानगी मिळाली, तेव्हां या ग्रंथालाहि परवानगी मिळून रशियांत तो प्रथम प्रसिद्ध झाला. पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत टॉलस्टॉय म्हणतातः—

"हा ग्रंथ सुमारें दहा वर्षांपूर्वीं लिहून झाला. हा ग्रंथ अद्यापिहि अपुरा असून त्यांत दुसऱ्याहि पुष्कळ उणीवा आहेत; पण माझ्या मित्रमंडळीच्या अत्याग्रहांवरून तो छापण्याची परवानगी मीं दिली. तो शुद्ध करून पूर्णत्वास आणण्याचें काम यापुढें माझ्या हातून होणें शक्य नाहीं, असें मला वाटतें. कारण ग्रंथ लिहिला जात असतां माझ्या बुद्धीला जी एकाग्रता, जें स्थैर्य, आणि जो उत्साह होता, तो आतां राहिलेला नाहीं. तथापि अशा स्थितींतहि जो प्रकाश मला प्राप्त झाला आहे, तो अंशतः तरी माझ्या वाचकांस मिळाला, तर माझें काम झालें असें मी समजेन. या प्रयत्नांत जो मार्ग मला सांपडला, तो मार्ग सत्य वस्तूकडे निःसंशय जात आहे व त्या मार्गानें जों जों पुढें जावें, तों तों मनःशांतीचा व आनंदाचा लाभ मला अधिकाधिक होत आहे. या लाभाचा वांटा माझ्या वाचकांसहि मिळावा, एवढीच माझी इच्छा आहे."

वरील प्रस्तावना लिहून झाल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं टॉलस्टॉय यांनीं या ग्रंथासंबंधीं पुढील उद्गार काढले होते.

"स्वतःच्या ग्रंथाची बरोबर परीक्षा ग्रंथकाराला होत नाहीं, असें म्हणतात. हें म्हणणें कदाचित् खरें असलें, तरी त्यांतील आक्षेप पत्करून माझ्या एकंदर लेखांचा मुकुटमणी असा हा ग्रंथ आहे, असें मी स्पष्टपणें म्हणतों. असें म्हणण्यांत मी अतिशयोक्ति अथवा चूक करीत नाहीं, अशी माझी खात्री आहे. हा लिहीत असतां अभूतपूर्व आनंदाचा अनुभव मला मिळाला. माझ्या आयुष्याची दिशा या ग्रंथानें बदलली व निश्चित झाली. या ग्रंथानंतर जी कांहीं कृति माझ्या हातून निपजली असेल, तिला आधारभूत ग्रंथहि हाच."

मूळ ग्रीक भाषेंतील ग्रंथांचा सांगोपांग अभ्यास करून पूर्ण विचा-

रांतीं जीं तत्त्वें टॉलस्टॉय यांस पटलीं व खिस्ताचें चारित्र त्यांच्या बुद्धीला जसें दिसलें, तदनुरूप या ग्रंथाची रचना त्यांनीं केली आहे, तथापि खिस्ताचें जें चित्र टॉलस्टॉय यांनीं काढलें आहे, तें तरी खरें कशावरून ? अशी शंका प्रदर्शित केली, तरी तिला बिनतोड उत्तर देतां येणार नाहीं. कारण खिस्ताचीं शब्दचित्रें आजपर्यंत अनेकांनीं काढलीं आहेत. त्यांत स्ट्रॉस, रेनन, रूस, हॉसरॉथ, फरार, हॉरन्याक, इत्यादि सुप्रसिद्ध बुद्धिवान् पुरुषहि आहेत. यांनींहि आपापलीं खिस्तचरित्रें स्वबुद्धीला पटलीं त्याप्रमाणें प्रामाणिकपणें लिहिलीं आहेत; तथापि या सान्यांत विलक्षण मतभेद आढळून येतो. यामुळें या बाबींत विश्वसनीय तरी कोणतें समजावें, अशी शंका कोणास आल्यास त्यांत नवल नाहीं. इतका घोंटाळा माजण्याचें मुख्य कारण हेंच कीं, ज्या मूळ संहितांवरून इतक्या टीका निर्माण झाल्या, त्या मूळ संहिताच अर्धवट, कच्च्या व बोबड्या आहेत. त्या मूळ लिहिल्या कोणीं, आणि कोठें लिहिल्या, याची कोणतीच माहिती सांप्रत आपणास उपलब्ध नाहीं. आणि त्यांतील परस्परांत विलक्षण विसंगतपणा आढळतो, हें निराळेंच. पुष्कळशा गोष्टी त्यांत गुप्त राहिल्या आहेत, आणि ज्या कांहीं बाहेर आल्या आहेत, त्यांत निश्चितपणा आणि पूर्णता हीं मुळींच नाहींत. यामुळें अनेक मतभेद असतांहि सर्वच मतांना स्वमताच्या पुष्टीसाठीं त्यांतून आधार सांपडतो.

हें कसेंहि असलें तरी इतकें मात्र खरें कीं, या उद्योगापासून टॉलस्टॉय यांचा मार्ग निश्चित होऊन शांतीचा लाभ त्यांना झाला. येशूखिस्ताचें स्वतः चरित्र कसें होतें व त्यानें कोणतीं तत्त्वें प्रतिपादिलीं, याचा उमज आपणांस बरोबर पडला आहे, अशी स्वतःपुरती तरी त्यांची खात्री झाली. जगाचें स्वरूप बदलत आहे, याकरतां जुन्या काळच्या गोष्टी त्या काळा-पुरत्या चांगल्या असल्या तरी नव्या मनूस अनुसरून त्यांत बदल केला पाहिजे, हें अर्वाचीन पाश्चात्य पंडितांचें मत टॉलस्टॉय यांस मुळींच मान्य न होण्याचें कारण हेंच. जगाच्या बदललेल्या स्वरूपांत सुखाचा व शांतीचा लाभ त्याला होणार नाहीं, असें टॉलस्टॉय यांचें निश्चित मत या अभ्यासानंतर झालें. नव्या बदलेल्या जगांत नवे मार्ग शोधून न काढतां

खिस्ताच्या काळाकडे पुन्हां परत जाऊन पूर्वींचें साधें व टापटिपीचें व बिनखर्चाचें शेतकऱ्याचें जीवनचरित्र पुन्हां सुरू करा, असा टॉलस्टॉय यांचा उपदेश आहे. पुढें पुढें धडपड करीत राहून सुखाचे नवे नवे मार्ग शोधीत बसल्यानें सुख पुढें व तुम्ही पाठीमागें ही धांवपळ जगाच्या अंतापर्यंतहि संपावयाची नाहीं. याकरतां पुढें न जातां मागें सरा असा उपदेश ते करतात.

यामुळें त्यांचीं पुष्कळशीं मतें अव्यवहार्य झालीं आहेत. तीं वाजवीहून अधिक कांटेकोर, फाजील तर्कशुद्ध व अत्यंत निष्ठुर अशीं असल्यामुळेंच त्यांचा व्यवहार करणें दुरापास्त होतें. तीं केवळ व्यक्तिदृष्ट्या एकाद्याच्या उत्तम उपयोगी पडण्याजोगीं असलीं, तरी एखाद्या मोठ्या समाजाचें नियंत्रण त्यांना अनुसरून करतां येणें शक्य नाहीं. सर्वांनीं आपापलीं अंतःकरणें परमेश्वरास मात्र वहावीं व दुसऱ्या कोणाचाहि हिशोब लक्षांत आणूं नये, असें टॉलस्टॉय म्हणतात; पण ही गोष्ट सामान्य मनुष्याच्या हातून घडणार तरी कशी? हेंच तत्त्व मुळांत धरून सारा देऊं नका, असा उपदेश ते करतात. पाटीलकुळकर्णी सारा वसूल करण्यासाठीं आले, तर आपखुषीनें तो न देतां वाटेल त्या रीतीनें तो वसूल करण्याची मुभा त्यांना ठेवावी, असा त्यांचा उद्देश आहे. अशा प्रकारच्या आज्ञा खुद्द खिस्तानेंच केल्या आहेत. हा अर्थ काढण्याच्या हेतूनें शुभवर्तमानाचें भाषांतर त्यांनीं आरंभिलें, तेव्हां तें ऐतिहासिक दृष्टीनें त्यांनीं केलें नाहीं, हें उघडच आहे. खिस्तानें ज्या आज्ञा केल्या, त्या काळीं परिस्थिति कशी होती, लोकांच्या चालीरीति कशा होत्या आणि कोणत्या प्रकारचे समज त्यांच्यांत रूढ होते, याचा विचार सुद्धां त्यांनीं केला नाहीं. तर त्या आज्ञा जशाच्या तशाच घेऊन त्यांवरील टीका शुद्ध विवेकबुद्धीला कशी दिसते, इतकाच विचार त्यांनीं केला आहे. यामुळेंच त्यांनीं सांगितलेल्या तत्त्वांना अव्यवहारित्व आलें आहे. अमुक एक गोष्ट खिस्ताची आज्ञा आहे, असें टॉलस्टॉय सांगतात; तेव्हां ती व्यावहारिक आहे कीं नाहीं, हें पहाण्याचा विचार सामान्य मनुष्याच्या मनांत सहजच येतो, आणि तें तत्त्व व्यवहार्य नाहीं, असें दिसल्यास खिस्तानें तें खरोखरच सांगितलें

कीं नाहीं, अशी शंकाहि साहजिकपणेंच येते. यांत ख्रिस्तानें चूक केली कीं, टॉलस्टॉय यांचा अर्थ चुकला याचा निश्चित उमज पडण्याचें साधन नसल्यामुळें तत्व म्हणून मिरवणारें हें नाणें खरें कीं खोटें याचा निर्णय् न होऊन वाचक त्यापासून पराङ्मुख होतो.

नव्या कराराचें जें भाषांतर टॉलस्टॉय यांनीं केलें आहे, त्यांत अर्थांची विलक्षण ओढाताण त्यांनीं केली आहे, असा कित्येकांचा आक्षेप आहे. या आक्षेपाला टॉलस्टॉय पुढील उत्तर देतात.

" ग्रीक भाषेचा उत्तम अभ्यास मीं केला असून त्या काळच्या विद्वन्-मुकुटमणींचे ग्रंथ मीं मनःपूर्वक वाचले आहेत. तथापि याहि गोष्टीला विशेष महत्त्व मी देतों असें नाहीं. कित्येक ठिकाणीं अर्थांची फाजील ओढाताण मीं जाणून बुजून केली आहे. ख्रिस्ताचा खरा हेतू लोकांपुढें मांडावयाचा इतकें एकच कर्तव्य मला नसून पुराणपंथानें उत्पन्न केलेले दुराग्रह लोकांच्या मनांतून काढून टाकण्याचें कामहि मला करावयाचें होतें. एका कार्यांत दोन कार्यें मला साधावयाचीं असल्यामुळें कित्येक प्रसंगीं जाणूनबुजून उलट दिशेला मी वाहवलों आहें. एकाद्या लोखंडाच्या तुकड्याला विद्युत्घर्षण झालें असतां त्यांत चुंबकत्व येतें. हें चुंबकत्व नाहींसें करावयाचें असल्यास उलट जोराच्या दुप्पट शक्तीचा उपयोग तेथें करावा लागतो. हाच हिशोब माझ्याहि भाषांतराला लागू केला पाहिजे."

आपलें भाषांतर करतांना ग्रीक शब्दांचा केवळ रूढ अर्थ न घेतां त्यांचा धात्वर्थ पाहून त्या शब्दांतील विशिष्ट हेतू टॉलस्टॉय यांनीं दर्शविला आहे. येशू ख्रिस्ताबद्दल टॉलस्टॉय यांच्या मतांत हळू हळू फरक पडत गेला. हिंदू व चिनी तत्त्वज्ञान्यांचें ग्रंथ अवलोकन केल्यानंतर बायबलाचा अभ्यास त्यांनीं केला. अशा प्रकारें अनेक धर्मांचा अभ्यास केल्यावर एक गोष्ट त्यांच्या लक्षांत आली ती ही कीं, तत्त्वतः सारे धर्म एकाच स्वरूपाचे असून जो भेद आतां त्यांत दिसतो, तो केवळ बाह्य उपाधींमुळें पडलेला आहे. हे धर्म व्यवहारांत येऊं लागल्यानंतर केवळ व्यावहारिक स्वरूपाचीं जीं पुटें त्यावर बसलीं त्यामुळें त्यांत पुढें भेद दृग्गोचर होऊं

लागले. वस्तुतः सारे धर्म बीजरूपानें एकच आहेत. हें तत्त्व लक्षांत आल्यानंतर येशू ख्रिस्ताच्या केवळ व्यक्तिविषयक गोष्टीसंबंधीं फारसा आदर टॉलस्टॉय यांच्या चित्तांत उरला नाहीं. इ. स. १९०० सालीं बिरुकॉफ याला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात.

" प्रोफेसर व्हेरुज यांचा ग्रंथ मीं वाचला. येशू ख्रिस्त या नांवाची व्यक्ति कधीं अस्तित्वांतच नव्हती, असा आशय दाखविणारीं अनेक प्रमाणें लेखकानें नमूद केलीं आहेत. हीं प्रमाणें कदाचित् खरीं ठरतील किंवा खोटींहि ठरतील, पण तीं खरीं ठरलीं, तरी त्यांत आमचें नुकसान काय ? बाले किल्ल्याचें रक्षण चांगलें करतां यावें या हेतूनें बाहेरची मोर्चेबंदी नाहींशी केली, तर त्यांत काय बिघडलें ? काळ अनंत आहे आणि पृथ्वीहि विपुल आहे. यांच्या उदरांतून वहात आलेला तत्त्वप्रवाह अमुक एका उगमापासून निघाला आहे कीं नाहीं, हें ठरविणें, ही मोठीशी मुद्याची गोष्ट नव्हे. अशीं तत्त्वें एकाद्या व्यक्तिविशेषापासूनच निर्माण झालेलीं असतात, असें नाहीं. साऱ्या मानवकुलाच्या केंद्रीभूत चैतन्यांतून त्यांचा उगम झालेला असतो."

टॉलस्टॉय यांच्या मतप्रतिपादनांत मुख्य मुद्दा व्यक्तीचें अस्तित्व सिद्ध करणें हा नसून त्या व्यक्तीनें कोणत्या तत्त्वांचें प्रतिपादन केलें, व तीं तत्त्वें मानवी जीवनक्रमाला आवश्यक असून व्यवहार्थ आहेत कीं नाहींत, हेंच त्यांस पहावयाचें होतें. ख्रिस्ताच्या अस्तित्वासंबंधीं कोणताहि आग्रह त्यांच्या चित्तांत राहिला नाहीं; पण त्यामुळें त्याच्या तत्त्वांवरील त्यांचा भरंवसा उडाला, असें मात्र नव्हे. व्यक्तीला महत्त्व न देतां तत्त्वालाच त्यांनीं महत्त्व दिलें.

टॉलस्टॉय यांच्या मतांत आणखीहि एक महत्त्वाचा मुद्दा आहे. प्रत्येकानें स्वचरितार्थ कांहीं तरी उद्योग प्रत्यक्ष हातानें करणें अवश्य आहे, या मुद्यावर त्यांनीं विशेष जोर दिला आहे. एकादा मनुष्य मोठा जमीनदार असला, तरी जमिनीची मशागत केवळ कुळांकडून करवून स्वतःच्या हातानें शेतकीचें कोणतेंहि काम न करतां शेतांतलें धान्य मात्र स्वतःच्या पदरीं पाडून घ्यावयाचें हा मार्ग टॉलस्टॉय यांस पसंत नव्हता. आपल्या

व आपल्या कुटुंबाच्या पोषणार्थ लागणाऱ्या वस्तू श्रीमंत जमीनदारांनींहि स्वतःच्या व कुटुंबियांच्या अंगमेहनतीनें मिळविल्या पाहिजेत, असें त्यांचें मत होतें. ह्याच शारीरिक मेहनतीचा नियम मानसिक कार्यालाहि ते लागू करतात. कोणतींहि तत्त्वें तोंडानें बडबडणें अथवा कागदावर लिहिणें, इतक्यानेंच आपलें कर्तव्य संपलें नसून प्रत्येकानें स्वमताप्रमाणें वागूनहि दाखविलें पाहिजे, असें त्यांचें मत होतें. लिहिणें, वाचणें, अभ्यास करणें, वादविवाद करणें, अथवा अनेक मनुष्यांची संहति निर्माण करून तिच्या द्वारें उद्योगवृद्धि करणें, या गोष्टींपेक्षां शारीरिक मेहनतीनें उत्तम प्रकारची शेती करणें अधिक अगत्याचें व अधिक महत्त्वाचें आहे, असें टॉलस्टॉय म्हणतात. आपल्या व आपल्या कुटुंबाच्या पोषणासाठीं जे कोणी कोणत्याहि सबबीनें अंगमेहनत करीत नाहींत, त्यांजवर टॉलस्टॉय यांनीं मनमुराद ताशेरे जागोजाग झाडले आहेत.

नव्या कराराच्या भाषांतराचा मोठा ग्रंथ लिहून झाल्यानंतर याच धोरणावर कांहीं कांहीं लहान चोपडीं व फुटकळ लेख टॉलस्टॉय यांनीं लिहिले आहेत. धर्म आणि राजा यांचे परस्परविषयक संबंध कोणत्या प्रकारचे असावेत, याचें उद्‌घाटन् एका लहानशा निबंधांत त्यांनीं केलें होतें. या निबंधाच्या बऱ्याच हस्तलिखित प्रती तयार होऊन त्यांचा प्रसारहि बराच झाला; पण त्यांची प्रसिद्धी छापखान्याच्या द्वारें होण्याचा योग केव्हांच आला नाहीं. नव्या कराराच्या भाषांतराचीहि स्थिति प्रथम अशीच झाली होती. त्याची एक प्रत त्यांच्याच घरच्या एका शिक्षकाला हवी होती; पण मूळ प्रत खुद्द टॉलस्टॉय यांजपाशींच ,नसल्यामुळें तिची नक्कल करणें, त्या शिक्षकाला अर्थातच शक्य नव्हतें; तेव्हां त्या ग्रंथांतील मुख्य मुख्य भागांचें एक लहानसें टिपण टॉलस्टॉय यांनीं तोंडानें सांगितलें व तें त्या शिक्षकानें लिहून घेतलें. अशा रीतीनें या मोठ्या ग्रंथाची ही लहानशी चूर्णिका निर्माण झाली. ही चूर्णिका सगळी लिहून झाल्यानंतर तिला एक लहानशी प्रस्तावना टॉलस्टॉय यांनीं स्वहस्तें लिहिली. या प्रस्तावनेंत ते म्हणतात, “ ख्रिस्ताचा मुख्य मुद्दा चोरून ठेवून मनमानेल तसे, भलतेच अर्थ ख्रिस्ताच्या तोंडून ज्यांनीं वदविले, अशा

लोकांना दोनच मार्ग मोकळे आहेत. एक तर त्यांनीं पश्चात्तापानें आपलीं अंतःकरणें शुद्ध करून आपलें असत्य आपल्या पदरीं परत घ्यावें अथवा मजसारखे जे कोणी त्यांचें बेंड बाहेर फोडतील, त्यांचा छळ करावा. माझें पुस्तक मी लिहीत होतों, तेव्हां या छळाचें स्वप्न मला पडलें नव्हतें, असें नाहीं. मला भीति वाटत होती ती इतकींच कीं, आयत्या वेळीं माझें मन मला दगा देऊन मला असम्मत अशा भलत्याच गोष्टी माझ्या तोंडीं वदवील कीं काय? असें होऊं नये म्हणून माझ्या मनाला पढवून मी त्यांची तयारी करीत होतों."

यानंतर इ. स. १९०८ सालीं येशू ख्रिस्ताचीं तत्त्वें या नांवाचें एक लहान पुस्तक केवळ मुलांच्या उपयोगासाठीं टॉलस्टॉय यांनीं लिहिलें.

इ. स. १८८४ सालीं 'माझा धर्म' या नांवाचें एक पुस्तक टॉलस्टॉय यांनीं लिहिलें होतें. त्यांच्या या ग्रंथांचीं भाषांतरें युरोपांतील बऱ्याच भाषेंत होऊन टॉलस्टॉय यांच्या मतांचा प्रसारहि पुष्कळ झाला. हा ग्रंथ बहुतांशीं आत्मचरित्ररूप असून स्वतःच्या मानसिक स्थितीचीं सुंदर चित्रें यांत टॉलस्टॉय यांनीं काढलीं आहेत. पुढें ख्रिस्ती धर्मग्रंथांचें जें मोठें भाषांतर त्यांनीं लिहिलें, त्यांतील विचारसरणी बीजरूपानें या ग्रंथांत प्रकट झाली आहे, ही गोष्ट पुढील उताऱ्यावरून वाचकांच्या ध्यानीं येईल.

"मनुष्याच्या आत्मकल्याणाच्या मार्गांत मोठी धोंड म्हटली म्हणजे 'मी आणि माझा देश' हीच होय. हा माझा देश आणि तो परक्याचा देश, या भावनेचा उदय चित्तांत झाल्यावर आत्मकल्याणाच्या मार्गांतून मनुष्य भ्रष्ट होतो, हें ख्रिस्तानें आपल्या पांचव्या आज्ञेनें स्पष्ट केलें आहे आणि ही त्याची आज्ञा अगदीं बरोबर आहे, असें म्हणण्यावांचून दुसरा मार्ग मला दिसत नाहीं. यामुळें क्वचित् प्रसंगीं या तत्त्वाचा विसर पडून कोणाहि परकीयाबद्दल शत्रुभाव माझ्या मनांत आला, तर हें मोठें पातक मीं केलें, असें माझें मलाच वाटूं लागतें. पूर्वीं माझ्या मनांत स्वदेशाभिमान जागृत होता; तेव्हां परके लोक द्वेष करण्याच्या लायकीचेच आहेत अशी माझ्या मनाची समजूत मी घालीत होतों. दुसऱ्या राष्ट्रांत घडणारे अत्याचार, त्यांचा रानटीपणा, त्यांचे क्रौर्यादि गुण, या गोष्टी

मनांत आणून, यापेक्षां माझें राष्ट्र किती तरी वरिष्ठ प्रतीचें आहे, असा विचार माझ्या मनाला मी सुचवीत असें; पण ही मोठी चूक आहे, असें माझ्या लक्षांत पुढें आलें. देशबांधवांवर प्रेम करण्यापेक्षांहि परकीयांशीं बंधुभाव जोडणें अधिक अगत्याचें आहे, ही गोष्ट माझ्या लक्षांत आली. माझ्या आत्मकल्याणाच्या मार्गांत ही गोष्ट विघ्न करणारी आहे, असें मला दिसून आल्यावर माझा पूर्वीचा आचारमार्ग कायम ठेवण्याची छाती मला होईना. माझ्या देशबांधवांचें जें कल्याण, तेंच माझें कल्याण, ही भावना म्हणजे एक भयंकर पाशच होय. जगांतील अखिल मानवजातीच्या कल्याणाशीं माझें कल्याण बांधलें गेलें आहे, हा विसर जेव्हां आपणास पडतो, तेव्हांच एक भयंकर पाश आपणांभोंवतीं निर्माण होतो. देशांच्या मनुष्यनिर्मित सरहद्दींमुळें माझ्या प्रेमालाहि एकादी सरहद्द मीं कां निर्माण करावी ? एकाद्या सरकारी हुकुमानें मी अमुक देशाचा, असा निश्चय मनांत करून तेवढ्या लहानशा मर्यादेंत स्वतःला मीं कां कोंडून घ्यावें ? अखिल मानवजातीशीं जें माझें ईश्वरनिर्मित ऐक्य आहे, तें मनुष्यनिर्मित सरहद्दींनीं भंग पावत नाहीं, ही गोष्ट माझ्या लक्षांत आतां आली आहे. जगांतील सर्व मनुष्यें सारखींच असून त्या सर्वांत बंधुत्वाचें सारखेंच नातें आहे. देशाभिमान या नांवाचा जो भयंकर भ्रम मनुष्यजातीवर लादला जातो, त्यांतूनच परस्पर द्वेष, भांडणें आणि लढाया उपस्थित होऊन प्रचंड क्रांत्या व उत्पात हीं जगावर कोसळतात, या गोष्टी माझ्या डोळ्यांनीं मीं पाहिल्या आहेत."

"माझ्या तारुण्याच्या काळीं, माझ्या अंगीं असलेला देशाभिमान स्वाभाविक नसून एकाच धर्तीच्या एकसारख्या दिलेल्या शिक्षणामुळें केवळ कृत्रिमपणानें माझ्या अंगीं तो मुरविला होता, हें माझ्या लक्षांत पुढें आलें. अमुक लोकांपासून आपण वेगळे आहों, त्यांचें शत्रुत्व आपण करावें, या भावनेचें बाळकडू जन्मापासून मला मिळाल्यामुळें माझी स्वाभाविक विस्तृत भावना नष्ट होऊन तिच्या जागीं देशाभिमानाची आकुंचित भावना कृत्रिमपणें माझ्या मनांत उत्पन्न झाली. ही गोष्ट लक्षांत आल्यावर ख्रिस्ताच्या आज्ञेची खरी किंमत मला कळली. 'आपल्या

शत्रूचेंहि हित करा.' 'स्वबांधवांप्रमाणेंच शत्रूशींहि आचरण करा' 'तुम्ही एकाच बापाचीं लेंकरें आहां' आणि 'तुमचा पिता ज्याप्रमाणें सगळ्यांकडे समदृष्टीनें पाहतो, त्याचप्रमाणें तुम्हीहि समदृष्टि ठेवा.' असो उपदेश ख्रिस्तानें कां केला, याचें रहस्य आतां माझ्या लक्षांत आलें."

"जगांतील यच्चयावत् मानवकुलाशीं माझें ऐक्य आहे. हा सिद्धांत मनुष्याला पटल्यावांचून आत्मकल्याणाचा दुसरा कोणताहि मार्ग नाहीं, अशी माझी खात्री आतां झाली आहे. हा सिद्धांत माझ्या बुद्धीला आतां पूर्णपणें पटला आहे. हा सिद्धांत पटल्यानंतर बरें काय आणि वाईट काय ? व कमी प्रतीचें काय व अधिक प्रतीचें काय? हें ठरविण्याची माझी कसोटीहि बदलली. हा माझा देश, हे माझे बांधव, हें माझें सरकार, अशा अकुंचित भावना माझ्या ठिकाणीं होत्या, तोंपर्यंत परकीयांचें नुकसान करून आणि त्यांना तरवारीच्या बडग्याखालीं चेंचून टाकून आत्मीयांचें कल्याण करावें, हा मार्ग चांगला असें मला वाटत होतें; पण या भावना नाहींशा झाल्यावर हा मार्ग मला अत्यंत तिरस्करणीय आणि उपहासास्पद वाटूं लागला. एकाद्यानें आपला रशियनपणा टाकून आणि दुसऱ्या देशांत जाऊन दुसऱ्याचें राष्ट्रीयत्व त्यानें पत्करल्याचें मीं ऐकलें, तर त्यानें हें मोठें निर्लज्जपणाचें कृत्य केलें, असें पूर्वीं मला वाटत होतें; पण आतां तसें न वाटतां, ही गोष्ट त्याच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष म्हणून मला पटली."

"क्वचित् प्रसंगीं माझ्या मनाला या तत्वाचा विसर पडून परदेशीय माझे रशियन बांधव मला अधिक प्रिय वाटतात व क्वचित् प्रसंगीं जगाच्या चढाओढींत रशियनांचा जय व्हावा, असेंहि मला वाटतें; पण अशी मनःस्थिति क्षणमात्र रहाते न रहाते तोंच, या विचारांच्या पाशांचें भयंकर स्वरूप माझ्या लक्षांत येतें. हा पाश माझा व इतरांचा नाश करणारा आहे, हें ताबडतोब लक्षांत येऊन त्यापासून मी दूर सरतों."

"अशा स्थितींत अमुक एक राष्ट्र अथवा अमुक एक साम्राज्य ही विशेष संस्था आहे, इतर जगापासून तिचें अस्तित्व स्वतंत्र आणि भिन्न आहे, ही गोष्ट कबूल करणें, मला शक्य नाहीं. यामुळें दोन देशांत तंटा

लागला असतां त्यांपैकीं एकाद्याची बाजू धरून त्याच्या तर्फे लेख लिहिण्याचें काम माझ्यानें होणार नाहीं. जेथें लेख लिहिण्याची सुद्धां मारामार तेथें प्रत्यक्ष हातानें मदत करावयाची गोष्टच बोलावयास नको. हा देश माझा आणि हा देश तुझा या भेदाच्या पायावर ज्या तंट्याची उभारणी झाली असेल, त्या तंट्याशीं कसल्याहि प्रकारचा संबंध माझ्यानें ठेववणार नाहीं. मग हा तंटा आयात मालावरील कराच्या बाबतींत असो अथवा शस्त्रास्त्र सामग्रीचा असो. दारूगोळ्याच्या कारखान्यांत अथवा दुसरीं कसलींहि शस्त्रें घडविण्याच्या कारखान्यांत काम करणें, माझ्यानें होणार नाहीं, मग प्रत्यक्ष युद्धांत मी हातीं शस्त्र धरणार नाहीं, हें निराळें सांगावयाला नको. असल्या गोष्टी जे कोणी करीत असतील, त्यांना कांहीं मदतीहि मी करणार नाहीं."

"माझें कल्याण कशांत आहे, हें मला पूर्णपणें समजून चुकलें आहे, आणि त्या मार्गाच्या सत्यतेबद्दल माझी पूर्ण खात्री झाली आहे. याकरतां त्या मार्गापासून जी जी गोष्ट मला भ्रष्ट करील, ती मी कधींहि करणार नाहीं."

"हा मार्ग चांगला आहे, एवढें नुसतें समजण्यांतच कांहीं फायदा नाहीं, तर त्याप्रमाणें प्रत्यक्ष आचरण मला केलें पाहिंजे. अशा रीतीनें मी चाललों, तर आज निरर्थक म्हणून वाटणाऱ्या माझ्या जीवितार्चे सार्थक होईल."

वरील उताऱ्यांत टॉलस्टॉय यांनीं दर्शविलेलीं तत्वें पवित्र आचरणाच्या दृष्टीनें अगदीं खरीं आहेत, यांत शंका नाहीं. गतानुगतिकतेनें चालत आलेल्या पंथांतील व्यंगें बाहेर ओढून त्यांचा स्फोट करण्याचें काम टॉलस्टॉय यांनीं उत्तम प्रकारें केलें आहे. धर्मांची उत्पत्ति जगांत कशाकरितां झाली, याचें रहस्य त्यांनीं पूर्णपणें विशद केलें आहे. धर्म म्हणजे शारीरिक कवाईत नव्हे, तो अंधविश्वासाचाहि भाग नसून व्यक्तीच्या उच्चतम कल्याणाचा मार्ग दाखविण्यासाठींच धर्माचा अवतार आहे, हें तत्व त्यांनीं स्पष्ट केलें आहे. त्याचप्रमाणें समाजरचना अथवा राज्यपद्धति यांची रचनाहि धर्ममार्गाला विध्वंसक नसून पोषक असली पाहिजे, हें आपलें

मतहि त्यांनीं स्पष्ट केलें आहे. असें करतांना पूर्वींच्या अनेक हटवादी तत्वांचा विध्वंस त्यांना करावा लागला. केवळ तरवारीच्या जोरावर राज्य-पद्धतींत जीं तत्वें जिवंत राहूं शकतात, त्यांच्या योगें धर्ममार्ग विकृत होऊन मानवी जन्माचें साफल्य साधत नाहीं. याकरतां अशा तत्वांचा विध्वंस केला पाहिजे, असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें होतें. जीं हटवादी तत्वें त्यांनीं नाहींशीं केलीं, त्या जागीं आपलीं दुसरीं नवीं तत्वें स्थापन केलीं आहेत. त्यांनीं सांगितलेल्या तत्वांत व्यक्तिदृष्ट्या कांहीं दोष नाहीं; पण सामान्य जनसमूहाला तीं सरसहा लागू करावींत, असें टॉलस्टॉय म्हणतात, तेव्हां पूर्वींच्या हटवादाच्या जागीं दुसरा नवा हटवाद मात्र ते स्थापन करतात, असें म्हणणें भाग पडतें. अप्रतिकार, अराजक, कायद्यांचें नास्तित्व, आणि विशिष्ट हक्कांचें नास्तित्व हीं टॉलस्टॉय यांचीं प्रमुख तत्वें होत. प्रचंड जनसमूहांतील व्यक्तींचा सरसनीरसपणा न पहातां आणि त्या परस्परांची सापेक्ष योग्यता लक्षांत न घेतां एकाद्या समाजावर हीं तत्वें लादलीं, तर समाजाचें कल्याण अधिक होईल कीं अकल्याण अधिक होईल याचें निश्चित उत्तर कोण देणार ?

आपली सारी विचारसरणी टॉलस्टॉय यांनीं तर्कशास्त्राच्या दृष्टीनें इतकी शुद्ध रचली आहे कीं, तींत खोड काढण्यास जागा नाहीं.

एकादें तत्त्व आपल्यास पटतें असें दिसलें, कीं त्याच्या पुष्टीकरणार्थ अनेक विचार शोधून काढावेत, असा टॉलस्टॉय यांचा स्वभाव होता. अशा स्थितींत त्या तत्त्वाला पोषक अथवा साधक अशीं अनेक प्रमाणें ते शोधून काढीत; पण त्याला बाधक अशा एकाहि गोष्टीकडे त्यांचें लक्ष जात नसे. यामुळें साधक मुद्यांचा विचार आणि विस्तार त्यांनीं जितका केला आहे, त्याच्या चतुर्थांशानेंहि: बाधक मुद्यांचा उहापोह त्यांनीं केलेला नाहीं. असो.

परमेश्वराची प्रार्थना करणें हा मार्ग टॉलस्टॉय यांस पसंत होता; तथापि परमेश्वराचें व्यक्तिविशिष्ठत्व त्यांना मान्य नव्हतें. ही गोष्ट निश्चितपणें सांगणें आपल्या बुद्धीबाहेरचें आहे, असें ते म्हणतात. परमेश्वराचें व्यक्ति-

विशिष्ट रूप त्यांच्या बुद्धीला पटत नसल्यामुळें केवळ ऐहिक कल्याणासाठीं त्याची प्रार्थना करणें, त्यांना मान्य नाहीं.

परमेश्वराची प्रार्थना करण्याचे मुख्य मार्ग दोन आहेत, असें टॉलस्टॉय म्हणतात. जीं धर्मतत्त्वें स्वतः बुद्धीला पटलीं असतील त्यांचें अखंड मनन करून त्यांचा निदिध्यास चित्ताला ठेवणें व त्याप्रमाणें प्रत्यक्ष वागण्याचा यत्न अविरतपणें करणें, हा परमेश्वराच्या प्रार्थनेचा एक मार्ग होय. त्याचप्रमाणें विशिष्ट प्रसंगीं एकांत सांपडला असतां व परमेश्वरासन्निध आपण आहों, अशी भावना उदय पावत असतां त्या प्रसंगीं सद्गदित अंतःकरणानें त्याची प्रार्थना करणें, हा दुसरा मार्ग होय.

इ. स. १९०१ सालीं आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात, "ज्या मार्गानें मी चालतों तो मार्ग सर्वांना सारखाच कल्याणप्रद होईल असें नाहीं. अथवा त्याच मार्गानें सर्वांना गेलें पाहिजे, अशीहि आवश्यकता नाहीं. मी स्वतः रोज सकाळीं परमेश्वराची प्रार्थना एकांतांत करतों आणि तिचा आशय पुढीलप्रमाणें असतो."

"हे स्वर्गस्थ परमेश्वरा, तुझें नांव पवित्र असो. अनिर्वचनीय प्रेम हेंच तुझें नांव. प्रेममय अंतःकरणानें युक्त असें जीवित जो धारण करतो, त्याच्या हृदयांत परमेश्वर असून परमेश्वराच्या हृदयांत तो असतो. बाह्य चक्षूंनीं परमेश्वराला कोणींहि पाहिलें नाहीं, पण परस्पर शुद्ध प्रेमाचा भाव जेथें असतो, तेथें परमेश्वराचा निवास असतो. परमेश्वराचें प्रेम मानवी अंतःकरणांत पूर्णता पावतें. मी ईश्वरभक्त आहें, असें तोंडानें म्हणून आपल्या बंधूचा द्वेष जो करतो, त्याला परमेश्वर दिसणार नाहीं. डोळ्यांनीं प्रत्यक्ष दिसणाऱ्या बंधूवरहि ज्याचें प्रेम नाहीं, त्याचें प्रेम न दिसणाऱ्या परमेश्वरावर कसें जडेल ? प्रेमाचा उदय परमेश्वरापासून होतो. याकरतां ज्याच्या अंतःकरणांत प्रेम आहे, त्यालाच ईश्वराची भेट होते. कारण प्रेम म्हणजेच परमेश्वर."

"परमेश्वरा, पृथ्वीवर तुझें साम्राज्य येवो, परमेश्वरासन्निध जाण्याचा यत्न करा, म्हणजे त्याचे सर्व गुण तुम्हाला प्राप्त होतील. परमेश्वराचें साम्राज्य तुमच्या अंतःकरणांतच आहे."

" परमेश्वरा, या जगांत आणि स्वर्गांत तुझ्या इच्छेचीच पूर्ती होवो. मी परमेश्वराच्या हृदयांत आहें आणि परमेश्वर माझ्या ठिकाणीं आहे, असें मला मनःपूर्वक वाटतें काय ? माझ्या रोजच्या आयुष्यक्रमांत माझ्या प्रेमाला अधिकाधिक भरती यावी, अशी माझी वागणूक आहे काय ? आज मी जिवंत आहें; पण मृत्यु कदाचित् मला उद्यांच गांठील, ही आठवण मला आहे काय ? केवळ स्वार्थ साधण्यासाठीं अथवा ऐहिक कीर्तीसाठीं जीवनाशा मी धरीत नसून परमेश्वराच्या इच्छेच्या पूर्ततेसाठीं मी जीवित धारण करतों, हें खरें आहे काय ? "

" परमेश्वरा, माझ्या इच्छा मागें पडून तुझ्या इच्छेची पूर्ती होवो. माझ्या हृदयांतून माझी इच्छा समूळ नष्ट होऊन तेथें तुझी इच्छा येवो. 'मी' जाऊन तेथें 'तूं' येवो."

" परमेश्वरा, दुसऱ्यांच्या अपराधांची क्षमा आम्ही जशी करतों, तशी आमच्या अपराधांची तूं क्षमा कर. तुम्हीं आपल्या बंधूचे अपराध पोटांत घेतले नाहींत, तर परमेश्वरहि तुमचे अपराध पोटांत घालणार नाहीं."

" परमेश्वरा, या जगांतील भुलविणाऱ्या वस्तूंपासून आम्हांस दूर ठेव. कोणत्याहि प्रकारची आशा, ईर्षा, प्रेमाभाव, विषयवासना, आणि ऐहिक कीर्ति यांजपासून सावध रहा. आपलीं दयाशीलतेचीं कृत्यें कोणाच्या नजरेस पडतील, अशा रीतीनें करूं नका. तुमच्या डाव्या हातानें घडलेलें कृत्य उजव्या हाताला कळूं नये. एकादें सत्कृत्य करीत असतां जो कोणी मागें वळून पहातो, तो परमेश्वराच्या राज्यांत जाण्यास योग्य नाहीं. तुम्हाला कोणीं शिव्या दिल्या, तर तुम्ही 'आनंदगीतें गा."

" अंतःकरणांतून उद्भवणाऱ्या वाईट विकारांबद्दल फार सावधगिरी बाळगा. दुर्विचार, अभक्ति, विषयवासना आणि असत्य विचार, यांचा परिणाम काय होईल, हें अंतःकरणांत आठवीत जा. आपल्या अखिल बांधवांवर जो प्रेम करतो, त्यानें मृत्यु जिंकला आहे; जो आपल्या बांधवावर प्रेम करीत नाहीं, त्याला चिरचैतन्याची प्राप्ती होणार नाहीं."

अशा प्रकारची प्रार्थना रोज करीत असतो. माझी वागणूक आग

माझी मनःस्थिति यांशीं माझ्या प्रार्थनेचा मेळ पडावा, असा यत्न मी करीत असतों. कित्येक वेळां प्रार्थना करीत असतां माझें अंतःकरण कोमल भावनेनें युक्त असतें, तर कित्येक वेळां तें अगदीं कोरडें असतें."

"या नित्याच्या प्रार्थनेशिवाय इतर वेळींहि एकांत सांपडल्यास मी प्रार्थना करतों. साधुसंतांच्या उद्गारांचें परिशीलन मी करतों. हे सारे साधुसंत केवळ ख्रिस्तीधर्मांतलेच नसून इतर धर्मांतलेहि असतात. त्याचप्रमाणें केवळ प्राचीन संतांचे विचार लक्षांत घ्यावयाचे आणि अर्वाचिनांचा त्याग करावयाचा असाहि माझा हट्ट नाहीं. परमेश्वराच्या दृष्टीनें माझ्या अंतःकरणांत वाईट गोष्ट कोणती आहे, हें शोधून काढण्यासाठीं व ती गोष्ट तेथून नाहींशी करण्यासाठीं मी नित्य मनन करीत असतों."

"मी इतर लोकांत वावरतों व हातानें काम करीत असतों, तेव्हांहि परमेश्वराची प्रार्थना करण्याचा यत्न मी करीत असतों. त्याचप्रमाणें मी जेव्हां विकारवश होतों तेव्हांहि त्याची आठवण करण्याचा प्रयत्न करतों. माझें चित्त विकारवश होतें, तेव्हां एकांतीं प्रार्थना करीत असतां त्याची स्थिति कशी होती, याची आठवण मी करतों. माझी प्रार्थना जेव्हां खरोखर अंतःकरणपूर्वक झालेली असते, तेव्हां दुर्विचारापासून मी लवकर पराङ्मुख होतों."

---

## प्रकरण दुसरें.

# बादशहांस पत्र.

टॉलस्टॉय यांचें चित्त धर्मविचारांकडे इतकें पुरें वेधलें कीं, बाकीच्या सर्व कार्यांचा पूर्ण विसर त्यांना पडला. शेतकीकडेहि त्यांचें लक्ष राहिलें नाहीं. वळू बाळगून घोड्यांची पैदास त्यांनीं सुरू केली होती; पण त्यांचा हा उद्योगहि मागें पडला. अशा रीतीनें इस्टेटीकडे त्यांचें दुर्लक्ष झाल्यामुळें त्यांच्या कारभाऱ्यांचें सहजच फावलें. त्यांच्या एकंदर तीन मिळकतींचें उत्पन्न पूर्वीच्या दशांशाइतकेंहि येईनासें झालें. यामुळें उत्पन्न

आणि खर्च यांचा मेळ अर्थातच पडेनासा झाला. त्यांचें कुटुंब पूर्वीपेक्षां किती तरी वाढलें होतें. आणि वडील मुलें मोठीं होत चालल्यामुळें त्यांच्या शिक्षणाचा बोजाहि अधिकाधिक होत चालला होता. याशिवाय टॉलस्टॉय यांचा गोड स्वभाव आणि त्यांचा मनमिळाऊपणा यामुळें पाहुण्यांची रहदारीहि पूर्वीपेक्षां कितीतरी अधिक झाली होती. तशांतून टॉलस्टॉय यांचा स्वभावहि उदार असल्यामुळें पाहुण्यांच्या अथवा दुसऱ्या कोणत्याहि बाबतींत आखडता हात त्यांनीं केव्हांच घेतला नाहीं. अशा रीतीनें खर्चाचीं तोंडें एका बाजूनें एकसारखीं वाढत असतां उत्पन्न मात्र कमी होत चाललें. तेव्हां उत्पन्नाचा सारा कारभार त्यांच्या पत्नीला आपल्या हातीं घेणें भाग पडलें. जमाखर्चांची तोंडमिळवणी करतां करतांच तिचा जीव अगदीं मेटाकुटीस येई. त्यांतून टॉलस्टॉय यांच्या मानसिक श्रमातिरेकाचा परिणाम त्यांच्या शरिरावरहि होऊं लागल्यामुळें कौंटेस बाईलाहि आणखी एक नवीनच काळजी उत्पन्न झाली.

तारीख ३ फेब्रुआरी सन १८८१ रोजीं आपल्या बहिणीला लिहिलेल्या पत्रांत कौंटेसबाई म्हणतात, “ अलीकडे लियो यांचें डोकें अतिशय दुखत असतें; पण त्यांचा विचार आणि त्यांचें लेखन हीं अद्यापि तशींच सुरू आहेत. डोस्कोएस्की हे मरण पावल्याचें वृत्त लियो यांना कळलें, तेव्हांपासून त्यांची वृत्ति अगदींच उदास बनून गेली आहे. घरच्या यजमानांचीच स्थिति अशी असल्यामुळें आम्हां इतर माणसांस तरी बरें कसें वाटावें ? डोस्कोएस्कीप्रमाणेंच आपणांवरहि मृत्यूचा अवचित घाला पडेल, असें मनांत येऊन लियो यांची वृत्ति अगदीं फाटून गेली आहे. दिवसच्यादिवस एक अक्षर सुद्धां ते कोणापाशीं बोलत नाहींत. त्यांचे केंस करडे होऊं लागले असून त्यांची शरीरप्रकृतीहि ठीकशी दिसत नाहीं.”

तारीख १ मार्च सन १८८१ रोजीं पिटर्सबर्ग येथील क्रांतिकारक पक्षांतील एका चळवळ्यानें बादशहा दुसरे आलेक्झांडर यांचा खून केला. ही बातमी टॉलस्टॉय यांस कळली, तेव्हां त्यांना अतिशय खेद झाला. त्यांना असल्या गोष्टीचा मनापासून तिटकारा होता; पण बादशहांच्या

खुनापेक्षांहि त्यांना ज्या गोष्टीचें अधिक वाईट वाटलें, ती गोष्ट त्या खुनानिमित्त पांचजणांना झालेली फांशीची शिक्षा होय. या पांचजणांत सोफीपेरोस्की या नांवाची एक स्त्रीहि होती. या वेळची हकीकत पुढें बऱ्याच वर्षांनीं लिहीत असतां टॉलस्टॉय म्हणतात,—

"त्या पांच खुनी इसमांची चवकशी व त्यांना झालेली फांशीची शिक्षा, या गोष्टींचा परिणाम माझ्या चित्तावर अतिशय झाला. त्या पांच मूर्ति माझ्या डोळ्यांसमोरून हालेनात. या खुनी लोकांचेंहि एकवार असो; पण खुनाला प्रतिखून म्हणून यांना फांसावर चढविण्याची जे लोक तयारी करीत होते, त्यांच्या मनःस्थितीबद्दल मला फारच वाईट वाटलें. या लोकांत तिसऱ्या आलेक्झांडर बादशहांचीहि गणना व्हावी, हें तर सर्वांत अधिक वाईट. त्या पांच इसमांना त्यानें जीवदान दिलें असतें, तर त्याच्या चित्ताला केवढें समाधान झालें असते! अखेरपर्यंत कांहींतरी प्रकार घडून हे पांच इसम बचावतील अशी वेडी आशा माझ्या मनाला वाटे. अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत घोळत असतां एके दिवशीं दुपारचें जेवण झाल्यावर मी सहज कोंचावर पडलों. पडल्यापडल्या मला केव्हांतरी अचानक झोंप लागली. त्या पांच खुनी इसमांच्या फांशीची तयारी चालली आहे, असें स्वप्नीं मीं पाहिलें. मी जणूं काय पूर्ण जागा असून ती सारी तयारी मी पहात आहें, असें मला दिसलें. इतक्यांत काय झालें कोणास ठाऊक, मलाच फांशी देणार असून त्यासाठीं ही तयारी चालली आहे, असें मला वाटूं लागलें. इतक्यांत हा रंग पुन्हां बदलून ही तयारी त्या पांचजणांसाठींच आहे, असें मला दिसलें. ते फांशी जात होते ते बादशहांच्या किंवा न्यायाधिशाच्या हुकुमानें फांशी जात नसून माझ्याच हुकुमानें फांशी जात होते! एवढा भाग दृष्टीस पडल्याबरोबर मी भयानें थरथर कांपतच जागा झालों आणि तावडतोब बादशहास पत्र लिहिलें."

या पत्रांतील मजकूर जसा आज उपलब्ध आहे, तसाच घेऊन त्यांतील पुढील उतारे दिले आहेत.

"मी प्रस्तुत पत्राचा लेखक एक क्षुद्र, अप्रसिद्ध, दुर्बळ आणि अगदीं यःकश्चित असा मनुष्य आहें. सांप्रतच्या अत्यंत गुंतागुंतीच्या आणि अत्यंत

बिकट अशा परिस्थितींत रशियाच्या बादशहानें कसें वर्तन करावें, याचा उपदेश त्याला करण्यास मी पुढें सरसावलों आहें. ही माझी वर्तणूक किती चमत्कारिक, किती अयोग्य व धाडसाची आहे, हें मला समजतें आणि हें समजूनहि पत्र मी लिहीत आहें."

"हें पत्र अगदीं एकीकडच्या अशा खेड्यांतून मी लिहीत असल्यामुळें कोणतीहि पक्की विश्वसनीय अशी बातमी मला मिळालेली नाहीं. वर्तमानपत्रांतील मजकूर आणि लोकांतील अफवा एवढाच माझ्या माहितीचा आधार. यामुळें वस्तुस्थितीला सोडून आलेला असा निरर्थक मजकूरहि या पत्रांत कदाचित् मी गोवीन. तसें असेल तर या फाजील धाष्टर्याची मला क्षमा करावी. हें पत्र लिहिण्यास मी हातीं घेत आहें, त्याचें कारण स्वतःच्या मोठेपणाचा फाजील विश्वास हें नसून प्रस्तुत पत्र मीं लिहिलें नाहीं, तर मी कर्तव्यभ्रष्ट होईन, असें मला वाटतें हें होय. माझ्या मानव बंधूंची जी सेवा माझ्या हातून घडावयास पाहिजे होती, ती न घडल्यामुळें माझ्या पदरीं पुष्कळ अपराध अगोदरच पडला आहे. आणि प्रस्तुत कर्तव्य मीं न केलें, तर माझा अपराध अधिकच वाढेल, अशी भीति वाटल्यामुळेंच हें पत्र मी लिहीत आहें."

"बादशहाला अर्ज करावयाचा म्हणजे त्यांत मिथ्या स्तुतींचीं फुलें आणि खोटें वाक्पाटव यांची रेलचेल असावयाची. अशी ठरीव पद्धत आहे. मी या पद्धतीनें लिहिणार नाहीं. कारण अशानें भावना आणि विचारपद्धति हीं दोन्ही दूषित होतात व पडावा तसा प्रकाश त्यांजवर पडत नाहीं. याकरतां एक सामान्य मनुष्यप्राणी दुसऱ्या सामान्याशीं ज्या पद्धतीनें बोलतो, त्या पद्धतीचा अंगीकार मीं केला आहे."

"आपण मनुष्यप्राणि आहां आणि रशियाचे बादशहाहि आहां, या दोन नात्यांनीं आपल्याबद्दल माझ्या ठिकाणीं जी पूज्य भावना आहे, ती व्यक्त होण्यास असल्या अलंकाराची जरूर तिला नाहीं, असें मला वाटतें."

"आपला पिता आणि रशियाचा झार हा दयाळू स्वभावाचा होता. लोककल्याणाच्या गोष्टी त्यानें बऱ्याच केल्या असून आपल्या प्रजेचें बरें

व्हावें, अशी त्याची इच्छा होती. अशा दयाळू गृहस्थाचा अमानुषपणें खून झाला आहे. हा खून केवळ त्याच्या शत्रूंनीं केला, असें नसून सध्यांच्या राज्यशासन पद्धतीच्या शत्रूंनीं तो केला आहे. हा खून करण्यांत मनुष्यजातीचें हित आपण साधीत आहों, अशी त्यांची कल्पना झाली आहे."

"त्या बादशहाच्या जागीं आपण आलां आहां आणि शासनपद्धतीचे हे शत्रू आपणांसमोर उभे आहेत."

"ज्याअर्थीं आपल्या वडिलांच्या जागीं आतां आपण आहां त्याअर्थीं त्यांचे शत्रू ते आपलेहि शत्रू होत. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे मनुष्यजातीच्या काल्पनिक हिताकरितां आपणांवरहि हत्यार चालविण्याची इच्छा त्यांना होईल."

"आपल्या पित्याचा वध ज्यांनीं केला, त्यांचा सूड घेण्याची इच्छा आपल्या मनांत उद्भवली असेल. किंबहुना असा सूड उगविणें हें आपलें एक कर्तव्यच होय, असें आपणांस वाटत असेल. बादशहानें असा सूड घ्यावा, ही लोकांचीच इच्छा आहे, असेंहि कदाचित् आपणांस वाटत असेल. अशा प्रकारच्या विचारांनीं आपल्या बुद्धीला मोह पडण्याचा संभव आहे; पण मनुष्यजातीशीं आपलें आद्य कर्तव्य बादशहा या नात्यानें नसून केवळ मनुष्य या नात्यानें आहे, हें लक्षांत घ्यावें. अशा प्रसंगीं ख्रिस्तानें काय आज्ञा केली आहे, हें ध्यानांत घेऊन तदनुरूप आपण वर्तन केल्यास या अनिवार मोहापासून आपली सुटका होईल."

"ख्रिस्तानें जे सद्विचार सांगितले आहेत, त्यांपासून जग अद्यापि फार लांब आहे, ही गोष्ट मला ठाऊक आहे. मोहक गोष्टींचा पाश दूर सारणें किती अवघड आहे, याचा अनुभव मला स्वतःला आहे. याकरतां असें वर्तन करण्यास लागणारें धैर्य बादशहानें दाखवावें, अशी अपेक्षा करणें योग्य नाहीं, हेंहि मला कळतें; तथापि असाधूशीं साधुत्वाचें वर्तन करणें, हेंच योग्य आहे. असें पुन्हां म्हटल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं."

"मानवी आणि ईश्वरी कायद्याविरुद्ध वर्तन करून ज्यांनीं घोर अप-

राध केले, त्यांना क्षमा करणें, हें मौर्ख्याचें लक्षण आहे, असेंहि पुष्कळांस वाटत असेल. 'त्यांना क्षमा करूं नका' 'हा विषारी कांटा उपटून टाका' 'हा अग्नि विझवून टाका.' असाहि उपदेश पुष्कळ लोक करतील, पण तत्वदृष्ट्या हें मत सिद्ध करण्याचा यत्न ते करूं लागले, तर मूर्खपणा आणि दुर्बुद्धि हीं आमच्या बाजूस नसून त्यांच्याच पक्षाला आहेत, असें त्यांना आढळून येईल."

"सुमारें वीस वर्षांपूर्वी तरुणांचा एक संघ तयार झाला. चालू समाज शासनपद्धति आणि सरकार यांचा द्वेष हा संघ करीत होता. हल्लींच्याहून कांहीं तरी निराळी पद्धति अस्तित्वांत असावी, असें या संघाला वाटत होतें. अथवा समाजाला धरबंद म्हणून कांहींच नसावा, अशीहि अराजक कल्पना त्याच्या चित्तांत वसत असेल. या कल्पनेला मूर्तरूप देऊन समाजाची नवी घटना अस्तित्वांत आणण्यासाठीं आगी लावणें, चोऱ्या करणें, खून करणें, इत्यादि अमानुष प्रकार त्यानें सुरू केले. सरकार आणि अराजक संघ यांजमधील हा तंटा गेलीं वीस वर्षें सुरू आहे; पण सरकारच्या भगीरथ प्रयत्नानींहि अराजकतेचें निर्मूलन न होतां दिवसें-दिवस नवे नवे कोम तिला फुटत आहेत, आणि या वाढीबरोबरच या लोकांचा दुष्टपणा आणि धाडस हीं वाढत असून राज्याच्या सुरक्षितपणाला दिवसेंदिवस अधिक धोका येत आहे."

"या भयंकर प्लेगाचें उच्चाटन करण्याकरतां धडपड करणाऱ्या अधिकाऱ्यांनीं दोन मार्गांचा स्वीकार केला. भयंकर शिक्षा देऊन समाजाचा हा नासका भाग कापून टाकणें हा एक मार्ग, आणि रोगाला मोकळें सोडून त्याची तीव्रता कायद्याच्या बंधनांनीं कमी करणें, हा दुसरा मार्ग. लोकांस कांहीं सवलती देणें आणि कायदे सुधारून लोकांस संतुष्ट करणें हे उपाय या दुसऱ्या मार्गांत येतात."

"केवळ व्यवहाराच्या जड दृष्टीनें या प्रश्नाचा विचार जे करतात, त्यांना एवढे दोनच मार्ग मोकळे आहेत. फांशीची शिक्षा, पोलीस, सैन्य, सेन्सार हे एका बाजूस व कायद्याची सौम्य अम्मल-बजावणी, राजसत्तेंत लोकांचा अंशतः प्रवेश, आणि हक्कांच्या देणग्या, हीं दुसऱ्या बाजूस.

अशा स्थितींत केवळ जड दृष्टीचा अधिकारीवर्ग चालत असतो. पण हे दोन्ही उपाय आजपर्यंत अपेशी ठरले आहेत. याकरतां तिसरा एकादा उपाय आहे कीं काय, याचें चिंतन करणें आतां अवश्य आहे. परमेश्वरानें विवेकबुद्धीच्या द्वारें दिलेले कायदे व्यवहारांत आणणें, हा तिसरा उपाय आहे. हा उपाय तुच्छ समजून तो उपेक्षणीय मानूं नका."

"आपल्या शत्रूंनाहि क्षमा करा, असा उपदेश आपल्या अनुयायांस ख्रिस्तानें केला आहे. या उपदेशाचा अवलंब करण्याची वेळ हीच आहे. ही वेळ मोठ्या आणीबाणीची आहे. एकादा मनुष्य आसन्नमरण स्थितींत असावा, त्या स्थितींत राशियाचा देश आणि आपण आज आहां. आसन्न मरण स्थितींतल्या रोग्याला अनावश्यक अथवा घातक अशा औषधांचा थोडासाहि अंश चुकीनें पोंहोंचला, तर त्याचा घात तावडतोब होतो. अशा नाजूक वेळीं एका चुकीचीहि क्षमा काळ करीत नाहीं. हीच स्थिति सध्यांच्या प्रसंगींहि झाली आहे. चुकीचें असें एकहि कृत्य सरकारच्या हातून घडलें तर आमच्या साऱ्या भविष्याची कदाचित् राखरांगोळी होईल. जशास तसें हा न्याय मनांत आणून अथवा सूड उगविण्याच्या भरीस पडून एकादेंहि अपकृत्य सरकारनें केलें, तर साऱ्या देशाचें भयंकर नुकसान किती वेळ होत राहील, हें सांगवत नाहीं. अपराधी लोक सुद्धां न्यायासनासमोर आहेत. त्यांची चवकशी पुरी होऊन त्यांना शिक्षा सांगण्यास सुमारें एक पंधरवडा काळ लागेल आणि वर सांगितलेल्या तीन मार्गांपैकीं कोणता स्वीकारावा, याचाहि निकाल याच पंधरवड्यांत होईल. जशास तसें, हा न्याय स्वीकारल्यानें अथवा थोड्याशा सवलतींची देणगी लोकांस दिल्यानें रोग्याला आराम पडत नाहीं, ही गोष्ट आजपर्यंतच्या अनुभवानें सिद्ध झाली आहे. आतां ख्रिस्तानें सांगितलेला उपाय मात्र करावयाचा बाकी आहे. हा उपाय परमेश्वराच्या इच्छेप्रमाणें असून बादशहा या नात्यानें नव्हे, तर मनुष्य या नात्यानें आपण तो अमलांत आणावयाचा आहे."

"हे राजा, कांहीं भयंकर चुकीमुळें अराजक संघाच्या मनांत आपल्या वडिलांबद्दल भयंकर द्वेष उत्पन्न झाला आणि या घातक द्वेषा-

मुळेंच असल्या अमानुष अत्याचाराला तो संघ प्रवृत्त झाला. हा द्वेष अराजक संघाच्या नाशाबरोबर कदाचित् नाश पावेल. आपल्या वडिलांच्या दफनविधीबरोबरच या द्वेपालाहि मूठमाती मिळेल. आपल्या संघापैकीं कांहीं लोक मरण पावले, या दोषाचें खापर तो संघ कदाचित् गत बादशहाच्या डोक्यावर लादील. हा दोष आपल्या पदरीं पडणार नाहीं. आपल्या हातावर रक्ताचे डाग पडलेले नाहींत, आज ज्या नाजूक स्थितींत आपण आहां, ती स्थिति आपल्या हुद्यामुळें, उच्च स्थानामुळें उत्पन्न झालेली आहे. आपल्या चुकीमुळें ती उत्पन्न झालेली नाहीं. परमेश्वराच्या व विवेकबुद्धीच्या न्यायासनासमोर आपण अद्यापि निष्पाप आहां; पण आतां आपणांसमोर दोन मार्ग असून त्यांच्या नाक्यावर आपण उभे आहां. आणखी थोड्याच दिवसांनीं कोणता तरी एक मार्ग आपणांस निश्चित करावा लागेल. 'ख्रिस्तानें सांगितलेलीं तत्वें सत्य नसून त्या केवळ भाकड कथा आहेत, आणि राजशासनाच्या कार्यांत रक्ताचा सडा पडून मृत्यूचें साम्राज्य होणें अवश्य आहे,' या मताचा विजय होऊन त्याचे अनुयायी आपण बनलां, तर सध्यांच्या निष्कलंक, निष्पाप व कल्याणमय स्थितीला आपण अखेरचा रामराम ठोकाल. आणि राज्यरक्षणार्थ या नांवाखालीं तमोमय मार्गाचा अंगीकार करण्यांत येतो, त्या अंधतामिस्रांत आपण पडाल, व अखेरीस परमेश्वराच्या कायद्याचेहि उल्लंघन करणें योग्य आहे, असें म्हणूं लागाल."

"क्षमा! क्षमा करणें हेंच या वेळीं उचित आहे. दुष्टत्वाचा प्रतिकार चांगलेपणानें करावा. अशा शंभर लोकांवर तुम्हीं उपकार केला, तर त्यांतले कांहीं तरी बरेच लोक आपला दुष्ट मार्ग सोडून परमेश्वराकडे वळतील. आणि कोट्यावधी लोकांचीं अंतःकरणें आनंदाच्या आणि आर्द्रतेच्या भावनांनीं सकंप होतील. बादशहानें अशा प्रकारें आपल्या पित्याचा सूड न उगवितां असल्या नाजूक प्रसंगीं घालून दिलेल्या उदाहरणाचा इष्ट परिणाम कोट्यावधी लोकांच्या अंतःकरणावर घडेल."

"हे राजन्! या लोकांना आपल्या जवळ बोलावून आणि त्यांना द्रव्यदान करून त्यांची रवानगी अमेरिकेसारख्या एकाद्या ठिकाणीं आपण

केली, व अशा रीतीनें 'शत्रूवरहि प्रेम करा-प्रीति करा' हें खिस्ताचें वचन आपण खरें करून दाखविलें तर दुसऱ्यांना काय वाटेल, हें मला सांगता येत नाहीं; पण मी मात्र आपल्या द्वारींचा कुत्रा होऊन राहीन. आपला हा गरीब प्रजाजन आपला बंदा गुलाम होईल. आपण असे वागलां तर आपलें नांव जेव्हां जेव्हां माझ्या कानीं पडेल, तेव्हां तेव्हां माझें अंतःकरण प्रेमभरीत होऊन माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागतील. फार काय, पण, आपण खरोखरच असें वागाल, एवढ्या नुसत्या आशेनें सुद्धां माझ्या डोळ्यांतून या क्षणीं अश्रुपात होत आहे. अरे! मी एक मोठी चूक करीत आहें. 'इतरांच्या मनावर काय परिणाम होईल, हें मला सांगतां येत नाहीं.' असें मीं म्हटलें, ही केवढी मोठी चूक मीं केली? आपल्या या अशा वर्तनानें दया आणि प्रेम यांच्या पुरांत सारा राशिया बुडून जाईल, हें मला पक्कें ठाऊक आहे."

"क्रांतिकारक पक्षांतील लोकांना ठार करूनहि त्यांना निर्बीज करणें शक्य नाहीं. क्रांतिकारक पक्षांत संख्येचें महत्व नाहीं. त्यांत लोक थोडे आहेत कीं पुष्कळ आहेत हा मुद्दा महत्वाचा नाहीं, त्यांत त्यांचें ध्येय हाच भाग अत्यंत महत्वाचा आहे. आपल्या ध्येयाकडे ते केवळ देहाच्या जड दृष्टीनें पहात नसून चैतन्य रूपानें त्यांचें चिंतन ते करतात. या करतां या लोकांचें उच्चाटन करावयाचें असेल, तर ती गोष्ट नुसत्या जड मार्गांनीं कधींहि साध्य होणार नाहीं. चैतन्याशीं भांडावयास चैतन्यच पाहिजे. सर्वांना पुरेसें अन्न आणि स्वातंत्र्य व परस्पर बंधुभाव यांची जोड राशियाला करून देणें, हें या पक्षाचें ध्येय आहे. या पक्षाशीं भांडून त्याला नाहींसें करून टाकणें असेल, तर त्याच्या प्रतिपक्षानें त्याच्याहून अधिक मोठें ध्येय पुढें ठेविलें पाहिजे. क्रांतिकारक पक्षाच्या ध्येयाचा अंतरभाव होऊनहि ज्याचा विस्तार शिल्लक राहील, इतकें मोठें ध्येय प्रतिपक्षाचें असलें पाहिजे. इंग्लंड आणि फ्रान्स या देशांतहि हा पक्ष आहे. तेथलीं सरकारेंहि चालू वहिवाटीच्या मार्गानें भांडत आहेत आणि त्या सरकाराचे प्रयत्न आजवर एकसारखे निष्फळच होत आले आहेत."

" या लोकांच्या ध्येयाविरुद्ध भांडण्याला समर्थ असें एकच ध्येय आहे. हें ध्येय म्हणजे प्रेम, क्षमा आणि अपकाराला उपकार! या ध्येयाच्या पोटांत क्रांतिकारक पक्षाचें ध्येय गडप होऊन जाईल. कारण क्रांतिकारक पक्ष सुद्धां समता आणि बंधुभाव याचा उच्चार तोंडानें मात्र करतो; पण त्याची क्रिया त्या तत्वाला सोडून होते. यामुळें त्याच्या हातून त्या तत्वाचा उपमर्द होत असतो. ख्रिस्तानें सांगितलेल्या ध्येयाचा आणि प्रेमाचा एक शब्द आपल्या उत्तुंग स्थानावरून खालीं येईल, आणि ख्रिस्तानें घालून दिलेला राजमार्ग आपण चालूं लागाल, तर रशियाच्या अंतःकरणाला लागलेली ही कीड कायमची नष्ट होईल. निखाऱ्यापुढें जसें मेण वितळावें, त्याप्रमाणें ख्रिस्ताचा कायदा पाळणाऱ्या पुरुषश्रेष्ठ बादशहापुढें क्रांतिकारक पक्षाचें पाणी होऊन जाईल."

ख्रिस्तानें सांगितलेला कायदा केवळ विशिष्ट काळापुरता नसून तो नित्य, स्पष्ट व शुद्ध सत्यरूप असून त्याची अम्मलबजावणी ताबडतोब झाली पाहिजे. हें टॉलस्टॉय यांचें मत वरील उताऱ्यांत उघड झालें आहे. हें त्यांचें मत अखेरपर्यंत कायम होतें. विशिष्ट कायद्यांनीं प्रस्थापित झालेल्या राज्यपद्धतीबद्दल त्यांच्या चित्तांत असलेला अनादर वरील उताऱ्यांत व्यक्त झाला आहे. केवळ कांहीं मर्यादा कायद्यानें घालून दिल्या म्हणून ख्रिस्ताच्या आज्ञेविरुद्ध सुद्धां त्या अमलांत आणाव्या, हें चालू राज्यपद्धतीचें आदितत्व टॉलस्टॉय यांस मुळींच मान्य नव्हतें. कोणत्याहि राज्यपद्धतीच्या मुळाशीं धर्मनीतीचा पाया अवश्य पाहिजे. व अशा पायावर रचलेली शासनपद्धति दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीहून श्रेष्ठतम आहे, असें त्यांचें मत होतें. हें तत्व खऱ्या मनोभावानें या पत्रांत त्यांनीं व्यक्त केलें आहे. मानवी जीवितांत उद्भवणाऱ्या अनेक अडचणींसंबंधीं टॉलस्टॉय यांच्या चित्तांत केवढी सहानुकंपा होती, हें वरील उद्गारांत स्पष्ट दिसतें. प्रश्न राजकारणाचा असो, सामाजिक असो अथवा धार्मिक असो, त्याचा उहापोह करतांना तो पूर्ण सहानुकंपेनें व अत्यंत मनोभावें करावयाचा, अशी प्रवृत्ति टॉलस्टॉय यांच्या ठिकाणीं असल्यामुळेंच त्यांच्या शत्रूंच्याहि मनांत त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न होत असे.

टॉलस्टॉय यांच्या मताप्रमाणें तिसऱ्या आलेक्झांडर बादशहानें त्या गुन्हेगारांवर दया दाखविली असती, तर बादशहाच्या या कृत्याचा परिणाम त्याच्या प्रजाजनांवर उत्तम घडला असता यांत शंका नाहीं. आरंभींच त्याची छाप साऱ्या प्रजाजनांवर पडली असती. दया आणि औदार्य या गुणांबद्दल त्याची कीर्ति सर्वतोमुखीं झाली असती, आणि अशा प्रकारची कीर्ति आरंभींच मिळणें हें राजकीय दृष्ट्या त्याच्या कारकीर्दीला हितावहहि झालें असतें; पण अशी सुबुद्धि बादशहाला सुचली नाहीं आणि असें झालें, यांतहि फारसें नवल नाहीं. एकमुखी सत्तेच्या मोहमदिरेनें धुंद झालेल्या बुद्धीला दयेचा आणि औदार्याचा प्रकाश दिसूं नये, यांत नवल नाहीं.

दुसरे आलेक्झांडर या बादशहानें आपल्या कारकीर्दींत कांहीं हक्क लोकांस दिल्यासारखे दाखविले होते. यामुळें लोकांच्या मनांत विलक्षण आशा उत्पन्न झाल्या होत्या, पण या देणग्यांचें स्वरूप व्यवहारांत स्पष्ट होऊं लागलें, तेव्हां त्यांचें स्वरूप फसवेगिरीचें आहे, हें लक्षांत येऊन लोकांच्या आशेला जबर धक्का बसला व या उलट वृत्तीच्या भरांत अराजक पक्षाच्या हातून भयंकर अत्याचार झाला.

प्राचीन काळीं हल्लींचें रशियाचें साम्राज्य् अस्तित्वांत नव्हतें, तेव्हां तेथें लहान लहान अनेक संस्थानें होतीं. या संस्थानांत एकोपा नव्हता. त्यांच्यांतील परस्पर तंट्यांमुळें तीं सारीं सारखींच दुर्बळ झालेलीं होतीं. अशा स्थितींत तार्तर लोकांच्या टोळधाडीस तीं बळी पडलीं, यांत नवल नाहीं. हळू हळू सर्व मध्यरशिया आपल्या ताब्यांत त्यांनीं आणला आणि अखेरीस मास्कोव्हीच्या ग्रँडड्यूकनें सीझर अथवा झार ही पदवी धारण केली. यानंतर तुर्क, पोल, स्वीड, फ्रेंच वगैरे लोकांच्या स्वाऱ्या इ. स. १६१२ पासून इ. स. १८१२ पर्यंत रशियावर झाल्या. या साऱ्या स्वाऱ्यांशीं तोंड देण्याकरतां एकमुखी सत्तेचें प्राबल्य देशावर असणें अवश्य होतें. एका मध्यबिंदूभोंवतीं देशाची सर्वशक्ति या काळांत एकवटली नसती, तर एवढ्या धामधुमींत रशियाचा टिकाव खचीत लागला नसता. झार बादशहा कसाहि असला, तरी तो देशबांधव आणि परकी लोक

कितीहि चांगले झाले, तरी परके. परक्यांची सत्ता आपल्या देशावर असावी, हें कोणासहि पसंत पडत नाहीं. अशा आणीबाणीच्या वेळीं रशियाच्या शक्तीच्या केंद्रीकरणाचें कार्य या झारांनीं केलें. पण परकीय स्वाऱ्यांचें भय नाहींसें झाल्यावर बादशाही सत्ता लोकांत विभागली जावी, तें न होतां ती सत्ता बादशहाच्या हातीं कायमचीच राहिली. आपल्या शत्रूचा पाडाव करण्याकरतां एका घोड्यानें मनुष्याला आपल्या पाठीवर घेतलें आणि त्याची कार्यसिद्धि झाल्यावरहि मनुष्यप्राणी घोड्याच्या पाठीवर कायमचाच बसला, अशी एक गोष्ट इसापनीतींत आहे. तसाच प्रकार येथें झाला. रशियाच्या विस्कळित संस्थानांचें प्रबल साम्राज्य बनलें. राजकीय दृष्ट्या हें एकीकरण झालें खरें; तथापि त्या साम्राज्यांत जो कुलभेद, धर्मभेद, भाषाभेद, आणि चालीरीतींचा भेद अस्तित्वांत होता, तो मात्र नाहींसा झाला नाहीं. अशा प्रकारच्या अनेकविध भेदांनीं भरलेल्या आणि अत्यंत विस्तृत अशा साम्राज्यावर केवळ एकतंत्री सत्ता चालवून सर्व प्रजेचें सारखें आराधन करणें, कोणाहि राजाला, अशक्यच झालें असतें. ही परिस्थिति ओळखून राज्यशासनांतील योग्य अधिकार प्रजेच्या हातीं बादशहानें द्यावयास पाहिजे होते, पण हें न घडल्यामुळें बादशहाच्या एकमुखी सत्तेला अराजक संस्था हा भयंकर प्रतिस्पर्धी निर्माण झाला. क्रिया आणि प्रतिक्रिया यांचे नियम जडसृष्टीप्रमाणेंच सूक्ष्म सृष्टींतहि लागू पडतात. सोफी पेरोस्की, आणि तिचे अनुयायी यांच्या हातून घडलेला अत्याचार अत्यंत भयंकर, गर्हणीय व अमानुष होता हें खरें; त्याचप्रमाणें आपल्या या कृत्याचा परिणाम आपल्या इच्छेप्रमाणें न होतां लोकांचा जाच अधिकच वाढेल, ही गोष्ट या कटवाल्यांच्या लक्षांत आली नाहीं, हेंहि खरें; तथापि त्यांची इच्छा शासनपद्धति सुधारण्याचीच होती, हेंहि खोटें नाहीं. लोकांच्या तकरारींचा निकाल जींत न्यायानें होईल, अशी राज्यपद्धति त्यांस अस्तित्वांत आणावयाची होती. हा त्यांचा हेतु लक्षांत घेतला म्हणजे केवळ पांच कटवाल्यांस क्षमा करून बाराकोट लोकांस स्वातंत्र्य न दिल्यानें झारचा कार्यभाग कितपत साधला असता, याची शंकाच आहे. हे लोक बोलून चालून आपल्या जीवावर उदार झालेले. स्वतःच्या जीवि-

ताची किंमत त्यांस मुळींच वाटत नव्हती. हा भयंकर गुन्हा करण्यांत कोणताहि स्वार्थ त्यांना साधावयाचा नव्हता. या साऱ्या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे, आपल्या प्रजाजनांस स्वातंत्र्याचे हक्क दिल्याशिवाय झारच्या दयेचा प्रत्यक्ष उपयोग मुळींच झाला नसता, असें म्हणणें भाग पडतें.

पत्र लिहून झाल्यानंतर आपला मित्र स्ट्रॅहॉफ याजपाशीं तें देऊन त्यानें तें बादशहाच्या शिक्षकाच्या हातीं पोहोंचतें करावें; अशी व्यवस्था टॉलस्टॉय यांनीं केली. बादशहाजवळ या शिक्षकाचें वजन फार आहे, असा लोकांचा समज होता. याशिवाय त्या शिक्षकाला खाजगी पत्र लिहून ऊ.ज अर्ज बादशहाला सादर करावा, अशी त्याची विनंति टॉलस्टॉय यांनीं केली होती, परंतु त्या शिक्षकानें तें पत्र बादशहाच्या हातीं न देतां स्ट्रॅहॉफ याच्या हातीं तसेंच परत दिलें. स्ट्रॅहॉफ यानें तें एका प्रोफेसराच्या स्वाधीन केलें व त्यानें ग्रँडड्यूक सर्जेस यांजमार्फत तें बादशहास पोहोंचविण्याची व्यवस्था केली. बादशहानें तें वाचून पाहिलें आणि असे उद्गार काढले कीं, 'अराजकांनीं खुद्द माझ्या विरुद्ध आगळीक केली असती, तर त्यांना मी आनंदानें क्षमा केली असती, पण हा अपराध माझ्या वाडिलांविरुद्ध घडला असल्यामुळें क्षमादानाचा अधिकार माझ्या हातीं राहिलेला नाही.' बादशहाचें हें म्हणणें अप्रत्यक्ष रीतीनें टॉलस्टॉय यांच्या कानांवर घालण्यांत आलें. गुन्हेगारांना मिळालेल्या फांशीच्या शिक्षेची अम्मलबजावणी होऊन गेल्यानंतर राजगुरूनें आपणास आलेल्या पत्राचें पुढील उत्तर टॉलस्टॉय यांस पाठविलें.

" परमपूज्य कौंट लियो निकोलव्हिच यांसः—

स्ट्रॅहॉफ यांजमार्फत आपलें जें पत्र माझ्या हातीं आलें, त्याचें उत्तर आजतागाईत मीं दिलें नाहीं, म्हणून आपण रागावूं नये. सौजन्याभावामुळें अथवा आपल्याविषयींच्या अनादरबुद्धीमुळें माझ्या हातून ही आगळीक घडली, असें आपण समजूं नये. सध्यांच्या परिस्थितीमुळें माझ्या चित्ताची चलबिचल इतकी उडाली आहे कीं, त्यांत विचारांची संगति म्हणून राहिली नाहीं. यामुळें

आपणाला जबाब काय द्यावा, हेंच मला कळेना.

बादशहाच्या पत्राची आपण मजवर सोंपविलेली कामगिरी मजकडून झाली नाहीं, म्हणून राग मानूं नये. अशा प्रकारच्या गोष्टींत ज्यानें त्यानें आपली विवेकबुद्धि सांभाळावी, हें योग्य आहे, असें मला वाटतें; आणि आपलें पत्र वाचून पाहिल्यानंतर तुम्हां-आम्हांत भयंकर मतभेद आहे, असें मला आढळून आलें. तुमचा धर्म वेगळा आणि माझा धर्म वेगळा असून तुमचा आमचा ख्रिस्तहि वेगवेगळा आहे, असेंहि मला दिसून आलें. यामुळें तुमची कामगिरी माझ्या हातून पार पडणें शक्य नव्हतें. स्वतः तुमच्याबद्दल माझ्या मनांत पूर्ण आदर आहे."

बादशहाच्या या खुनासंबंधीं पुढें एका प्रसंगीं सहजगत्या गोष्टी निघाल्या असतां टॉलस्टॉय म्हणाले—

"जसें पेरावें, तसें उगवतें. दुष्टपणाच्या कार्याला दुष्टपणाचेंच प्रतिकार्य केलें, तर त्यांतून आणखी नवा दुष्टपणा मात्र उत्पन्न होईल. त्या पांचजणांना फांशीची शिक्षा झाली, हें वर्तमान मला समजलें, तेव्हां माझ्या काळजाचें कसें पाणी झालें, तें अद्यापिहि मला आठवतें. माझी झोंप उडाली. खाणेंपिणें गोड लागेना. कोठेंहि बसा आणि कांहींहि करा, चित्ताला विश्रांति म्हणून नाहीं, अशी माझी स्थिति झाली. पिटर्सबर्गला जावें, झारच्या हातींपायीं पडावें आणि त्याज़पुढें पदर पसरून जीवभिक्षा मागावी अशी प्रबळ इच्छा मला होऊं लागली. प्राचीन काळीं लोक असेंच करीत. बादशहाजवळ कांहीं मागावेंसें वाटलें, तर त्याच्यापुढें प्रत्यक्ष उभें राहून आपला अर्ज तोंडानें ते सादर करीत. प्राचीन काळच्या लोकांत मनोबल अधिक होतें. मी पडलों अर्वाचीन काळचा, तेव्हां तसें करण्याची छाती मला झाली नाहीं. अर्वाचिनांच्या पद्धतीप्रमाणें एक पत्र मीं लिहिलें आणि एका मित्रामार्फत त्याची रवानगी मीं केली. माझें अंतःकरण शक्य तितकें उघड करण्याचा यत्न त्या पत्रांत मीं केला होता; पण माझ्या अंतःकरणांतील भावनांचा शतांशहि त्यांत व्यक्त झाला नव्हता."

"पुढें फांशीच्या शिक्षेची बजावणी झाली, तेव्हां त्या पांच लोंवणाऱ्या

आकृती माझ्या डोळ्यांपुढून हालेनात. विशेषतः सोफीपेरोस्कीच्या आकृतीनें तर माझा पिच्छाच पुरविला. तिच्या गळ्याभोंवतीं फांस पडत आहे, त्या फांसाच्या गांठीं तिच्या श्वासोच्छ्वास नलिकेवर बरोबर बसाव्या म्हणून तिचें डोकें इकडे तिकडे फिरावेलें जात आहे, अखेरीस तिच्या पायांखालची फळी निघून जाऊन जबर हिसक्यानें ती खालीं लोंबत आहे, रक्ताचा प्रचंड प्रवाह तिच्या मस्तकाकडे धांव घेत असून सर्व शरीराला पीळ पडत आहे, असा देखावा दिसूं लागून मला गुदमरल्यासारखें झालें. मला श्वासोच्छ्वास करतां येतो कीं नाहीं, हें मी पाहूं लागलों. माझा घसा बंद झाला कीं काय हें ठरविण्याकरतां मी वारंवार थुंकी गिळून पाहूं लागलों. ते बाहेर आलेले डोळे, तो काळवंडलेला चेहेरा, आणि त्याजवरील ती काळी टोपी, हीं मूर्तिमंत माझ्यासमोर उभीं राहिलीं. या भयंकर देखाव्यानें माझी वृत्ति अगदीं मूढ बनून गेली. काय हा भयंकर प्रकार!"

"एक गोष्ट माणसें नेहमीं विसरत असतात. ज्या हेतूसाठीं असलीं अमानुष कृत्यें तीं करतात, तो हेतु बाजुलाच राहतो, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. मृत्यु समोर प्रत्यक्ष उभा राहिला म्हणजे, आपलें जाळें जीवात्म्याभोंवतीं तो इतकें दाट पसरून देतो कीं, या दुष्टत्वाची कल्पना या वेळीं जीवात्म्याला स्पर्श करूं शकत नाहीं. त्याचीं सारीं दुःखें आणि त्याचे सारे कष्ट त्याजपासून वेगळे होतात."

"परमेश्वर त्या जीवात्म्याला आपल्या पंखाखालीं घेतो. त्या शत्रूवर खासा सूड उगवीत आहों, असें ज्या क्षणीं हें कृत्य करणारांस वाटत असतें, त्या क्षणीं त्यांनीं दिलेल्या बलीचा आत्मा भगवंताच्या संरक्षणाखालीं असतो, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. ज्या हेतूनें त्यांनीं आपला बाण सोडला, तो हेतु अपुरा राहतो. त्या बाणाचें लक्ष्य चुकतें आणि तो बाण येऊन सोडणारावरच आघात करतो. परमेश्वराची ही रचना मोठी विलक्षण आणि आपल्या बुद्धीला अगम्य अशी आहे; पण हें असेंच घडतें, यांत मात्र शंका नाहीं."

"एके वेळीं एका प्रचंड अस्वलाच्या जबड्यांत मीं सांपडलों होतों.

त्याच्या प्रचंड पंज्याचीं नखें माझ्या खांद्यांत घुसत होतीं. तथापि त्या वेळीं कोणत्याहि दुःखाची जाणीव मला होत नव्हती. मी खालीं पडलों होतों, आणि त्याचें तें प्रचंड तोंड आणि ते शुभ्र दांत हीं मला दिसत होतीं; तथापि अशा स्थितींतहि भीतीचा स्पर्श मला झाला नव्हता. माझा एक डोळा त्याच्या तोंडा आड होता; तथापि दुसऱ्या एका डोळ्यानें आकाशाचा नील भाग मला दिसत असून त्यांत एकावर एक रचलेले जांभळे आणि नारिंगी ढगहि मला दिसत होते. आकाशांतील या सौंदर्याच्या देखाव्यानें माझें चित्त हर्षभरीत होऊन गेलें होतें."

"पुढेंहि कित्येक प्रसंगीं या क्षणाची आठवण मला होत असे. त्या क्षणीं मृत्यूच्या अगदीं सन्निध मी पोहोंचलों होतों. आतां केव्हांहि मृत्यूची आठवण मला झाली, तर त्या प्रसंगाचें चित्र माझ्या डोळ्यांपुढें हुबेहुब पुन्हां उभें राहतें. मी स्वस्थपणें या चित्राकडे पाहतों, त्याजवर विचार करतों, चालू जीविताशीं त्याची तुलना करतों आणि अखेरीस माझ्या बुद्धीचा जो निश्चय होतो, तो हाच कीं, अत्यंत गंभीर सत्यरूप आणि सर्वभक्षक मृत्यु मुळींच भीतिप्रद नाहीं. परमेश्वराची ही केवढी कृपा आहे बरें! त्या क्षणीं सर्व वृत्ती मुग्ध होतात. भीतिदायक वस्तूंचा मागमूसहि नाहींसा होतो आणि जीवात्मा अगदीं स्थिर होतो."

"लांडग्याच्या तोंडांत सांपडलेलें कोंकरूं, ससाण्याच्या चोंचींतील चिमणी, वाघाच्या जबड्यांतला प्रवासी आणि फांशीच्या पीठावरून खालीं घसरलेले लोक यांची वृत्तिहि अशीच बनत असेल!"

जुन्या मताच्या झारच्या शिक्षकाचें पत्र वर दिलेंच आहे, त्यावरून हा राजगुरु जुनाट धर्मपंथाचा होता, हें सहज दिसून येण्यासारखें आहे. या पंथाला बादशाहीतरवारीचें पूर्ण पाठबळ असल्यामुळें आपणाहून वेगळ्या मताच्या लोकांवर या राजगुरूसारखे लोक वाटेल तसा जुलूम करण्यास मागें पुढें पहात नसत. स्वतःस वाटेल त्या मताप्रमाणें धर्माचरण करण्याची पूर्ण मोकळीक प्रत्येकाला असावी, यासाठीं टॉलस्टॉय यांची धडपड होती. कोणतेंहि काम करावयाचें तें पूर्ण मनोभावानेंच करावयाचें, असा टॉलस्टॉय यांचा स्वभाव असल्यामुळें या कामींहि जोरानें

ते पुढें सरसावले. स्वतःचें मत प्रतिपादन करतांना सवलतीचा मार्ग स्वीकारावयाचा. हें मत टॉलस्टॉय यांस कधींच. मान्य नव्हतें. प्रतिपक्षाशीं भांडतांना सवलती काढणें हें स्वतःस निश्चितपणें अवनतिकारक होत असून त्यांत उभयपक्षीं तोटाच व्हावो, असें टॉलस्टॉय यांचें ठाम मत होतें. या मतास अनुसरून प्रतिपक्षावर टीका करण्याची पाळी येई, तेव्हां दोषाविष्करणाचें काम टॉलस्टॉय अत्यंत कडकपणें करीत. त्यांनीं सौम्य अथवा लपवालपवीची भाषा कधींच वापरली नाहीं. स्वाभाविकपणें त्यांची वृत्ति फार दयार्द्र होती. आपल्या वर्तनानें कोणासहि दुखवावयाचें नाहीं, असा निश्चय ते वारंवार करीत. आपल्या शब्दानें कोणाला राग येऊं नये अशी त्यांची इच्छा होत। अत्यंत नम्र वृत्तीनें वागून स्वतःच्या कट्टया शत्रूंचे अपराधहि पोटांत घालण्याची त्यांची इच्छा होती; पण धर्ममताच्या बाबींसंबंधीं ते कांहीं लिहूं लागले म्हणजे आपल्या इच्छेचा आणि निश्चयाचा विसर त्यांना पडे. पुष्कळ वेळां लेख लिहून गेल्यानंतर त्यांना पश्चात्तापहि होई. अशा स्थितींत त्यांची चित्तवृत्ति दुखंड होऊन त्यांच्या मनाला अत्यंत कष्ट होत असत. घरांतल्या घरांतहि त्यांच्या वागणुकींत कित्येक वेळां मनाची अशी कातरवृत्ति त्यांच्या कुटुंबवासियांच्या अनुभवास येई. तारीख २५ मे सन १८८१ च्या रोजनिशींत पुढील उतारा आढळतो.

" आपलें कुटुंब आपल्याच रक्तमांसाचें. किंबहुना कुटुंबाचा मुख्य पुरुष हा आत्म्यासारखा असून कुटुंब हा त्याचा देह होय. याकरतां कुटुंबाचा त्याग करणें म्हणजे आत्महत्याच करणें होय. छे छे ! या मोहाला बळी पडून उपयोगी नाहीं. कुटुंबाचा भारवाही हमाल होण्यापेक्षां फक्त परमेश्वराकडेच चित्त ठेवून त्याची नौकरी करणें, अधिक चांगलें. कुटुंब म्हणजे काय ? स्वतःची योग्यता दाखविणारा कांटा. विश्वरचनेंत आपलें स्थान कोणतें, हें बाजूचें कुटुंब आपणास सांगत असतें. विश्वरचनारूप जी शिडी थेट परमेश्वरापर्यंत उभारली आहे, तिच्या कोणत्या पायरीवर आपण आहों, याचा निर्देश आपलें कुटुंब करीत असतें. आपल्या आंगीं मनोबल किती आहे, याचें माप आपलें कुटुंब घेत असतें. पोट दुर्बल झालें म्हणजे जाडेंभरडें अन्न

त्याला खपत नाहीं. त्याला त्याचें ठराविक अन्नच लागत असतें. त्याचप्रमाणें चैनीला सोकावलेल्या कुटुंबाच्या गरजाहि दरिद्री कुटुंबापेक्षां अधिक असतात. या साऱ्या गरजा पुरविण्याचा मक्ता मालकानें घेतलेला असतो काय ?"

तारीख ७ मे रोजीं टॉलस्टॉय टूला येथील तुरुंग पाहून आले. या संबंधीं त्यांच्या रोजनिशींत पुढील टिपणें आहेत.

"मी टूला येथील तुरुंग पाहिला. कालुगा प्रांतांतील पंधरा शेतकरी आज महिनाभर येथें खितपत पडले आहेत.' यांचा अपराध इतकाच कीं, आपला प्रांत सोडून जाण्यास सरकारचा परवाना त्यांनीं घेतला नव्हता. त्यांना कालुगा येथें पाठवून तेथून त्यांची रवानगी त्यांच्या गांवीं केली असती, तर सरकारचें काम भागलें असतें; पण भलत्या सलत्या सबबीवर तुरुंगाच्या अधिकाऱ्यानें जवळ जवळ दोन महिने त्यांना तेथेंच खितपत ठेवलें आहे."

तारीख १५ मेच्या रोजनिशींत पुढील मजकूर आहे.

"आज संध्याकाळीं पिसारेफ आणि समारीन भेटीला आले होते. समारीन हंसत हंसत म्हणाला, 'या अराजक लोकांना एकजात फांशी दिलें पाहिजे.' मी कशीबशी आपली जीभ आवरली. त्याची मानगुटी धरून त्याला तसाच खिडकींतून भिरकावून द्यावा, अशी प्रबळ इच्छा मला झाली होती."

तारीख २२ मे.—

"चांगलें म्हणजे काय ? यांची बरीच चर्चा आज झाली. चांगलें ही भावना केवळ सापेक्ष आहे, असें एक गृहस्थ म्हणाले. केवळ स्वतःलाच नव्हे, तर सर्व जगालाहि जें सारखेंच चांगलें, तें खरें चांगलें होय."

ता. २९ मे.—

"घरीं आज मोठा वादविवाद झाला. फेट म्हणाला, 'ख्रिस्ताचीं तत्त्वें अव्यवहार्य आहेत.' त्यावर मीं त्याला विचारलें, तर मग ख्रिस्त मूर्खशिरोमणि होता काय ? फेटनें उत्तर दिलें, 'छे छे ! त्याचीं तत्त्वें चांगलीं आहेत, पण तीं व्यवहारांत येण्यासारखीं नाहींत.' मीं पुन्हां म्हटलें, 'पण तसें वागण्याचा यत्न तरी तुम्ही करून पाहिला आहे का ?' फेट म्हणाला,

'तसा यत्न मीं केला नाहीं; तथापि तीं तत्त्वें अव्यवहार्य आहेत, हें कांहीं खोटें नाहीं.' हा वाद मी पुढें वाढविला नाहीं."

या काळापासून टॉलस्टॉय आणि फेट यांजमधील स्नेहभावाला उतरती कळा लागली. या दोघांत प्रत्यक्ष भांडण केव्हांच झालें नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि त्यांच्यांतलें प्रेम कमी होऊन त्या दोघांत परकेपणा आला होता, हें खोटें नाहीं. टॉलस्टॉय यांजबद्दल केवळ युरोपांतच नव्हे, तर साऱ्या जगभर आदरभाव उत्पन्न झाला होता; तथापि ज्यापाशीं आपलें हृदय त्यांना उघडें करतां येईल, असा एकहि मित्र त्यांना राहिला नाहीं, ही गोष्ट किती विलक्षण आहे! खिस्ताची गुरुकिल्ली आपणास सांपडली व ती ज्याच्या ज्याच्या हातीं जाईल, त्याला त्याला ती खास सुखी करील अशी टॉलस्टॉय यांची खात्री ज्या क्षणापासून झाली, त्याच क्षणापासून संसाराला ते पारखे होत चालले. त्यांचे मित्र एकामागून एक कमी होऊं लागले. त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाशीं त्यांची फूट पडूं लागली व अखेरीस त्यांच्या धर्मपत्नीशींहि त्यांची तेढ उत्पन्न झाली. अशा रीतीनें जणूं काय साऱ्या जगांत ते एकटे राहिले. परमेश्वर आपल्या भक्ताचें सर्वस्व हरण करतो, असें जें संत म्हणतात, त्याचा अनुभव या ठिकाणींहि आला.

तारीख १० जून रोजीं टॉलस्टॉय ऑप्टिन मठाच्या यात्रेसाठीं पुन्हां निघाले. ही सारी यात्रा त्यांनीं या वेळीं पायीं केली व या वेळचा त्यांचा सारा पोषाक अगदीं सामान्य शेतकऱ्याला शोभण्यासारखा होता. या वेळीं सर्जी या नांवाचा एक नौकर त्यांजबरोबर होता. सर्व पैसाअडका या सर्जीपाशीं असून भेटेल त्या भिकाऱ्याला आणादोन आणे देण्याचें काम टॉलस्टॉय यांनीं त्याजवर सोंपविलें होतें.

या प्रवासांत असतां पुढील पत्र त्यांनीं आपल्या पत्नीला लिहिलें आहे.

"माझ्या पायाला फोड आल्यामुळें मी अगदीं हैराण झालों आहे; तथापि मला झोंप चांगली लागते आणि माझी प्रकृतीहि ठीक आहे. आतां तागी तळव्याचा जोडा मीं घेतला असून त्यावर सर्व यात्रा चांगली पुरी होईल, असें वाटतें."

"अशा प्रकारच्या यात्रा मनुष्याच्या आध्यात्मिक कल्याणाच्या दृष्टीनें

किती महत्त्वाच्या आणि उपयुक्त असतात, याची कल्पनाहि तुला होणार नाहीं. ईश्वरकृत जगाचें स्वरूप अशा स्थितींत पहावयास मिळतें. बाह्य सृष्टींत दोन प्रकार आहेत. एक ईशसृष्टि आणि दुसरी जीवसृष्टि. ईश-सृष्टीच्या पोटांत आम्हांसारखे जीव, आणखी एक जीवसृष्टि निर्माण करीत असतात. ईशसृष्टींतील कांहीं घटक घेऊन ही माझी बायको, हें माझें मूल, हा माझा काका, हा माझा मित्र, हा माझा शत्रु, ही माझी बाग, इत्यादि प्रकारचे आरोप या घटकांवर करून ही स्वतःची सृष्टि जीव नित्य भोगीत असतो. अशा स्थितींत ईशसृष्टीचें भानहि त्याला असत नाहीं. या स्वकृत सृष्टींत त्याचें मन इतकें पक्कें गुंतून गेलेलें असतें कीं, जगभर फिरत असतांहि आपल्या सृष्टींतून तो बाहेर पडत नाहीं."

"मी स्वतःच्या प्रकृतीची चांगली काळजी घेतों. आज पोटांत बरें नव्हतें, म्हणून बरींचशीं द्राक्षें मीं विकत घेऊन खाल्लीं. येथें एक दहा वर्षांची मुलगी मीं पाहिली. तूं तिला पहातीस तर पोटच्या मुलीप्रमाणें तुझें प्रेम तिजवर जडलें असतें. तिला साऱ्या गोष्टी समजतात. स्वभावानें ती अगदीं अबोल आहे, ती सदा हंसतमुख असते. आज एक मोठा मुद्दा माझ्या लक्षांत आला, तो हा कीं, आपण वास्तविक कोण, हें ओळखणें आणि आपण जसे खरोखर असूं तसेंच आणि तितकेंच लोकांना दिसणें. मनुष्य आपली ओळख लोकांस पटवितो, तेव्हां केवळ स्वतः-चीच ओळख तो सांगून रहात नाहीं, तर आपल्या साऱ्या चीजवस्तूंचीहि ओळख तो लोकांस सांगतो. मी अमुक एवढाच निर्देश करून स्वस्थ न बसतां, मी अमुक मोठा जमीनदार, मी अमुक सावकार, मी अमुक ग्रंथकार, मी अमुक एकाद्या थोरामोठ्याचा जांवई, इत्यादि प्रकारचें आपलें सारें भांडवल तो लोकांच्या नजरेस आणतो. मग लोक त्याची ओळख ठेवतात कीं, त्यांच्या त्या भांडवलाची ठेवतात, कोण जाणें!"

"खटाऱ्यांत बसून जाणारा शेतकरी वाटेंत दिसला. तो मला म्हणाला, 'काय रे गड्या, इकडे कोठें चाललास?' 'आप्टीनला' असें उत्तर मीं दिलें. असा उपक्रम होऊन आमचें संभाषण बराच वेळ चाललें होतें. पुढें त्याचा आमचा रस्ता फुटला."

निशासमय जवळ आला म्हणजे आमचे हे दोन प्रवासी एकाद्या शेतकऱ्याच्या झोंपड्यांत प्रवेश करीत. एके दिवशीं एका साधारण मोठ्या गांवांत ही मंडळी आली व तेथील पाटलाच्या घरांत मुक्कामास राहिली. पाटीलबोवा सुमारें पंचवीस मजुरांस कांहीं कामाबद्दल मजुरी चुकती करीत होते. शेतकरी अडाणी असल्यामुळें त्यांना हिशोब समजत नव्हता. याचा फायदा घेऊन आठ नी पांच अकरा अशा दरानें मजुरी चुकती झाल्यावर पाटीलबोवा म्हणाले, 'अरे तुम्ही इतकी मजुरी मिळविली तर दारूच्या दोन तीन बाटल्या तरी आणा. ही यात्रेकरू मंडळी बसली आहे. त्यांनाहि थोडीशी मेजवानी होईल.' हे शब्द ऐकतांच घरांतून उठून टॉल-स्टॉय बाहेरच्या बाजूस आले व आपल्या नौकराला म्हणाले, 'आपल्याच कुळांचें मांस खाणारा हा पाटील किती नीच आहे बरें!'

पाटीलबोवा थोडेसे दारूच्या निशेंत होते, तेहि बाहेर अंगणांत आले. इतक्यांत एक वृद्ध बाई एक लहानसें मूल बरोबर घेऊन आली व पाटीलबोवांच्या पाया पडून म्हणाली, 'महाराज, माझ्यावर कांहीं तरी दया करा. धनी मरून गेले, आणि घरांत खायला कांहीं नाहीं. आतां तुम्ही दया केली तर बरें, नाहीं तर उपाशी मरण्याचा वखत आहे.'

पाटीलबोवा मध्येंच ओरडून म्हणाले, 'चल ऊठ, चालती हो. तुझें नखसुद्धां मला पहावयाला नको. लवकर गेली नाहींस, तर पोलिसाला मी हाक मारीन.'

टॉलस्टॉय यांनीं त्या बाईला जवळ बोलाविलें व तिची हकीकत त्यांनीं विचारली. त्यावरून तिची कांहीं जमीन कोणत्या तरी कारणानें जप्तींत गेली असून पाटीलबोवा तिचें घरहि काढण्याच्या विचारांत होते; अशी हकीकत टॉलस्टॉय यांस समजली.

टॉलस्टॉय यांनीं तिची हकीकत टिपून घेतली व तुझ्यासाठीं शक्य ती खटपट करतों असें सांगून त्यांनीं तिला रजा दिली. पाटीलबोवा जवळच उभे होते, त्यांना टॉलस्टॉय यांची ही मध्यस्ती खपली नाहीं. टॉलस्टॉय यांस त्यांनीं अद्वातद्वा बोलण्यास सुरुवात केली आणि अखेरीस त्यांचा परवाना पहाण्यासहि पाटीलबोवांनीं मागितला.

टॉलस्टॉय यांच्या नौकरानें त्यांचा परवाना गाठोड्यांतून काढून तो पाटीलबोवांच्या हातीं दिला. पाटील म्हणाले, 'चष्म्याशिवाय मला वाचतां येत नाहीं. माझा मुलगा व्हॅसेली घरांत आहे, त्याला तो दाखव. पिटर्स-बर्ग येथें तो गाडी हांकण्याचा धंदा करीत होता, तेव्हां तो वाचावयाला शिकला.'

टॉलस्टॉय यांचा नौकर घरांत गेला व तो परवाना त्यानें व्हॅसेलीच्या हातीं दिला. 'कौंट लियो निकोलिव्हिच टॉलस्टॉय' एवढें नांव पाहिल्या-बरोबर व्हॅसेली मनांत चपापला व कांहीं शब्द आपल्या वडिलांच्या कानांत तो पुटपुटला. त्याबरोबर पाटीलबोवा पळतच घरांत गेले व ती शेतकरी मंडळी व व्होडका दारूच्या बाटल्याहि क्षणार्धांत नाहींशा झाल्या. एके वेळीं ही हकीकत सांगत असतां टॉलस्टॉय यांचा नौकर पुढें म्हणाला,

"शेगडी पेटवून व्हॅसेलीनें ती आपल्या खोलींत ठेवली व आम्हास आंत बोलाविलें. आम्ही आंत जाऊन पहातों तों व्हॅसेलीच्या आईशिवाय तेथें दुसरें कोणीहि नव्हतें. पाटीलबोवा आणि बाकीची शेतकरी मंडळी कोठें गेली, अशी चौकशी कौंट यानें केली, तेव्हां व्हॅसेलीची आई म्हणाली, 'कांहीं कामासाठीं पाटीलबोवा शेजारच्या गांवीं कोर्टाला गेले आहेत आणि शेतकरी मंडळी आपल्या घरोघर गेली आहेत.' त्या बाईनें आम्हास बरेंचसें दूध आणि दहा अंडीं दिलीं. आमच्याबरोबर चहा घेण्यासाठीं त्या दोघांना आम्हीं बोलावलें. पण तीं दोघे आलीं नाहींत. मग निजण्यासाठीं मी गवत अंथरूं लागलों, तेव्हां त्या बाईनें आपली गादी कौंट यांस देऊं केली; पण त्यांनीं ती घेतली नाहीं."

"दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून मीं शेगडी पेटविली व चहा तयार करून कौंट यांस जागें केलें. आमचें खाणेंपिणें आवरल्यावर त्या बाईला कांहीं पैसे कौंट देऊं लागले, पण ते ती घेईना. अखेरीस ते पैसे बळेंच तिच्या हातीं देऊन आम्ही बाहेर पडलों. जातां जातां कौंट व्हॅसेलीला म्हणाले, 'तुझ्या वडिलांची वर्तणूक बरी नाहीं. असाच क्रम पुढें चालला, तर एकादे दिवशीं ते पेचांत येतील, असें त्यांना सांग."

दुसरे दिवशीं संध्याकाळीं वाटेंतच मोठें वादळ झालें व विजांचा

प्रचंड कडकडाट सुरू झाला. लवकरच मुसळधार पाऊसहि सुरू झाला. इतक्यांत टॉलस्टॉय यांच्या पोटांत इतक्या भयंकर कळा येऊं लागल्या कीं, चिखल झालेल्या जमिनीवरच ते गडबडां लोळूं लागले. अखेरीस खुरडत खुरडत एका शेतकऱ्याच्या झोंपड्यांत ते शिरले; पण त्यानें त्यांना तेथें जागा दिली नाहीं. तेव्हां तशाच अंधारांत ते आणखी कांहीं अंतर चालून गेले व तेथें त्यांना एका शेतकऱ्यानें निवाऱ्याची जागा दिली.

दुसरे दिवशीं संध्याकाळीं सहाच्या सुमारास ही मंडळी मठांत पोहोंचली. टॉलस्टॉय यांच्या अंगावरचा पोशाक पाहून मठाधिपतीनें श्रीमंत लोकांसाठीं राखून ठेविलेली खोली त्यांना दिली नाहीं आणि बाहेरच्या एका पडवींत कांहीं भणंगभिकारी बसले होते, त्यांतच त्यांस उतरावयास सांगितलें. टॉलस्टॉय यांचा नौकर म्हणतो,

" असल्या भिकारीबैराग्यांशेजारीं बसण्याचा प्रसंग कौंट यांजवर आलेला पाहून मला फार वाईट वाटलें आणि मीं त्यांच्या तोंडाकडे पाहिलें. त्यांच्या तोंडावर खेदाचें यत्किंचितहि चिन्ह दिसत नव्हतें. आपलें गांठोडें सोडून व फराळाचें सामान बाहेर काढून ते खाऊं लागले व मोठ्या आनंदानें शेजाऱ्यापाजाऱ्यांबरोबर गप्पा मारू लागले. खाणें-पिणें झाल्यावर निजण्यासाठीं कोठें तरी बरीशी जागा मी पाहूं लागलों. शेवटीं मठांतला एक बैरागी मला आढळला, तेव्हां त्याच्या हातीं एक रूबल ( सुमारें दीड रुपया ) देऊन मीं म्हटलें, 'महाराज, आम्हांला एकादी खोली मिळेल, तर मोठे उपकार होतील.' त्यानें एक खोली आम्हांस दिली; पण आम्हांबरोबर एका चांभाराचाहि समावेश त्यानें आमच्याच खोलींत केला. थोड्याच वेळांत आम्ही अंथरुणावर पडलों. तो चांभार एवढ्या मोठ्यानें घोरूं लागला कीं, कौंट यांस त्यामुळें झोंप लागेना. त्याला जागें करून मीं म्हटलें, 'गड्या, तूं केवढ्या मोठ्यानें घोरतोस ! त्या वृद्ध गृहस्थांना तूं झोंप येऊं देणार कीं नाहीं ?' तो चांभार रागावून मला म्हणाला, 'त्या बुड्ढयासाठीं मी रात्रभर जागत बसूं काय ?' पुढें तो लवकरच झोंपी गेला; पण मग तो फारसा घोरला नाहीं, हें मात्र खरें."

दुसरे दिवशीं सकाळीं उठून न्याहरी केल्यावर टॉलस्टॉय मठाच्या शेतांत गेले व मठाचे बैरागी शेतकामें कशीं करतात, हें त्यांनीं पाहिलें.

मठाच्या बाहेर मठाचें एक पुस्तकविक्रीचें दुकान होतें. दुकानांत कसलीं पुस्तकें विक्रीला असतात, हें पहाण्यासाठीं टॉलस्टॉय तेथें गेले. एक बाई आपल्या मुलाकरतां बायबलाची एक प्रत घेण्यासाठीं तेथें उभी होती. दुकानदार तिला म्हणाला, 'बायबल लहान मुलांच्या उपयोगी नाहीं. त्याच्या ऐवजीं मठाचें वर्णन अथवा साधूंनीं केलेले चमत्कार यांपैकीं एकादें पुस्तक घे.' हें ऐकून टॉलस्टॉय यांनीं आपल्या खिशांतून पैसे काढून बायबलाची प्रत विकत घेतली व ती त्या बाईला दिली.

भिकाऱ्यासारखा पोषाक केलेल्या एका गृहस्थानें एकदम अडीच रुपये दुसऱ्यासाठीं खर्चावेत, हें पाहून त्या दुकानदार बैराग्याला मोठें नवल वाटलें आणि ही हकीकत त्यानें मठाधिपतीला कळविली. इतका श्रीमान भिकारी कोण, याची चवकशी करण्याकरतां मठाधिपतीनें आणखी एका बैराग्याला सांगितलें. हा बैरागी यासनायाचा रहिवाशी असल्यामुळें टॉलस्टॉय यांस त्यानें तावडतोब ओळखलें आणि सर्व मजकूर मठाधिपतीला त्यानें निवेदन केला.

टॉलस्टॉय मठांत आले आहेत ही बातमी तावडतोब साऱ्या मठभर पसरली, तेव्हां पुष्कळसे बैरागी टॉलस्टॉय यांच्या भोंवतीं जमले व मठाधिपतीस भेटण्याची विनंति टॉलस्टॉय यांस त्यांनीं केली. तेव्हा टॉलस्टॉय आपल्या नौकराला म्हणाले, "त्यांनीं मला ओळखलेंच आहे, याला उपाय नाहीं. आतां माझा नेहमींचा पोषाक काढ. तो घालूनच मी मठाधिपतीला भेटण्यास जातों."

पोषाक घालून टॉलस्टॉय तयार होतात न होतात तोंच कांहीं बैरागी आले व एका उत्तम सजविलेल्या खोलींत जागा देतों असें म्हणाले आणि टॉलस्टॉय नको नको म्हणत असतांहि त्यांचें सामान बैराग्यांनीं एका थाटदार खोलींत नेऊन ठेवलें. या खोलींतील खुर्च्या वगैरे सामान उंची मखमलीनें मढविलेलें होतें.

फादर अॅम्‌रोज नांवाच्या एका प्रसिद्ध संन्याशाची भेट टॉलस्टॉय यांनीं घेतली व त्याच्याशीं त्यांचें संभाषण चार तास चालू होतें.

या यात्रेसंबंधीं पुढील उतारे त्यांच्या रोजनिशींत सांपडतात. तारीख २६ जून सन १८८१.—

"दरिद्री लोकांची वस्ती जिकडे तिकडे दिसते. माझी तब्येतहि बरोबर नाहीं. गेले चार दिवस झोंप नाहीं आणि अन्नहि नाहीं. अशा स्थितींतहि मनाला सुखांत ठेवणें शक्य आहे, असें वाटतें. मी आपला मार्ग हळू हळू आक्रमण करीत असून माझी प्रगति होत आहे, असें वाटतें."

२८ जून—"परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल सर्जियसशीं चर्चा झाली. याबद्दल निश्चित सांगतां येत नाहीं. अमुक गोष्ट सिद्ध होत नाहीं अथवा अमुक गोष्ट सिद्ध करण्याची जरूरी नाहीं,' असें म्हणणें, हें सुशिक्षितपणाचें व शहाणपणाचें लक्षण आहे, असें हे लोक समजतात; पण वास्तविक पहातां हें शुद्ध अज्ञानाचें लक्षण होय. 'मला ताऱ्यांचें आणि ग्रहांचें ज्ञान नाहीं. ज्या अंगावर पृथ्वी फिरते, त्याचें ज्ञान मला नाहीं, त्याचप्रमाणें पृथ्वीच्या प्रदक्षिणेच्या गतीचें ज्ञानहि नाहीं. केवळ लोकांनीं सांगितलेल्या गोष्टी अंधळेपणानें खऱ्या मानाव्यात, अशी माझी प्रवृत्तीहि नाहीं.' ठीक आहे. तुमचें हेंहि म्हणणें मला कबूल आहे. खगोलासंबंधीं सर्व गोष्टी खडे मांडून सिद्ध करणें शक्य नाहीं, हें मी कबूल करतों; तथापि जितक्या गोष्टी आपल्या बुद्धीला समजतात, तेवढ्यामुळेंहि आपल्या विचारसरणींतील घोंटाळा बराचसा कमी होऊन तिच्यांत एकसूत्रता येते, हा फायदासुद्धां थोडा नाहीं. हीच गोष्ट नीतितत्वांना व धर्मतत्वांना लागू आहे. आम्ही करावें काय! जाणावें काय? आमचें अखेरचें पर्यवसान कोठें, इत्यादि अनेक प्रश्न आपल्या चित्ताला भांबावून सोडीत असतात. त्यामुळें शांतीचा लाभ आपणास होत नाहीं. याकरतां हे सारे प्रश्न एकाच सूत्रांत गोंवलें जाणें अवश्य आहे. साऱ्या मनुष्यजातीची धडपड याचसाठीं सुरू आहे. चित्ताची विविधता नष्ट करून त्यांत एकतानता उत्पन्न करावी, याकरतांच मनुष्यमात्र साऱ्या खटपटी करीत असतो. इतक्यांत एकादा

अर्वाचीन विद्वान उठतो आणि त्याचा बुद्धिभेद करतो. असें करण्यांत आपण मोठें पुण्य संपादन केलें व मनुष्यजातीची मोठी सेवा बजावली, असेंहि त्याला वाटतें. अशा ज्ञानदानांत पुष्कळशा निरुपयोगी वस्तूहि शिरल्या आहेत. बुद्धीच्या कसाला न उतरणाऱ्या अनेक गोष्टींचा समावेश त्यांत झाला आहे. जुन्या लोकांनीं कांहीं धर्मविधी आणि कांहीं तुटकीं फाटकीं नीतिवाक्यें लोकांस शिकविलीं. अर्वाचिनांनीं निराळ्या प्रकारचें ज्ञान लोकांना दिलें. यामुळें सलाशें ठिगळें लागलेली गोधडी लोकांच्या पदरीं पडली आहे. त्यांना मिळालेल्या ज्ञानांत कांहीं धरबंद नाहीं. मनुष्य-जातीचा हा मोठाच फायदा झाला आहे, असें अर्वाचीन पंडितांस वाटतें, हें मोठें आश्चर्य नव्हे काय ?"

"वादविवाद होतां होतां आपण देहात्मवादी आहों, ही गोष्ट सर्जि-यसनें स्पष्ट कबूल केली, हेंहि एका अर्थीं बरेंच झालें."

३ जुलई—"आजार मला अजून सोडीत नाहीं. शरीर दुबळें झालें आहे व अंगांत आळस भरला आहे. मनुष्यमात्राला चपळपणा अवश्य पाहिजे. त्याखेरीज ज्ञानप्राप्ति अथवा स्वतःची सुधारणा हीं दोन्हीहि शक्य नाहींत. ज्ञानप्राप्ति करून घेणें व तदनुरूप प्रत्यक्ष आचरण करणें, या दोन्ही गोष्टींचा एकत्र मेळ असणें, हें मनुष्याच्या सुधारणेला अवश्य आहे."

६ जुलई—"एका गृहस्थाबरोबर आर्थिक विषयावर संभाषण झालें. सांपत्तिक परिस्थिति सध्यां इतकी घोंटाळ्याची झाली आहे कीं, सध्यांच्या परिस्थितींत पूर्ण क्रांति होणें अवश्य आहे. अशी क्रांति होईल कीं नाहीं, अशी शंकासुद्धां माझ्या मनांत येत नाहीं. ती अवश्य होणारच. आज-पर्यंत ती कशी झाली नाहीं, याचेंच मला नवल वाटतें."

या वेळीं लहान मुलांसाठीं एक मासिक पुस्तक टॉलस्टॉय यांचा मेहुणा प्रसिद्ध करीत होता. या मासिकासाठीं टॉलस्टॉय यांनीं कांहीं गोष्टी लिहिल्या. केवळ मुलांसाठीं आणि सामान्य शेतकऱ्यांसाठीं टॉल-स्टॉय यांनीं त्या लिहिलेल्या होत्या; पण त्यांचा प्रसार पुढें साऱ्याच दर्जाच्या लोकांत झाला. आणि युरोपांतील साऱ्या भाषांत आतां त्यांचीं भाषांतरें

झालीं असून सर्व देशांत त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. रुमानियाची राणी कारमेन सिल्व्हा हिनें पुढील मत प्रदर्शित केलें आहे.

"या सुप्रसिद्ध ग्रंथकारानें आजपर्यंत जितकीं पुस्तकें लिहिलीं. त्या सर्वांत या गोष्टी मला अत्यंत चित्ताकर्षक वाटल्या. इतक्या सुंदर गोष्टी आपूर्वी मीं कधींहि वाचल्या नव्हत्या. सामान्य लोकांकरतां लिहिलेल्या या गोष्टींत अत्यंत उच्च दर्जाचे सुविचार आपणास पहावयास सांपडतात. आणि ते अशा सोप्या पद्धतीनें सांगितले आहेत कीं, तीपुढें सुप्रसिद्ध रचनाकौशल्यहि फिकें पडतें. साहित्यकला या गोष्टींत ओतप्रोत भरली आहे. डान्टी, सेक्स्पीयर यांचे ग्रंथ किंवा बायबल यांची योग्यता ज्याप्रमाणें चिरकाल टिकणारी आहे, त्याचप्रमाणें या गोष्टीहि मानवी साहित्यांत चिरकाल टिकतील. कारण त्यांत चिरकाल टिकणारें सत्य भरलें आहे. या अद्वितीय हिरकण्यांना मागें टाकून टॉलस्टॉय यांच्या मोठ्या ग्रंथांची स्तुति लोक कशी करतात, याचें मला नवल वाटतें. या छोट्या गोष्टी शिवाय दुसरा कोणताहि ग्रंथ टॉलस्टॉय यांनीं लिहिला नसता, तरी त्यांचें नांव जगांतील विख्यात ग्रंथकारांच्या यादींत अजरामर होऊन बसलें असतें. या गोष्टी लिहीत असतां ग्रंथकाराच्या चित्तांत कोणताहि क्षुद्र विचार होता असें दिसत नाहीं. दुःखार्त जनतेचें प्रेम मात्र त्याच्या चित्तांत या वेळीं होतें."

'मानवी जीवनाचीं साधनें' ही या गोष्टींतील पहिली गोष्ट होय. दया आणि प्रेम हे मानवी जीवनाचे आधारस्तंभ आहेत, असें प्रतिपादन या गोष्टींत टॉलस्टॉय यांनीं केलें आहे. गोष्टी सांगणें, हाच चरितार्थाचा उद्योग करणारे लोक रशियांत आहेत. या गृहस्थांपैकीं एकाच्या तोंडून ऐकलेली गोष्ट आधारभूत घेऊन ही गोष्ट टॉलस्टॉय यांनीं लिहिली आहे. या गोष्टीची परंपरा दुसऱ्या कांहीं लेखकांनीं आणखी निराळ्याच प्रकारची सांगितलेली आहे. पार्नेल यानें हरमिट अथवा संन्यासी या नांवाच्या लिहिलेल्या कवितेला याच गोष्टीचा आधार आहे. पार्नेल यानें ही गोष्ट प्रथम हेनरीमोर याजकडून ऐकली आणि त्यानें ती आणखी कोणाकडून मिळविली होती. तिचा उल्लेख जुन्या फ्रेंच साहित्यांत असून धर्मसुधारक

लूथर यानेंहि आपल्या गोष्टींत ती गोंविली आहे. याशिवाय निरनिराळ्या रूपानें हेंच कथानक कुराणांत व आरबी ग्रंथांतहि आढळतें. ही गोष्ट इतकी जुनी आहे. टॉलस्टॉय यांच्या दुसऱ्या गोष्टी इतक्या लोकांत आवडत्या झाल्या नाहींत.

या मासिकाकरतां टूरजिनेफ यानेंहि एक गोष्ट लिहिली होती आणि तीहि लोकांस फार आवडली. या वेळीं टॉलस्टॉय टूरजीनेफला भेटण्यासाठीं त्याच्या गांवीं गेले होते. आपण गुरुवारीं येतों असें एक अगाऊ पत्र टूरजीनेफ यास त्यांनीं लिहिलें होतें; पण बुधवारच्याच दिवशीं गुरुवार समजून टॉलस्टॉय त्याच दिवशीं गेले आणि स्टेशनावर उतरले. त्यांना घेण्याकरतां टूरजीनेफची गाडी स्टेशनावर अर्थातच आली नव्हती, तेव्हां एक भाड्याची गाडी करून टॉलस्टॉय गांवांत जावयास निघाले. अंधारांत गाडीवाला वाट चुकला. अखेरीस भटकतां भटकतां रात्रीं एक वाजण्याच्या सुमारास टॉलस्टॉय आपल्या मुक्कामाला पोहोंचले.

याच वेळीं पोलान्स्की या नांवाचा एक प्रसिद्ध कवि टूरजीनेफकडे आला होता. रात्र बरीच झाली होती, तरी तो झोंपी गेला नसून आपल्या खोलींत कांहीं लिहीत बसला होता. अंगणांत घोड्याच्या टापा वाजलेल्या ऐकून तो बाहेर आला आणि मुख्य दिवाणखान्याचा दरवाजा त्यानें उघडला. या वेळीं टॉलस्टॉय यांच्या अंगावर अगदीं सामान्य शेतकऱ्याचा पोषाक असल्यामुळें पोलान्स्कीनें त्यांना ओळखलें नाहीं. गाडीवानाचे पैसे चुकते करून टॉलस्टॉय दिवाणखान्यांत आले. पोलान्स्कीला त्यांनीं पाहिलें तेव्हां 'कविराज आपण केव्हां आलां' असें ते म्हणाले. त्याबरोबर पोलान्स्कीनें टॉलस्टॉय यांना ओळखलें.

इतक्यांत टूरजीनेफहि तेथें आला व या तीन सरस्वतीभक्तांत जें संभाषण सुरू झालें, तें पहांट होईपर्यंत चालू होतें. टूरजीनेफ याचा स्वभाव पूर्वीप्रमाणेंच तापट होता. कित्येक वेळां एकाद्या मुद्यावर तो इतका संतापून जाई कीं, त्यांचें तोंड अगदीं लाल होऊन जाई. तथापि एवढ्या जोराच्या वादविवादांत टॉलस्टॉय यांची शांतवृत्ति ढळली नाहीं. ही गोष्ट पोलान्स्कीच्या लक्षांत विशेषें करून आली. टॉलस्टॉय आणि

टूरजीनेफ यांजमध्यें पूर्वी निकराचें भांडण झालें होतें आणि टॉलस्टॉय हे मोठ्या तापट स्वभावाचे होते, ही गोष्ट पोलान्स्कीला ठाऊक होती. वीस वर्षांत टॉलस्टॉय व पोलान्स्की यांची भेट झाली नव्हती. या अवधींत टॉलस्टॉय यांच्या वृत्तींत इतका जमीनअस्मानाचा फेर पडलेला पाहून त्याला मोठें नवल वाटलें. या भेटीचा उल्लेख करीत असतां पोलान्स्की म्हणतो.

" पूर्वीचे टॉलस्टॉय जाऊन त्यांच्या जागीं हे नवे टॉलस्टॉय जन्मास आले कीं काय ? असेंहि क्षणभर मला वाटलें. मूर्तिमंत प्रेम आणि आत्म-विश्वास हे गुण या नव्या टॉलस्टॉयच्या अंगीं मला आढळून आले. आपलीं मतें आमच्यावर हट्टानें लादण्याचा यत्न त्यांनीं केव्हांच केला नाहीं. टूरजीनेफचे आक्षेप अगदीं शांतपणें त्यांनीं ऐकून घेतले. सारांश, इतकाच कीं, पूर्वीचे तरुण कौंट टॉलस्टॉय ते हे नव्हत, अशी माझी पुरी खात्री झाली."

दुसरे दिवशीं सकाळीं टूरजीनेफनें एक नवीनच बातमी आणली. त्याचा आचारी दारू पिऊन बेशुद्ध झाला होता आणि स्वयंपाक करण्यास दुसरें कोणीं माणूस घरांत नाहीं, असें तो म्हणाला. आतां करावें काय ? याची मोठीच पंचाईत त्याला पडली. आपणाकडे आलेल्या या पाहुण्यांचा सत्कार कसा करावा, हेंच त्याला समजेना. शेवटीं स्वतःच चुलीची आरा-धना करण्याचें त्यानें ठरविलें आणि भाजी कशी चिरावी, इत्यादि गोष्टींचा विचार तो करूं लागला. असा विचार करीत तो स्वयंपाकघरांत गेला. इतक्यांत एक नोकर पुढें होऊन म्हणाला, 'धनीसाहेब, तुम्ही येथून बाहेर व्हा कसे. हा धंदा तुमचा नव्हे. कांहीं तरी करून पोटाची तजवीज आम्हीच लावूं.'

या भेटीसंबंधीं टॉलस्टॉय यांच्या रोजनिशींत पुढील उल्लेख आहे.

९।१० जुलई—" टूरजीनेफच्या घरीं गेलों होतों. सदय अंतःकरणाचा पोलान्स्की तेथें भेटला. साहित्यसेवेंत तो निमग्न होता. स्वतः कांहीं न करतां दुसऱ्यांचे गुणदोष पहात बसण्याचा धंदा तो करीत नाहीं आणि

यामुळें त्याचें चित्त अगदीं शांत रहातें. टूरजीनेफहि मला शांत दिसला, आपला काळ आळसांत आणि चैनींत तो घालवीत आहे."

टॉलस्टॉय निघून गेल्यानंतर टूरजीनेफ यानें त्यांजबद्दलचें आपलें चांगलें मत पोलान्स्कीजवळ बोलून दाखविलें. टॉलस्टॉय यांच्या तोडीचा ग्रंथकार साऱ्या रशियांत निर्माण झाला नाहीं, असें म्हणून युद्ध आणि शांति या कथानकांतील एक भाग तो मोठ्यानें वाचूं लागला. सेनापति प्रिन्स बॅग्रेशन याजसमोरून एक पायदळ पलटण सलामी देत जात आहे, असें वर्णन या भागांत होतें. हा सारा भाग मोठ्यानें वाचून अखेरीस टूरजीनेफ म्हणाला, "याहून अधिक हृदयंगम असें वर्णन चालू काळच्या कोणत्याहि साहित्यांत माझ्या नजरेस पडलें नाहीं. वर्णन करावें, तर असें. शुद्ध साहित्यकेलेल्या दृष्टीनें हें वर्णन अगदीं बिनतोड आहे."

या भेटीनंतर परत आल्यावर टॉलस्टॉय आपल्या समारा येथील वतनावर गेले. येथील सारी इस्टेट एकवार आपल्या नजरेखालून घालावी व येथें चालणारीं सर्व प्रकारचीं कामें स्वतः पहावींत असा त्यांचा बेत होता; पण येथें येऊन पोहोंचल्यानंतर यांपैकीं एकहि गोष्ट त्यांच्या हातून घडली नाहीं. हें काम करणें आपल्या वृत्तीला अशक्य आहे, असें त्यांना आढळून आलें. त्यांच्या रोजनिशींतील पुढील उतारे पहा.

१६ जुलई—"घोड्यांची पहाणी करण्याकरतां आज गेलों होतों; पण मन इतकें बेताल झालें कीं, अखेरीस कांहीं न करतां तेथून मी परत आलों. आपला सारा काळ मी आळसांत घालवीत आहें ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे."

२२ जुलई—"पालोका येथील एक शेतकरी इस्पितळांत मेला. त्याचा मुलगा उपासमारीनें मेला. त्याच्या तान्ह्या मुलीला थोडें दूध मिळाल्यामुळें ती मात्र अद्यापि जीव धरून आहे. अठरा विश्वे दारिद्र्य जिकडे तिकडे दिसतें. फिकट आणि अकालवृद्ध चेहरे, सर्वत्र आढळतात. जमीनदारांनीं हजारों बिघे जमीन आपल्या आसनाखालीं घालून बसावें आणि हजारों शेतकऱ्यांस वाटीभर ताकहि मिळूं नये ही विषमता किती

भयंकर आहे! तथापि आपल्या मालकींतील एक तसूभरहि जागा सोडण्यास जमीनदार कबूल नाहींत."

तारीख २४ जुलईच्या आपल्या बायकोला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात.

"यंदाच्या पिकाचा रंग सोळा आणे दिसतो. यांत मला खेदाची गोष्ट वाटते ती इतकीच कीं, आमच्या हातून गरिबांना कांहींच मदत होत नाहीं. आपल्या खेड्यांत मूर्तिमंत दारिद्य भरलें आहे आणि आपण दरिद्री आहों! ही जाणीव सुद्धां हे लोक विसरले आहेत."

या पत्राला कौंटेसबाईनें पुढील उत्तर दिलें. "इस्टेटीची व्यवस्था आजवर चालत आली आहे, तशीच ती पुढें चालू देणें बरें. त्यांत कांहीं बदल करावा, असें मला वाटत नाहीं. या व्यवस्थेंत नुकसान होत असेल; पण आतां आम्हाला त्याची संवयच झाली आहे. नव्या व्यवस्थेनें उत्पन्न वाढत असलें, तरी तें माझ्या अथवा माझ्या मुलांच्या पदरीं पडणार नाहीं. तें तुम्ही गरिबांना देऊन टाकणार. मग चालू व्यवस्थेंत बदल झाला न झाला मला सारखेंच. समारांतल्या आणि आजूबाजूंच्या हजारों भिकाऱ्यांना पोसण्याचें सामर्थ्य आम्हाला नाहीं. आतां जेथें एकाद्या वस्तूची नड फारच भासत असेल तेथें तेवढी पुरविण्यास कांहीं वावगें नाहीं आणि तसें करणें हें आपलें कर्तव्यहि आहे."

संपत्तीच्या विषमवांटणीमुळें भयंकर दारिद्याचा प्रश्न साऱ्या युरोपांतच विलक्षण गुंतागुंतीचा झालेला आहे. जेथें गरजा अगदीं थोड्या आणि जेथें समाजाचा जीवनक्रम पूर्वापर चालीरीतींनें निश्चित झालेला असतो, अशा स्थाईक समाजांत हा दारिद्याचा प्रश्न इतक्या जोरानें कधींहि पुढें येत नाहीं. पण जो समाज उत्क्रमणावस्थेंत असल्यामुळें अस्थिर असतो, तेथें दारिद्याची जाणीवहि भयंकर असते आणि तें नाहींसें करण्यास सरळ आणि सोपे मार्गहि नसतात. हा प्रश्न इतका विस्तृत आणि इतका गुंतागुंतीचा असतो कीं, तें काम एकट्या दुकट्या व्यक्तीच्या अहाराबाहेरचें आहे. यामुळें पुष्कळ लोक या प्रश्नाकडे अर्थातच कानाडोळा करतात आणि तो दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीचा व अधिक बिकट होत जातो.

ज्यांच्या ठिकाणीं सदसद्विवेक बुद्धीची आंच अधिक जाज्वल्य असते, असे लोक आपणांकडून होईल तो यत्न करूं लागतात; पण अखेरीस त्यांना स्वतःला पुष्कळसा त्रास मात्र भोगावा लागतो.

समारा प्रांतीं असतां तेथील बरेच धार्मिक पंथ टॉलस्टॉय यांनीं पाहिले. तारीख २४ जुलई रोजीं लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात.

"मोलोकानपंथाचे कांहीं धर्माध्यक्ष मला भेटले त्यांच्या एका प्रार्थनेच्या प्रसंगीं मी हजर होतों. बायबलासंबंधीं त्यांचा माझा बराच वादविवाद झाला. हे लोक मोठेसे सुशिक्षित आहेत असें नाहीं; तथापि त्यांची धर्मबुद्धि, त्यांची कळकळ आणि त्यांची तीव्र ग्राहक बुद्धि हीं खरोखरच वाखाणण्यासारखीं आहेत."

"काल एक वृद्ध तापसी मला भेटला. तो एका अरण्यांत रहातो. चाळीस वर्षांपूर्वी या प्रांतीं जो एक प्रचंड मठ स्थापण्यांत आला, त्याच्या उत्पादकांत हा होता."

"तुम्ही लवकरच आतां मास्कोला जाणार असाल ? संसाराचे सारे श्रम तुला एकटीलाच करावे लागतात आणि त्यांत माझ्याकडून जवळ जवळ मुळींच मदत होत नाहीं, याबद्दल तर मला अतिशय वाईट वाटतें."

"माझी प्रकृति आतां बरीच सुधारली आहे आणि माझा दृष्टिकोणहि साफ बदलला आहे. धर्मतत्वांकडे साऱ्या लोकांनीं माझ्याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे, हा माझा पूर्वीचा भ्रम आतां साफ नाहींसा झाला आहे, माझ्या स्वतःच्या विचारांत कांहीं बदल झाला आहे, असें नाहीं. पण तें दुसऱ्यावर लादावेत अशी इच्छा मात्र माझ्या ठिकाणीं राहिली नाहीं."

"कोणतीहि गोष्ट करावयाची म्हटलें, तर ती तनमनधनानें झाली, तरच ती चांगली होते. तिच्या सिद्धीकरतां आजूबाजूच्या बाकीच्या गोष्टींचें अस्तित्व विसरावें लागतें. माझीहि स्थिति अशीच झाली. पण आजूबाजूच्या गोष्टी विसरण्याच्या नादांत मी तुलाहि विसरलों, याबद्दल मला फार वाईट वाटतें. श्रमाचा अतिरेक केव्हांहि होऊं देऊं नये. मी येईपर्यंत जितकीं कामें लांबणीवर टाकतां येण्यासारखीं असतील तितकीं बाजूला ठेवावींत. मी आल्यावर तीं सारीं मी उरकून टाकीन."

" येथें ज्या कुटुंबांत मी असतों, तें कुटुंब खरोखरच मोठें नमुनेदार आहे. सुव्यवस्थित आणि रेखीव संसार कसा असावा, हें या माणसां-पासून अवश्य शिकण्यासारखें आहे. कुटुंबांत नोकर असा एकच आहे. मेहनतीचीं सर्व कामें घरांतलीं माणसेंच करतात."

समारा येथें टॉलस्टॉय यांचा मुक्काम बरेच दिवस होता. तेथून परत येत असतां तारीख १ आगष्टच्या रोजनिशींत पुढील उल्लेख आहे. रायझॅक येथें दरमहा एक मनुष्य आगगाडीला बळी पडतो. मनुष्यांचे बळी देऊन हें यांत्रिक युग चालावयाचें असेल, तर या साऱ्या यंत्रांचा नाश जितक्या लवकर होईल, तितकें बरें."

टॉलस्टॉय घरीं पोहोंचले, तेव्हां त्यांचें घर पाहुण्यारावळ्यांनीं अगदीं गजबजून गेलें होतें आणि एका खाजगी नाटकाची तयारी अगदीं जारीनें चालू होती. खेडेगांवच्या अगदीं साध्या राहणींत बरेच दिवस काढून टॉलस्टॉय आले असल्यामुळें या गोष्टी त्यांच्या चित्ताला मुळींच रुचल्या नाहींत. तारीख १८ आगष्टच्या रोजनिशींत पुढील वाक्य आहे. "आमच्या येथें नाटकाची तयारी आहे. पुष्कळसे पोकळडोके जमले आहेत. एकोणीस, वीस आणि एकवीस या तारखांचे तीन दिवस माझ्या आयुष्यांत वजा घातले पाहिजेत."

तारीख २२ आगष्ट रोजीं दूरजीनेफ याषनाया येथें आला. संध्या-काळीं मुलें बागडत असलेलीं पाहून त्याच्याहि अंगांत जणूं काय लहान-पणाचें वारें भरलें. तो मुलांबरोबर नाचूं बागडूं लागला आणि अखेरीस पॅरीसमध्यें 'क्यान क्यान' नांवाचा नाच कसा नाचतात हें दाखविण्या-करितां तो जेव्हां वेडेवांकडें नाचूं लागला, तेव्हां सारीं मुलें आणि त्यांजबरो-बर मोठी मंडळी खो खो हंसूं लागली. अशा रीतीनें त्यांच्या येण्यामुळें एकंदरीनें साऱ्या मंडळीचा तो दिवस मोठ्या आनंदांत गेला; पण टॉल-स्टॉय यांच्या रोजनिशींत मात्र पुढील उद्गार आढळतात. "दूरजीनेफ-सारख्या उतारवयाच्या गृहस्थानें वेडेवांकडें नाचून पोरकटपणा करावा, याचें मला फार वाईट वाटलें."

टॉलस्टॉय यांचा सर्वांत वडील मुलगा सर्जेस हा आतां अठरा वर्षांचा

झाला होता. त्याला आतां विश्वविद्यालयांत पाठविणें अवश्य झालें होतें. टॉलस्टॉय यांचें लक्ष धर्मविचारांत पूर्ण गुंतल्यामुळें दुसऱ्या मुलांच्या शिक्षणाचीहि थोडीबहुत हेळसांडच झाली होती. या गोष्टी साधण्याकरतां आतां केव्हां तरी तजवीज करणें जरूर होतें. याशिवाय त्यांची वडील मुलगी सतरा वर्षांची झाली होती. तिलाहि एकादें स्थळ पाहणें अवश्य होतें. अशा बऱ्याच गोष्टी एकत्र जमल्यामुळें या सर्व कुटुंबानें मास्को येथें जाऊन रहावें असें ठरलें आणि त्याप्रमाणें इ. स. १८८१ च्या सप्टेंबर महिन्यांत ही सर्व मंडळी मास्को येथें गेली व तेथें एक प्रशस्त घर भाड्यानें घेऊन त्यांत तेवढ्या पुरती तरी कायमची वस्ती त्यांनीं केली.

शहरांत कायमची वस्ती करणें टॉलस्टॉय यांस मुळींच आवडत नसे. पण वर सांगितलेल्या प्रापंचिक अडचणीमुळें आपली आवडनिवड बाजूस ठेवणें त्यांना भाग पडलें. पुष्कळ वर्षेपर्यंत त्यांची वस्ती खेडेगांवांत झाली होती. यामुळें शहरच्या राहणींत किती अडचणी असतात आणि त्रास भोगावा लागतो, याची चांगलीशी कल्पना टॉलस्टॉय यांस नव्हती; पण मास्को येथें रहावयास आल्यानें तर थोड्याच दिवसांत या गोष्टीची पूर्ण कल्पना त्यांना आली. तारीख ५ आक्टोबरच्या रोजनिशींत ते लिहितातः—

"एक महिना झाला; पण स्वास्थ्य कसें तें मुळींच नाहीं. इतकी दगदग माझ्या साऱ्या आयुष्यांत मला केव्हांच झाली नव्हती. सामानाच्या लावालावीचें, मांडणीचें आणि इतर व्यवस्थेचेंच काम अजून चालू आहे. ही मांडणी केव्हां संपणार कोणास ठाऊक. आणि ही सारी व्यवस्था कशाकरतां म्हणाल, तर स्वतःच्या सुखासाठीं अथवा सोईसाठीं ती नसून केवळ लोकांनीं बरें म्हणावें, एवढ्यासाठीं ती आहे. आपलें सारें जीवित लोकांच्या कल्पनांवर अवलंबून ठेवणारे हे लोक किती अभागी आहेत!"

"जिकडे तिकडे घाण पसरली आहे. जावें तिकडे धोंडेमातीची मांडणावळ आणि घाण. आणि लोकांचें सारें आयुष्य चैन, उडाऊपणा आणि दुर्व्यसनें यांत जात आहे. जगांतले दुष्ट दुर्व्यसनी येथें एकत्र जमले असून लोकांस नागवून त्यांनीं चार लढाऊ शिपाई गोळा केले, स्वतःच्या व आपल्या मदतगारांच्या रक्षणाकरतां कायद्याची कोर्टें त्यांनीं उभीं केलीं

आणि आतां ते खुशाल मेजवान्या झोडीत बसले आहेत. स्वतः कांहीं करावें, तर लोकांना तशी ताकद मुळींच नाहीं. मग या चोरट्यांकडे गेलेली आपली चीजवस्त परत मिळविण्याकरतां ह्या चोरट्यांनाच नाना प्रकारचे छंद लावून आणि व्यसनांस बळी पाडून गत संपत्तीचा जो कांहीं भाग परत येईल तेवढ्यावरच लोक संतोष मानतात. असल्या गोष्टींत बायकांहून पुरुष अधिक हुशार आहेत. बायका खेड्यांत राहून शेतकी करतात आणि पुरुष शहरांत येऊन गाडीवाले होतात. आमचे पाय दाबतात व अशींच दुसरीं कामें करतात."

तारीख १४ आक्टोबर रोजीं पुढील पत्र कौंटेसबाईनें आपल्या बहिणीला लिहिलें आहे.

"येथें येऊन एक महिना झाला; पण एवढ्या अवधींत मीं एक ओळसुद्धां कोणाला लिहिली नाहीं. आधीं पहिला पंधरवडा माझ्या डोळ्यांचें पाणी खळलें नाहीं. कारण येथें आल्याबरोबर लियो यांची वृत्ति अगदींच बिघडून गेली. ते विलक्षण उदास झाले. त्यांना झोंप येईना, अन्न जाईना आणि कित्येक वेळां तर एकाद्या पोरासारखे ते रडत सुद्धां बसत. मला स्वतःला तर वेड लागण्याची पाळी आली. माझ्या देहावर हाड आणि कातडें याशिवाय आंत कांहीं उरलें नाहीं. येथें अगदींच चैन पडेना, तेव्हां आठ दहा दिवस लियो फिरून आले आणि आतां त्यांची प्रकृति कांहींशी बरी आहे. येथें अगदीं एका बाजूला अशा दोन स्वतंत्र खोल्या त्यांनीं भाड्यानें घेतल्या आहेत. शहराबाहेर जाऊन लांकूडतोड्याबरोबर केव्हां केव्हां ते लांकडेंहि तोडतात आणि यामुळें त्यांची प्रकृति आतां बरीच सुधारली असून त्यांची वृत्तीहि अधिक आनंदी झाली आहे."

मास्को जवळच असलेल्या एका लहानशा खेड्यांत सुटेप नांवाचा एक शेतकरी होता. हा मनुष्य फारसा शिकलेला नव्हता; तथापि त्याचे विचार आणि त्याच्या भावना हीं टॉलस्टॉय यांच्या विचारांशीं फार जुळतीं होतीं. अशा प्रकारचा मनुष्य अमक्या खेड्यांत राहतो, इतकी माहिती कानीं पडल्याबरोबर त्याच्या भेटीसाठीं टॉलस्टॉय तावडतोब त्या खेड्यांत गेले.

घड्याकर बसविण्यासाठीं लागणारे घोंडे घडविण्याचा धंदा सुटेप

पीटर्सबर्ग येथें करीत होता; पण स्वतःच्या पोटासाठीं स्वबांधवांशीं चढाओढ करणें, हें पाप आहे; असा विचार मनांत येतांच आपला धंदा सोडून देऊन सुटेप त्या खेड्यांत रहावयास आला. पीटर्सबर्ग येथें चारचौघांकडे असलेलें आपलें येणें सुद्धां त्यानें वसूल केलें नाहीं. त्या खेड्यांत येऊन गांवच्या गुराख्याचा धंदा तो करूं लागला. गुरांशींहि ममतेनें वागावयाचें असा निश्चय करून मोठा असूड सोडून देऊन एक बारिकशी काठी त्यानें हातीं घेतली. त्याचे मुलगेहि बापाचें वळण गिरवूं लागले. कायद्याप्रमाणें लष्करांत येण्याचा हुकूम मुलांच्या हातीं पडला; पण युद्ध करणें पापमूलक आहे, असें कारण सांगून लष्करांत जाण्याचें त्यांनीं साफ नाकारलें, तेव्हां कायद्याप्रमाणें त्यांची रवानगी तुरुंगांत झाली. स्वतःस धर्माधिकारी म्हणविणारे लोक ख्रिस्ताची आज्ञा मोडतात, त्याअर्थीं त्यांनीं चालविलेल्या 'चर्चों'शीं संबंध ठेवावयाचा नाहीं. असा निश्चय करून सुटेप यानें आपलें एक नवेंच धर्ममंडळ बनविलें.

सुटेपच्या भेटीनें टॉलस्टॉय यांस फार आनंद झाला. त्याचा साधेपणा, त्याची मनःपूर्वक धार्मिकवृत्ति आणि विवेकबुद्धीची त्याची जागृति या गुणांमुळें तो त्यांस फार आवडूं लागला. मनुष्यानें वागावें कसें, हा प्रश्न जितका नाजुक तितका बिकटही आहे. आपण अमुक प्रकारें वागावें असा एकाद्याच्या बुद्धीचा निश्चय झाला, तरी अनेक कारणानें तसें प्रत्यक्ष वर्तन त्याच्या हातून घडत नाहीं. आधीं लोक काय म्हणतील, ही भीति त्याला भेडसावीत असते. कृत्रिम आचारविचारांचा दाब त्याच्या मनावर पडलेला असतो. हे खोटे आचारविचार बाजूस सारण्याचें धैर्य त्याला नसतें. क्वचित् प्रसंगीं असें धैर्य त्यानें दाखविलें, तरी लोकक्षोभाची थोडीशी चुणूक लागतांच त्याचे हातपाय कांपूं लागतात. त्याच्या धैर्याच्या पाठीमागें जोम नसतो; अशा अनेक प्रकारच्या अडचणी लक्षांत घेतल्या म्हणजे सुटेपसारख्या निरक्षर शेतकऱ्याच्या अंगीं इतके गुण असलेले पाहून त्याचें कौतुक टॉलस्टॉय यांस वाटलें, यांत नवल नाहीं. सुटेपची राहणी अगदीं साधी होती. आपल्या गरजा शक्य तितक्या त्यानें कमी केल्या होत्या. आपला उपयोग लोकांना अधिक कसा होईल, हें पाहून त्यानें आपला

आयुष्यक्रम ठरविला होता. त्याच्या बोलण्याच्या तऱ्हेंत आडपडदा अगर डावपेंच यांचें नांवहि नव्हतें. आपले विचार अगदीं सरळ व सोप्या भाषेनें सांगण्याची हातोटी त्याला चांगली साधली होती. यामुळें एकाच भेटींत टॉलस्टॉय व सुटेप यांचा चांगला स्नेह जमला.

दुसरे दिवशीं टॉलस्टॉय यांस शेजारच्या गांवीं एका जुन्या स्नेह्याच्या भेटीला जावयाचें होतें. त्यांना तेथें पोहोंचविण्याकरतां सुटेपनें गाडी जोडली आणि दोघेहि तींत बसून त्या गांवीं जावयास निघाले. वाटेंत त्यांची धर्मविषयक चर्चा पुन्हां सुरू झाली. बोलतां बोलतां ते दोघेहि इतके रंगून गेले कीं, गाडी कोणीकडे चालली आहे, याचें भान कोणासच न राहून रस्त्याच्या बाजूच्या एका लहानशा खोऱ्यांतून गाडी घरंगळून खालच्या दरींत जाऊन पडली. सुदैवानें कोणासहि फारशी इजा झाली नाहीं.

सुटेप हा मोठा विद्वान् होता, असें नाहीं. त्यानें टॉलस्टॉय यांस मोठीं गहन प्रमेयें सांगितलीं असेंहि नाहीं. टॉलस्टॉय यांस त्याचा स्नेह हवासा वाटला, तो त्याच्या विद्वत्तेमुळें नसून तो त्याच्या वागणुकीमुळें होय. स्वतःचीं मतें तंतोतंत प्रचारांत आणावयाचीं या उद्देशानें आपला सारा आयुष्यक्रम त्यानें बदलला होता. असें करण्यांत आर्थिक नुकसान त्यानें सोसलें, एवढेंच नव्हे, तर लोकलज्जाहि त्यानें झुगारून दिली होती. स्वतःच्या आतेष्टांसहि त्यानें जुमानलें नाहीं. त्याच्या याच गुणांचें अत्यंत कौतुक टॉलस्टॉय यांस वाटलें. जें धैर्य आपल्या अंगीं नाहीं, तें या निरक्षर शेतकऱ्याच्या अंगीं पूर्ण आहे, असें टॉलस्टॉय यांस आढळून आलें. वागणुकींत धरसोड आणि पूर्ण धैर्याचा व चिकाटीचा अभाव याच गोष्टी टॉलस्टॉय यांच्या मानसिक व्यथेच्या मुळाशीं होत्या. या वेळीं पुढील पत्र आपला मित्र आलेक्झीएफ यांस त्यांनीं लिहिलें आहे.

"तुमचें सुंदर पत्र मिळालें आणि मला फार संतोष झाला. आपणां दोघांचें प्रेम जणूं काय मधून मधून आपण विसरत असतों. पण तुमच्यामुळें माझ्या चित्ताला जी शांति प्राप्त झाली आहे आणि दृष्टीला जो शुद्धपणा मिळाला आहे, तो मी कसा विसरेन ! धार्मिक बाबीसंबंधीं अर्वाचीन

सुशिक्षित लोकांपैकीं तुमचींच मतें माझ्या मतांशीं मिळतात. दुसऱ्या एकाचीं मतें आपल्यासारखींच आहेत, असें पाहिलें म्हणजे आपलीं मतें खरीं आहेत, असा जणूं काय प्रत्यंतर पुरावा मिळून आपल्या चित्ताला संतोष होत असतो आणि तसा संतोष तुमच्यामुळें मला झाला. यामुळें तुम्हांस विसरणें मला केव्हांहि शक्य नाहीं. आचार आणि विचार या बाबींत तुम्हां आम्हांत बरेंच साम्य आहे. तुम्हांला सांसारिक यातना होतात, असें तुमच्या पत्रावरून मला कळून आलें आणि माझा जीव गडबडला; पण माझीहि स्थिति तीच आहे. संसार धड धरवत नाहीं आणि धड सोडवत नाहीं. अशी तुमच्याप्रमाणेंच माझीहि स्थिति झाली आहे. आपले विचार परिपक्वदशेस आले खरे; पण पूर्ववयांत जे लागेबांधे आपण निर्माण करून ठेवले त्यांचीं सूत्रें इतकीं चिवट आहेत कीं, तीं तोडून टाकण्याचें सामर्थ्य या नव्या विचारांत नाहीं. आतां खरा महत्वाचा भाग जड आचारांत नसून मनाच्या पक्केपणांत आहे, हेंहि मला कबूल आहे. या बाबतींत तुमचे आणि माझे विचार जुळत आहेत, हें पाहून मला फार आनंद होतो."

"लोकांकडलीं आपलीं येणीं वसूल करून त्या पैशांतून एकादें लोकोपयोगी कृत्य करावें, असा विचार एकदां माझ्या मनांत आला होता; पण असें करणें नुसत्या मूर्खपणाचेंच द्योतक नसून दांभिक लोकसेवेचेंहि द्योतक आहे, अशी माझी खात्री झाली. 'द्रव्य' ही चीज मूलतःच इतकी वाईट आहे कीं, तींतून चांगलें असें कांहींच निर्माण व्हावयाचें नाहीं, हें तुमचें म्हणणें मलाहि पटलें. मग पैशाअडक्याचा सारा संबंध एकदम सोडून देऊन तूं मोकळा कां होत नाहींस ? असा प्रश्न तुम्ही मला कराल, तर त्याचें उत्तर इतकेंच कीं, हें सारें माझ्या कुटुंबासाठीं मला करावें लागतें. आपण अकिंचन व्हावें हीच माझी खरी इच्छा आहे आणि या साध्याची पहिली पायरी या अर्थानें माझें सर्वस्व कुटुंबाच्या स्वाधीन मी करीत असतों. हें मोठें सत्कार्य आहे, असें मी म्हणत नाहीं; पण यामुळें मजवर येणारा दोष अल्पांशानें तरी कमी होईल इतकेंच."

"माझा हा बुद्धिवाद सर्वांना सर्वांशानें पटेल असें नाहीं; पण बुद्धि-

गम्य मार्गानें जाणाऱ्या मनुष्याला तरी तो पटेल, असा मला भरंवसा आहे; पण येथें आणखीहि एक मुद्दा आहे, तो असा कीं, या बाबींत बुद्धिवाद करून कोणाची खात्री पटविण्याची वास्तविक जरूरच नाहीं. माझीहि एका काळीं अशीच स्थिति होती. मीं जें कांहीं लिहिलें आहे, तेवढें रस्ता दाखविण्यास पुरेसें आहे. मार्ग शोधण्याची इच्छा ज्याला खरोखर असते, त्याला त्या दिशेकडे नुसतें बोट दाखविलें तरी पुरतें. योग्य मार्ग ज्याचा त्यानेंच शोधून काढला म्हणजे कोरड्या बुद्धिवादापेक्षांहि त्याची खात्री अधिक पटते आणि आपल्या मानसिक परिस्थितीला योग्य वस्तु कोणत्या आणि अयोग्य कोणत्या याचा निर्णयाहि त्याला अधिक चांगला करतां येतो. रस्ता दिसूं लागणें हाच काय तो महत्वाचा मुद्दा आहे. आणि हा रस्ता स्वतःच्या जीवनक्रमांतच मनुष्याला सांपडतो, अशी माझी खात्री झाली आहे. आपला सारा जीवनक्रम आपण वारंवार चाळून पहावा. म्हणजे हा मार्ग दिसूं लागतो. आपण आपल्या स्वतःच्या वागणुकीनें उदाहरण घालून द्यावें. त्यांच्याशीं बुद्धिवाद करण्यास लागूं नये. प्रत्यक्ष उदाहरणाचा परिणाम हळू हळू घडला, तरी निश्चयानें घडतो. त्या परिणामाला निश्चित स्वरूप असतें, असेंहि कदाचित् म्हणतां येणार नाहीं. तसेंच तो अमक्यावर घडेल, अथवा अमक्यावर घडणार नाहीं, असेंहि निश्चयानें म्हणतां यावयाचें नाहीं; पण दुसऱ्याला सुमार्गाला लावण्यास प्रत्यक्ष उदाहरणाइतका दुसऱ्या कशाचाहि उपयोग होत नाहीं. कोणत्याहि परिस्थितींत शुद्ध परोपकाराचें जीवित चालविणें शक्य आहे, ही गोष्ट प्रत्यक्ष उदाहरणाशिवाय नुसत्या बुद्धिवादानें कधींहि पटावयाची नाहीं. लोकांचीं अंतःकरणें हालतात, तीं बुद्धिवादानें नसून प्रत्यक्ष उदाहरणानें हालतात. याकरतां अशा रीतीनें चालणें हें तुम्हांला व मलाहि इष्ट आहे आणि या कामीं आपण परस्परांस मदत करूं या. आपण आपलीं अंतःकरणें एकमेकांशीं पूर्ण उघडीं करूं या.''

पुढें थोड्याच दिवसांनीं आलेक्सीएफ यानें एका श्रीमंत स्त्रीशीं विवाह केला आणि एका शाळेचा मुख्य अध्यापक होऊन पूर्वीचा साधा आयुष्य-क्रम त्यानें सोडून दिला. तथापि याच्या अगोदरच्या काळांत त्याचा उप-

योग टॉलस्टॉय यांस पुष्कळ झाला होता. आपणास योग्य वाटेल त्या मार्गानें जाण्यासाठीं सदोदित धडपड करावयाची आणि केवळ लोकांच्या भीतीनें गतानुगतिकतेनें चालावयाचें नाहीं, असा पूर्ण निश्चय करून जो मनुष्य जातो, त्याचें बाह्यतः नुकसान झाल्यासारखें दिसलें, तरी उत्क्रांतीच्या दृष्टीनें त्याची वाढच होत असते, अशी खात्री टॉलस्टॉय यांस स्व-अनुभवानें पटली होती. यामुळेंच दिवसेंदिवस त्यांची बुद्धि अधिक जोमदार बनत गेली. ते अशा रीतीनें स्वतः वागत गेले म्हणूनच ते लोकांना पूज्य आणि वंदनीय झाले. पण इतकी स्थिति येऊन पोहोंचेपर्यंत त्यांनीं भयंकर हाल सोसले होते, हेंहि विसरतां कामा नये. त्यांना जें देव-पण प्राप्त झालें, तें टाकीचे घाव त्यांनीं सोसले, म्हणून प्राप्त झालें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांचा जन्म मोठ्या खानदानीच्या श्रीमंत आणि सरदार घराण्यांत झाला होता. ते घरचे सुखी होते. त्यांच्या पदरीं जमीन-जुमला पुष्कळ होता. त्यांचे स्नेहसंबंध थोरामोठ्यांशीं होते आणि पूर्व-वयांत त्यांचा स्वतःचा स्वभावहि काव्यमय आणि रंगेल होता. इतक्या सगळ्या बाबींचा विचार केला, म्हणजे संसारापासून परावृत्त करण्यासारखी एकहि गोष्ट तेथें नव्हती. इतकेंच नव्हे, तर उलट संसारालाच त्यांनीं अधिकाधिक चिकटावें, अशी त्यांची परिस्थिति होती, असेंच आपणास दिसून येईल. पण सत्याच्या शोधार्थ इतके सारे बंध त्यांनीं तोडले. सारीं प्रेमसूत्रें त्यांनीं तोडून टाकलीं. या गोष्टी करतांना त्यांना मानसिक हाल किती भोगावे लागले असतील, हें वर्णनानें सांगतां येण्यासारखें नाहीं. 'जावें त्याच्या वंशा' तेव्हां कळणार. पुष्कळ वेळां त्यांचा मार्ग चुकला असेल. क्षुद्र गोष्टीला त्यांनीं नसतें महत्त्व दिलें असेल आणि महत्त्वाच्या गोष्टी कस्पटासारख्या लेखल्या असतील ! असें झालें असलें तरी त्यांच्या साऱ्या वागणुकीची दिशा एकच होती. ती दिशा सत्याचा शोध ही होय.

या वेळीं टॉलस्टॉय यांस निकोलस फिओडोराफ या नांवाचा एक गृहस्थ भेटला. मास्को येथील पदार्थसंग्रहालयांत हा एक सरकारी काम-गार होता. याचीं मतें टॉलस्टॉय यांच्या मतांशीं जुळतीं असल्यामुळें या दोघांची बरीच दाट ओळख झाली. त्याचप्रमाणें ऑर्लॉफ या नांवाचा एक

शाळागुरुहि टॉलस्टॉय यांचा चाहता झाला. या दोन गृहस्थांबद्दल पुढील पत्रांत टॉलस्टॉय यांनीं आपल्या मतांचा उल्लेख केला आहे. हें पत्र आलेक्झीएफ यांस लिहिलें आहे.

"तुमचें पत्र पावलें. फार आनंद झाला. तुमची आठवण मला वारंवार होत असते. तुम्हांवरील माझें प्रेम अखंड आहे. तुमच्या मनाला कांहीं तरी कारणानें असंतोष उत्पन्न झाला असल्याचें तुम्हीं लिहितां. 'तुम्हांला कोणत्याहि गोष्टीची कमतरता नाहीं, असें असतांहि जर तुम्हीं असंतुष्ट, तर मग माझी स्थिति कशी असावी ! मला हें मास्को येथलें राहणें अगदीं नकोसें झालें आहे. आतां येथें येऊन दोन महिने होऊन गेले, तरी येथली स्थिति अद्यापीहि माझ्या आंगवळणीं पडत नाहीं, आणि माझा असंतोष अगदीं पहिल्या दिवसाइतकाच ताजा आहे. मास्कोसारख्या शहरीं अनेक उपद्रवांच्या गोष्टी असतात आणि मोहाच्या बाजारांत लोक रहातात, जसें मीं पूर्वीं ऐकलें होतें; पण हा त्रास कसा असतो, याचा प्रत्यक्ष अनुभव मला नसल्यामुळें पुष्कळशा गोष्टी मला खोट्या वाटत. कॉकेशस पर्वताचें वर्णन भूगोलाच्या पुस्तकांत वाचून त्याची खरी कल्पना जशी येत नाहीं, त्याचप्रमाणें या गोष्टीबद्दलहि मला खरी कल्पना नव्हती. आतां येथें आल्यावर या मोहाच्या समुद्राचा प्रत्यक्ष अनुभव मला पूर्णपणें आला. माझ्या छातीवर दडपण पडल्यासारखें मला वाटतें. या भवचक्रांतून आपली सुटका धडपणें होणार कीं नाहीं, अशी शंका मला येऊं लागली आहे. अशी शंका येथें कोणालाच कशी येत नाहीं, याचें मला नवल वाटतें. डोळे असून लोकांना या गोष्टी दिसत नाहींत, हें कसें ! पण माझ्या आयुष्यांत याहि अनुभवाची उणीव असूं नये, असा संकेत असेल. आपल्या आयुष्यांत खरा प्रामाणिकपणाचा मार्ग मला शोधतां यावा, म्हणून हा अनुभव येणेंहि कदाचित् अगत्याचें असेल. अशा प्रकारच्या स्थितींत पडलेल्या मनुष्याला दोनच मार्ग मोकळे असतात. एक मार्ग असा कीं, चाललेल्या गोष्टींकडे काना डोळा करून जळफळत स्पष्ट बसावें अथवा जुगार, दारू, गप्पा, नाटकें, तमाशे इत्यादि गोष्टींचा अंगिकार करून त्यांच्या मुळींत बुद्धीची

दृष्टि बंद करून टाकावी. ही दुसरी गोष्ट करणें, मला तर शक्य नाहीं. आणि पहिल्या मार्गानें जावें म्हटलें, तर माझ्या अंगीं एवढी सहनशीलता नाहीं. तेव्हां आतां तिसराच एक मार्ग मीं शोधून काढला आहे. तो मार्ग म्हणजे तोंडानें व लेखांनीं लोकांना उपदेश करणें हा होय. पण या मार्गांतहि एक धोक्याचें स्थळ मला दिसतें. खोटा अभिमान आणि गर्व यांचा संचार होऊन कदाचित् बुद्धीची फसगत होण्याचाहि संभव या मार्गांत असतो. यामुळें याचीहि मला भीति वाटते. आतां लोकसेवा पतकरून निराश्रितांच्या उपयोगीं पडावें, असें म्हटलें तर निराश्रित लोक तेथें इतके आढळतात कीं, या कामीं आपण यःकश्चित् मनुष्य कितीसे पुरे पडणार, या विचारानें मन शंकाकुल होत असतें. येथें एकाद्या खेड्यासारखी स्थिति नाहीं. आतां असल्या निराशाजनक भागाकडे न पाहतां जें आहे, तें बरेंच आहे, अशी तुमच्याप्रमाणें मनाची समजूत घालावी, तर मला तेंहि साधत नाहीं. जेव्हां मी अगदीं निराश होतों, तेव्हां तुमच्या या समतोल मनस्थितीची आठवण मला होते. पण ती स्थिति आपल्या अंगीं आणणें, हें मात्र मला साधत नाहीं. माझा स्वभाव तापट असल्यामुळें मनाविरुद्ध कांहीं घडलें कीं, माझें डोकें एकदम फिरतें. आणि मग कांहीं सुचेनासें होतें; पण अशा स्थितींतहि एकाद-दुसऱ्या सज्जनाची भेट तरी परमेश्वर मला करवितो, हा त्याचा केवढा उपकार आहे बरें ! ऑरलाफ आणि फिओरोराफ असे दोन सज्जन येथें मला भेटले. फिओडोराफचें वय साठ वर्षांचें आहे. आपली सारी मिळकत दानधर्मांत खर्चून तो अगदीं गरीबीनें दिवस काढतो. तो अत्यंत प्रेमळ आणि उल्हासी मनुष्य आहे. ऑरलाफ याजवर कांहीं राजकीय किटाळ येऊन दोन वर्षें त्याला तुरुंगांत काढावीं लागलीं. त्या ठिकाणीं त्याची प्रकृति कायमची बिघडली. तो अगदीं त्यागीवृत्तीनें राहतो. तो शाळागुरूचा धंदा करतो. माझीं कांहीं पुस्तकें त्याच्या पाहण्यांत आलीं त्यावरून माझ्याशीं त्याचीं मतें अगदीं जुळतात, असें त्यांस आढळून आलें. सध्यां कांहीं लहान लहान गोष्टी मी लिहीत आहें; पण हा सारा उद्योग चालण्यास आजुबाजूला जी शांतता पाहिजे

तिचा मात्र येथें पूर्ण अभाव आहे. असल्या भयंकर परिस्थितीचें लोकांना कांहींच वाटत नाहीं. ठरावीक मार्गानें जावें आणि ठराविक शब्द बोलून परस्परांस व स्वतःस फसवावें, एवढ्यांत येथल्या लोकांचें सारें तत्वज्ञान आलें आहे. असल्या लोकांचें नित्य दर्शन होत असल्यामुळें मनाला सदोदित विषाद वाटतो. सकाळीं उठून कांहीं काम करावें म्हणतों; पण तेंहि घड साधत नाहीं. दुपारीं कोठें तरी रानांत जाऊन मी लांकडें कापीत बसतों. येथल्या दिनक्रमांत हाच वेळ केव्हां केव्हां तरी मला सुखप्रद होतो. हा उद्योग सोडून दिला कीं, माझी वृत्ति पुन्हां बिथरते. संध्याकाळीं मी बहुधा घरींच बसतों आणि या वेळीं भेटीस येणारे समंध माझ्या बोकांडीस बसलेले असतात. त्यांच्या भाषणांत केव्हां एकादी मौजेची गोष्ट असते; पण तींत सुद्धां पुष्कळ वेळां खरें तत्व कांहींच नसतें. तास तास गप्पा मारूनहि महत्वाच्या अशा एकाहि गोष्टीला आम्हीं स्पर्शसुद्धां करीत नाहीं. या एरंडाच्या गुऱ्हाळाचा मला अगदीं वीट येऊन गेला आहे. या लोकांचें मुखावलोकनहि नको, असें मला वाटूं लागलें आहे. हें पत्र मीं पुन्हां वाचून पाहिलें, तेव्हां तें अगदीं बाष्कळ आहे; असें दिसून येऊन तें टपालांत टाकावें कीं नाहीं याचा निश्चय होईना, पण दुसरें अधिक चांगलें लिहितां येण्याजोगें नसल्यामुळें अखेरीस हेंच तुम्हांस पाठविलें. पुढच्या खेपेला मी अधिक चांगलें लिहीन. वारंवार पत्र पाठवून समाचार कळवीत जावा."

या वेळीं फिओडोराफ यांशीं जडलेला टॉलस्टॉय यांचा हा स्नेह चिरकाल टिकला नाहीं. या काळानंतर कांहीं वर्षांनीं दोघांत विलक्षण मतभेद उद्भवून दोघेहि आपापल्या मताचे कट्टे अभिमानी असल्यामुळें त्यांचें पटेनासें झालें यांत नवल नाहीं. यामुळें टॉलस्टॉय यांजसंबंधीं उल्लेख करतांना फिओडोराफ यानें आपल्या कांहीं लेखांत असभ्य भाषाहि वापरली आहे; पण टॉलस्टॉय यांनीं या बाबींत जशास तसें असें वर्तन केलें नाहीं. फिओडोराफचा पूर्ण त्यागीस्वभाव टॉलस्टॉय यांस माहीत होता. स्वार्थासाठीं कोणतीहि गोष्ट तो करणार नाहीं, अशी त्यांची खात्री होती. यामुळें मतभेद झाला,-तरी कोठेंहि फिओडोराफचा उल्लेख करण्याचा प्रसंग

आल्यास टॉलस्टॉय अत्यंत आदरपूर्वक उल्लेख करीत. फिओडोराफसंबंधी तुच्छताबुद्धि अथवा दुसरी कोणतीहि क्षुद्रभावना त्यांच्या ठिकाणीं आढळली नाहीं.

जीं दोन मनुष्यें आपला मार्ग स्वपराक्रमानें काढीत असतात, अशांचें मतैक्य सर्व प्रकारें होणें ही गोष्ट जवळ जवळ दुरापास्तच होय. त्यांच्या ठिकाणीं विचार स्वतंत्रपणें वाढलेले असतात आणि भिन्न परिस्थितींत उत्पन्न झालेल्या विचारांत एकवाक्यता नसणें हेंहि स्वाभाविकच आहे. या वेळीं स्ट्रॉहाफ याला एक पत्र लिहून त्याच्या धरसोडीच्या वागणुकीबद्दल त्याची कानउघडणी टॉलस्टॉय यांनीं केली होती. या पत्राच्या उत्तरांत स्ट्रॉहाफ लिहितो.

" तुमचें मनोबल माझ्या ठिकाणीं नाहीं आणि जें नाहीं, तें आहे असें भासविण्याची विद्या मला साधलेली नाहीं. आपल्या हातून होत नाहीं, त्याचें ढोंग करण्याची इच्छा मला नाहीं. स्वतःच्या मताच्या ठिकाणीं तुमची जी अव्यभिचारी भक्ति आहे, ती माझ्या ठिकाणीं नाहीं; पण माझ्या हातून वर्तनांत चूक झाली, तरी त्यावरून तुमचीं मतें मला अग्राह्य आहेत, असें समजूं नये. माझ्या विवेकबुद्धीला तीं पूर्णपणें पटलीं असतांहि मनोदौर्बल्यामुळें माझ्या आचरणांत तीं उतरत नाहींत. याकरतां माझा अव्हेर करूं नका. मी आहें तसाच मला वागूं द्या. जगाचा पूर्ण वीट तुम्हांला आला आहे, हें मला ठाऊक आहे आणि माझी स्थितीहि तीच आहे. फरक इतकाच कीं, तुमचा वीट जितका तीव्र आहे, तितका माझा नाहीं. तथापि माझ्या ठिकाणींहि जगाबद्दल लोभ नाहीं. या जगाचा संबंध नको, असें तुमच्याप्रमाणेंच मलाहि वाटतें आणि त्या संबंधाचे अखेरचे धागे तोडण्याचा यत्न मी करीत असतों. पण माझा दुर्बळपणा दिसून आला, तरी तेवढ्यावरून तुम्हीं स्नेहांत उणीव आणूं नये. माझ्या साऱ्या आयुष्यांत निस्सीम सुखाचे असे जे कांहीं क्षण गेले, त्यांचें कारण तुम्हीं आहां, हें मी जाणून आहें. तुमचें हें ऋण मी कधींहि विसरणार नाहीं. माझ्या दोषाकडेच केवळ पाहूं नका. गुणाचा अंश असेल, तर तोहि पहा आणि चुकेल तेथें दुरुस्त करा."

इ. स. १८८१ सालाच्या आक्टोबरच्या ३१ तारखेला टॉलस्टॉय यांस आणखी एक मुलगा झाला. या मुलाचें नांव आलेक्झी असें ठेवण्यांत आलें.

या वेळीं टॉलस्टॉय यांच्या बाह्य स्वरूपाचें वर्णन बोबोरिकिन नांवाच्या एका ग्रंथकारानें पुढीलप्रमाणें केलें आहे.

" टॉलस्टॉय हे या वेळीं मध्यम वयाचे दिसत होते. चेहऱ्यावरून ते दयाशील दिसत. त्यांचे केंस अद्यापि फारसे करडे होऊं लागले नाहींत. त्यांचा पोषाक अगदीं गांवढळ नसला तरी ऐटबाजीचा तिटकारा त्यांत पूर्ण दिसत होता. सरदार घराण्यांत यजमान या नात्यानें वावरणाऱ्या पुरुषाला जसा पोषाक अवश्य असला पाहिजे, असें लोकांस वाटतें, तसल्या पोषाकालाहि त्यांनीं रजा दिली होती. घरीं चार चौघांदेखतहि वरचा कोट काढून ते बसत. शिष्टमंडळांत असें करणें असभ्यपणाचें समजलें जातें. उकडूं लागल्यास नुसता सद्रा घालूनच ते बसत."

" त्यांच्या मानानें कौंटेसच्या वागणुकीची तऱ्हा अगदीं वेगळी दिसली. ही स्त्री मोठी बांधेसूद व ठसठशीत चेहऱ्याची अशी असून तिचा पोषाकहि अगदीं नीटनेटका आणि त्या काळच्या फ्याशनला अगदीं अनुसरून होता असें मला दिसलें."

---

## प्रकरण तिसरें.

# गरिबी आणि श्रीमंती.

मानवी जीविताचा अंतिम हेतु काय आणि मर्यादित जीवात्मा व अमर्याद परमात्मा यांचे परस्परसंबंध कोणत्या प्रकारचे आहेत, हें जाणण्याची धडपड टॉलस्टॉय यांनीं किती व कशी केली, हें पूर्वी आपण पाहिलेंच आहे. या प्रश्नांचीं उत्तरें मिळण्यासाठीं अनेक धर्मांतील प्रमुख आचार्यांचे ग्रंथ त्यांनीं पाहिले आणि ख्रिस्ताच्या उपदेशाचा अभ्यासहि त्यांनीं स्वतंत्रपणें केला. या खटपटीच्या अखेरीस जीं त्यांचीं मतें ठाम बनलीं, तीं आपल्या

एका ग्रंथांत त्यांनीं नमूद केलीं आहेत. धर्मविचाराचें अंग अशा रीतीनें निश्चित झाल्यावर त्यांची बुद्धि सामाजिक प्रश्नांकडे वळली. सामाजिक अर्थशास्त्राचा विचार ते प्रथम करूं लागले. जगांत श्रीमंत मूठभर आणि गरीब कोट्यवधि अशी स्थिति कां ? या प्रश्नाचा विचार ते करूं लागले.

जगांत न्यायाचें, समतोलपणाचें आणि सर्वांस मंगलदायक असें राज्य उत्पन्न करणें, हें मनुष्याचेंच काम आहे, असा त्यांचा निश्चित सिद्धांत होता. अशी स्थिति मनुष्याला आणतां येत नसेल, तर ती त्याचीच चूक होय. परमेश्वरानें घालून दिलेले नियम आपण पाळले, तर जगांत दुःखाचें नांवहि उरणार नाहीं, अशी खात्री त्यांस वाटे. मास्को येथें रहावयास आल्यानंतर त्या शहराच्या भिकार भागांतील वस्ती ज्या भयंकर हालअपेष्टा सोशी, त्या पाहून त्यांच्या हृदयाचें पाणी होऊन गेलें, आणि त्या अभागी लोकांकडे धर्माधिकारी, विद्वान्, श्रीमंत आणि सरकार हे सारखाच कानाडोळा करतात, हें पाहून त्यांचा संताप अनावर होई. दुःख आणि दारिद्य यांचें एवढें जिवंत साम्राज्य आजूबाजूस पसरलें असतां हे पुढारी म्हणविणारे वर्ग स्वस्थ घोरत कसे पडतात, याचें त्यांस नवल वाटे.

या वेळीं दशवार्षिक खानेसुमारीचें काम नुकतेंच सुरू झालें होतें. तेव्हां या संधीचा फायदा घेऊन या विषयाकडे लोकांचीं मनें वळविण्याचा निश्चय त्यांनीं केला. खानेसुमारीच्या कामांत दोन हजार विद्यार्थ्यांची योजना मोजणीकडे झाली होती. हें शिरगणतीचें काम करतां करतांच या विद्यार्थीवर्गानें लोकांच्या सामान्य स्थितीचीहि नोंद करावी, असा उपदेश टॉलस्टॉय यांनीं त्या विद्यार्थीवर्गास केला. जे लोक अगदीं निराश्रित स्थितींत सांपडतील, त्यांना लोकांकडून मदत व्हावी, अशी योजना करण्याचा बेत त्यांनीं केला होता. या साऱ्या खटपटीचें फळ म्हणून 'आम्हांस काय केलें पाहिजे' या नांवाचा ग्रंथ त्यांनीं लिहिला, हें होय.

'पैसा' या विषयासंबंधीं टॉलस्टॉय यांचें निश्चित मत अद्यापि बनलें नव्हतें. तथापि त्यांच्या मताची दिशा काय होती, हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

" लोकांचें बरें करणें म्हणजे त्यांना पैसा देणें, असाच अर्थ सांप्रत सर्वत्र समजला जातो; पण द्रव्यदान आणि लोककल्याण या वस्तु समानार्थक नाहींत. एवढेंच नव्हे, तर त्यांचा परस्परांशीं संबंधहि नाहीं, असें माझें मत आहे. फार काय, पण या दोन वस्तु परस्परविरोधी गुणांच्या आहेत, असेंहि मी म्हणेन. पैसा हा स्वभावतःच अनर्थकारक आहे. ज्याप्रमाणें पाणी आणि पातळपणा अथवा साखर आणि गोडी हीं अभेद्यपणें एकत्र नांदतात, त्याचप्रमाणें पैसा आणि पाप यांची वागणूक एकाच घरांत असते. याकरतां पैसा देणारा मनुष्य पाप उत्पन्न करतो, असें मी म्हणेन. लोकसेवा करावी, हा उद्देश मनांत धरून जो मनुष्य खटपट करतो, तो स्वतः जवळील द्रव्याचें दान बहुधा करीत असतो: अशा रीतीनें आपल्या जवळील पापाचा सांठा तो नाहींसा करतो. पण यामुळेंच द्रव्यदान पुण्यकारक आहे, असा गैरसमज लोकांत उत्पन्न होतो."

यावरून पैशासंबंधीं त्यांना पूर्ण तिरस्कार होता, असें कोणालाहि वाटण्याचा संभव आहे; तथापि द्रव्यदानासंबंधीं ते खरोखरच इतके उदासीन होते, असेंहि निश्चयानें म्हणवत नाहीं. उदाहरणार्थ पुढील उतारा पहा.

" सध्यां मोजणीचें काम चाललें आहे. अशा वेळीं जे अगदींच कंगाल स्थितींत आढळतील, त्यांना पैशाची थोडीबहुत मदत करण्याची खटपट कांहीं लक्ष्मीपुत्रांनीं चालविली आहे. अशा मदतीनें ही आपत्ति कायमची दूर होईल, असें नाहीं आणि तिचा उपयोग फक्त चालू क्षणापुरता होईल हेंहि खरें; तथापि तिचा उपयोग अगदींच होणार नाहीं, असें मात्र नाहीं. क्षुधिताला एका दिवसापुरतें अन्न मिळणें, हेंहि अशा स्थितींत मोठें कार्य आहे. याशिवाय आपल्या अभागी बांधवांशीं एका प्रसंगीं तरी आपण माणसासारखे वागलों, ही जाणीव कांहीं विद्यार्थ्यांत आणि सरकारी अधिकाऱ्यांत एकदां तरी उत्पन्न होईल, ही गोष्ट मोठ्या महत्त्वाची होय."

या दोन उताऱ्यांत दिसणारा विरोध अगदीं स्पष्ट आहे. पैसा देतो, तो पाप देतो; असें एकदां म्हणून तेच टॉलस्टॉय पैसा देणें अगदींच वाईट नाहीं, असेंहि म्हणतात. या विरोधाची एकवाक्यता टॉलस्टॉय कशी करतात, हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

" द्रव्यदान करण्यानें होणारा कार्यभाग बाह्यतः अगदीं क्षुल्लक दिसला. तरी त्याचें महत्त्व फार मोठें आहे; पण हें कार्य येथेंच थांबेल आणि तें पूर्णतेस कधींच पोहोंचणार नाहीं, असें तरी आपण कां म्हणावें ? उभ्या मास्को शहरांत उघड्या अंगानें हिंडणारा, भुकेनें पिडलेला आणि पोटासाठीं कोणतेंहि कर्म करण्यास मागेंपुढें न पाहणारा,, असा एकहि मनुष्य मिळावयाचा नाहीं, अशीं आशा आपण कां करूं नये ? अशी गोष्ट अद्यापि घडली नाहीं, यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. मला आश्चर्य वाटतें तें हेंच कीं, एका बाजूला चैनींत लोळणारे लक्ष्मीपुत्र आणि त्यांच्याच शेजारीं दुसऱ्या बाजुला अन्नान्न करीत हिंडणारे भिकारी; अशा विरुद्ध वस्तु रोज दिसत असतां डोळ्यांवर कातडें ओढून आपण घोरत कसे पडतों ? एका बाजुला श्रीमंती इतकी कीं, जवळच्या पैशांचें काय करावें, हें सुद्धां मालकाला सुचत नाहीं. आणि दुसऱ्या बाजूला दारिद्र्य इतकें भयंकर कीं, दिवसच्या दिवस अन्नाच्या दर्शनावांचून जातात. ही स्थिति प्रत्यहीं पहात असतां समाज स्वस्थ घोरत पडतो, हें नवल नव्हे काय ? "

या वेळीं टॉलस्टॉय यांनीं समाजाचें जें निरीक्षण केलें आणि त्यावरून जे समाजसिद्धान्त त्यांच्या बुद्धीला पटले, ते एकत्र करून एक ग्रंथ त्यांनीं निर्माण केला. 'आतां आपण काय करावें ?' हा ग्रंथ इ. स. १८८६ या सालीं पुरा झाला.

या पुस्तकाचे लहान लहान चाळीस भाग त्यांनीं केले आहेत. या वेळीं टॉलस्टॉय यांची स्वतःची मनःस्थिति कोणत्या प्रकारची होती, आणि रशियांतील सामान्य लोकस्थिति कशी होती, हें ध्यानांत येण्याकरतां या ग्रंथांतील कांहीं उतारे पुढें दिले आहेत.

— १ —

माझें सारें पूर्ववय खेड्यापाड्यांत गेलें. इ. स. १८८१ सालीं मास्को शहरीं मी राहण्यास आलों. तेव्हां तेथील दारिद्र्य माझ्या दृष्टीस पडलें, आणि मी आश्चर्यानें मूढ होऊन गेलों.

खेड्यापाड्यांतली गरिबी मला ठाऊक होती; पण शहरांतली गरिबी

मिळाल्यावर भीक मागण्याची हौस कोणाला असेल ?' असें म्हणून आणि 'आपण उद्यां खास येतों' असें मला तीनतीन वेळां बजावून तो निघून गेला.

लांकडें तोडण्यासाठीं गांवाबाहेरील ज्या टेंकडीवर मी जात असें येथें त्याला मीं बोलाविलें होतें आणि त्याच्या बोलण्याचालण्याच्या ढबीवरून तो खरोखरच येईल असें मला वाटलें होतें; पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो आला नाहीं. अशाच रीतीनें आणखीहि कित्येक माणसांनीं मला फसविलें. याशिवाय या लोकांच्या दुसऱ्याहि युक्ती आहेत. आपल्या गांवीं जाण्यास लागणारे आगगाडीच्या तिकिटापुरते पैसे कांहीं लोक मागतात; पण चार आठ दिवसांनीं रस्त्यांत पुन्हां कोठें तरी ते भेटतात. मला अशा रीतीनें फसवून त्यांपैकीं एकाद्याची पुन्हां गांठ पडली आणि त्यानें मला ओळखलें नाहीं, तर ती जुनी थाप तो मारीत असे. अशा प्रकारचे फसवे लोक निरक्षर शेतकरी वर्गांतहि मला पुष्कळ आढळले; तथापि मला या लोकांचा राग न येतां त्यांची कींवच वाटे. यांपैकीं पुष्कळ लोक थंडीच्या दिवसांत गारठून मरतात आणि कांहीं आत्महत्या करतात, असेंहि मला समजलें.

— २ —

अशा प्रकारची हकीकत माझ्या मित्र मंडळीला मीं सांगितली, तेव्हां त्यांपैकीं एक म्हणाला, 'अहो, तुम्ही पाहिलें हें कांहींच नाहीं. हित्रॉफ मार्केटाजवळील भिकाऱ्यांच्या चाळी तुम्हीं पाहिल्यावर या रस्त्यांतल्या भिकाऱ्यांचें तुम्हास कांहीं वाटणार नाहीं. तेथल्या रहिवाश्यांनीं स्वत:ला 'गोल्डन कंपनी उर्फ सोनेरी टोळी' असें नांव घेतलें आहे !

इतक्यांत दुसरा एक थट्टेखोर गृहस्थ म्हणाला, 'ती आतां कंपनी राहिली नसून तिचें रेजिमेंट (पलटण) बनण्याइतकी ती मोठी झाली आहे.' चौकशीअंतीं यांची संख्या रेजिमेंटपेक्षांहि अधिक असून तिचें एक मोठें सैन्य बनेल अशी माझी खात्री झाली. एकट्या मास्को शहरांत अशा लोकांची संख्या ५०००० पर्यंत असावी असा माझा अजमास आहे.

शेतकरी अजारी पडून इस्पितळांत गेले होते. इस्पितळांतून बाहेर पडल्यावर धंदा नाहीं आणि परत जाण्यास पुरेसा पैसा नाहीं, अशा पेचांत सांपडून ते भीक मागूं लागल्याचें मला आढळलें. कित्येक शेतकरी वृद्धावस्थेमुळें काम करण्याच्या स्थितींत नव्हते, असेंहि मला दिसलें. तसेंच कित्येक धट्टेकट्टे असूनहि भीक मागत होते. मास्को शहरीं आल्यानंतर दोन माणसें बरोबर घेऊन लांकडें तोडण्यास गांवाबाहेर जाण्याचा परिपाठ मीं ठेवला होता.

हीं दोन्ही माणसें शेतकरी वर्गांतलींच होतीं. एकाचें नांव पिटर असें असून तो लष्करांतून वजा झाला होता. दुसऱ्याचें नांव सायमन असें होतें. अंगावरील कपडे आणि शरीराचे हातपाय यांशिवाय स्वतःच्या मालकीचें असें म्हणावयास त्यांजवळ कांहींच नव्हतें. एवढ्या साधनावर रोज दहाबारा आणे मिळवून त्यांतला कांहीं भाग ते शिलकी टाकीत. अशा रीतीनें थोडासा पैसा जमवून जरूरीपुरते चार कपडेलत्ते करावेत आणि आपल्या गांवीं निघून जावें असा त्यांचा बेत होता. हे लोक उद्योगी कां आणि यांच्याचसारखे दुसरे भिक्षेकरी कां, असा प्रश्न माझ्या मनांत उभा राहिला.

असा एकादा भिकारी शेतकरी वाटेंत भेटला म्हणजे, 'तुझी अशी स्थिति कां?' असा प्रश्न मी त्याला करी. एके वेळीं असाच एक शेतकरी मला भेटला. त्याचे केस करडे होऊं लागले होते. त्यानें मजपुढें हात पसरतांच 'तूं कोण?' असा प्रश्न मीं त्याला केला. तो म्हणाला, 'काम पाहण्यासाठीं काळुगाहून मी आलों होतों. प्रथम थोडे दिवस लांकूड चिरण्याचें काम मला मिळालें; पण तें संपल्यावर मला कोणतेंच काम मिळालें नाहीं; तेव्हां जवळ होतें नव्हतें तें मोडून पोटाची भर मीं केली. करवत आणि कुऱ्हाडसुद्धां मीं विकून टाकली.' ही हकीकत ऐकून करवतीपुरते पैसे मीं त्याला दिले आणि म्हटलें, 'गड्या, करशील तितकें काम मी तुला देतों. उद्यां करवत घेऊन ये. काम मिळेल कीं नाहीं अशी शंका मुळींच धरूं नको. जरूर ये.'

तो म्हणाला, 'मी खचित येईन. मी अजून धट्टाकट्टा आहें. काम

मिळाल्यावर भीक मागण्याची हौस कोणाला असेल ?' असें म्हणून आणि 'आपण उद्यां खास येतों' असें मला तीनतीन वेळां बजावून तो निघून गेला.

लांकडें तोडण्यासाठीं गांवाबाहेरील ज्या टेंकडीवर मी जात असें येथें त्याला मीं बोलाविलें होतें आणि त्याच्या बोलण्याचालण्याच्या ढबीवरून तो खरोखरच येईल असें मला वाटलें होतें; पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो आला नाहीं. अशाच रीतीनें आणखीहि कित्येक माणसांनीं मला फसविलें. याशिवाय या लोकांच्या दुसऱ्याहि युक्ती आहेत. आपल्या गांवीं जाण्यास लागणारे आगगाडीच्या तिकिटापुरते पैसे कांहीं लोक मागतात; पण चार आठ दिवसांनीं रस्त्यांत पुन्हां कोठें तरी ते भेटतात. मला अशा रीतीनें फसवून त्यांपैकीं एकाद्याची पुन्हां गांठ पडली आणि त्यानें मला ओळखलें नाहीं, तर ती जुनी थाप तो मारीत असे. अशा प्रकारचे फसवे लोक निरक्षर शेतकरी वर्गांतहि मला पुष्कळ आढळले; तथापि मला या लोकांचा राग न येतां त्यांची कींवच वाटे. यांपैकीं पुष्कळ लोक थंडीच्या दिवसांत गारठून मरतात आणि कांहीं आत्महत्या करतात, असेंहि मला समजलें.

— २ —

अशा प्रकारची हकीकत माझ्या मित्र मंडळीला मीं सांगितली, तेव्हां त्यांपैकीं एक म्हणाला, 'अहो, तुम्ही पाहिलें हें कांहींच नाहीं. हिट्रॉफ मार्केटाजवळील भिकाऱ्यांच्या चाळी तुम्हीं पाहिल्यावर या रस्त्यांतल्या भिकाऱ्यांचें तुम्हास कांहीं वाटणार नाहीं. तेथल्या रहिवाश्यांनीं स्वत:ला 'गोल्डन कंपनी उर्फ सोनेरी टोळी' असें नांव घेतलें आहे !

इतक्यांत दुसरा एक थट्टेखोर गृहस्थ म्हणाला, 'ती आतां कंपनी राहिली नसून तिचें रेजिमेंट (पलटण) बनण्याइतकी ती मोठी झाली आहे.' चौकशीअंतीं यांची संख्या रेजिमेंटपेक्षांहि अधिक असून तिचें एक मोठें सैन्य बनेल अशी माझी खात्री झाली. एकट्या मास्को शहरांत अशा लोकांची संख्या ५०००० पर्यंत असावी असा माझा अजमास आहे.

या वस्तुस्थितीसंबंधीं येथल्या जुन्या रहिवाशांचे डोळे इतके मरून गेले आहेत कीं, तिजबद्दल खेद न होतां उलट त्यांना गम्मतच वाटते. मी लंडनला गेलों होतों, तेथेंहि हीच स्थिति मला आढळली.

ही वस्तुस्थिति एक वेळां डोळयांनीं पाहून तिचें प्रत्यक्ष ज्ञान करून घ्यावें, असा विचार कित्येक दिवस माझ्या मनांत घोळत होता; पण त्या वस्तींत जाण्यासाठीं निघालों कीं माझी मलाच लाज वाटूं लागे. ज्यांचे कष्ट आपणास दूर करवत नाहींत, त्यांना पाहण्यांत हांशील काय? असा विचार माझ्या मनांत येई आणि 'ज्या अर्थी तूं शहरांत राहण्यास आलास त्या अर्थी तेथल्या भल्याबुऱ्या सगळ्या गोष्टी पाहून घे' असेंहि एक मन मला सांगे. अखेरीस इ०स० १८८१ च्या डिसेंबर महिन्यांत हिट्रॉफ मार्केटकडे जाण्यास मी निघालों. कापसासारखें शुभ्र बर्फ पडत होतें. त्या दिवशीं वाराहि खूप सुटला होता. तेथल्या एका रस्त्याला मी जाऊन पोहोंचलों. वेडेवांकडे पोषाख केलेले तेथले रहिवासी, रस्त्यांत इकडे तिकडे हिंडत होते. त्यांच्या अंगावरील कपडे अंगाच्या मापानें केलेले नव्हते. त्यांच्या मुद्रा आजुबाजूच्या परिस्थितीला अगदीं उदासीन असल्याचें मला दिसून आलें. अशा बऱ्याच लोकांचा घोळका एका दिशेनें चालला होता. मीहि त्यांच्या मागें जात जात मार्केटकडे जाऊन पोहोंचलों. मार्केटाच्या आजुबाजूला असल्याच प्रकारचे लोक बसले असून कांहीं जिनसांची देवघेव त्यांच्यांत सुरू होती. मार्केटांत फारशी गडबड मला दिसली नाहीं. या बाजाराचें काम तेव्हां संपलें असावें असें दिसलें. मार्केटांतून बाहेर पडून एक घोळका पुढें जाणाऱ्या एका उंचवट्याच्या रस्त्यानें चालला होता. मीहि या घोळक्या-मागें चाललों. माझ्या पुढच्या बाजूस बाया चालल्या होत्या. यांत एक म्हातारी असून दुसरी तरुण होती. दोघींच्याहि अंगावर फाटक्या चिंध्या होत्या. कांहीं घरगुती बाबीवर त्या बोलत होत्या. मुद्याचे एकदोन शब्द झाले कीं मागोमाग एकदोन शिव्या त्यांच्या तोंडून बाहेर पडत होत्या. अशा रीतीनें शद्बाआड शिवीचा उच्चार होत होता. त्या दारू प्यायलेल्या नव्हत्या. समोरून कोणी भेटलें तर त्याच्याशीं बोलतांना मध्यें अपशद्बांचा

उच्चार त्या करीत. यावरून ही या लोकांची सामान्य भाषा असावी, असा तर्क मीं केला.

तो उंचवटा चढून रस्त्याच्या कोंपऱ्यावरील एका मोठ्या इमारतीजवळ आम्ही आलों. माझ्या बरोबरचे बहुतेक लोक तेथेंच उभे राहिले. बाजूच्या फूटपायरीवर अशाच प्रकारचे आणखी कित्येक लोक बसले होते. या मोठ्या इमारतीचे दोन भाग असून एका भागांत पुरुष व दुसऱ्या भागांत बायका राहतात. या दोन चाळींच्या मधून मीहि पहात पहात चाललों. हें घर कंगाल लोकांना रात्रीचा आसरा देण्यापुरतें कोणीं एकानें बांधलें होतें. संध्याकाळीं पांच वाजतां भिकारी आंत घेतले जात. माझ्याबरोबर रस्त्यांत चालणारे बहुतेक भिकारी या घराकडेच येत होते.

मला तेथें उभा राहिलेला पाहून त्यांतले कांहीं लोक माझ्याकडे पाहूं लागले. 'तुझ्यासारखा भलत्याच तऱ्हेचा मनुष्य येथें कां?' असा प्रश्न विचारण्याचें जणूं काय त्यांच्या मनांत असावें असें त्यांच्या मुद्रेवरून मला दिसलें. त्यांच्या त्या वेळच्या मुद्रेवरून ही एकच भावना होती, असें नाहीं; कांहीं राग, कांहीं असूया, कांहीं द्वेष, कांहीं दीनता, अशा अनेक विकारांचें विलक्षण मिश्रण मला तेथें दिसत होतें. 'आमच्या दुःखांत सुख मानणारा अहंमन्य श्रीमंत तूं कोण? वेळ घालवायला तुला दुसरें साधन नाहीं काय? आमच्या दुःखांत तूं भर कां घालतोस? त्यावर डागण्या कां देतोस? काय तुला आमची दया येते? छेः! असला प्राणी आजपर्यंत आम्हांस कधींच भेटला नाहीं.' अशा प्रकारचे प्रश्न त्यांच्या मुद्रा मूकपणें मला विचारीत होत्या. त्यांच्यापैकीं कोणाशीं तरी संभाषण करावें, अशी इच्छा मला होती; पण तसें करावयाचें धैर्य पुष्कळ वेळपर्यंत मला झालें नाहीं.

आम्हां दोघांच्या संसारिक स्थितींत जरी जमीनअस्मानाचें अंतर होतें, तरी परस्परांची नजरभेट तीनचार वेळ झाल्यानंतर आमच्यांतील परकेपणा बराच कमी झाला. माझ्या शेजारीं एक तरुण उभा होता. याच्या तोंडाला सूज आली होती. याची व माझी नजरानजर तीन वेळ झाल्यानंतर तो कोठून आला, याची चवकशी मीं केली. अशा रीतीनें आमच्या संभाष-

णाचा उपक्रम झाल्याबरोबर आणखीहि कांहीं लोक आमच्या आजुबाजूस येऊन उभे राहिले. हा तरुण स्मालेन्स्क येथून आला होता. शेतसारा देण्यापुरते सुद्धां पैसे त्याच्याजवळ नव्हते. तेव्हां मास्कोला कांहीं काम पहावें व शेतसाऱ्यापुरते व बींबियाण्यापुरते पैसे मिळवावेत, या हेतूनें तो आला होता. तो म्हणाला, 'येथें काम मुळींच मिळत नाहीं. लष्करी शिपायी थोड्या रोजमुऱ्यावर सरकारांतून येथें मिळतात. तेव्हां लोक त्यांनांच बोलावतात. मग आमच्यासारख्यांना वांव कोठून मिळणार? गेले दोन दिवस मीं खडखडीत उपास काढला आहे! त्याच्याच शेजारीं दुसरा एक गृहस्थ उभा होता. हा एका गरम पेय पदार्थाची विक्री करीत होता. मीं तें एक पेलाभर त्या शेतकऱ्याला दिलें. तें आपल्या पोटांत ढकलून शेतकरी पुढें म्हणाला, 'मी येथें आलों, तेव्हां माझ्याजवळ जे चारदोन पैसे होते, तेहि येथें चोरीस गेले आणि त्याबरोबरच माझा सरकारी परवानाहि गेला आतां मास्कोंतून बाहेर पडणेंहि मला मुष्किलीचें झालें आहे. येथें इकडे तिकडे भटकावें आणि मिळाल्यास शिळ्यापाक्या भाकरीचे तुकडे खावेत. असा माझा क्रम आहे. कोणत्यातरी कारणानें पोलीस मला धरतें केव्हां आणि तुरुंगांत टाकतें केव्हां, याचीच मी वाट पहात आहें. कदाचित् माझ्याबरोबर पहारा देऊन मला ते माझ्या गांवींहि रवाना करतील. कसेंहि झालें तरी बरें. येत्या गुरुवारीं पोलीसचे लोक यावयाचे आहेत असें ऐकतों.'

अशा रीतीनें आमचें संभाषण चालू असतां आमच्या भोंवतीं बरीच गर्दी जमली आणि दुसऱ्या कित्येकांनींहि अशाच प्रकारच्या गोष्टी मला सांगितल्या. यांत एक तरुण मला आढळला. तो अगदीं हाडकुळा होता. चेहऱ्यावर विलक्षण फिक्केपणा दिसत होता. अंगावरील सदरा शेंकडों ठिकाणीं फाटला होता. थंडीनें तो थरथर कांपत होता. तो जवळ येऊन उभा राहिल्यावर त्या गरम पेयाचा एक पेला त्यालाहि मीं दिला. तो माझ्याशीं कांहीं बोलणार इतक्यांत तिसराच एक धटिंगण पुढें आला आणि त्या हाडकुळ्या तरुणाला बाजूला ढकलून 'मलाहि एक पेला द्या' असें म्हणाला; पण तो पेला त्याच्या हातीं जाण्यापूर्वीच आणखी एक

लांबनाक्या पुढें सरला. हा पुष्कळशी दारू प्यायला होता. अशा रीतीनें माझ्या जवळ येण्यासाठीं त्यांच्यांत धडपड सुरू झाली. त्यांत कित्येक आंधळे, कित्येक पोंक आलेले व कित्येक लंगडे होते. एकाच्या नाकाचा पत्ता नव्हता. हे सारे भुकेनें पोटाची दामटी वळलेले असे दिसत होते. त्यांना देतां देतां तें गरम पेयहि संपून गेलें. तेव्हां एकाला थोडे पैसे मीं दिले. ते पाहतांच माझ्या भोंवतीं सबंध पलटणीचा वेढाच पडला. इतक्यांत गरिबांस मदत करणाऱ्या संस्थेचे कांहीं प्रतिनिधी तेथें आले. या गर्दींतून मला बाहेर काढण्यासाठीं ते प्रयत्न करूं लागले. पण माझ्याभोंवतीं जमलेला घोळका इतका मोठा होता कीं, त्यांचा शिरकाव मजपर्यंत होईना; माझ्याजवळ असलेला तीस पसतीस रुपयांचा खुर्दा वांटून टाकला आणि त्या गरिबांच्या आश्रमांत मी गेलों. हें घर पुष्कळच मोठें असून त्यांत चार भाग होते. वरच्या मजल्यावर पुरुषांची जागा असून खालचे मजले बायकांसाठीं ठेवले होते. प्रथम मी. वरच्या मजल्यावर गेलों. एकेका मोठ्या खोलींत साधारण मनुष्य निजण्यापुरत्या रुंदीच्या फळ्या चाऱ्ही बाजूंनीं मारल्या होत्या. या फळ्या एकावर एक अशा जोडीनें बसविल्या होत्या. बायकांच्या जागेंतहि मला हीच व्यवस्था आढळली. बायका अथवा पुरुष आंत आले, कीं नेमून दिलेल्या फळीवर बसत. मग यांपैकीं कांहीं प्रार्थना करीत, कांहीं त्या चाळीच्या मालकाला दुवा देत आणि दुसरे कांहीं आपसांत तंटे करून शिव्यागाळीहि करीत.

अशा रीतीनें हा देखावा पाहून मी घरीं आलों आणि बुरणूस घातलेल्या व झाडून स्वच्छ केलेल्या पायऱ्यांच्या जिन्यावरून वर जाऊन एका रुजामे पसरलेल्या दिवाणखान्यांत गेलों. अंगावरील लोकरीचा जाड कोट काढून ठेवून मी खालीं माजघरांत गेलों आणि पंचपक्कान्नांनीं युक्त अशा भोजनास सुरुवात केली. माझ्या पाठीमागें दोन नोकर लागेल तो पदार्थ पुरविण्यास आदबीनें उभे होते. या दोन नोकरांनींहि मूल्यवान् वस्त्रें परिधान केलीं होतीं. बर्फासारखे शुभ्र गळेबंद त्यांनीं बांधले होते. त्यांच्या हातांत सफेत हातमोजे होते.

त्या गोष्टीला आज तीस वर्षें झालीं. मी प्यारीस येथें गेलों असतां

मनुष्याचा गळा गिलोटीनच्या यंत्रानें कसा कापतात, हें पहावयास दुसऱ्या हजारों तमासगिरांबरोबर मीहि गेलों होतों. असल्या प्रकारच्या आसुरी कृत्याचें समर्थन कांहीं लोक कसें करतात, हेंहि मला ठाऊक होतें; पण त्या अपराध्याचें शीर धडापासून वेगळें होतांच, माझें हृदय जणूं काय उडावयाचेंहि थांबलें. त्या वेळीं या कृत्याचें समर्थन करणाऱ्या साऱ्याच गोष्टी, दुष्टपणाच्या भाकडकथा आहेत, असा बोध बुद्धीला नव्हे, तर अंतःकरणाला झाला. मनुष्यवध एकानें केला काय अथवा सरकार या नांवाखालीं कांहीं इसमांनीं मिळून केला काय, तो मनुष्यवधच. माझ्या दृष्टीसमोर घडलेलें कृत्य निःसंशय न्यायाचें नसून तें अघोरपातक होतें. आणि हें पातक माझ्या दृष्टीसमोर घडत असतां मीं त्याला मनाई केली नाहीं, त्या अर्थीं या कृत्याला संमति देऊन त्या पापाचा भाग स्वतःच्या पदरीं मीं घेतला. हातानें पाप करणाराच पापी असतो, असें नाहीं. तर त्याला संमति देणाराहि तितकाच पापी होय, हें शास्त्रवचन, निःसंशय खरें आहे.

त्या वेळीं जी माझी स्थिति झाली, तीच या प्रसंगींहि झाली. हजारों लोक एका बाजूला भुकेनें आणि थंडीनें मरत असतांना माझ्यासारखे हजारों लोक अजीर्ण होईपर्यंत पक्वान्नें झोडीत आहेत, हा देखावा पाहून माझें हृदय शतधा विदीर्ण झालें. हजारों लोकांच्या अंगावर थंडी निवारण्यापुरताहि कपडा नसतां, आमच्या घराच्या पायऱ्यांवर जाड बुरणुसें आम्हीं अंथरतों आणि आमच्या घोड्यांना आणि कुतऱ्यामांजरांनाहि किंमतवान् उबदार वस्त्रें आम्ही शिवतों. या विपरित स्थितीचें समर्थन विद्वान् लोक कशाहि प्रकारें करोत; पण माझ्या दृष्टीनें माझ्या वर्गांतले लोक पातकी असून हें पातक एक वेळच नव्हे, तर आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं ते आचरीत आहेत. आणि अशा प्रकारची चैन स्वतः करून या पातकाचा भाग मीहि आपल्या पदरीं घेत आहें!

— ३ —

संध्याकाळीं ही सारी हकीगत मीं एका मित्राला सांगितली. त्याचा सारा

जन्म शहरांत गेला असल्यामुळें या गोष्टी त्याच्या रोजच्या परिपाठांतल्या होत्या. माझ्या हकीगतीनें त्याला कांहीं वाईट वाटलें नाहीं; अथवा फारसें नवलहि वाटलें नाहीं. अशा प्रकारच्या गोष्टी एवढ्या मोठ्या शहरांत असणें, हें अगदीं स्वाभाविक आहे, असें त्याला वाटल्याचें दिसलें. तो मला म्हणाला, 'तुम्ही पूर्वी शहर पाहिलें नसल्यामुळें ही स्थिति तुम्हांला भयंकर वाटते; पण अशी स्थिति अनादिकालापासून चालत आली असून पुढेंहि ती तशीच चालणार. किंबहुना असें असणें हें या नव्या मनूचें चिन्हच आहे. अर्वाचीन संस्कृति जेथें उच्चत्वास पोहोंचली आहे, तेथें ही स्थिति असतेच. लंडनांत येथल्याहूनहि वाईट स्थिति आहे. त्याहून आपला देश शतपट बरा. मग ही गोष्ट तुम्ही आपल्या चित्ताला इतकी लावून कां घेतां?'

माझ्या मित्राला मी कांहीं उत्तर देऊं लागलों. बोलण्याच्या भरांत माझें भान जाऊन मी इतक्या मोठ्यानें ओरडूं लागलों व असे हातवारे करूं लागलों कीं, काय झालें हें पाहण्यासाठीं माझी बायको तर आंतून धांवतच बाहेर आली. माझा चेहेरा अगदीं रडका होऊन गेला होता.

इतक्यांत दुसरीहि एकदोन मित्रमंडळी आली आणि मग सर्वांनीं मिळून माझी थट्टा करण्यास आरंभ केला. ते म्हणाले, 'एवढ्याशा क्षुल्लक गोष्टीचा तुम्ही उगाच बाऊ करतां, आणि या भिकाऱ्यांबद्दल तुम्हांला खरोखरच वाईट वाटत असलें, तरी अशा प्रकारच्या वागणुकीनें तुमच्या आजूबाजूच्या मंडळीच्या सुखांत माती कालविण्याचा अधिकार तुम्हांला काय आहे?'

त्यांचा हा प्रश्न बिनतोड होता. त्यांचा न्याय मला पटला; पण माझ्या मनाची समजूत मला घालतां येईना. आणि मनांत जें नाहीं, तें बाहेर दाखविण्याची विद्या मला साधली नसल्यामुळें माझ्या हृदयांतले कष्ट माझ्या मुद्रेवर दिसल्यावांचून राहिनात.

शहरांतील रहाणी मला आधींच आवडत नव्हती, आणि मग अशा गोष्टी पाहिल्यावर तर शहरांत रहाण्याचा पूर्ण तिट्कारा मला आला. तारुण्याच्या भरांत शहरांत राहून जे अत्याचार मीं केले, आणि जी चैन

मीं भोगली, तिची आठवण होऊन पश्चात्तापानें माझें हृदय पोळूं लागलें. माझ्या मनाची समजूत घालण्याचा यत्न मीं कितीहि केला, तरी त्याची घडी जी विघडली ती विघडलीच. घरीं अथवा बाहेर गाद्यांच्या खुर्च्या, सुंदर पदार्थांनीं विभूषित केलेलीं मेजें, डौलदार गाड्या, धष्टपुष्ट घोडे आणि फक्कडराव बनलेले गाडीहाके, अशा वस्तु पाहिल्याबरोबर माझें मन उसळून बेताल होई. केव्हां एकादें भपकेदार दुकान अथवा ऐटबाज नाटकगृह यांजकडे पहाण्याची देखील सोय उरली नाहीं. या जिनसा पाहिल्याबरोबर त्यांच्याच शेजारीं भुकेनें अर्धमेले झालेले आणि थंडीनें आंकडे वळलेले, हजारों दीनवाणे भिकारी माझी मनःसृष्टि निर्माण करीत, याला माझा कांहींच उपाय चालेना. शेजारीं शेजारीं रहाणाऱ्या या दोन वस्तूंत कांहीं तरी नित्यसंबंध असला पाहिजे व यांतील एक कारणरूप असून दुसरी कार्यरूप असली पाहिजे, असे विचार माझ्या मनांत येत आणि कितीहि खटपट केली, तरी ते थांबत नसत. या पापांत मीहि एक भागीदार आहें, ही जाणीव एक मन मजपुढें सारखी उभी करी आणि दुसरें मन तिजवर पांघरूण घालण्याचा यत्न करी.

ही सारी हकीकत ज्या ज्या मित्रमंडळीजवळ मीं सांगितली, त्या साऱ्यांचीं उत्तरें एकाच दर्ज्याचीं! जें उत्तर पहिल्यानें मला दिलें, जवळ जवळ तेंच शेवटच्यानेंहि दिलें. त्यांतच कांहीं मंडळी मला म्हणाली, 'तुम्ही जात्याच दयाशील असल्यामुळें या स्थितीचा परिणाम तुमच्या मनावर वाजवीपेक्षां फाजील झाला आहे. तुमच्या या स्थितीवरून तुम्ही सत्पुरुषांच्या कोटींतले आहां, अशी मात्र आमची खात्री झाली.' स्तुति कोणाला आवडत नाहीं? तिला मान डोलविण्यास माझेंहि मन खुषीनें तयार झालें, यांत नवल नाहीं. आणि या स्तुतीचा हल्ला माझ्या मनावर इतक्या सपाट्याचा झाला कीं, स्तुतीच्या या शब्दांत खरोखर कांहीं तथ्य आहे कीं नाहीं, हें पहाण्याची फुरसदसुद्धां त्या हल्ल्यानें माझ्या मनाला दिली नाहीं. आणि माझ्या मनांत पश्चात्तापाबरोबरच दुसराहि एक विचार त्या हल्ल्याच्या गर्दींत घुसला. मी खरोखरच संत आहें, अशी भावना होऊन स्वतःच्या या सद्गुणाबद्दल त्या दुःखांतच मला थोडासा संतोषहि

झाला. आणि आपल्या या साधुत्वाचें प्रदर्शन लोकांत करावें, ही इच्छाहि तेथें हळूंच डोकावली. चैन आणि दारिद्य यांच्यांत कार्यकारणसंबंध आहे ही पूर्वींची भावना नाहींशी झाली. 'छि छे! माझ्या चैनीमुळें दारिद्य उत्पन्न होणें शक्य नाहीं. मानवकुलाच्या जीवनयात्रेंत अशा विपरीत परिस्थिति उत्पन्न होणें, अपरिहार्यच असलें पाहिजे. माझी चैन मीं उद्यां सोडून दिली, तरी त्या भिकाऱ्यांचें बरें काय होणार? मी स्वतः दरिद्या-सारखा राहूं लागलों तर मी फुकटचा दुःखांत पडेन आणि आजूबाजूच्या स्नेहसंबंध्यांस दुःखांत पाडीन आणि ते दरिद्री जशाच्या तसेच राहतील. याकरतां माझ्या जीवनक्रमाची दिशा बदलण्यांत कांहीं फायदा नाहीं. आपणाकडून होईल ती मदत त्यांना करावी म्हणजे झालें. मी स्वतः दयाळू अंतःकरणाचा सत्पुरुष असल्यामुळें मी उगीच राईचा डोंगर करतों.'

अशा रीतीनें स्तुतीला भुलून माझ्या मनाची समजूत मीं घातली आणि आतां आपल्या साधुपणाचें प्रदर्शन कसें करावें, याचे बेत मी मनांत योजूं लागलों; पण माझें मन कसलें हट्टी! हे बेत मी एकीकडे करीत असतां मनाच्या खोल भागांतला असंतोष डोकावत होताच. मी करतों, हें बरोबर नाहीं. ही जाणीव कांहीं केल्या माझ्या मनांतून पूर्ण नाहींशी झाली नाहीं. पण मनुष्याच्या ठिकाणची स्वार्थबुद्धि इतकी प्रबळ आहे कीं ती वारंवार जागृत होऊन सदसद्विवेकबुद्धीची वाणि जागच्या जागीं दडपून टाकते. हा नेहमींचाच अनुभव आहे. माझेंहि असेंच झालें.

या वेळेला शिरगणतीचें काम चालू व्हावयाचें होतें. आपल्या साधु-त्वाच्या प्रदर्शनाला ही संधि बरी आहे, असें मला वाटलें. मास्को शहरीं कांहीं परोपकारी संस्था अस्तित्वांत होत्याच; पण माझ्या दृष्टीनें त्यांच्या कार्याची दिशा चुकलेली होती. याशिवाय त्यांच्या कार्याचें प्रमाणहि फार अल्प असें वाटून मीं मोठमोठे प्रचंड बेत तयार केले. शहरांतील श्रीमान् लोकांची सहानुकंपा मिळवून मोठा द्रव्यनिधि जमवावयाचा आणि या कामीं शरीरद्वारां मदत करण्यासाठीं स्वयंसेवक मिळवावयाचे असा बेत मीं केला. मोजणीचें काम करणाऱ्या लोकांनीं त्या कामाबरोबरच भिका-ऱ्यांची चौकशी करून पात्रापात्र माणसांची यादी तयार करावी व त्यांस

द्रव्यद्वारां आणि इतर रीतींनेंहि मदत करावी. अशा प्रकारचे बेत मीं योजिले होते. माझा सर्व कार्यभाग एवढ्या बेतानेंसुद्धां पुरा होण्याजोगा नव्हता. शहरांतील निरनिराळ्या भागांत कायमच्या संस्था स्थापून दारिद्र्याचें बीज मुळांतच उपटून टाकण्याचा बेत मीं केला होता. अशा रीतीनें शहरांतलें सारें दारिद्र्य नाहींसें झालें कीं, आम्हां श्रीमंत लोकांच्या डोळ्यांची ही खरखर निघून जाऊन आपलीं पंचपक्वान्नें जेवणें सुखानें झोडण्यास आम्हास मग कांहींच हरकत उरणार नाहीं. मोठ्या जोडीच्या गाडींत बसून आम्ही नाटकाला अथवा नाचाला जावयास निघावें आणि रस्त्यांत लक्तरें पांघरलेले भिकारी आम्हास दिसावेत, हा आम्हास अपशकुनच नव्हे तर काय ? आपल्या अफाट संपत्तींतील थोडासा भाग खर्चून हा अपशकून आम्हास नाहींसा करतां आला, तर त्यांत आमचा फायदाच आहे, असें मला वाटलें.

अशा रीतीनें आरंभींचे बेतबात झाल्यावर मीं एक लेख तयार केला आणि तो प्रसिद्ध करण्यापूर्वी माझ्या चार श्रीमंत स्नेह्यांस मी भेटून आलों या मंडळींकडून द्रव्याची मदत मिळण्याची अपेक्षा मला होती. मीं माझे सारे विचार त्यांजजवळ बोलून दाखविले. माझे विचार त्यांनीं शांतपणें आणि मोठ्या उत्सुकतेनें ऐकून घेतले; पण पैशाचें नांव निघतांच त्यांचीं तोंडें गोरींमोरीं झालीं. असल्या भलत्याच नादीं लागणारा हा वेडापीर आम्हांकडे आला तरी कशाला ? असेंच जणूं काय ते म्हणत होते, असें त्यांच्या चेहऱ्यांवरून मला दिसलें. याची ही कटाळवाणी कहाणी ऐकून घेतली, हाच मोठा उपकार आपण याजवर केला, असेंच जणूं काय त्यांना वाटत होतें. यांच्या भाषणाचें सार थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें, तर तें असें सांगतां येईल:—

" वा ! वा ! तुमचा बेत मोठा नामी आहे. अशा बेताला होईल ती मदत प्रत्येकानें अवश्य करावी. अहो, माझ्या मनांतसुद्धां बरोबर हीच कल्पना आली होती; पण करावें काय ? असल्या कामीं लोकांची मदत फारशी होत नाहीं. यामुळें या कार्याला—यावें तसें यश येत नाहीं. आतां तुम्हाला थोडीबहुत मदत मी करीन."

हे अथवा अशाच अर्थाचे शब्द प्रत्येकजण मजपाशीं बोलूं लागला. मला मदत देण्याची आशा प्रत्येकानें दाखविली, पण निश्चित आंकडा कोणींच बोलेना. तेव्हां 'दोनशें रुपये घालूं कीं कांहीं कमी अधिक करूं?' असा प्रश्न मलाच विचारावा लागला. या प्रश्नाला निश्चित जबाब कोणीं दिला नाहीं आणि रोख रक्कमहि माझ्या हातीं आली नाहीं. ज्याला कांहीं देण्याची इच्छा खरोखर असते, तो इच्छित रक्कम ताबडतोब देत असतो. एकाद्या नाटकगृहांत 'सॅरा बर्नहार्ड'सारख्या नटीला पहावयाला लोकांची गर्दी जमली म्हणजे तेथली धर्मार्थ पेटी पैशानें भरून निघते. पण मला स्वतःला तो अनुभव न येतां माझी रवानगी या मंडळीनें रिक्त हस्तेंच केली. त्याच दिवशीं संध्याकाळीं एका श्रीमंत स्त्रीच्या घरीं मी गेलों. ही बाई परोपकारी म्हणून प्रसिद्ध होती. पुष्कळशीं परोपकाराचीं कामें तिच्या हातीं नेहमीं असत. मी गेलों तेव्हां तिच्या दाराशीं कित्येक सुंदर गाड्या उभ्या होत्या. बाजूच्या खोलींत उंची पोषाखाचे हुजरे किती तरी बसले होते. मधल्या मोठ्या दिवाणखान्यांत दोन वाटोळ्या मेजांवर दोन प्रकाशमान दिवे ठेवले होते. त्यांच्या भोंवतीं मांडलेल्या खुर्च्यांवर उंची पोषाकाच्या आणि दागदागिन्यांनीं नटलेल्या कित्येक स्त्रिया बसल्या होत्या. आणि त्यांच्या आजूबाजूला तरुणहि दिसत होते.

तेथला तो सारा देखावा पाहून मला आनंद न होतां माझ्या चित्ताला उद्वेग मात्र उत्पन्न झाला. या सर्वांची मालमत्ता एकत्र केली असती, तर तिची किंमत कित्येक कोटी रुपये झाली असती. दागदागिना, कपडालत्ता, गाड्याघोडीं, नौकरचाकर इत्यादि वस्तूंवर जेवढा खर्च झाल्याचें मला दिसलें, त्या रकमेचें व्याजसुद्धां केवढें तरी मोठें झालें असतें. त्या श्रीमंत बाईनें परोपकारासाठीं मदत म्हणून आजची ही पार्टी जमविली होती. या पार्टीचा, दिवाबत्तीचा आणि चहापाण्याचा खर्च किती आणि त्या खर्चाच्या मानानें या मंडळीकडून होणारी प्राप्ति किती? याचा हिशेब या बाईनें आपल्या मनांत कधीं मांडून पाहिला आहे काय? असा प्रश्न त्या वेळीं माझ्या मनांत उभा राहिला. अशा हिशेबाची तोंडमिळवणी

कधींच होत नाहीं. मग ही बाई एवढा खर्च करते तरी कां ? याचा उमज मला पडेना. एकंदरींत या मंडळीची फारशी मदत आपणास होणार नाहीं, अशी खूणगांठ मीं मनांत बांधली; पण आतां आलों त्या अर्थीं कांहीं तरी केलें पाहिजे, म्हणून माझे सर्व बेत या मंडळीपुढें मीं निवेदन केले.

तेथें हजर असलेल्या मंडळींपैकीं एक श्रीमंत बाई म्हणाली, 'त्या गरीब मंडळींत जाऊन हिंडण्याचें काम मला होणार नाहीं; तथापि द्रव्याची मदत मी करीन,' पण किती पैसे आणि केव्हां देणार याबद्दल चकारशब्दहि तिनें काढला नाहीं. दुसरे एक गृहस्थ म्हणाले, 'या उद्योगाचा फारसा उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. येथल्या श्रीमंत लोकांनीं शक्य ती मदत आधींच करून टाकली असल्यामुळें आतां अधिक पैसा त्यांजकडून मिळण्यासारखा नाहीं. असल्या कामीं श्रीमंत लोक मदत करतात, ती सुद्धां कांहीं तरी आशेनेंच करीत असतात. येथल्या बहुतेक परोपकारी श्रीमंतांना पदव्या, पदकें आणि मानसन्मान हीं आधींच मिळून चुकलीं आहेत. तुम्हांला पैशाची मदत हवी असेल, तर कांहीं तरी युक्ति करून पदव्यांची आणखी खैरात सरकाराकडून मिळेल अशी खटपट करा. श्रीमंतांकडून पैसा काढण्याला याखेरीज दुसरा मार्गच नाहीं. आणि हा मार्ग आपल्या हातीं येईल, असें निश्चित साधन आपल्या जवळ नाहीं. मग या खटपटींत व्यर्थ कां पडावें ?'

इतका करार झाल्यावर तेथून उठून मी घरीं आलों. गादीवर पडल्या पडल्या माझ्या चित्तांत अनेक विचार सुरू झाले. आपला हा बेत निष्फळ होणार याबद्दल मला वाईट वाटलें; पण माझ्या चित्ताला जी मोठी रुखरुख लागली ती ही कीं, माझ्या आयुष्याचा एक दिवस मी कुकर्मांत घालविला. सारा दिवस मीं केलेलें काम अगदीं निर्लज्जपणाचें होतें. इतकें झालें तथापि हें काम सोडून द्यावें, असाहि माझा निश्चय होईना. हातीं घेतलेलें काम सोडून देणें मला मोठ्या लज्जेचें वाटे. लोक हंसतील या खोट्या लज्जेच्या पायीं माझ्या विवेकबुद्धीचे डोळे मी बांधून टाकूं लागलों. दुसरें असें कीं, आपली नेहमींची चैन चालू राहून विवेक-

बुद्धीचे तडाखे चुकविण्यास दुसरा मार्ग मला दिसेना. हें कार्य सोडावें, तर त्याबरोबर आपल्या चैनीच्या रहाणीलाहि रजा दिली पाहिजे आणि हें करण्याची छाती होत नव्हती. इतकें धैर्य माझ्या ठिकाणीं नव्हतें, तेव्हां पोक्त विचार करून विवेकबुद्धीची मुस्कटदाबी मीं केली आणि हातीं घेतलेलें कार्य पुढें चालविण्याचा बेत मीं केला.

तयार केलेला लेख मीं छापण्यास पाठविला व त्याच दिवशीं संध्याकाळीं नगरभवनांत एक सभा बोलावून तो मीं वाचूनहि दाखविला. माझें मन किती हट्टी ! आदल्या रात्रीं मीं त्याला झोंपीं घालविलें होतें; पण तें याच वेळीं जागृत होऊन मला म्हणूं लागलें, 'अरे, हें काय करतो आहेस ? अजूनसुद्धां तुला लाज वाटत नाहीं का ?' मनाची ही टोंचणी इतकी तीव्र झाली कीं माझें वाचन रडक्या आणि कांपऱ्या सुरांत मीं केव्हां आणि कसें संपविलें हेंहि मला समजलें नाहीं. वाचन संपल्यावर समोरच्या लोकांकडे मीं पाहिलें, तेव्हां त्यांचे चेहरेहि मला कसेसेच दिसले. बराच वेळ झाला, तरी माझ्या भाषणास दूजोरा देण्यास कोणी पुढें येईना. अखेरीस हा सारा बेत अव्यहार्य आहे, असें मत एका सभासदानें दिलें. तेव्हां त्याला मात्र सर्वांनीं माना डोलविल्या; पण या पराभवानेंहि मी शुद्धीवर आलों नाहीं. त्या मंडळीपैकीं कांहीं जणास एकएकटे गांठून त्यांची संमति मिळविण्याचा यत्न मीं करून पाहिला, तेव्हां त्यांच्या मुद्रा फार चमत्कारिक झाल्या. 'अरे वेड्या, एक वेळ आम्ही तुझी शोभा राखली, तेवढ्यांत न उमजतां तूं आम्हांला पुन्हां त्रास कशाला देतोस ?' असेंच जणूं काय हे लोक म्हणत होते. तथापि बाह्यतः कांहीं लोकांनीं माझ्या विचाराला संमति दिली.

शिरगणती करण्याच्या कामावर कांहीं विद्यार्थ्यांची योजना झाली होती. या विद्यार्थीना गांठून त्यांची मदत मिळविण्याचा यत्न मीं केला, तेव्हां या मोठ्या मंडळीप्रमाणेंच त्यांच्या चित्तावरहि विचित्र पारिणाम झाला, असें मला दिसलें. चांगला पोषाख केलेला आणि शिकलेला एखादा सभ्य गृहस्थ मूर्खाप्रमाणें भलत्याच गोष्टी बरळूं लागला म्हणजे ऐकणाराचा जसा चेहरा होतो, तसे त्यांचे चेहरे मला दिसले. हाच परिणाम वर्तमानपत्राच्या

एका संपादकावर झाला. एवढेंच नव्हे, तर माझ्या बायकामुलांवरहि तोच परिणाम झाला. माझें म्हणणें कोणीं खोडून काढलें नाहीं; पण त्याचा स्वीकार उत्साहानें कोणींच केला नाहीं. 'तुमचा बेत फार चांगला आहे; पण तो व्यवहार्य नाहीं हाच सर्वांच्या म्हणण्याचा आशय होता. ज्यानें उठावें त्यानें लोकांच्या उदासीनतेबद्दल त्यांना शिव्या द्याव्या, माझा बेत चांगला म्हणावा, तो जरूरीचा आहे, असेंहि म्हणावें; पण त्या बरोबरच तो अव्यवहार्यहि ठरवावा, हा प्रकार येथून तेथपर्यंत माझ्या अनुभवास आला. लोक वाईट हें सर्वांचें मत निश्चित होतें, मग या सर्वांशिवाय आणखी वेगळे लोक ते कोणते, याचा उमज माझ्या बुद्धीला पडेना.

अशा रीतीनें हा उद्योग मीं पुढें चालविला होता, हें खरें; तथापि हा सत्य मार्ग नव्हे, ही जाणीव माझ्या चित्तांतून कधींच नाहींशी झाली नाहीं. माझा लेख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला. येत्या खानेसुमारींत स्वतः खटपट करण्याचा निश्चय मीं केला. जें कार्य मीं सुरू केलें होतें, त्यांत माझे पाय पक्के गुंतले आणि आतां परवश होत्साता तें कार्य नेईल तिकडे मीं जाऊं लागलों.

— ४ —

मास्को शहराच्या ज्या भागांत 'ऱ्यानॉफ हाऊस' या नांवाची इमारत होती, त्या भागांतील शिरगणतीच्या कामाकडे अधिकाऱ्यांकडून मीं नेमणूक करून घेतली. दारिद्य आणि दुर्गुण यांचें मूर्तिमंत शेत या अनाथगृहांत आहे, असें माझ्या कांनीं आलें होतें.

शिरगणतीचें काम प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी आपल्या भागाचें सामान्य निरीक्षण एकदां करावें म्हणून अधिकाऱ्यांकडुन त्या भागाचे नकाशे मिळवून तिकडे मीं आपला मोर्चा वळविला. नकाशावर दाखविल्या ठिकाणीं हें प्रचंड अनाथगृह मला बरोबर सांपडलें आणि त्याच्या अनेक दरवाजांपैकीं, एका दारांत मी येऊन उभा राहिलों. बराच वेळ आंत शिरण्याची छाती मला होईना. अखेरीस कसाबसा धीर करून मी आंत प्रवेश केला. आंतल्या आवारांत जिकडे तिकडे घाणीचा नुसता खच्च पडून

राहिला होता. मी इकडे तिकडे पाहतों आहें, इतक्यांत एक हाडकुळी स्त्री एका खोलींतून धांवत धांवत बाहेर आली. तिच्या अंगावर वस्त्रासारख्या दिसणाऱ्या कांहीं लकतऱ्या होत्या. तिच्या मागोमाग एक लठ्ठ्या धांवत आला. याच्या अंगांत एक तांबडा सद्रा असून पायांतील विजार इतकी रुंद होती कीं, बायकांचा लहंगा त्यानें उलटा करून घातला असावा असें मला वाटलें. तिला जोरानें आंवळून धरून तो म्हणाला, ' पोरी, आतां कोठें पळशील ? तूं त्या चकण्यावर फिदा झालीस काय ? ' ही स्त्री मोठ्यानें हंसत सुटली. इतक्यांत मजवर तिची नजर वळली. मला रागानें ती म्हणाली, 'काय रे, ये उपटसुंभ्या, तुला कोण पाहिजे ? ' या तिच्या प्रश्नावर काय उत्तर द्यावें, हें मला न सुचून मी अगदीं गोंधळून गेलों.

तेथील रहिवाशांच्या दृष्टीनें या प्रकारांत कांहीं विशेष होतें असें नाहीं. या गोष्टी त्यांच्या रोजच्या परिपाठाच्या असल्यामुळें त्यांना त्यांत विशेष नवल वाटण्यासारखें कांहींच नव्हतें; पण तेथील लोकांची वृत्ति पाहून माझ्या मनांत आणखी एक नवाच विचार उत्पन्न झाला. श्रीमान् लोकांच्या मदतीनें या लोकांचें कल्याण करण्याची माझी इच्छा होती. आतां येथला एकंदर प्रकार पाहून यांच्या अन्नवस्त्रापुरतीच तरतूद केल्यानें सर्व कार्य संपत नाहीं, हें माझ्या लक्षांत आलें. एकाद्यानें हजार दोन हजार बकरीं पाळावीं आणि त्यांना गवत घालावें, तशांतलाच हा प्रकार होणार, ही गोष्ट माझ्या लक्षांत आली. ही गोष्ट माझ्या प्रथमच लक्षांत कशी आली नाहीं, याचें मला नवल वाटलें. कंगाल लोक झाले, तरी तेहि आम्हां सारखींच माणसें आहेत, हा मुद्दा जणूं काय मी विसरूनच गेलों होतों. त्यांनाहि आम्हांप्रमाणेंच विकार आणि विचार आहेत. आमच्याप्रमाणेंच त्यांच्या ठिकाणींहि सुखदुःखाच्या भावना आहेत, ही गोष्ट आज प्रथमच मला कळली. यांचें बरें करावयाचें म्हणजे त्यांच्या अन्नवस्त्रापुरतीच तजवीज करावयाची असें नव्हतें. आम्हां श्रीमंत लोकांप्रमाणेंच त्यांच्याहि डोक्यांत पूर्वविचारांची परंपरा असली पाहिजे. आणि त्यांचें ंपतचें वर्तन या परंपरेला धरून असलें पाहिजे. आम्हांप्रमाणेंच यांतील मिश्रण विकारवश होण्यास पात्र असून माझ्याप्रमाणेंच आयुष्याची

इतिकर्तव्यता काय ? अशा प्रकारचे विचारहि या लोकांच्या डोक्यांत येत असण्याचा संभव आहे, त्या अर्थी शरीरपोषणाबरोबरच त्यांच्या मनोवृत्तींनांहि वळण देणें आवश्यक नाहीं काय ? असा विचार मनांत उद्भवून हातीं घेतलेलें हें कर्म किती कठीण आहे, हें मला स्पष्ट दिसूं लागलें ! आपल्या हातून हें पार पडावें, इतकी योग्यता आणि इतकें बळ आपल्या अंगीं नाहीं, हें मला दिसून आलें. पण आतां पुढें टाकलेलें पाऊल मागें तरी कसें घ्यावें ?

— ९ —

शिरगणतीच्या नेमलेल्या दिवशीं सकाळीं विद्यार्थी मंडळीनें आपल्या कामास सुरुवात केली; पण परोपकारी अस्मादिकांची स्वारी या वेळीं त्या मंडळीबरोबर नव्हती. कारण, आम्ही निजून उठतों तों दहाचा ठोका पडला. पुढें सकाळचा फराळ आणि चहा काफी यांत कांहीं वेळ गेला. मग खाल्लेलें पचविण्यासाठीं धूम्रपान अवश्य असल्यामुळें त्यांत कांहीं वेळ गेला. इतका वेळ झाल्यानंतर अस्मादिकांची स्वारी परोपकार करण्यास डुलत डुलत बाहेर पडली.

कंगाल वस्तीच्या त्या प्रचंड आवारांतील पहिल्या घराचें निरीक्षण मीं केलें. त्यांत मदतीला पात्र असा एकहि इसम मला आढळला नाहीं. बाह्यतः एकादा मनुष्यप्राणी दुर्दैवी दिसला, तरी त्याचा मागचा इतिहास पाहिल्याशिवाय पैशाची मदत त्याला केली, तर तें दान अपात्रीं पडण्याचा पुष्कळ संभव असतो. या साऱ्या घरांत माझ्या अपेक्षेप्रमाणें एकहि भिकारी आढळला नाहीं. याबद्दल मला वाईट वाटलें आणि माझी निराशा झाली. ज्या गोष्टीबद्दल आनंद व्हावा, तिजबद्दल मनुष्याला वाईट वाटतें, यावरून मनुष्यप्राणी किती अहंमन्य आणि किती निर्लज्ज आहे, हें मात्र दिसून येतें. येथील रहिवाशांत माझ्या अपेक्षेप्रमाणें कांहीं विशेष प्रकार मला मुळींच आढळून आले नाहींत. सामान्यतः माझ्या स्थितींतल्या लोकांप्रमाणेंच यांच्यांतहि सुखदुःखाचें कमी अधिक मिश्रण मला आढळून आलें. आमच्याप्रमाणें त्यांच्यांतहि आनंदी लोक अच्चच पडून

आमच्याप्रमाणें त्यांच्यातहि सद्वृत्तीचें आणि दुर्वृत्तीचें मिश्रण मला आढळून आलें. आमच्याप्रमाणें त्यांच्यांतहि सुतकी चेहेरे मला दिसले. सामान्य स्थितींत असलेल्या दोन गृहस्थांत एक सुखी आणि एक दुःखी असा प्रकार आढळतो. यावरून सुख अथवा दुःख बाह्यवस्तुंवर अवलंबून नसून ज्याच्या त्याच्या अंतर्यामावर अवलंबून आहे, असें म्हणावयास काय हरकत आहे? ज्याचें अंतरयाम सदां सुतकी, त्याला कुबेराची संपत्तीहि सुखी करूं शकत नाहीं, ही खूण आज मला पटली.

— ६ —

मास्को शहरांत अगदीं खालच्या दर्जाची वस्ती सुमारें एक लाख असेल. या वस्तीचे सारे नमुने मीं पाहिलेल्या या कंगालपुऱ्यांत होते. यांत बारीकसारीक धंदे करणारे, फाटके जोडे शिवणारे, बारीकसारीक सुतारकाम करणारे, फाटके कपडे शिवणारे, असल्या प्रकारच्या अनेक धंद्यांचे प्रतिनिधी तेथें मला आढळले. बायकांच्या भागांत रोजमुरा करणाऱ्या, हेलपाटी करणाऱ्या, परटिणी, भाजीपाला विकणाऱ्या, अशा अनेक धंद्यांच्या स्त्रिया होत्या. व्याजबट्ट्याचा धंदा करणाऱ्याहि कांहीं स्त्रिया मला आढळल्या. निव्वळ भिक्षेचा धंदा करणारीं पुष्कळशीं माणसें येथें रहात होतीं, हें निराळें सांगावयाला नको.

पूर्वीच्या प्रसंगाप्रमाणें आज माझी वृत्ति या ठिकाणीं बावरली नाहीं, याचें माझें मलाच नवल वाटलें. फार काय सांगावें, पण शहराच्या एकाद्या समृद्ध भागांत जसें मोकळेपणीं आणि आनंदांत हिंडावें, तसेंच येथेंहि आम्ही हिंडत होतों. येथें पुष्कळांशीं मीं संभाषण केलें, त्यावरून या वर्गांतहि आम्हांप्रमाणेंच सुस्वभावी माणसें मला पुष्कळ आढळून आलीं.

आपापल्या पोटाचा धंदा हातानें करून जे लोक उदरभरण करतात, त्यांत आनंदी आणि सुस्वभावी माणसें अधिक, असें मला आढळून आलें.

जो तो आपापल्या कामांत गुंग होता. कपडे धुण्याचा आवाज, रंध्याचा खरखराट व त्याबरोबरच गाण्याच्या लकेऱ्या, असें सुरांचें विचित्र मिश्रण मला ऐकूं येत होतें. तेथल्या रहिवाशांनीं आनंदी मुद्रेनें आमचें

स्वागत केलें. विद्यार्थ्यांनीं विचारलेली माहिती ते शांतपणें देत होते. आम्हास श्रीमंतांप्रमाणें तुसडीं उत्तरें कोणींहि दिलीं नाहींत. अहंमन्यता, दांभिकपणा आणि पोकळ श्रीमंतीचें खोटें नाटक हे श्रीमंतांचे गुण येथें मला आढळले नाहींत. उलट उत्तरें देतां देतां त्यांतील कांहीं प्रश्नांवर विनोदात्मक चर्चाहि चाले. अशा रीतीनें आमचा हा सर्व वेळ मोठ्या सुखाचा गेला.

ज्या ठिकाणीं सैतानांचें जिवंत साम्राज्य आढळेल अशी माझी अपेक्षा होती, त्या ठिकाणीं त्याच्या अगदीं उलट प्रकार आढळला. यामुळें या साध्याभोळ्या मंडळीबद्दल माझ्या मनांत एक प्रकारचा आदर उत्पन्न झाला, असें म्हटल्यासहि तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. यांच्यांत मधून मधून दुर्वृत्त, आळशी आणि शुद्ध परोपजीवी लोकहि दिसत होते; पण त्यामुळें एकंदर समाजाच्या सुस्वरूपाची हानि न होतां तें उलट गालबोटाप्रमाणें शोभा देत होतें. या समाजाची ही स्थिति पहात असतां माझ्या मनावर जो परिणाम झाला, तो विद्यार्थीवर्गाच्या मनावर झाला नाहीं. एकाच वस्तूकडे पाहण्याची त्यांची व माझी दृष्टि भिन्न होती. ते कांहीं शास्त्रीय सत्य शोधण्याच्या हेतूनें आले होते. समाजशास्त्राचा एकादा महासिद्धांत या निरीक्षणांतून बाहेर पडतो कीं काय, हें पाहण्याकडे त्यांची दृष्टि गुंतली होती. मी गरीब लोकांस मदत करण्याकरितां आलों होतों. असहाय्य लोकांचें कांहीं हित करावें, ही माझी दृष्टि होती. अनंत दुर्दैवी प्राणी मला येथें आढळतील या आशेनें मी आलों होतों; पण भुकेनें मरणारे आणि सर्व बाबींत अगदीं रसातळास पोहोंचलेले प्राणी आढळण्याऐवजीं येथें मला शांत, संतुष्ट आणि आनंदी प्राणी आढळले. त्यांत पुष्कळसे सदय अंतःकरणाचे आणि उद्योगी लोकहि होते.

एकाद्या ठिकाणीं मदतीची खरोखर जरूर आहे, असें दिसलें, तरी आमच्यासारख्या श्रीमंतांच्या मदतीची अपेक्षा न करितां हे गरीब लोक आपसांत मदत करतात, असें मला आढळून आलें; पण यांच्या मदतीचे मार्ग कोणते, याचा शोध मात्र मला लागला नाहीं. एक भिकारी दुसऱ्या भिकाऱ्याला मदत कशी करतो, हें मला कोडेंच राहिलें.

एका लहानशा खबदाडवजा खोलींत एक वृद्ध मनुष्य विषमज्वरानें आजारी पडला होता. त्याचे आप्त असे कोणीं नव्हते. याच खबदाडाच्या दुसऱ्या एका कोंपऱ्यांत एक विधवा आपल्या लहानग्या मुलीला घेऊन राहिला होती. ती म्हाताऱ्याच्या नात्यागोत्याची नव्हती. तथापि केवळ शेजारधर्म म्हणून त्याचें पथ्यपाणी वगैरे सर्व पहात असे. दररोज सकाळीं आपल्या बरोबरच म्हाताऱ्यालाहि ती चहापाणी देई आणि आपल्याच पैशांतून त्याच्यासाठीं ती औषधहि आणी. दुसऱ्या एका खोलींत एक स्त्री बाळंतपणाच्या तापानें कण्हत होती. तिच्या तान्ह्याला सांभाळण्याला शेजारची एक बाई दोन दिवस येऊन बसली होती. या दोन दिवसांत कामधंद्याची फुरसत सुद्धां तिला सांपडली नाहीं. आणखी एका खोलींत एक शिंप्याचें कुटुंब होतें. स्वतःच्या पदरीं तीन मुलें असतांहि रस्त्यांतलें बिनवारशी अर्भक त्यानें बाळगलें होतें. आतां राहतां राहिल्या लोकांत कांहीं हुजरे, कांहीं जन्माचे भिकारी, बदफैली स्त्रिया आणि दारुडे, असले लोक मला आढळले. आतां या लोकांना मदत करावयाची, तर त्यांचा पूर्वेतिहास पाहणें, अवश्य होतें. एकंदरीनें पाहतां खरोखर अभागी आणि ताबडतोब मदतीला पात्र असा एकहि इसम मला आढळला नाहीं. दुर्दैवी लोक तेथें पुष्कळ होते; पण त्याची अधिक चवकशी करणें जरूरीचें होतें. म्हणजे एकंदरीनें ही गोष्ट ताबडतोबीनें होणारी नसून ती कालावधीवर पडणारी होती.

— ७ —

तेथें आढळलेल्या गरीब लोकांत सामान्यतः तीन वर्ग होते. चांगल्या पगाराच्या नोकऱ्या सुटून त्या पुन्हां मिळण्याकरितां धडपड करणारे. दुसरा वर्ग बदफैली बायकांचा. मोठी संख्या याच वर्गाची व तिसरा वर्ग अनाथ मुलांचा. यांपैकीं पहिल्या वर्गाची विशेष नोंद मीं केली. साधारणपणें मध्यम स्थितींतले बरेच लोक या वर्गांत होते.

इतक्यांत घराचा मालक आला. त्यानें हाक मारतांच एका आंधाऱ्या गुहेंतून एक दारुडा बाहेर पडला. हा गृहस्थ एके काळीं बराच श्रीमंत

होता व त्याला चांगल्या पगाराची सरकारी नोकरीहि होती. हा दारूच्या नशेंत नसे तेव्हां कोणतेंहि काम तो मोठ्या खुषीनें करी. अशा वेळीं तो बोलूं लागला म्हणजे मोठमोठे वजनदार शब्द वापरून तो आपली पंडित-गिरीहि दाखवी. त्यानें आम्हां सर्वांस क्षणभर निरखून पाहिलें. आमच्या हातांतलीं छापील कार्डें त्यानें तपासून पाहिलीं. समाजाच्या ज्या वर्गांत तो मोडत होता, त्या वर्गांतली ही आमची मंडळी पाहून त्याला संतोष झाल्यासारखें दिसलें. मग या वर्गांत पूर्वीं मीहि मोडत होतों, हें दाखविण्याच्या इराद्यानें आजूबाजूच्या लोकांकडे तो पाहूं लागला. त्याचा पूर्वेतिहास मीं त्याला विचारला, तेव्हां मोठ्या ऐटीनें आपली सारी कुळ-कथा तिखटमीठ लावून त्यानें वर्णन केली. ज्या जागीं आपण नोकरी केली, त्या जाग्यावर आपला हक्क अद्यापीहि न्यायानें आहे, असें तो म्हणाला. स्वतःच्या शिक्षणाबद्दलहि त्याला मोठा अभिमान होता.

अशा प्रकारचे पुष्कळ लोक या आवारांतील इमारतींत होते. येथील एका लहानशा इमारतींत तर या प्रकारचे सुमारें चाळीस लोक रहात होते. या घरांत मीं गेलों. या लोकांइतके अभागी आणि दुःखीकष्टी दुसरे लोक मला कोठें आढळले नाहींत. यांतील तरुणांचे चेहरे अगदीं फिके आणि शरीरें रोड दिसत होतीं. आणि वृद्ध लोक तर इतके वाईट दिसत होते कीं, त्यांजकडे पहावतहि नव्हतें. यांतीलहि कित्येकांशीं मीं संभाषण केलें. सर्वांच्या बोलण्यांतील तात्पर्य बहुधा एकच. यांतील प्रत्येक जण पूर्वीं चांगल्या स्थितींत असल्याचें सांगत होता आणि आपले कोणी काकेमामे अजून श्रीमंती भोगीत आहेत, असेंहि कित्येकांनीं सांगितलें. दुर्दैवामुळें, चुगलखोरांच्या दुष्टपणामुळें अथवा स्वतःच्या परोपकारबुद्धीच्या अतिरेका-मुळें आपण अशा स्थितींत येऊन पडलों, असें प्रत्येक जण सांगत होता. येथें रहाणें कोणालाच आवडत नव्हतें. उवांच्या आणि पिसांच्या वुजवुजा-टांत, अजुबाजूंच्या दारुड्यांच्या शिव्यागाळी ऐकत आपलें कंटाळवाणें आयुष्य झिजवीत बसण्यास शुद्ध दुर्दैव कारण आहे, हा प्रत्येकाच्या सांगण्याचा मुख्य आशय होता. प्रत्येक जण गतकाळचें चिंतन करीत आयुष्याचा अपव्यय करीत बसला होता. वर्तमानकाळ जणूं काय त्यांच्या हिशेबींच

नव्हता. मनांत भूतकाळचें चिंतन असून भविष्यकाळाची फुकट आशा त्यांना वाटत होती. लवकरच कांहीं तरी घडेल, आणि आपल्या पूर्वीच्या स्थितींत आपण पुन्हां जाऊन पडूं, ही आशा त्यांना होती; पण हें कांहीं तरी ह्मणजे काय, हें कोणासच सांगतां येत नव्हतें आणि तें घडून येत नसल्यामुळें त्यांचें आयुष्य फुकट जात होतें. अशा फुकट्या आशेवर पांच-पांच दहादहा वर्षें माशा मारीत बसलेले कांहीं लोक यांत होते आणि एका गृहस्थानें तर तीस वर्षें अशा अवस्थेंत काढिलीं होतीं. कित्येकांनीं दिवाणी कोर्टांत आपल्या चीजवस्तूंचें वाटोळें करून घेतलें होतें, तरी तोच दावा पुढें चालवून तो जिंकण्याची आशा ते धरून बसले होते. एकंदरीनें बाहेरून कांहीं तरी मदत मिळेल आणि आपण सुखी होऊं, या आशेनें या लोकांना वेडें केलें होतें.

मी परोपकारकर्ता या अभिमानानें फुगून गेलों नसतों, तर या लोकांची खरी चूक कोठें होत आहे, हें माझ्या लक्षांत आलें असतें. मनुष्याचें सुख त्याच्या आजुबाजूच्या परिस्थितीवर अवलंबून नसून त्याच्या दृष्टिकोणावर अवलंबून असतें. रडक्या मनुष्याला उद्यां तुम्हीं सिंहासनावर बसविलें, तरी तेथेंहि तो रडणारच. आजुबाजूची परिस्थिति बदलून मनुष्याला सुखी करण्याचा यत्न फुकट होय. हे लोक दुःखी असण्याचें कारण त्यांची परिस्थिति हें नव्हें. हे लोक सामान्य माणसांहून कांहीं वेगळ्या जातीचे प्राणी आहेत, असें नाहीं. तत्वदृष्ट्या यांच्या आणि माझ्या परिस्थितींत कांहींच अंतर नव्हतें. या लोकांशीं संभाषण करतांना मला इतकें जड वाटलें, याचें कारण हेंच होय. माझ्या स्वतःच्या मानसिक अवस्थेचें प्रतिबिंब जणूं या आरशांत मला दिसत होतें. मी आणि माझ्या परिस्थितींतले इतर लोक यांच्या मानसिक अवस्थेची तुलना या लोकांच्या मानसिक अवस्थेशीं त्या वेळीं मीं करून पाहिली असती, तर या दोन अवस्थांत गुणमूलक फरक नाहीं, ही गोष्ट माझ्या लक्षांत ताबडतोब आली असती.

हे लोक या आवारांत न राहतां आमच्यासारखे राजरस्त्यावरील सुंदर इमारतींत रहात असते आणि सध्यांप्रमाणें शिळी भाकरी पोटांत न भरतां

पंचपक्कान्नें खात असते, तरी त्यांच्या अभागीपणांत कांहीं कमीपणा आला नसता. आपणास प्राप्त असलेल्या परिस्थितींत माखुष रहावयाचें आणि गेले दिवस ते चांगले, असें म्हणून दुःख करीत भावी आशेवर नजर लावून बसावयाचें, हाच यांचा जन्मसिद्ध स्वभाव. असे लोक आम्हां श्रीमंतांतहि किती तरी आढळत नाहींत काय? मग या श्रीमंतांत आणि या आवारांत असलेल्या खबदाडांतील रहिवाशांत फरक तो कोठें राहिला? या सर्वांची आकांक्षा पाहिली, तर ती एकच. स्वतःला निरुद्योगीपणा ठेवून आणि आपल्यासाठीं अधिकाधिक लोकांस राबवून आपली तुंबडी कशी भरतां येईल हींच यांची नित्य विवंचना! असले लोक बाह्यतः श्रीमंत अथवा गरीब दिसले, तरी त्यांची मनोघटना एकच. या मनोघटनेंतील फरक गुणधर्ममूलक नसून परिणाममूलक मात्र असतो. ही सारी विचारपरंपरा त्या वेळीं माझ्या चित्तांत आली असती, तर हें मूळभूत तत्वहि माझ्या लक्षांत तेव्हां आलें नसतें; पण त्या वेळीं मीं विचार केला नाहीं, त्या लोकांनीं सांगितलेल्या हकीकतीचीं संक्षिप्त टांचणें मीं लिहून घेतलीं आणि पुढें मागें या लोकांस कोणत्या तऱ्हेनें मदत करावी, एवढाच विचार त्या वेळीं माझ्या चित्तांत होता. या लोकांचा दृष्टिकोण बदलल्याशिवाय हे लोक कधींहि सुखी व्हावयाचे नाहींत, हा मुद्दा त्या वेळीं मला समजला नाहीं.

या लोकांना पौष्टिक अन्न न मिळाल्यामुळें ते रोडावले होते, असें नाहीं, तर त्यांच्या जठराग्नीची क्रियाशक्ति नाहींशी झाल्यामुळें ते रोडावले होते. त्यांना वास्तविक पौष्टिक अन्नाची जरूरी नव्हती, तर जठराग्नीला फाजील चेतना देणारे पदार्थ त्यांना हवे होते.

यांपैकीं कांहीं लोकांना थोडीफार मदत मीं केली; पण तिचा वास्तविक उपयोग एकासहि झाला नाहीं, असें आतां मी सांगतों. यांपैकीं तिघांजणांची हकीकत अद्यापि माझ्या समोर आहे. तिघांना वारंवार मदत मिळाली असतांहि ते सारे आज त्याच पूर्वस्थितींत तसेच खितपत पडले आहेत.

— ८ —

माझ्या मदतीच्या यादींत आणखीहि एका प्रकारच्या मनुष्यप्राण्यांची नोंद मीं केली होती. हे मनुष्यप्राणी म्हणजे कुमार्गी स्त्रिया. या आवारांत अशा किती तरी स्त्रिया होत्या. अगदीं तरुण कुमारिकांपासून तों तोंडाचीं बोळकीं होण्यापर्यंतचे सारे वर्ग येथें दिसत होते. तरुण स्त्रियांत कांहीं तरी माणुसकी अद्यापि शिल्लक होती; पण म्हाताऱ्या बायका शुद्ध हडळी किंवा जखणी बनल्या होत्या. अशा बायकांना मदत तरी काय करावी, हाहि मोठा प्रश्नच होता. यांना मदतीच्या यादींत दाखल करण्याचा विचार प्रथम माझ्या मनांत नव्हता.

या आवारांतील एका बैठ्या घरांत आम्हीं शिरलों. घराच्या मालकाचा शोध करण्यासाठीं एक विद्यार्थी गेला आणि आंतील रहिवाशांची चौकशी मी करूं लागलों. या घरांत मध्यभागीं एक मोठी रिकामी जागा असून त्याच्या चाऱ्ही बाजूंनीं खोल्या बांधलेल्या होत्या. यांपैकीं पहिल्या खोलींत एक म्हातारा रहात असून त्याजबरोबर एक स्त्रीहि होती. पलीकडच्या खोलींत घराचा मालक रहात होता.

मी पहिल्या खोलींत शिरलों आणि त्या म्हाताऱ्याची चवकशी केली. त्याला एका छापखान्यांत पोटापुरती नौकरी होती. त्याच्या शेजारच्या खोलींत एक मनुष्य झोंप घेत पडला होता. ही खोली एका तरुणीनें भाड्यानें घेतलेली होती. त्या खोलींत मी गेलों आणि तो निजलेला गृहस्थ कोण, याची चवकशी त्या तरुणीपाशीं केली. ती म्हणाली, ‘ हा माझा पाहुणा आहे.’ तूं कोण आणि तुझा धंदा काय ? असा प्रश्न विचारतां ती म्हणाली, ‘ मी एक शेतकऱ्याची स्त्री आहें.’ धंद्याबद्दल प्रश्न विचारतां, सरळ जबाब न देतां ती मोठ्यानें हंसूं लागली. तेव्हां तुझ्या पोटाची तजवीज काय ? असा प्रश्न मीं पुन्हां केला, तेव्हां तिनें कांहीं गुळमुळीत जबाब मला दिला; पण त्याचा अर्थ मला समजला नाहीं. इतक्यांत पलीकडच्या आणखी एका खोलींतूनहि एका स्त्रीचें मोठ्यानें हंसणें मला ऐकूं आलें. माझ्या प्रश्नाला सरळ जबाब मिळत नाहीं, असें पाहून मालक

पुढें होऊन म्हणाला, 'तिचा धंदा वेश्येचा आहे.' आणि मग त्या स्त्रीकडे धिःक्कारयुक्त मुद्रेनें पाहून तिला म्हणाला, 'गुळमुळीत जबाब देण्यांत काय अर्थ आहे ? तूं बाजारबसवी आहेस, असें स्पष्ट कां सांगत नाहींस ?'

त्या गृहस्थाच्या या फटकळपणाचा मला राग येऊन मीं त्याला म्हटलें, 'अशा रीतीनें तिला लाजविण्यांत काय अर्थ आहे ? आपण सारे पुण्यवान् असतों, तर ती तरी येथें कशाला आली असती ? त्यांना दोष लावण्यांत अथवा लाजविण्यांत अर्थ नाहीं. अशा प्राण्यांची दया करणें हेंच उचित आहे. अशा स्थितींत या बायका येऊन पडतात, हा सर्वस्वी त्यांचाच अपराध आहे काय ?'

यावर त्या मालकानें मला कांहीं जबाब दिला नाहीं. त्या गरीब बिचाऱ्या बायकांशीं बोलतांना एकाद्या ब्रह्मचाऱ्याचा आव आणून त्यांना पशूसारखें त्यानें वागवावें, यामुळें मला त्याचा राग आला होता. आमचें हें भाषण होत आहे, इतक्यांत एक तांबड्या तोंडाची आणि कुरळ्या केसांची हाडकुळी स्त्री वरच्या पोटमाळ्यांतून बाहेर पडली. आमचें भाषण कानीं पडल्यामुळें काय प्रकार आहे, हें पाहण्यासाठीं ती तेथें आली होती. इतक्यांत तिच्या मागोमाग आणखीहि तीन चार स्त्रिया येऊन उभ्या राहिल्या.

आम्ही सर्वजण स्वस्थ उभे राहिलों. कोणीच कांहीं बोलेना. घराचा मालक लज्जेनें खालीं तोंड घालून उभा होता. मी तोंडानें उपदेशाची कांहीं भाषा बोलत होतों खरा; पण ही भाषा दांभिकपणाची आहे, असें माझें मन मला सांगत होतें. मी स्वतः सर्वगुणसंपन्न नाहीं, हें माझें मला स्पष्ट कळत असतां या पतित स्त्रियांना उपदेश तरी कोणत्या तोंडानें मीं करावा ? मीहि जवळ जवळ त्यांच्याचसारखा होतों. हा सारा विचार मनांत येतांच अधिक कांहीं न बोलतां त्या स्त्रियांची नोंद मीं करून घेतली.

येथें आणखी एक चूक मीं केली. अशा स्त्रियांना सुधारून त्यांना नीतीच्या मार्गाला पुन्हां आणतां येईल, असा चुकीचा विचार माझ्या मनांत आला. आपल्या हातीं जणूं काय यक्षिणीची कांडी असून सर्व

दुनियेचें स्वरूप उलथें पालथें करण्याचें सामर्थ्य आपणास आहे, असा गर्व मला झाला होता. यांची नोंद करून घ्यावी व पुढेंमागें यांस मदत करावी, असें आपल्या मनाशीं ठरवून त्यांचीं नांवें मीं टिपून घेतलीं; पण हे मदत करणारे अस्मादिक कोण? हा विचार मात्र त्या वेळीं माझ्या चित्ताला शिवलासुद्धां नाहीं. स्त्रिया अशा स्थितीला आणून पोहोंचविण्याचें घोर कर्म मी आणि माझ्या पुष्ठ्यांतले दुसरे लोक पिढ्यानपिढ्या करीत आलों आहों, ही गोष्ट या वेळीं मी अगदीं विसरलों होतों. मी परोपकारी या अभिमानानें माझी विवेकबुद्धि आंधळी झाली असल्यामुळें खरा प्रकार जाणण्याची पात्रता तिच्या आंगीं उरली नव्हती; आणि या पापाचा मूळ झरा शिल्लक आहे, तोंपर्यंत त्याचा प्रवाह नष्ट करण्याचा यत्न फुकट आहे, हेंहि त्या वेळीं माझ्या लक्षांत आलें नाहीं. हा मुद्दा त्या वेळीं माझ्या लक्षांत आला असता, तर हा प्रयत्न अखेरीस विफल होणार याबद्दल मला शंका राहिली नसती.

तेथील एका स्त्रीला तिचा पूर्वेतिहास मीं विचारला, त्यावरून ती मास्कोचीच राहणारी असून तिचा बाप एक गिरणीकामगार होता, असें मला समजलें. ती लहान असतांच तिचा बाप वारला, व तिजवर देखरेख ठेवणारे कोणी नसल्यामुळें छाकट्या लोकांच्या नादीं लागून अखेरीस वेश्येचा धंदा ती उघडपणें करूं लागली. हा धंदा तूं सोडशील काय? असा प्रश्न मीं तिला केला, तेव्हां माझी थट्टा करण्यासाठींच कीं काय कोणास ठाऊक, गदगदां हंसून ती मला म्हणाली, 'माझ्याजवळ पिंवळें तिकिट आहे, त्यासुद्धां मला कोण घेणार?' पिंवळें तिकिट म्हणजे वेश्येचा धंदा चालविण्यास पोलिसांनीं दिलेला परवाना.

तिच्या उपहासाकडे दुर्लक्ष करून मीं तिला म्हटलें, 'आम्ही तुला स्वयंपाकणीची नोकरी कोठें दिली, तर ती तूं करशील कीं नाहीं?'

मोठ्या आश्चर्याची मुद्रा करून ती म्हणाली, 'काय स्वयंपाकणीची! अहो, मला भाकरीसुद्धां भाजतां येत नाहीं.'

स्वयंपाक येत नाहीं, ही गोष्ट तिनें अगदीं खोटी सांगितली, असें तिच्या मुद्रेवरून मला स्पष्ट दिसून येत होतें. स्वयंपाकाचा धंदाच तिला

हलकटपणाचा वाटत होता. पोटापुरतेंसुद्धां जवळ नाहीं, अशा स्थितींत ती होती; तथापि स्वयंपाकणीचा धंदा तिला तुच्छ वाटत होता. आतांपर्यंतचा तिचा जन्म कामावांचून गेला असल्यामुळें आळस हाच आपला धंदा, असें तिला वाटे. आणि गम्मत अशी कीं, अशा प्रकारें तिनें आयुष्य काढावें, ही गोष्ट तिच्या आजूबाजूच्या लोकांसहि विपरीत वाटत नव्हती. मनुष्याचें खरें दुर्भाग्य तें हेंच. चुकीच्या गोष्टीहि त्याला बरोबर वाटतात. येथेंच सारें बिनसतें. या गैरसमजामुळेंच असल्या पशूंच्या स्थितींत ती पडली आणि या गैरसमजामुळेंच त्या स्थितीला ती चिकटून राहूं पहात होती. संध्याकाळ झाली कीं खोटा नट्टापट्टा करून एकाद्या खिडकींत बसावें, हाच आपला पिढीजात व स्वाभाविक धंदा आहे, असा धडा लहानपणापासून तिनें गिरविला होता. आतां अशा स्थितींतून तिला बाहेर काढण्याचें काम माझ्या अथवा दुसऱ्या कोणाच्या तरी हातून कसें होणार ? आपला मार्ग चुकीचा आहे, हें तिला कसें पटणार ? निव्वळ आळसांत गेलेला काळ हा आयुष्याचा अपव्यय करणारा असून पापमूलक आहे व उद्योगशाली मनुष्य हाच खरा माणूस होय, अशी खात्री ज्यांची पटली आहे, असे लोक आम्हांमध्यें आधीं किती आहेत ? इतकी खात्री पटलेले लोक आधींच विरळा आणि अशी खात्री पटलेल्या लोकांपैकीं प्रत्यक्ष आचरण करणारा तर त्याहून विरळा. हे मुद्दे त्या वेळीं माझ्या लक्षांत आले असते, तर समाजाला जडलेला हा रोग नाहींसा करणारा धन्वंतरी अद्यापि कोणीहि निर्माण झालेला नाहीं, हें त्या वेळींच मला कळलें असतें.

आमच्या भोंवतीं बऱ्याच बायका जमल्या होत्या. आणि माझे प्रश्न ऐकून त्यांना मोठें नवल वाटत होतें. नवल अशासाठीं कीं, असे प्रश्न मीं कां करावे, हेंच त्यांना समजत नव्हतें. आपला मार्ग अनीतीचा आहे, हेंच त्यांना पटलेलें नव्हतें. मग तो सोडण्याचा उपदेश त्यांना कसा रुचणार ? लोक आपणाला तुच्छ समजतात व आपणाशीं बोलतांना वाटेल तशी घाणेरडी भाषा वापरतात, हें त्यांना समजत होतें, पण लोक असें कां करतात, याचा उमज मात्र त्यांना पडत नव्हता. असल्या प्रकारच्या बदफैली स्त्रियांच्या संगतींत त्या लहानपणापासून वाढल्या असल्या-

मुळें समाजांत आपला वर्ग अनाठायीं नसून समाजाला त्याची जरूर असल्यामुळेंच अनादी कालापासून तो जीव धरून राहिला आहे, अशी त्यांची खात्री होती. या वर्गांतील स्त्रिया शरीरानें नीटनेटक्या स्थितींत आहेत कीं नाहींत, याची खास चवकशी राखण्यासाठीं, स्वतः सरकारसुद्धां चांगले पगार देऊन अधिकारी नेमतें. समाजाला जर या वर्गाची जरूर नसेल, तर या कामीं सरकार तरी पैसे कशाला खर्चील ? यावरूनच या वर्गाची जरूर समाजाला आहे, ही गोष्ट निःसंशय सिद्ध होते. यांत दुसरेंहि आणखी एक बारीक रहस्य आहे. पुरुषवर्गाचें काम इतर स्त्रियांपेक्षां आपल्या हातीं अधिक पक्कें आहे, या गोष्टीची जाणीव या स्त्रियांत पक्की आहे. यामुळेंच कामधंदा करून अथवा लग्नें लावून एखाद्याची बटीक होण्यापेक्षां सांप्रतच्या स्थितींत राहून पुरुषवर्गाला वाटेल त्याप्रमाणें वांकविण्यांत त्यांना अधिक शहाणपण वाटतें, यांत नवल काय ? लोक एका बाजूनें आपणास शिव्या देत असले, तरी आपली जरूर त्यांना आहे, आणि ही गोष्ट स्त्रिया, पुरुष व सरकार यांनींहि मान्य केली आहे, मग आपल्या वर्तणुकींत अनीतीचा अथवा पश्चात्ताप करण्यासारखा भाग कोणता ? हेंच त्यांस समजत नाहीं. आपली वर्तणूक तुम्ही सुधारा, असा उपदेश कोणीं त्यांना केला, तर आपल्या वर्तणुकींतला कोणता भाग सुधारावयाचा, हेंच त्यांच्या लक्षांत येत नाहीं.

दुसऱ्या एका घरांत एक बाई आपल्या तेरा वर्षांच्या मुलीचा तनुविक्रय करून आपलें पोट भरते असें आम्हांस समजल्यावरून त्या कोंवळ्या पोरीला तरी या पापगर्तेतून बाहेर काढावें, या हेतूनें आम्हीं त्या घरीं गेलों. आई सुमारें चाळीस पंचेचाळीस वर्षांची असून तिचा धंदाहि वेश्येचा होता. हिचा कुरूपपणा इतका विलक्षण होता कीं, तिला पाहिल्याबरोबर मला खरोखर शिसारीच आली. खाण तशी माती, हा न्याय लक्षांत आणला म्हणजे मुलीच्या रूपाचें निराळें वर्णन नलगे. तुम्हीं दोघी धंदा काय करतां ? असा प्रश्न त्या स्त्रीला मीं केला, तेव्हां बुजलेल्या बैलासारखी ती मजकडे रोंखून पाहूं लागली. मी रिकामी उठाठेव करणारा, कोणी तरी निरुद्योगी माणूस आहें, असेंच तिला वाटत होतें. त्या

मुलीला कांहीं प्रश्न मीं विचारला म्हणजे मला जबाब देण्यापूर्वीं आपल्या आईकडे ती पाही आणि मग उत्तरादाखल तोंडांतल्या तोंडांत कांहीं पुटपुट करी. ही जोडी पाहून माझ्या मनांत दया तर उत्पन्न झाली नाहींच; पण त्या दोघींचा तिटकारा मात्र मला आला. तथापि या मुलीला चांगल्या मार्गाला लावावें, एतदर्थ कांहीं खटपट करण्याचा बेत मीं केला. अशा स्त्रियांस मदत करण्याचा उद्योग कांहीं श्रीमंत व सभ्य स्त्रियांनीं हातीं घेतला होता, त्यांना या मुलीची हकीकत कळविण्याचा माझा मनोदय होता. या मुलीच्या आईचा गतकाळ कोणत्या स्थितींत गेला, या मुलीचा जन्म तिच्या उदरीं कोणत्या अवस्थेंत झाला आणि आपल्या लेंकराचें संगोपन तिनें कोणत्या अवस्थेंत केलें, याचा विचार त्या वेळीं मी केला असता, तर तिचें कृत्य अनीतीचें अथवा पापाचें आहे, असें माझ्या मनांत खचित आलें नसतें. ती स्त्री जगांत एकटी. प्रसंगीं वास्तपुस्त करण्यास कोणीहि माणूस नाहीं, जवळ पैशाचा आधार नाहीं, अशा स्थितींत आपल्या पोटाच्या लेंकराला जगविण्यासाठीं तिला केवढे प्रयास पडले असतील आणि केवढा आत्मयज्ञ तिला करावा लागला असेल, हा विचार त्या वेळीं माझ्या मनांत आला असता, तर तिनें केलें तें वाईट असें मला म्हणतां आलें असतें काय ? बऱ्यावाईटाबद्दल तिच्या कल्पना चुकीच्या असतील; पण तसें असलें तरी, आपल्या कल्पनेप्रमाणें आपल्या मुलीच्या बचावासाठीं आपल्या सर्व सुखावर पाणी ओतीत होती, हें खोटें काय ? त्या मुलीनें अशा स्थितीला येऊं नये, अशा स्थितीचा विचार करण्याचा काळ कधींच निघून गेला होता. तसें करावयाचें तर तिच्या आईला कोणी तरी आधींच सुमार्गास लावावयास हवें होतें. कोणाचीहि नायको होऊन न राहतां आणि काबाडकष्ट न करतां केवळ इंद्रियांच्या सुखासाठीं जगणें, हें माणुसकीला उचित नाहीं, असें तिला कोणी तरी प्रथमच सांगावयास हवें होतें, पण असें सांगणारा तिला कोण भेटणार ? जो भेटणार तो तिला उलट उत्तेजनच देणार. ज्या सभ्य स्त्रियांकडे या मुलीची वर्दी मी लावणार, त्या बाया तरी काय करीत होत्या ? मुलें होऊं नयेत अशी त्यांचीहि इच्छा होती. कित्येक जणी यासाठीं खटपटहि

करीत. त्यांपैकीं एकहि हातानें उद्योग करणारी नव्हती. सर्वजणींचा काळ आळसांत आणि इंद्रियांचे लाड करण्यांत जात होता. आपल्या मुलीबाळींना हेंच शिक्षण त्या देत होत्या. पण हे विचार त्या वेळीं माझ्या मनांत आले नाहींत. ते आले असते, तर एका आंधळ्याचें गाऱ्हाणें दुसऱ्या आंधळ्याकडे पोहोंचविण्याचा फुकटा उद्योग मीं खचित केला नसता. वेश्येचा धंदा करणारी ही एक आई आपल्या मुलीला नटवून खिडकींत बसविते, तर ती दुसरी श्रीमंत आई आपल्या मुलीला थाटाचा पोषाक चढवून राजवाड्यांतल्या अथवा एकाद्या सरदाराच्या घरीं नाचाला घेऊन जाते. परिस्थितीप्रमाणें बाहेरचीं सोंगें वेगळीं; पण दोन्हीं अंतर्यामांतील विचारप्रवाहांचें स्वरूप एकच. मानवी जिवीताची इतिकर्तव्यता काय? हा प्रश्न या दोन अंतःकरणांना केला, तर दोघांचें उत्तर एकच. तें उत्तर असें. स्त्रीनें पुरुषांची करमणूक करून त्यांच्या पशुवासना तृप्त कराव्या आणि त्यांच्या बदल्यांत पुरुषांनीं तिला अन्नवस्त्र पुरवून तिची काळजी घ्यावी. अशी स्थिति असतां श्रीमान् आणि सभ्य—गर्तीं स्त्रियांनीं हलकट म्हणविण्याऱ्या वेश्यांचीं स्थिति सुधारण्याकरतां हातीं चंग तरी कसा बांधावा?

— ९ —

मुलांसंबंधीं माझ्या परोपकाराचा आणखी एक निराळाच मासला झाला. मी बोलूनचालून परोपकार करण्यास निघालेला! तेव्हां अनाथ मुलें मी कशीं विसरूं? अशा मुलांचेंहि परित्राण करण्याचा निश्चय करून त्यांची यादी मीं तयार केली आणि याचा विचार पुढें करूं असें म्हणून ती मीं खिशांत ठेवून दिली. हा 'पुढें' केव्हां येणार हें माझें मला देखील माहीत नव्हतें.

या मुलांत सुमारें बारा वर्षांचा सीरो या नांवाचा एक मुलगा होता. हा मुलगा मोठा तरतरीत, चलाख आणि बुद्धिवान् असावा, असें मला वाटलें. हा मुलगा एका चांभाराकडे नौकरीला होता. कांहीं कारणानें तो चांभार तुरुंगांत गेला तेव्हां ती नौकरी सुटून तो भटकूं लागला. या

मुलाची ही हकीकत ऐकून मला खरोखर फार वाईट वाटलें आणि याला प्रथम हातीं धरावें, असा बेत मीं केला.

या मुलाची एकंदर हकीकत थोड्याशा विस्तारानें मी सांगणार आहें म्हणजे त्यांत आम्हांसारख्या 'परोपकारी' गृहस्थांची खरी मदत किती होते, याचाहि उलगडा होईल. मी या मुलाला आपल्या घरीं आणलें आणि त्याची योजना स्वयंपाकघरांत केली. उवालिखांनीं भरलेल्या त्या मुलाला माझ्या स्वतःच्या मुलांत मिसळूं देणें, अर्थातच मला इष्ट वाटलें नाहीं. आतां त्याच्या उवांचा त्रास नौकर मंडळीला होईल हें खरें; पण माझ्यासारख्या परोपकारी गृहस्थाला स्वतःचा त्रास चुकवून तो लोकांच्या मागें लावण्यांत हरकत कां वाटावी ? मी त्याच्यावर किती तरी उपकार करीत होतों. उष्टें खरकटें अन्न (मी नव्हें, माझा आचारी) आम्हीं त्याला घालीत होतों. याशिवाय त्याला फाटके कपडे आम्हीं देत होतों हें वेगळेंच. हा मुलगा सुमारें एक आठवडा आमच्या घरीं होता. घरांत हिंडतां हिंडतां केव्हां तरी तो माझ्या नजरेस पडे. तेव्हां उद्योगशीलतेवर एकादें व्याख्यान मी त्याला ऐकवीं. एके दिवशीं संध्याकाळीं मी फिरायास गेलों असतां माझ्या ओळखीचा एक चांभार मला भेटला. तेव्हां त्या मुलाला ठेवून घेण्याविषयीं त्याजकडे मीं गोष्ट काढली. या वेळीं सुटेप या नांवाचा एक शेतकरी आमच्या घरीं रहात होता. त्यानें त्या मुलाला आपल्या खेड्यांत रवाना केलें. खेड्यांत जाऊन रोजमजुरी करणें त्या मुलाला पसंत पडलें नाहीं. अशाच रीतीनें आणखी पांच चार दिवस काढून तो पोरगा एकाएकीं अदृश्य झाला. दुसऱ्या दिवशीं त्या कंगालखान्यांत जाऊन त्याची चवकशी मीं केली. तो तेथें आला असल्याचें मला समजलें; पण त्या वेळीं तो मला भेटला नाहीं. त्या दिवशीं आठ आणे रोजावर एका पशुसंग्रहालयांत त्याला काम मिळालें होतें. संग्रहालयाच्या आवारांत हत्तींची आणि दुसऱ्या कांहीं जनावरांची मिरवणूक निघणार होती. त्या वेळीं रानटी लोकांसारखा पोशाक करून जनावरांबरोबर हिंडण्याचें काम त्याला मिळालें होतें. दुसऱ्या दिवशीं पुन्हां मी कंगालखान्यांत गेलों; पण तें कारटें असलें कृतघ्न कीं मला येतांना पाहून दुस-

त्याच रस्त्यानें त्यानें पळ काढला. त्या मुलाच्या पूर्वपरंपरेचा विचार माझ्या मनांत त्या वेळीं आला नाहीं. काम केल्याशिवाय पोट भरणें शक्य आहे, असा अनुभव येऊन तो आधींच बिघडला होता. यामुळेंच त्याची काम करण्याची संवय साफ मोडली होती; मग आंग मोडून निढळाच्या घामाचा पैसा मिळविणें त्याला कसें आवडणार ? त्याला सुधारण्याकरतां आणि त्याचें हित साधण्याकरतां त्याच्यावर मीं मोठा उपकार केला. तो कोणता, तर माझ्या घरीं मीं त्याला नेलें. तेथें त्यानें काय पाहिलें? त्याच्याहून मोठीं, त्याच्या बरोबरीचीं आणि त्याच्याहून लहान अशीं सर्व प्रकारचीं मुलें स्वतः कसल्याहि कामाला बोट सुद्धां न लावतां चारी ठाव यथेच्छ भोजनें झोडतात आणि स्वतःसाठीं दुसऱ्यांना राबवितात, हेंच ! करमणुकीसाठीं मातींत खेळून तीं कपडे खराब करतात, गोडधोड पदार्थ घशापर्यंत खाऊन अजीर्णानें ओकत सुटतात, घरांतल्या पेले, बशा फोडतात. पातळ पदार्थांच्या बाटल्या पालथ्या करतात आणि सुंदर पक्वान्नें सुद्धां कुत्र्यांपुढें फेंकतात, हेंच त्याला तेथें दिसलें. पूर्वीच्या कंगालखान्यांतून बाहेर पडून ज्या सुधारलेल्या जगांत तो आला आणि तेथें जी सुधारलेली स्थिति त्यानें पाहिली, ती अशा प्रकारची ! तेव्हां कांहीं काम न करतां टोळाप्रमाणें इतस्ततः हिंडावें आणि मनमुराद खावें प्यावें, असाच बोध त्याला झाला असला, तर त्यांत त्याची काय चूक आहे ! आतां ही गोष्ट मात्र खरी कीं, डोकेंफोडीचे व्याकरणाचे नियम अथवा 'किंबक्तु' सारख्या गांवढ्यांचीं नांवें पाठ करण्याचें खडतर काम माझ्या मुलांना करावें लागत होतें, हें मात्र त्याला कळलें नव्हतें; पण हें त्याला समजलें असतें, तरी या धाकंदट्टीचा उपयोग त्याच्या ध्यानीं आला असता कीं नाहीं, याची वानवाच आहे. आणि ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली असती, असेंहि घटकाभर मानलें, तरी तिच्यापेक्षां माझ्या मुलांच्या उदाहरणाचा परिणामच त्याच्या चित्तावर खास अधिक झाला असता. माझ्या मुलांना जें शिक्षण मिळत होतें, त्याचा हेतु तरी भविष्यत्कालीं कोणतेंहि काम हातानें केल्यावांचून त्यांची चैन अशीच चालू रहावी. स्वतः कोणतेंहि काम न करतां आपणास मिळालेल्या सरकारी सनदांच्या जोरावर दुसऱ्याला शक्य तितकें अधिक राबवावें, व

दुनियेंत मिळणाऱ्या चैनबाजीचा शक्य तितका अधिक उपभोग घ्यावा, हाच या शिक्षणाचा हेतु आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आल्यावांचून राहिली नसती. ही गोष्ट त्याच्या ध्यानीं आली म्हणूनच त्या शेतकऱ्याबरोबर खेड्यांत जाऊन राहण्याचें व बटाटे खावून ताकाचें पाणी पिण्याचें त्यानें नाकारलें. यामुळेंच पशुसंग्रहालयांत जाऊन आठ आणे रोजावर रानटी पोषाकांत मिरविणें, त्यानें पसंत केलें.

माझ्या स्वतःच्या मुलांना कोणत्याहि कामधंद्याला न लावतां उलट त्यांना चैनीचें वळण मी लावतों आणि लोकांच्या पोरांनीं शारिरीक कष्ट करावेत, असा उपदेश करतों, हा माझा केवढा मूर्खपणा ! पण ती गोष्ट त्या वेळीं माझ्या ध्यानांत आली नाहीं.

त्या कंगालखान्यांत किती तरी मुलें विपन्नावस्थेंत होतीं. त्यांत कांहीं वेश्यांचीं आणि कांहीं पोरकीं पोरें होतीं. या साऱ्यांची अवस्था दगडाला पाझर फोडण्यासारखी होती. पण सिरोयाचा जो अनुभव मला आला, त्यावरून या मुलांनाहि माझ्यानें कांहीं मदत होईल, असें मला वाटलें नाहीं. आम्ही श्रीमंत लोक आमच्या स्वतःच्या आणि आमच्या मुलांच्या उदाहरणानें जो परिणाम त्यांच्या चित्तावर घडवीत असतों, त्यामुळें आमच्या कोरड्या उपदेशाचा काडीचा उपयोग त्यांना होणें नाहीं, ही गोष्ट पुढें माझ्या ध्यानांत आली. एखाद्या भिकाऱ्याजवळून अथवा वेश्येजवळून एखाद्या मुलाला काढणें ही गोष्ट फारशी अवघड नाहीं. जवळ पैसा असला म्हणजे अशीं मुलें हवीं तेवढीं मिळवितां येतील, त्यांना कपडालत्ता देतां येईल, त्यांच्या पोटाला खाऊं घालतां येईल आणि अनेक शास्त्रांचें शिक्षणसुद्धां त्यांना देतां येईल, पण इतकें झालें तरी मेहनतीच्या धंद्याला त्यांना लावतां येणार नाहीं. आम्ही स्वतः आपली भाकर कष्ट करून मिळवीत नसतां त्यांनीं मात्र कष्ट करावेत असा उपदेश करणें, व्यर्थ आहे. आमचीं जिवंत उदाहरणें प्रत्यक्ष डोळ्यांपुढें असतां आमचा शाब्दिक उपदेश तो कां ऐकेल ? किंबहुना अशा मुलांना पोटभर अन्नवस्त्र देणें आणि लिहिणें वाचणें शिकावणें हेंहि चुकीचें आहे. कारण असें करणें म्हणजे त्यांच्या ठिकाणीं आळसाचें बीजारोपण करणें होय.

एकाद्यानें एकादें कुत्र्याचें पोर पाळावें, त्यास न्हाऊं माखूं घालावें, खावूं घालावें आणि चेंडू तोंडानें आणण्यास शिकवून त्याच्या वागडण्यांत आनंद मानावा हें ठीक आहे; पण माणसाच्या पोराला जेऊं खाऊं घालून त्याला संस्कृत शिकविलें म्हणजे सारा कार्यभाग संपला असें नाहीं. जगांत जगावें कसें, हा धडा त्याला शिकविणें अत्यंत अगत्याचें आहे. शक्य तोंपर्यंत दुसऱ्यापासून कमी नोकरी कशी घ्यावी आणि स्वत: लोकांची शक्य तितकी अधिक सेवा कशी करावी, याचें शिक्षण माणसाच्या पोराला अत्यावश्यक होय. अनाथ पोरांच्या संरक्षणासाठीं गृहें उभारून आणि त्यांत अनाथ मुलें पाळून त्यांना जें शिक्षण आम्ही देतों तें याच्या अगदीं उलट असतें.

— १० —

दुसऱ्या दिवशीं आमची स्वारी त्या कंगालखान्यांत पुन्हां गेली. आदल्या दिवशीं ज्यांची नोंद मीं करून घेतली होती, त्यांपैकीं ताबडतोब मदत कोणास करतां येईल, हें आज मला पहावयाचें होतें. पण येथें जाऊन प्रत्यक्ष अनुभव मीं घेतला, तेव्हां मदत करण्याचें हें काम प्रथम मला वाटलें तितकें सोपें नाहीं, असें माझ्या अनुभवास आलें. यामुळें त्या लोकांना मदत होणें बाजूलाच राहून उगीचच्या उगीच मीं त्यांना त्रास दिल्यासारखें मात्र झालें. माझ्या अपात्रतेमुळें म्हणा अथवा त्यांना मदत करणें अशक्य होतें म्हणून म्हणा; पण असा प्रकार झाला, हें मात्र खरें. त्यानंतर आणखीहि कांहीं वेळां त्या कंगालखान्यांत मी जाऊन आलों; पण प्रत्येक वेळीं मला एकसारखेंच अपयश येत गेलें. प्रत्येक वेळीं याचकांचा एवढा मोठा तांडा माझ्या भोंवतीं गोळा होई कीं, त्यांच्या गडबडीनें कांहीं सुचेनासें होऊन मला तेथून पळ काढावा लागे. भिक्षेकऱ्यांच्या एवढ्या मोठ्या सैन्याला मदत करूं जाणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधूं पाहणें होय, असें मला वाटलें. इतक्या लोकांनीं मजभोंवतीं गोंगाट करून भिक्षा मागावी, याचा मला रागहि आला; पण त्या लोकांची निरनिराळी चवकशी मीं केली, तेव्हां मदतीला पात्र असा एकहि इसम त्या

वेळीं तरी मला दिसला नाहीं. माझ्या पोटांत दया उत्पन्न करण्याकरितां प्रत्येक जण वाटेल त्या थापा मारीत आहे, अशी शंका माझ्या मनाला एकसारखी येत होती. खरें खोटें जाणण्याची शक्ति असणारा हा मनुष्य-प्राणी नसून ही एक खजिन्याची जणूं जिवंत पेटीच आहे, असेंच जणूं त्यांना वाटलें आणि सुचेल या मार्गानें ती फोडून तिच्यांतील द्रव्य काढण्याचा यत्न ते करीत होते. माझ्यापासून मिळणाऱ्या द्रव्याचा उपयोग कोणत्याहि प्रकारचा न होतां त्यांना उलट कांहींतरी अपायच होईल, असें माझी मनोदेवता मला सांगत होती. माझें जाणें येणें तेथें वारंवार होऊं लागलें आणि त्या लोकांचा परिचय जसजसा वाढत चालला, तसतशी अंगीकृत कर्माची विफलता मला अधिकाधिक स्पष्ट दिसूं लागली.

मोजणीच्या अखेरच्या रात्रीं त्या कंगालखान्यांत मी पुन्हां गेलों. या घरीं रात्रीं येण्याची ही माझी पहिलीच खेप होती. यामुळें हें ठिकाण या वेळीं मला अगदीं नवें पण अत्यंत भयंकर वाटलें. सारीं घरें अगदीं चिकार भरून गेलीं होतीं. माळ्यांत आणि पोटमाळ्यांत स्त्री पुरुषांची एकच खिचडी होऊन गेली असल्याचें दिसत होतें. या लोकांचा वेष व त्यांची राहणी पाहून एकाद्याला खरोखरच भीति वाटली असती. आणि असलीं भयप्रद माणसें तेथें शेंकड्यावरच नव्हे, तर हजारांनीं मोजतां येण्याइतकीं होती. हें पहिलें घर—घर कसलें—खबदाडच तें—त्याच्या शेजारीं दुसरें, कांहीं अंतरावर पांचवें, त्या पलीकडे कांहीं अंतरावर विसावें; अशी मोजदाद तरी कोठवर करावी ? मोजतां मोजतां आंकडेहि संपून जावयाचे आणि यांपैकीं प्रत्येक घरांत ती एकच घाण, तें एकच कुजलेलें वातावरण, तीच भयंकर गर्दी, बायकांची आणि बाप्यांची तीच खिचडी दारुड्या स्त्री पुरुषांचा तोच धुमाकूळ आणि सर्वत्र तेच भेसूर याचना करणारे भयंकर चेहरे. सर्वांच्या तोंडावर पापाची कळा दिसत होती. हा सर्व देखावा पाहून मी केवढें अशक्य कार्य हातीं घेतलें, हें मला स्पष्ट दिसूं लागलें आणि तें हातीं घेतल्याबद्दल माझी मलाच लाज वाटूं लागली. मी लाजेनें अगदीं अर्ध मेला होऊन गेलों. मीं कोणाला कांहीं विचारलें नाहीं, आणि कशाचें टिपणहि केलें नाहीं.

माझ्या मनाला भयंकर यातना होत होत्या. एकादा वैद्य आपल्या रोग्यांकडे जातो आणि त्याला वांचविण्यासाठीं नानाप्रकारची धडपड करतो; पण अखेरीस आपल्या दिव्य मात्राहि खापराच्या किंमतीच्या ठरल्या, अशी त्याची खात्री झाली, म्हणजे त्याला जसें दुःख होतें, तेंच दुःख या वेळीं मला झालें. माझ्या हृदयाला हजारों विंचू झोंबत आहेत, असें मला वाटलें.

— ११ —

या भेटीनें माझ्या डोळ्यांवरची धुंदी साफ उतरली. मी मोठा दयाळू, मोठा उपकारकर्ता आणि साऱ्या जगाचें दुःख नाहींसें करणारा आहें. अशी जी मोठी घमेंड मला होती, तिचा मागमूसहि आतां कोठें राहिला नाहीं. मीं हातीं घेतलेलें कार्य शुद्ध मूर्खपणाचेंच नव्हे, तर भयंकरहि आहे, असें मला स्पष्ट दिसून आलें. इतकें झालें तरी, तें कार्य फेंकून देऊन मोकळें व्हावें, ही बुद्धि मला होईना. हें काम करण्यास मी जणूं काय बांधला गेलों आहें, असें मला वाटलें. या कंगालखान्यांत मी वारंवार येत गेल्यामुळें त्या गरीब लोकांना मधाचें बोट मीं लाविलें होतें. आपल्यासाठीं हा कांहीं तरी करील, अशी आशा त्यांच्या ठिकाणीं मी उत्पन्न केली होती. दुसरें असें कीं, या कार्यांत मीं पडलों आहे, ही गोष्ट जगजाहीर होऊन कांहीं लक्ष्मीपुत्र पैशाच्या थैल्या घेऊन मजकडे येऊं लागले होते आणि त्यांपैकीं कांहींनीं मजबरोबर आंगमेहनतहि करण्याचें पत्करलें होतें.

मजकडे मदतीची याचना करणारे अर्ज शंभरावर येऊन पडले होते. यांतील बहुतेक अर्ज श्रीमंत–भिकाऱ्याकडून आले होते. या श्रीमंत–भिकाऱ्यांची ओळख वाचकांस पूर्वीं झालीच आहे. यांपैकीं कित्येकांना मी स्वतः जाऊन भेटलों आणि कित्येकांचे अर्ज मीं फेंकून दिले. तथापि माझ्या दानशूरपणाचा उपयोग एकाहि ठिकाणीं झाला नाहीं. जेथें आंवळा देऊन कोहळा काढतां येईल, अशा जागा या लोकांस मिळाल्या होत्या आणि आतां त्या हातच्या गेलेल्या जागा पुन्हां मिळविण्यासाठीं ही धडपड होती. एकाला दिवाळ्यांत गेलेलें आपलें दुकान पुन्हां थाटण्या-

साठीं पांचशें रुपये हवे होते. दुसऱ्या एकाला गहाण पडलेलीं भांडीं सोडवावयाचीं होतीं. दुसऱ्या एकाची बाजाची पेटी गहाण पडली होती, ती सोडवून व गवयी बनून तो चरितार्थ चालविणार होता. 'तुला किती रक्कम पाहिजे ?' असें मीं विचारलें, तर निश्चित आंकडा मला कोणीच सांगेना. याच्याजवळून बराच पैसा उपटतां येण्यासारखा आहे, असा रंग दिसला, म्हणजे आपल्या मागण्याहि ते वाढवीत. एकंदर तात्पर्यार्थ इतकाच कीं, दरिद्र्यांना मदत करण्याचें कार्य नुसत्या पैशानें होणारें नाहीं, अशी माझी खात्री झाली. कदाचित् माझ्या मूर्खपणामुळेंहि असें झालें असेल आणि त्या लोकांशीं वागण्याची हातोटी मला न साधल्यामुळें असा विपरीत प्रकार घडला असेल; पण तें कसेंहि असलें तरी त्या वेळीं माझ्याकडून कोणासहि मदत झाली नाहीं, इतकें मात्र खरें.

आतां आमच्यांतील दानशूर कर्णांची मौज सांगावयाची आहे. या बाबतींतहि मला अगदीं अपरिचित आणि अनपेक्षित असे अनुभव आले. मदतीची यादी मीं फिरविली, तेव्हां कित्येकांनीं नक्की रकमेचे आंकडे घातले होते आणि कित्येकांनीं मोघम वचनें दिलीं होतीं; पण यांपैकीं एकानेंहि एक छदामहि मला दिला नाहीं. माझ्या यादीप्रमाणें पहातां पांच सहा हजार रुपये माझ्या हातीं यावयास पाहिजे होते; पण या रकमेपैकीं एक पैसुद्धां वसूल झाली नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपण आंकडा घातला आहे, ही गोष्टसुद्धां बहुतेक लोक विसरले होते. विद्यार्थीवर्गानें मात्र सरकारांतून मिळालेला आपला सारा मुशाहिरा माझ्या स्वाधीन केला होता. अशा रीतीनें हजारों हजार रुपये जमवून हजारों लोकांस दारिद्र्यांतून बाहेर काढण्याच्या माझ्या कार्याची इतिश्री झाली. अखेरीस हिशेब पहातां शेंपन्नास रुपये दहावीस लोकांना मीं वाटले, असें मला आढळून आलें. शेवटीं मास्कोच्या सार्वजनिक सभेनें माझ्या हातीं दिलेली पन्नास रुपयांची रक्कम मजजवळ बाकी उरली आणि तिचें काय करावें, हेंहि मला समजेना.

अशा रीतीनें आमच्या या परोपकाराची समाप्ति झाली. मला लवकर मास्को शहर सोडावयाचें असल्यामुळें जवळ असलेल्या रकमेची वाट

लावून टाकण्याकरितां त्या कंगालखान्यांत पुन्हां एकवार मी गेलों. या रकमेची वांटणी कशी करावी, याचो उलगडा पूर्वीपेक्षां या खेपेला कांहीं अधिक झाला होता, असें नाहीं. तेव्हां या कामीं तेथल्या कुंटणखान्याच्या मालकाची सल्ला मीं घेतली. तो दिवस उत्सवाचा असल्यामुळें सारीं माणसें खाऊन पिऊन मजेंत होतीं. आणि पुष्कळसे लोक दारू पिऊन मस्त झाले होते. आवाराच्या एका कोंपऱ्यांत एक अगदीं हाडकुळा मनुष्य रस्त्यांतून गोळा करून आणलेल्या पदार्थांची निवड करीत होता. याचें वय आतां सत्तर वर्षांचें झालें होतें. रस्त्यांत पडलेल्या चिंध्या व हाडकें गोळा करून आणि तीं विकून तो आपला उदरनिर्वाह करीत असे. या धंद्यांत आपल्याला चांगली कमाई होते, असें त्यानें मला सांगितलें. अगदीं भिकारी स्थितींत येथें कोण लोक रहातात, अशी चवकशी त्याजजवळ करतां तो म्हणाला; 'आळशी आणि दारुडे यांजशिवाय येथें उपाशीं मरणारे कोणीहि नाहीं.' पुढें बोलतां बोलतां मजजवळ पैसे असून ते मला वांटावयाचे आहेत, असें त्याला समजतांच माझ्यापाशीं त्यानें आणा-दोन आणे मागितले. हातीं पैसे पडतांच तो धांवतच दारूच्या दुकानाकडे गेला. मीहि तेथून निघून घराच्या मालकाकडे गेलों आणि अगदीं कंगाल स्थितींतलीं माणसें मला दाखविण्याविषयीं त्याची विनंति केली.

तेव्हां तो मजबरोबर आला आणि एकेक खबदाड तपासण्यास आम्ही सुरुवात केली. नाना प्रकारचे लोक आम्ही पाहिले. तथापि अमुक एक मनुष्य मदतीला खरोखरच पात्र आहे, असा निश्चय आम्हास करतां येईना. अखेरीस त्या मालकानें एका आंधळ्याचें नांव सुचविलें. तेथें जाऊन आम्ही पहातों तों ऐंशी वर्षांचा हा आंधळा दारूनें मस्त होऊन गडबडां लोळत होता आणि जवळ असलेल्या एका तरुण पोरीला इतक्या गलिच्छ शिव्या देत होता कीं, ते शब्द लिहून दाखविणें शक्य नाहीं. हा देखावा पाहून मी तेथून तडक बाहेर पडलों. त्या घराचा मालक स्वतः चांगल्या बुद्धीचा मनुष्य असल्यामुळें मदतीला खरोखरच पात्र असा इसम त्यालाहि दाखवितां येईना. कारण या उत्सवाच्या वेळीं यांपैकीं कोणाच्याहि हातांत पैसा पडला, तर तो दारूच्या दुकानांत गडप होणार, अशी

त्याची पक्की खात्री होती. पण मला माझ्या रकमेची वासलात कशी तरी लावणें अवश्य असल्यामुळें तो पैसा वांटून टाकून मी मोकळा झालों. पुढें त्याचा सदुपयोग झाला कीं काय झालें, हें फक्त परमेश्वरालाच ठाऊक.

माझ्या परोपकाराच्या मोहिमेची ही इत्थंभूत हकीकत आहे. पुढें मी लवकरच मास्को शहर सोडून आपल्या खेड्याला गेलों. त्या वेळीं या साऱ्या हकीकतीनें माझें चित्त अत्यंत उद्विग्न होऊन गेलें होतें. त्या वेळीं साऱ्या जगाचा राग मला आला होता; पण वास्तविक मूर्खपणा माझाच होता, असें मात्र त्या वेळीं मला वाटलें नाहीं. माझ्यांतील परोपकार-बुद्धीचा शेवट अशा रीतीनें झाला खरा; तथापि या साऱ्या हकीकतींत माझ्या चित्तांत जे नवे विचार उद्भवूं लागले होते, त्यांना खळ न पडतां, ते दुप्पट जोरानें वर येऊं लागले.

— १२ —

या साऱ्या हकीकतींचा अर्थ काय ?

मी खेड्यापाड्यांत राहिलों होतों. खेड्यापाड्यांतलें दारिद्र्य कसें असतें, याची पूर्ण माहिती मला होती. खेड्यांत रहात असतां मी गरिबांसाठीं कांहीं विशेष करीत असे, असें नाहीं. ही गोष्ट मी खोट्या विनयानें म्हणतों, असें समजूं नका. विनयाचा खोटा अविर्भाव करून त्याच्या खालीं खरा गर्व झांकावयाचा अशांतली ही गोष्ट नव्हे, तर पुढें जो कांहीं सिद्धांत मला सांगावयाचा आहे, तो वाचकांच्या गळीं पुरा उतरावा, एवढ्याच-साठीं ही खरी हकीकत प्रस्तावनेदाखल मी सांगत आहें. खेड्यांत रहात असतां मी फारसा परोपकार केला नाहीं; पण खेड्यांतल्या लोकांची मागणीच इतक्या बेताची असे कीं, ती पुरविण्यांत आपण कांहीं विशेष करीत आहों, अशी जाणीवच उत्पन्न होत नसे आणि अशा स्थितींत जी थोडीबहुत मदत माझ्या हातून होई, तिचा खरा उपयोग त्याला होऊन आम्हांमध्यें एकंदरीनें संतोष आणि परस्पर प्रेम यांचें बीज रुजत असे. यामुळें माझ्या खेड्यांत मी कोठेंहि हिंडलों, तरी माझ्या शांतीच्या वाता-वरणांत केव्हांहि बिघाड होत नसे. यामुळें माझा जीवनक्रम जरी चुकीचा

होता, तरी त्या चुकीची तीव्रता कमी होऊन मला संतुष्टवृत्तींत राहणें शक्य होतें. शहरांत रहावयास आल्यावर माझें असेंच चालेल, असा भरंवसा मला होता; पण तेथें दारिद्र्याचा जो प्रकार मला आढळला, तो अगदींच अननुभूत स्वरूपाचा होता. शहरांतील दारिद्र्य अधिक फसवेगिरीचें होतें; तथापि खेड्यांतील दारिद्र्याहून तें अधिक कष्टप्रद होतें, हेंहि खोटें नाहीं. दुसरें असें कीं, शहरांत एकाच ठिकाणीं किती तरी दरिद्री असल्यामुळें पाहणाराच्या दृष्टीला तो देखावा फार भयंकर दिसतो. मास्को येथील कंगालखाना दृष्टीस पडल्याबरोबर माझ्या जीवनक्रमाचा खोटेपणा माझ्या प्रत्ययाला ताबडतोब आला. मजवर घडलेला हा परिणाम फार तीव्र स्वरूपाचा होता. आपला चालू आयुष्यक्रम पार बदलून टाकला पाहिजे, असें मला मनःपूर्वक वाटूं लागलें खरें; तथापि असें स्थित्यंतर सहन करण्यास जें मनोबळ पाहिजे, तें मजपाशीं नव्हतें. माझ्या मनावर झालेल्या तीव्रपणापेक्षां माझ्या मनोदौर्बल्याची तीव्रता अधिक होती. आणि बाकीचें जग या दुर्बलतेला भर घालीत होतें. श्रीमंती आणि चैनीच्या वस्तू या ईश्वरी देणग्या असून त्यांचा उपयोग घेणें, आपणास अवश्य आहे, असा अजूबाजूचे लोक मला उपदेश करीत होते. जगाला आरंभ झाल्यापासून हाच उपदेश आम्हां मनुष्यांच्या कानावर आदळत आला आहे. यामुळें स्वतःची चैनबाजी कोणत्याहि प्रकारें कमी न करतां गरिबांस मदत करणें शक्य आहे, असें लोक मला सांगत. माझ्या मनाच्या कमकुवतपणामुळें हा उपदेश मला पटला. अशा रीतीनें गरिबांस मदत करण्याचा बेत मीं केला आणि मग याच हेतूनें श्रीमंतांकडे मदतीची याचना मीं केली. त्यांनींहि माझ्या हेतूशीं शाब्दिक सहानुकंपा दाखविली; तथापि एक तर कांहीं देण्याची त्यांची इच्छा नव्हती अथवा गरिबांना देण्यास त्यांजपाशीं कांहीं नसावें. अशा स्थितींत त्या कंगालखान्यांत मी गेलों आणि तेथें जो प्रकार मीं पाहिला, तो अगदींच अनपेक्षित होता. त्या खबदाडांत दोन प्रकारचे लोक मीं पाहिले. जे लोक हातांनीं काम करून पोट भरीत होते, त्यांच्या आंगीं दारिद्र्य सोसण्याचें वळण पडून गेलें होतें. केवळ दारिद्र्यामुळें त्यांचें मन दुर्बळ झालें आहे,

अथवा ते नीतिभ्रष्ट झाले आहेत, असें मला आढळून आलें नाहीं, केवळ स्वतःच्या कर्तबगारीवर आयुष्याचे भले बुरे दिवस न डममगतां सुखासमाधानानें काढण्यास जें विशिष्ट प्रतीचें मनोबल लागतें तें मजपेक्षां त्यांजपाशीं अधिक होतें. अशांना मदत करणें मला शक्य नव्हतें. दुसऱ्या प्रकारचे लोक मजसारखेच दुर्बळ. यामुळें त्यांना मदत करून न करून सारखेंच. मग असली मदत करून तरी काय फायदा? त्या लोकांचें खरें दुर्दैव हेंच कीं, मेहनत करण्याचें त्राण त्यांच्या मनाला नव्हतें. उद्योगशीलतेची इच्छाच त्यांना नव्हती. स्वतःची भाकरी मी स्वतः कमावीन असें म्हणण्याची धमक त्यांजवळ नसल्यानें काम करण्याची त्यांची संवय मोडून गेली होती. असल्या परोपजीवी लोकांना केलेल्या मदतीचें खरें चीज तें काय होणार? पैशाचा अभाव हेंच त्यांचें दुर्दैव नसून मजप्रमाणेंच मनोदौर्बल्य हें त्यांचें खरें अभागीपण होय.

कंगालखान्यांतील दारिद्र्याची मीमांसा अशा प्रकारची आहे. ज्या लोकांच्या मदतीसाठीं म्हणून मी धांवलों, ते लोक वस्तुतः मला अगदीं परके होते. त्यांच्यांत व माझ्यांत कोणत्याहि प्रकारची घसट कधींच नव्हती. किंबहुना माझ्या दृष्टीनें मला ते परदेशस्थ लोकांसारखे वाटत होते. आम्हा दोघांच्या आयुष्यक्रमांत जमीनअस्मानाचें अंतर. यामुळें त्यांच्यांत खरी उणीव कशाची आहे, हें मला समजणें जवळ जवळ अशक्य होते आणि याहून विशेष गोष्ट ही कीं, या लोकांचा यातनामय जीवनक्रम नुसत्या पैशानें बदलतां येण्यासारखा नव्हता, अशी माझी पुरी खात्री झाली. अशा प्रकारें चोहोंकडून निराशा झाल्यावर हें परोपकाराचें कार्य मीं आटोपतें घेतलें आणि मास्को शहराला राम राम ठोकला.

माझ्या कार्याला असें अपेश कां आलें, याचा खुलासा करावा या हेतूनें एक लेख लिहिण्याचा बेत मीं केला. या लेखाच्या द्वारें लोकांपुढें मोठीं बिनमोल तत्त्वें मी मांडीन अशी घमेंड मला होती. या लेखाला लागणारें साहित्य मजपाशीं भरपूर होतें; पण कांहीं केल्या माझें लिहिण्याचें काम सुरळीत चालेना. या साऱ्या आपत्तीचें मूळ बीज कोठें आहे; याचा उमज पडल्याशिवाय संगतवार लेख लिहिणें मला जमेना, यांत नवल

नाहीं. हें मूळबीज माझ्याच ठिकाणीं होतें, ही गोष्ट त्या वेळीं मला जाणवली नव्हती. यामुळें इ. स. १८८५–८६ सालपर्यंत हा लेख मला पुरा करतां आला नाहीं.

* * *

टॉलस्टॉय यांच्या या लेखाचा उल्लेख करण्यापूर्वी इ. स. १८८२ सालीं त्यांनीं लिहिलेल्या दुसऱ्या एका लेखांतील कांहीं उतारे या स्थळीं देणें अधिक सोयीचे होईल. धनी आणि चाकर यांच्यांतील परस्परसंबंधाविषयीं टॉलस्टॉय यांचीं मतें काय होतीं, हें या उताऱ्यांत वाचकांस दिसेल.

"आमच्या बटलराचा अथवा मुख्य नौकराच्या मदतीसाठीं म्हणून एका शेतकऱ्याला आमच्या घरीं आम्हीं ठेवलें होतें. पुढें आमच्या दुसऱ्या एका नौकराबरोबर त्याचा तंटा झाल्यामुळें आम्हीं त्याला काढून टाकलें. पुढें तो एका व्यापाऱ्याकडे नौकरीस राहिला आणि धन्याची मर्जी संपादून आतां तो सुंदर कपडे आणि तकतकीत बूट घालून हिंडतो. आमचा एक नौकर भयंकर दारुबाज होता. आपले अंगावरचे कपडे दारूबाजींत घालवून अखेरीस तो रस्त्यांत भटकूं लागला, आणि शेवटीं त्यानें कंगालखान्याची वाट धरली. आमचा आचारी शहरांत आल्यावर दारू पिण्यास शिकला आणि कायमचा भ्रमिष्ट झाला. खेड्यांत असतां जो मनुष्य पांच वर्षांत व्होडका दारूला शिवलाहि नव्हता, तोच शहरांत आल्यावर भयंकर दारूबाज बनला."

"याच सालीं आमच्या घरीं नौकरीस ठेवलेल्या एका शेतकऱ्याच्या पोरीची वाईट वर्तणूक आमच्या नजरेस आल्यामुळें तिला आम्हीं नौकरींतून कमी केलें. ती वेश्यांच्या संगतीस लागली, कुंटणखान्यांत गेली आणि वीस वर्षांची होण्यापूर्वीच उपदंशाच्या विकारानें इस्पितळांत मरण पावली."

"दारिद्र्याचें भेसूर स्वरूप पाहिल्याबरोबर आम्हीं या लोकांच्या मदतीसाठीं धांवाधांव करूं लागतों. पण आमच्या चैनीनें आणि बेताल आयुष्य-

क्रमानें हा रोग आम्हींच कसा उत्पन्न करतों, आणि याचा फैलाव आम्हींच कसा करतों, हें ज्याला पहावयाचें असेल, त्यानें गिरण्यांकडे आणि अशाच प्रकारच्या दुसऱ्या कारखान्यांकडे एकवार नजर फिरविली म्हणजे पुरे."

याच लेखांत टॉलस्टॉय पुढें म्हणतात,

"या लोकांना आमच्यासारख्याकडून मदत न होण्याचें आणखी एक कारण त्यांची लुच्चेगिरी हें होय. याबद्दल प्रथम मी त्यांना पुष्कळ दोष देत असें. दुसऱ्यांना दोष देण्याइतकें सोपें काम दुसरें नाहीं; पण या साऱ्या कोड्याचा उलगडा माझा शेतकरी मित्र सुटेप यानें केला, तेव्हां माझ्या अपेशाचें खरें कारण मला कळलें. या वेळीं माझ्या डोळ्यांवर आत्मप्रतिष्ठेची धुंदी विलक्षण चढलेली होती. एके दिवशीं मी माझ्या बहिणीच्या घरीं गेलों असतां सहजगत्या सुटेपहि तेथें आला. माझें परोपकाराचें कार्य कसें काय चाललें आहे, याची चवकशी माझी बहीण मजपाशीं करीत होती. आणि मीहि आपले सारे बेतबात तिजपाशीं सांगत होतों. अगदीं असहाय्य अशा स्थितींतला मनुष्य उभ्या मास्को शहरांत औषधासमुद्धां उरूं द्यावयाचा नाहीं, असे घमेंडीचे शब्द माझ्या तोंडून निघून गेले. पुढें आणखी कांहीं वेळ याच विषयावर आमचें संभाषण चालू होतें. मध्यें एक दोन खुर्च्या सोडून पलीकडे सुटेप बसला होता. आमचें भाषण चालू असतां तो मुकाट्यानें तें ऐकत होता. सुटेप हा सच्चा दिलाचा ख्रिस्तानुयायी आणि परोपकाराची खरी किंमत जाणणारा होता, हें मला ठाऊक असल्यामुळें माझें हें कार्य त्याच्या पसंतीस उतरेल, असा भरंवसा वाटून ती पसंती त्याच्या चेहऱ्यावर कितपत दिसते, हें पाहण्याकरतां मधून मधून मी त्याजकडे हळूच नजर फेंकीत होतों. बाह्यतः मी माझ्या बहिणीपाशीं बोलत होतों खरा; पण माझें सारें भाषण सुटेप याला उद्देशून मी बोलत होतों. मीं त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें तेव्हां माझ्या भाषणांतला एकादा शब्द तरी त्याच्या कानीं पडला कीं नाहीं, अशी शंका मला आली. तो आपल्याच विचारांत गुंग दिसला. त्याची दृष्टि अर्धोन्मीलित झाली होती. जणूं काय तो बाहेरच्या जगांत नसून अंतर्गत

दृष्टि न्याहाळून पहात होता. माझें सारें भाषण संपलें, तरी त्याच्या तोंडून चकार शब्दहि निघत नाहीं, असें पाहून त्याला हांक मारून मीं म्हटलें, ' हें माझे बेत तुमच्या पसंतीस कसे काय उतरतात ? '

' याचा काडीचाहि उपयोग होणार नाहीं.'

' कां ? '

' परोपकारी मंडळ्या निर्माण करून कितीहि खटपट तुम्हीं केली, तरी तिचा परिणाम शेवटीं शून्य. खऱ्या उपयोगाचें असें त्यांतून कांहींच निघावयाचें नाहीं.'

' पण असें का ? हजारों लोकांचें राहिलें; पण शें दोनशें लोकांना तरी अन्नदान आणि वस्त्रदान आम्हांस करतां येईल कीं नाहीं ? क्षुधिताला अन्न आणि नग्नाला वस्त्र द्या, हा ख्रिस्ताचा उपदेश तुम्हांला ठाऊक आहेच, मग त्याप्रमाणें वागणें वाईट आहे काय ? '

' हो हो. सारे उपदेश मला पुरते ठाऊक आहेत; पण तुमचा सारा मार्ग चुकलेला आहे. जें करावयाला हवें तें तुम्हीं मुळींच करीत नाहीं. ही काय मदत झाली ? तुम्हीं फिरावयास निघतां, वाटेत एक भिकारी तुम्हांला भेटतो, आणि त्यानें हात पसरल्यावर आणा दोन आणे त्याच्या हातावर तुम्हीं फेंकतां आणि तो चालता होतो. ही काय खरी मदत झाली ? त्याचें मन शुद्ध होत जाईल, अशी मदत त्याला तुम्हीं करा. देवाची आठवण त्याला होईल, असें तुम्हीं करा. मन तसेंच भिकारी ठेवून शरीर पोसणें, हा धर्म नव्हे आणि परोपकारहि नव्हे. तुमच्या मदतीचें खरें स्वरूप इतकेंच कीं, ती मनुष्यरूपी त्याज्य वस्तु आपणापासून तुम्हीं दूर ढकलतां. त्याची कटकट तुम्हांला सोसत नाहीं, म्हणून ती बंद करण्याचा हा एक उपाय तुम्हीं काढला आहे. यांत त्याचें बरें काय झालें ? '

' छे छे ! आमचा बेत असा नाहीं. या लोकांच्या खऱ्या गरजा शोधून काढून त्या नाहींशा करणें, हा आमचा उद्देश आहे. भिकाऱ्यांना पैसा आणि रिकामटेकड्यांना आम्हीं काम देणार आहों. आम्हांला त्यांचा आळस वाढवावयाचा नसून त्यांना उद्योगी बनवावयाचें आहे.'

'पण या लोकांची ओळख तुम्हांला नाहीं. तुमच्या या मार्गानें त्यांचें कांहींसुद्धां बरें होणार नाहीं.'

'मग तुमचें म्हणणें तरी काय? त्यांना अन्नवस्त्रावांचून आम्हीं तसेंच मरूं द्यावें काय ?'

"ते कां मरतील ! अशा स्थितींतले लोक तरी किती आहेत ?"

'पुष्कळ. पुष्कळ ! या एकट्या मास्को शहरांत अन्नवस्त्राशिवाय वीस हजार लोक रहातात, हें तुम्हाला ठाऊक आहे काय ? याशिवाय पिटर्सबर्ग वगैरे शहरें आहेतच.'

माझें भाषण ऐकून सुटेप नुसताच हंसला. मग थोड्या वेळानें तो म्हणाला, 'साऱ्या रशियांत आठ दहा लाख घरें असतील नव्हे ?'

'असलीं तर त्याचें काय ?'

'त्याचें काय ? अहो अगदीं सोपें काम आहे. या साऱ्यांना आपण वांटून घेऊं या. मी कांहीं श्रीमंत नाहीं; पण दोन माणसें मी सांभाळतों. तो कंगालखान्यांतला छोकरा तुम्ही बरोबर आणला होता ना ? त्याला मीं माझ्याबरोबर बोलावलें; पण तो बेटा नाहींच म्हणतो. असे वीस हजारच काय ? पण त्याच्या दसपट माणसांचीहि व्यवस्था आम्ही लावून टाकूं. मीं एक घेतला, तुम्हीं एक घेतला कीं झालें काम. आम्ही बरोबर काम करूं आणि बरोबरीनें पोटालाहि मिळवूं. आज त्याला कामाची माहिती नसली तर माझें काम पाहून चार दिवसांत तो तयार होईल. तो माझ्याबरोबर हिंडेल फिरेल आणि भजनहि करील. याचें नांव परोपकार. याचें नांव धर्म; पण तुमच्या त्या मंडळ्या आणि त्या संस्था यांना दुरूनच नमस्कार असो. त्यांच्या हातून कवडीचेंहि काम होणार नाहीं.'

त्या एकमार्गी शेतकऱ्याचें साधें आणि सरळ भाषण ऐकून मला मोठें नवल वाटलें. त्याचें म्हणणें अगदीं तथ्यपूर्ण होतें, हें मला स्पष्ट दिसून आलें. अव्यवहार्य असा एक शब्दहि त्यांत नव्हता.

खरेंच आहे. अगदीं उत्कृष्ट प्रतीचा आणि मोठा मोलवान् कोट अंगांत घालून स्वतःच्या घरची गाडी मी उडवीत जात असतां एकादा

भिकारी मला पहातो. या भिकाऱ्याच्या पायाला जोडाहि नसतो. दरमहा नुसत्या घरभाड्यादाखल तीन चार हजार रुपये मी भरतों, हेंहि कदाचित् त्याला ठाऊक असेल. मी पांचचार रुपये त्याच्या अंगावर फेंकतों, ही गोष्ट केवळ लहरीखातर मी करतों, हेंहि त्याला समजतें. माझ्याजवळ इतका पैसा फुकटचा पडलेला असतो कीं, त्यांतून पांचचार रुपये देणें मला जाणवतसुद्धां नाहीं, हेंहि त्याला समजत असतें. स्वतः श्रम केल्याशिवाय अनेक प्रकारच्या मार्गांनीं अनेक लोकांकडून हा पैसा सहजासहजीं मीं लुबाडलेला असतो, हेंहि त्याला पक्कें ठाऊक असतें. अशा स्थितींत असा पैसा मजजवळ असणें, हा शुद्ध अन्याय आहे, असें त्याला वाटल्यावांचून कसें राहील ? या पैशावर माझी मालकी कां आणि त्याची कां नाहीं, याचें समाधानकारक उत्तर त्याच्या डोक्यांत येत नाहीं, यांत नवल नाहीं. अशा स्थितींत माझ्याकडचा पैसा आपल्या खिशांत येईलसें करण्यांत कोणताहि मार्ग स्वीकारणें विहित आहे, असें त्याला वाटलें, तर त्यांत त्याची चूक कोणती ? तो माझ्याशीं थापबाजी करतो, मला मोकळेपणीं उत्तरें देत नाहीं आणि प्रसंगीं मला भेटण्यालाहि तो टाळाटाळी करतो, अशी माझी तक्रार आहे; पण या तक्रारीला तरी खरी जागा आहे काय ? त्याच्या घरीं मी गेलों तर त्याच्या खाटेवर बसण्याला मी भितों. तिच्यांतल्या पिसा माझ्या कपड्यांत शिरतील अथवा अनेक रोगजंतु मला पछाडतील अशी भीति माझ्या पोटांत उठते. म्हणून त्याच्याकडे मी जात नाहीं. आणि मजकडे त्यालाहि येऊं देत नाहीं. तो क्षुधार्त होऊन आम्हासारख्याकडे आला, तर त्याचें मोठें भाग्य! अशा स्थितींत त्याच्याचबद्दल उलट मीं तक्रार करावी, हा न्याय कोठचा ? ”

संपत्तीची विषम वांटणी, हा प्रश्न साऱ्या युरोपालाच अलीकडे कित्येक वर्षें जड होऊन बसला आहे. लक्षावधि लोक उपाशीं मरतात आणि मूठभर लोकांच्या हातांत स्थावरजंगम संपत्तीचा सर्व भाग एकवटतो, याला उपाय काय करावा ? याचें सर्वांस पटण्यासारखें उत्तर अद्यापीहि कोणीं दिलें नाहीं. या प्रश्नाचें उत्तर सांपडण्यासाठीं टॉलस्टॉय यांनीं कोणती खटपट केली आणि तींत त्यांस पुरें अपेश कसें आलें, याचा

इतिहास येथें संपला. या खटपटींत त्यांना पुरें अपेश आलें ही गोष्ट खरी, तथापि या खटपटीमुळेंच त्यांना कांहीं नवे अनुभव प्राप्त झाले, आणि त्या अनुभवांचा उपयोग त्यांनीं पुढें करून घेतला. या वेळीं आलेल्या अनुभवांमुळेंच या विषयाकडे त्यांचें चित्त पुरें वेधलें व या अनुभवांमुळेंच 'आपण काय केलें पाहिजे' हा सुंदर ग्रंथ त्यांच्या लेखणींतून उतरला. सांप्रतची युरोपीय समाजघटना इतकी चुकीची आहे कीं, तिचे परिणाम आतां अगदीं असह्य होऊं लागले असून ती अगदीं बदलून न टाकतां आपण हात जोडून स्वस्थ बसलों तर ही स्थिति पुढें कोणत्या थराला जाईल, याचा नियम नाहीं, हें या ग्रंथाच्या द्वारें टॉलस्टॉय यांनीं सर्वांच्या प्रत्ययास चोख आणून दिलें आहे.

टॉलस्टॉय यांचा स्वभाव बराचसा उतावळा असल्यामुळें मागचा पुढचा विचार न करतां हा दारिद्र्याचा प्रश्न प्रत्यक्ष सोडविण्याकरतां ते खटपट करूं लागले; परंतु पूर्वानुभवाच्या अभावीं त्यांत त्यांना अपेश आलें; पुढें हा उद्योग त्यांनीं हातचा सोडला व सामान्य उपदेशाचा मार्ग स्वीकारला. या उपदेशांत सामान्यतः तीन चार मुद्दे होते. लोकांनीं अंगमेहनतीनें पोट भरावें, चैनीचा त्याग करावा, आहाराबाहेर खर्च करूं नये, स्थावर मिळकत मिळविण्यासाठीं धडपडूं नये, हातीं असलेली मिळकतहि आपणाकडेच रहावी, असा हट्ट धरूं नये आणि जें सरकार केवळ लोकांवर जुलूम करण्यासाठीं निर्माण झालेलें आहे, तें सुरळीत चालण्याच्या कामास मदत करूं नये. इतके मुद्दे त्यांच्या विवेचनांत होते. केवळ अर्थशास्त्राच्या दृष्टीनें या प्रश्नांचा विचार त्यांनीं कधींच केला नाहीं. भणंगभिकाऱ्यांना पैशाची जरूर नसून उद्योगीपणाकडे त्यांचीं मनें वळतील असें करणें, हेंच अत्यंत जरूरीचें आहे, असें त्यांचें मत या अनुभवामुळें निश्चित बनलें. या प्रश्नांची पहाणी करण्याकरतां रशियन सरकारहि केव्हां केव्हां कमिशनें नेमून खटपट करी; पण अशा प्रकारच्या सरकारी अथवा खाजगी प्रयत्नाला टॉलस्टॉय यांजकडून यानंतर केव्हांहि मदत मिळाली नाहीं. अशाच प्रकारच्या एका सरकारी कमिशनाचा रिपोर्ट १९०९ सालीं प्रसिद्ध झाल्याचें टॉलस्टॉय यांनीं ऐकलें, तेव्हां आपल्या एका स्नेह्याजवळ ते

म्हणाले, 'या भिकाऱ्यांना मदत करावी, असें तुम्हालाहि ज्या अर्थी आतां इतकें जाणवूं लागलें आहे, त्या अर्थी तुम्ही त्यांना आधींच पुरें लुबाडून टाकलें असलें पाहिजे.' अशा प्रकारच्या कोणत्याहि प्रयत्नावर त्यांचा विश्वास मुळींच नसे. त्यांतून सरकारी प्रयत्न म्हटला कीं, त्यांचें पित्त अधिकच भडके. अशा प्रकारच्या गोष्टी निव्वळ खाजगी स्वरूपाच्या असल्यामुळें त्यांत सरकारनें हात घातलेला त्यांस खपत नसे. असल्या प्रकारच्या प्रयत्नामुळें लोकांची मानसिक अवस्था सुधारण्याचा यत्न अगदींच मागें पडतो आणि यामुळें खरी सामाजिक सुधारणा न होतां, लोकांची मनःप्रवृत्ति पूर्वीसारखीच कायम रहाते, किंवा अधिक बिघडतहि जाते, असें त्यांचें मत होतें.

या एकंदर खटपटींत टॉलस्टॉय यांना अपेश आलें, ही गोष्ट खरी आणि त्यामुळें त्यांचीं जीं मतें बनलीं तीं सर्वांस सारखीं ग्राह्य होतील असेंहि नाहीं; तथापि या बाबतींत त्यांनीं जी जनसेवा केली, ती व जे दोन मुद्दे लोकांपुढें स्पष्टपणें आणले, ते मुद्दे उपेक्षणीय नाहींत. या प्रश्नाची मांडणी त्यांनीं इतक्या स्पष्ट रीतीनें केली आहे कीं, या प्रश्नाची माहिती आपणास नाहीं, असें म्हणण्याचें धाडस कोणाहि विचारवंतास होणार नाहीं. दुसरें असें कीं, या चर्चेनें पुष्कळाच्या ठिकाणीं त्यांनीं विचारजागृति केली. याविषयीं आपल्या हातून होईल ती खटपट करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें पुष्कळांस वाटूं लागलें.

हा प्रश्न केवळ अर्थशास्त्राचा नसून त्याचा प्रत्यक्ष संबंध मनुष्याच्या दानतीशीं व मानसिक स्थितीशीं असल्यामुळें हा प्रश्न वस्तुतः धर्मविषयक आहे, हेंच टॉलस्टॉय यांचें म्हणणें सर्वांशीं खरें आहे. अशा प्रकारची परिस्थिति समाजांत असणें हें आपणास लांछन आहे, ही जाणीव साऱ्या समाजांत निर्माण झाल्याशिवाय कितीहि फंड तुम्हीं जमविले अथवा रेखीव नियमबद्ध मंडळ्या कितीहि स्थापिल्या तरी तेवढ्यानें हा प्रश्न कधींहि कायमचा सुटावयाचा नाहीं. अशा प्रकारची मनोभूमिका लोकांत निर्माण करण्यास अर्थशास्त्राचे सिद्धांत उपयोगी पडावयाचे नाहींत, तर परसेवा करणें, हेंच वस्तुतः आपल्या खऱ्या फायद्याचें आहे, आणि यानेंच

आपलें आत्मिक कल्याण होणार आहे, हें तत्त्व लोकांच्या मनावर दीर्घकाळ ठसवीत राहिलें पाहिजे.

या उद्योगांत टॉलस्टॉय यांस अपेश आलें, तरी समाजाकरतां आपण कांहीं तरी करणें हें आपलें कर्तव्य आहे, अशी जाणीव पुष्कळांच्या ठिकाणीं त्यांनीं उत्पन्न केली. रशियन धर्मपंथाचे बाह्य आचार व विधि जे लोक पूर्णपणें पाळतात व तेवढ्यानें आपलीं धार्मिक कर्तव्यें संपलीं असें समजतात, अशा लोकांपैकींहि पुष्कळांच्या ठिकाणीं ही नवी जागृति टॉलस्टॉय यांनीं उत्पन्न केली. जी गोष्ट धर्माच्या प्रवचनकारांना कधींहि साध्य झाली नसती, ती टॉलस्टॉय यांनीं सिद्ध करून दाखविली. या कामाकरितां अनेक मंडळ्या स्थापन झाल्या, हेंच टॉलस्टॉय यांच्या कार्याचें दृश्यफळ होय. आतां असल्या प्रकारच्या मंडळ्यांकडून खरा कार्यभाग किती होईल, ही गोष्ट वेगळी आणि असा कार्यभाग होणार नाहीं, असें खुद्द टॉलस्टॉय यांचें मत होतें, हेंहि खरें; तथापि गाढ झोंपेंत घोरत पडलेल्या समाजाला त्यांनीं जागें केलें, आपलें कर्तव्य काय आहे, याची जाणीव उत्पन्न करून दिली आणि कार्याची खरी दिशा कोणती, हेंहि दाखवून दिलें; एवढें कार्य कमी महत्त्वाचें आहे, असें नाहीं.

आतां अशा प्रकारचे सार्वजनिक हिताचे प्रश्न सरकारनें हातीं घ्यावे कीं नाहीं, या मुद्यावर बराच मतभेद असण्याचा संभव आहे. या बाबतींत सरकारनें ढवळाढवळ मुळींच करूं नये असें टॉलस्टॉय यांचें मत होतें; पण या कार्याचें क्षेत्र इतकें विस्तृत आहे कीं, हा प्रश्न कायमचा तडीस लावण्याचें कार्य एकट्या दुकट्या व्यक्तीच्यानें अथवा लहानसहान मंडळ्यांनीं होईलसें दिसत नाहीं. याकरतां येथें सरकारी मदत अवश्य पाहिजे असें म्हणणें भाग पडतें. तथापि सरकारचें काम बरोबर चालतें कीं नाहीं, हें पहाण्यास व तें तसें चालत नसेल, तर सरकाराकडून तें करविण्यास तितकें जोरदार लोकमत तयार होणें हेंहि अवश्य आहे. आणि असें मत तयार होण्यास जी मूळ जाणीव समाजांत असावी लागते, ती टॉलस्टॉय यांनीं उत्पन्न केली.

## प्रकरण चवथें.

# त्यागाची पूर्व तयारी.

तिसरा आलेक्झांडर बादशहा गादीवर आल्यापासून तों इ० स० १८८०-८५ सालापर्यंत रशियाची स्थिति सर्व बाजूंनीं निराशाजनक झाली होती. राजकीय, सामाजिक, धार्मिक यांपैकीं कोणत्याहि बाबतींत स्वातंत्र्याचा मागमूसहि न उरल्यामुळें पूर्ण मुस्कटदाबी होऊन रशियन राष्ट्र-पुरुषाचा श्वासहि बंद होतो कीं काय, अशी भीति पुष्कळांस वाटूं लागली. अशा स्थितींत रशियांत स्वातंत्र्याचें व संस्कृतीचें पाऊल पुढें न पडतां त्याची पीछेहाट व्हावी, यांत नवल नाहीं. मनोविकासाचा मार्ग पूर्ण बंद झाल्यानंतर तेथें असे परिणाम घडावेत हें अगदीं स्वाभाविक आहे. या बादशहाच्या कारकीर्दींत सार्वजनिक सभांना बंदी झाली होती. वर्तमान-पत्रांना कांटेरी लगाम घातली होती, राजकीय अथवा धार्मिक बाबींत सामान्य चर्चा कोणीं केली, तर ती सुद्धां रशियन सरकारला खपत नसे. आपल्या एकंदर प्रजाजनांत रशियन सरकारनें दोन भाग कल्पिले होते. आपल्या दंडुकेशाहीची तळी उचलणारा आणि ती आहे तशीच कायम रहावी यासाठीं ति । प्रत्यक्ष मदत करणारा तो सत्पक्ष. आणि या सत्पक्षा-खेरीज बाकीचा उरलेला सारा प्रजाभाग-असत्पक्ष. असत्पक्ष याचा अर्थ सरकारला धोका आणणारा पक्ष—सरकारला उलथून पाडणारा पक्ष—अर्थात् या पक्षांतील लोकांचा छळ करणें हें कायदेशीर ठरलें होतें. आणि ज्या अर्थीं या असत्पक्षांत संख्या मोठी होती, त्या अर्थीं इतक्या लोकांवर नजर ठेवण्याकरितां पुष्कळ हेर लागावेत, हेंहि न्याय्य म्हटलें पाहिजे. यामुळें या बादशहाच्या आमदानींत हेरखात्याला विलक्षण तेजीचे दिवस आले. आपला जुना धर्म नको म्हणणारा अथवा चालू राज्यपद्धतींत लोकमाताला मान मिळावा असें म्हणणारा प्रत्येक मनुष्य कायद्यानें गुन्हेगार ठरूं लागला व त्याला प्रत्यक्ष गुन्हेगार समजून हें हेरखातें त्याची वाटहि लावूं लागलें.

अशा रीतीनें सारें वातावरण कोंदट व विषारी झालें असतां टॉलस्टॉय यांच्या स्पष्ट, जोरदार आणि निर्दय शब्दांनीं ताजा वारा रशियांत खेळूं लागला. अशा प्रकारच्या ताज्या व आरोग्यकारक हवेच्या अभावीं जे लोक मृतप्राय होऊन पडले होते, त्यांच्यांत नवा जीव भरून ते हिंडूं फिरूं लागले. पुष्कळांची विवेकबुद्धि जागृत झाली. अशा प्रकारच्या शुद्ध सामाजिक विषयांच्या चर्चेलाहि त्या काळीं बंदी झाली होती; तथापि त्या बंदीला न जुमानतां टॉलस्टॉय यांनीं या विषयांचा उहापोह सुरु केला व आपली बाजू निर्भिडपणें लोकांपुढें मांडली. वास्तविक पाहतां अशा प्रकारच्या विषयांची चर्चा समाजाला अत्यावश्यक आहे. अशा प्रकारची चर्चा नसणें, हें मृतसमाजाचें लक्षण होय; पण ही गोष्ट लक्षांत न घेतां आम्ही म्हणूं तें प्रमाण या मार्गानें जाणाऱ्या त्या वेळच्या रशियन सरकारनें अशा चर्चेलाहि बंदी केली होती. आम्ही करूं त्या कायद्याला प्रजेनें निमूटपणें मान वांकविलीच पाहिजे, असा हट्ट रशियन सरकारच्या अंगीं होता; पण आपल्या विवेकबुद्धीवांचून दुसऱ्या कोणत्याहि बाह्य शक्तीचा अधिकार मानावयाचा नाहीं, व तिजपुढें मान वांकवावयाची नाहीं, असा टॉलस्टॉय यांचा कृतनिश्चय होता आणि या बाबींतहि ते प्रत्यक्ष तसे वागले. कोझ्याक स्वार आणि पोलिसची फौज यांजवर सरकारचा सारा भरंवसा. आणि टॉलस्टॉय तर अशा प्रकारच्या जुलमाचे कट्टे द्वेष्टे. अमेरिकेंत गुलामगिरीची पद्धती नष्ट होण्यापूर्वी तेथें असाच पक्षभेद निर्माण झाला होता. एका मनुष्यानें आपल्या दुसऱ्या बांधवाला गुलाम करून जनावरासारखें वागविणें, हें माणुसकीला लांछन आहे, असें म्हणणारा विवेकबुद्धीचा पक्ष व्यूइलियम ग्यारिसन यांनीं तेथें निर्माण केला होता. चालू परंपरेच्या आड लपणाऱ्या सरकारचें पाठबळ या पक्षाला नव्हतें. स्वार्थी जनतेचें पाठबळ त्याला नव्हतें. आतां धर्माचें पाठबळ त्याला मिळणें योग्य होतें; पण धर्माधिकारी म्हणविणारा आचार्यवर्ग सरकारच्या व जनतेच्या ओंजळीनें पाणी पिणारा असल्यामुळें त्यानेंहि रामायस्वस्ति रावणायस्वस्ति असा मार्ग स्वीकारला होता. अशा प्रकारच्या पूर्ण नैराश्य स्थितींत ग्यारिसन पक्षाचा उदय झाला. या पक्षाच्या हातीं

तरवार नव्हती आणि बंदुकहि नव्हती; पण विवेकबुद्धीचा सांठा त्यांच्या-पाशीं भरपूर होता. उलट बाजूचा पक्ष सरकारी मोर्च्यांच्या आश्रयानें सुरक्षित जागीं बसलेला होता. अखेरीस ग्यारिसन यांच्या उच्च घोषानें बाहेर पडलेल्या विवेक वाणीला यश येऊन प्रतिपक्षाचा पूर्ण पाडाव झाला. ग्यारिसन यांनीं गुलामगिरीला मूठमाती दिली. जवळ जवळ अशाच प्रकारच्या परिस्थितींत, अशाच प्रकारचें एक कार्य टॉलस्टॉय यांच्या माथीं आलें. 'रेड्याला पांच शेर दूध' म्हणण्याचा हक्क खुद्द परमेश्वरानें आपणांस दिला आहे, असें बादशहाचें म्हणणें होतें आणि जुना रशियन धर्मपंथ बादशहांच्या म्हणण्याला दुजोरा देत होता. बादशहाच्या तोंडून पडलेलीं मुक्ताफळें म्हणजे अस्सल पाणीदार मात्यें होत, असें सामान्य लोकांच्या मनांत ठसविण्याचा उद्योग धर्माधिकाऱ्यांनीं स्वीकारला होता. अशा रीतीनें धर्म आणि राजदंड अशीं प्रचंड शस्त्रें विरुद्ध पक्षाला असतां आणि सामान्य जनता उदासीन असतांहि टॉलस्टॉय यांनीं आपल्या प्रतिपक्षाला ग्यारिसनप्रमाणें अगदीं धुळीस मिळविलें नसलें, तरी त्याजवर प्रचंड वज्रप्रहार करून त्याला जबर जखमा केल्या आणि त्याला कायमचें पंगू करून टाकलें हें निर्विवाद आहे.

मास्को येथें राहण्याचा अतिशय कंटाळा आल्यामुळें आपल्या बायकामुलांना तेथेंच सोडून टॉलस्टॉय यासनाया तेथें आले; ही हकीकत गेल्या प्रकारणांत आलीच आहे. मास्को येथें अगदीं विथरून गेलेलें आपलें मन आपल्या खेडेगांवीं पुन्हां ताळ्यावर येईल असें टॉलस्टॉय यांस वाटलें. यासनायाहून पुढील पत्र त्यांनीं आपल्या पत्नीला लिहिलें आहे.

"येथच्या शांततेच्या राहणींत माझें मन जितकें संतुष्ट राहतें, तितकें दुसऱ्या कोठेंहि तें राहणें शक्य नाहीं, असा माझा समज आहे. तूं स्वतः संसाराच्या मानगर्डींत चूर होऊन गेलेली असतेस, यामुळें खेडेगांवांतली आणि शहरांतली राहणी यांतील भेद तुला जाणवत नाहीं. खेड्यांत काय अथवा शहरांत काय, तुझ्या भोंवतीचा प्रपंच एकच असल्यामुळें बाहेरच्या दुष्टावांतील फरक तुला जाणवत नाहीं हें ठीकच आहे."

"तथापि या विषयाची चर्चा पत्रांतून करण्याचें कारण नाहीं. कारण

यासंबंधीं एक ग्रंथ लिहिण्याचें काम मीं आतां हातीं घेतलें आहे, आणि माझ्या हातून तें पुरें झालें, तर माझे समग्र विचार तुला त्यांत अधिक स्पष्टपणें पहावयास सांपडतील. माझ्यासारख्या विचारवंत मनुष्याला शहरांतील राहणी, हें एक मोठें धोक्याचें ठिकाण आहे. तें असें कीं, तेथें खोटे विचार सदोदित कानांवर आदळत असतात. असें झालें म्हणजे माझ्यासारख्याला दोन मार्ग मोकळे असतात. या खोट्या विचारांपाशीं भांडून त्यांचा पाडाव करणें, हा एक मार्ग अथवा वादाच्या भरीस न पडतां त्यांना मूकसंमति देणें, हा दुसरा मार्ग. पहिल्यापेक्षांहि दुसरा मार्ग अधिक भयंकर आहे. शुद्ध मूर्खपणाच्या आणि भ्रामक कोट्यांना उत्तरें देणें म्हणजे काळाचा शुद्ध अपव्यय करणें होय. कारण अशा प्रकारचा शुष्कवाद म्हणजे नुसतें एरंडाचें गुऱ्हाळ होय. बरें, इतकेंहि करून त्याचा शेवट कधीं लागेल, असेंहि नाहीं. कारण जगांत खोट्या आणि भ्रामक गोष्टींचा नेहमींच सुकाळ असतो. मग इतर्यांचा नाश कोणाच्यानें करविणार ? दुसरें असें कीं, मनुष्य एकदां या वादविवादाच्या भरीस पडला कीं, त्या जाळ्यांत त्याचे पाय पक्के गुंततात. त्यांतून बाहेर पडणें, त्याला अशक्य होतें. आणि अखेरीस वादविवाद करणें हेंच आपलें कर्तव्य आहे, असें त्याला वाटतें. अशा रीतीनें त्याचें बिनमोल आयुष्य अर्थशून्य होऊन बसतें. याकरतां वादविवादाच्या भरीस न पडतां केवळ स्वतःपुरती खऱ्या खोट्याची निवड ज्याची त्यानें करून घ्यावी. आणि ही निवड करतांना वादाचा शब्दहि उपस्थित न होईल अशी तजवीज ठेवावी; पण हें करावयाचें म्हटलें, म्हणजे त्याला शांतता आणि एकांतवास यांची जरूर आहे. प्रत्येकाला मनुष्यांशीं संघटन असणें अत्यावश्यक आहे, हेंहि मला माहीत आहे. एका दृष्टीनें पाहतां मास्कोंतील माझें तीन महिने राहणें अगदींच फुकट गेलें असेंहि नाहीं. याभुळें पुष्कळ गोष्टींचें ज्ञान मला झालें. सामान्य लोकांची रहाटी मला अधिक समजली. याशिवाय ऑर्लाफ, सूटेफ वगैरेंची जोड मिळाली ती वेगळीच. फार काय; पण ज्या खालच्या समाजाला आम्हीं दुरून पाहूनच त्याला नांवें ठेवीत असतों, त्या समाजानेंहि पुष्कळ ज्ञान मला

दिलें. आणि आतां या साऱ्या वस्तूंची निवडानिवड करून त्याचें वर्गीकरण मी करीत आहें. खानेसुमारी, आणि सुटेप या दोघांनीं मला पुष्कळ गोष्टी शिकविल्या. असो. माझ्याबद्दल काळजी करूं नये. कोणीहि मनुष्य कोणत्याहि ठिकाणीं आणि केव्हांहि अजारी पडेल. कारण, रोग शहरांत असतात आणि खेड्यांत नसतात, असें थोडेंच आहे. तथापि सध्यां तरी येथें मी सर्वोत्कृष्ट परिस्थितींत आहें."

इ० स० १८८२ च्या फेब्रुवारी महिन्यांत टॉलस्टॉय मास्को येथें पुन्हां परत आले; पण या खेपेला त्यांचा मुक्काम तेथें अगदींच थोडा होता. येथें राहण्याचा त्यांना लवकरच कंटाळा आला आणि त्यांत बायकोशींहि त्यांची कांहीं कुरबूर झाली. तेव्हां ते ताबडतोब यासनायाला आले. तेथून लिहिलेल्या पत्राला त्यांच्या पत्नीकडून पुढील उत्तर आलें. "मी सकाळीं जागी होऊन पाहत्यें तों आपलें पत्र पुढें पडलेलें. तें वाचून मला अत्यंत खेद झाला आणि जीव अगदीं उदास होऊन गेला. आजार वाढत्या प्रमाणावर आहे असें या पत्रावरून मला वाटतें. सर्व बाजूंनीं सुखांत पडलेला एखादा मनुष्य जगाचा उगीच तिटकारा करूं लागला, तर त्याला काय म्हणावें ? ऐहिक जीवितांत नुसता वाईट भाग तेवढाच दिसणें आणि चांगल्याकडे नजरहि न पोंहोचणें हें आजाराचेंच चिन्ह समजलें पाहिजे. आपण कांहीं तरी औषधपाणी केलें पाहिजे. आपल्या पत्रांतील भावार्थ वाचून मला किती दुःख झालें हें लिहितां येत नाहीं. माझी विनंति ध्यानीं घ्यावी आणि संतापून न जातां आपल्या मानसिक स्थितीचा विचार करावा. असें आपण केलें, तर या संकटांतून बाहेर पडण्याचा मार्ग आपणच कदाचित् शोधून काढाल."

"अशा प्रकारची उदासीनता पुष्कळ वर्षांपूर्वीं आपणास केव्हां केव्हां पछाडीत असे. आत्महत्या करावी, असें सुद्धां त्या वेळीं केव्हां केव्हां आपल्या मनांत येई; पण आतां असें कां व्हावें ? आपले धर्मविचार आतां परिपक्क झाले आहेत; मग आपण असंतुष्ट कां रहावें ? भुकेले, आजारी, दुःखी, कष्टी आणि दुष्ट लोक जगांत राहतात, ही गोष्ट आपणास पूर्वींच ठाऊक नव्हती काय ? ही स्थिति आज नव्यानेंच पाहिली असें

नाहीं. आपल्या दृष्टीची दिशा आपण थोडीशी बदलली, तर आनंदी, सुदृढ, सुखी आणि सद्वृत माणसेंहि जगांत आपणास पुष्कळ आढळतील. परमेश्वरानें आपणास आयुरारोग्य द्यावें, अशी प्रार्थना करण्यावांचून मी अधिक काय करूं ! ”

यासनाया येथील एकांतांत टॉलस्टॉय यांचें मन पुन्हां ताळ्यावर आलें आणि पुढें थोड्याच दिवसांनीं पुढील पत्र त्यांनीं आपल्या पत्नीला लिहिलें.

“ तुझें पत्र वाचून मला फार आनंद झाला. माझ्याबद्दल इतकी काळजी करीत बसूं नये. तुझ्या वागणुकीनें माझें मन बिघडलें असें मनांत सुद्धां आणूं नये. क्षमा ही अत्यंत उपकारकारक भावना आहे. ज्याच्या मनांत तिचा वास आहे, त्याला कशाचेंहि भय वाटत नाहीं. तुझ्याप्रमाणेच मीहि आपल्या हृदयांत क्षमा ठेवितों. अशी अवस्था कशानें झाली, हें खरोखर मला स्वतःलाहि सांगतां येत नाहीं. हा परिणाम कदाचित् उतार वयाचा असेल अथवा वाईट प्रकृतीचा असेल. तथापि कशाबद्दलहि मी तकरार करीत नाहीं. मास्कोच्या राहणीनें मला पुष्कळ गोष्टी शिकविल्या. योग्य कर्तव्याची जाणीव माझ्या ठिकाणीं उत्पन्न केली, आणि माझ्या कर्तव्याची दिशा त्यानें मला दाखविली. माझ्या अंगांत कांहीं कर्तबगारी अथवा कांहीं त्राण उरलें असेल, तर त्याचा उपयोग कोणत्या दिशेनें करावा, हें मास्कोनें मला शिकविलें. याशिवाय मास्कोचा विशेष उपकार हा कीं, तुमची आमची मैत्री अधिक दृढ झाली.”

“तुमचीं आमचीं सोंगं आतां बदलतात कीं काय, अशी भीति मला वाटली. इतके दिवस अजाऱ्याची बतावणी मजकडे होती. ती आतां तुमच्याकडे जाऊन तुमचें सुदृढपणाचें आणि सुखासीनतेचें सोंग मजकडे येईल कीं काय, असें मला वाटूं लागलें आहे. तुझ्या प्रेमाशिवाय मला दुसऱ्या कशाची अपेक्षा असणार ! माझा एकांतवास मला अवश्यकच होता. त्यानें पुन्हां मला ताजेंतवानें केलें आहे आणि तुझ्या प्रेममय शब्दांनीं माझें अंतःकरण उल्हसित झालें आहे.”

यानंतर टॉलस्टॉय लवकरच मास्को येथें गेले असतां निकोलस गे या

नांवाच्या एका प्रख्यात चित्रकाराशीं त्यांची ओळख झाली आणि पुढें या ओळखीचें रूपांतर लवकरच दाट मैत्रींत झालें. या चित्रकाराच्या संगतींत असतां टॉलस्टॉय यांचा काळ फार सुखाचा गेला आणि त्यांची धर्मबुद्धिहि वाढीला लागली. हा चित्रकार स्वतः धार्मिकबुद्धीचा होता. चित्राचा धंदा सोडून देऊन मध्य रशियाच्या एका खेड्याच्या एकांतांत तो रहात असे. त्यानें प्रसिद्ध केलेल्या आठवणींत पुढील मजकूर आहे.

'मास्कोची खानेसुमारी' या नांवाचा टॉलस्टॉय यांनीं लिहिलेला ग्रंथ इ० स० १८८२ सालीं माझ्या हातीं पडला. या लेखांत मला स्वतःला अत्यंत उपकारक असा उपदेश मिळाला. या लेखांत पुढील वाक्य मला आढळलें. 'खालच्या वर्गाबद्दल आमच्या मनांत प्रेमबुद्धीचा पूर्ण अभाव असणें हेंच त्या वर्गाच्या दुर्दशेचें खरें कारण आहे.'

"एखाद्या वाळलेल्या गवताच्या पुंजक्यावर ठिणगी पडावी, तसें मला झालें. या वाक्यांत माझ्या धुमसत असलेल्या हृदयांत ज्वाला पेटविली. मास्को येथें जाऊन या सत्पुरुषाचें दर्शन घेऊन त्याला मिठी मारावी आणि त्याच्या कार्याला स्वतःला वाहून घ्यावें, असें माझ्या मनानें घेतलें."

"मी मास्कोला आलों. चित्राचें कापड आणि रंग खरेदी करून टॉलस्टॉय यांच्या घरीं मी गेलों. डोळे भरून त्यांना मीं पाहिलें. त्यांना आलिंगन दिलें आणि म्हटलें, 'लियो, तुम्ही म्हणाल तें करण्यासाठीं मी आलों आहें. तुमच्या मुलीचें चित्र काढूं?' ते म्हणाले, 'नको, नको. तुम्हांला चित्र काढावयाचेंच असेल, तर माझ्या पत्नीचें काढा.' मीं त्याप्रमाणें चित्र काढलें. त्या क्षणापासून माझ्या हृदयाचा सखा मला भेटला अशी माझी खात्री झाली. लियोच्या ठिकाणीं माझी पुरी भक्ति बसली. त्यांनींच मला आंधारांतून उजेडांत आणलें. मी साऱ्या आयुष्यभर कशाचा शोध करीत होतों, हें माझें मलाच ठाऊक नव्हतें. तें माझें अज्ञात ध्येय त्यांनीं मला दाखवून दिलें. आम्ही दोघेहि समहृदयी आहों, अशी माझी खात्री झाली. यानंतर एक महिनापर्यंत लियो यांच्या दर्शनास मी रोज जात होतों."

टॉलस्टॉय आणि गे या दोघांत बऱ्याच अंशीं गुणसाम्य होतें. या

दोघांची जी मैत्री इ० स० १८८२ सालीं जुळली, ती इ० स० १८९४ पर्यंत म्हणजे गेच्या मृत्यूपर्यंत अगदीं अबाधित राहिली. हे दोघेहि साधारण समवयस्क होते. प्रत्येकानें आपापल्यापरी महत्कार्यें केलीं होतीं. कीर्तीची जोड दोघांनींहि मिळविली होती. केवळ पैसा अथवा कीर्ति मिळविल्यानेंच मानवी जीविताचें साफल्य होत नाहीं, ही जाणीवहि दोघांच्या ठिकाणीं सारखी उत्पन्न होऊन खरें साफल्य कशांत आहे, हें शोधण्याच्या मार्गाला दोघेहि लागले होते. सत्य वस्तूच्या शोधार्थ निघालेल्या या दोन वाटसरूंस सारखींच संकटें भोगावीं लागलीं होतीं. अखेरीस वाटेवरच्या एका धर्मशाळेंत ते परस्परांस भेटले. परस्परांच्या दर्शनानें परस्परांस संतोष झाला आणि त्यांच्यामध्यें जो स्नेह जमला तो अखेरपर्यंत कायम टिकला.

याच सालीं टॉलस्टॉय यांस आणखीहि एक स्नेही मिळाला. याचें नांव निहेलोस्की असें होतें. इ० स० १८७५ सालीं शिक्षणविषयक चळवळ टॉलस्टॉय यांनीं केली, तेव्हां निहेलोस्की यानें टॉलस्टॉय यांची बाजू चांगली राखली होती. निहेलोस्की यानें टॉलस्टॉय यांजबद्दल पुढील उल्लेख केला आहे.

"टॉलस्टॉय यांची राहणी अगदीं साधी म्हणजे जवळ जवळ खेडवळ होती; तथापि त्यांचा रुबाब असा होता कीं, दृष्टभेट झाल्याबरोबर कोणावरहि त्यांचें वजन पडे. वास्तविक पाहतां सत्शीलता आणि चांगल्या रीतीभाती यांची वस्ती शुभ्र हातमोज्यांत आणि व्याकरणशुद्ध फ्रेंच भाषेंत असतें असें नाहीं."

"बोलतां बोलतां, आमच्या भाषणाचा ओघ समाजिक गोष्टीकडे वळला. अखेरीस सामाजिक गोष्टी सोडून झार महाराजांच्या पत्राचा विषय निघाला. बादशहाच्या बापाचा खून झाला होता, त्या वेळीं टॉलस्टॉय यांनीं हें पत्र नव्या बादशहास लिहिलें होतें. या पत्राची सारी हकीकत कौंटसाहेबांनीं मला सांगितली. कौंट साहेबांच्या मनोवृत्तीबद्दल जो अंदाज मीं पूर्वीं केला होता, तो या भेटींत खरा ठरला, हें पाहून मला फार आनंद झाला! यापुढें मास्कोला जाण्याचे अनेक प्रसंग मला आले आणि प्रत्येक

वेळीं टॉलस्टॉय यांची भेट घेण्यास मी चुकत नसें. बोलण्या चालण्यास यांच्या इतका गोड मनुष्य मिळणें मोठें दुर्लभ होय. एखाद्या विषया-बद्दल आमच्यांतील मतभेद जरा तीव्र होतोसा दिसलें, कीं टॉलस्टॉय ताब-डतोब आवरतें घेत. आणि मध्यें थोडा वेळ विड्या ओढण्यांत घालवून तो विषय आम्ही पुन्हां सुरू करीत असूं. अशानें आमचा तंटा संपत असे असें नाहीं, तथापि मध्यंतरीच्या व्यत्ययामुळें आमचीं मनें थंड होत असत हें मात्र खरें."

टॉलस्टॉय यांच्या कांहीं स्नेह्यांत स्ट्रूहाप याची गणना प्रमुखत्वानें केली पाहिजे. स्ट्रूहाप याच्या मनांत टॉलस्टॉय यांजबद्दल पूर्ण पूज्यभाव होता आणि त्यांचीं कांहीं मतें त्याला मान्यहि झालीं; तथापि कित्येक प्रसंगी त्यांच्यांत मतभेद होई, तेव्हां टॉलस्टॉय यांचें मत निमुटपणें ऐकून घेऊन स्ट्रूहाप त्यांच्याशीं कडाक्याचा वाद करी. एवढेंच नव्हे, तर कित्येक प्रसंगीं आपलें मत टॉलस्टॉय यांस कबूल करावयास लावी. टॉलस्टॉय यांच्या ग्रंथांत स्ट्रूहाप याच्या मताची छाया जागोजाग पडलेली दिसते. तारीख ३१ मार्च इ० स० १८८२ रोजीं स्ट्रूहाप यानें टॉलस्टॉय यांस लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे.

"गेला सारा गतेतिहास ज्या प्रकारच्या चळवळीनें भरलेला आहे, त्या साऱ्या चळवळी नकारात्मक स्वरूपाच्या आहेत, असें माझें स्पष्ट मत आहे. उदारमतें, राज्यपद्धतीच्या क्रांती व सोसियालिस्ट लोकांचीं मतें, यांचीं प्रत्यक्ष व्यावहारिक किंमत सांगावयाची म्हटलें तर ती 'नेती नेती' या शब्दांनींच सांगितली पाहिजे. यांच्या एकंदर चळवळींचा तात्पर्यार्थ इत-काच कीं जें चालू आहे तें नको; पण त्या ऐवजीं अमुक पाहिजे, असा कोणताच निश्चयार्थ त्या चळवळींत मला दिसत नाहीं. यामुळेंच मी या साऱ्या चळवळींविरुद्ध आहें. त्या नको असें मी म्हणतों, म्हणजे वास्त-विकपणें ज्याला खरें अस्तित्व नाहीं, तेंच मी नको म्हणतों. स्वातंत्र्य आणि समता हीं पुष्कळांचीं दैवतें होऊन बसलीं आहेत. या दैवतांना अनेक भक्त, आजपर्यंत मिळाले. याच झेंड्याभोंवतीं भयंकर लढाया होऊन राज्यक्रांत्याहि झाल्या; पण अखेरीस त्यांच्या अंतरंगांतून व्यावहा-

रिक तत्व कोणतेंहि बाहेर पडत नाहीं, हें पाहून कोणालाहि नवलच वाटेल. ज्या तत्वांचा प्रत्यक्ष व्यवहार होईल अथवा आपलें प्रत्यक्ष ध्येय म्हणून जीं कोणालाहि पुढें ठेवतां येतील, अशीं कोणतींच तत्त्वें एवढ्या उत्पातांतून बाहेर पडलीं नाहींत. अर्वाचीन युरोपीय सुधारणेचा मनुष्य जन्माला आला, त्या क्षणापासून चालू काळापर्यंत प्रत्यक्ष काय पदरांत पडलें, याचा अढावा काढून पाहिलें, तर मध्ययुगांत असणाऱ्या पुष्कळशा वस्तूंची मोडतोड, हेंच या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागेल. मध्य युगाच्या विघटनेचें हें कार्य गेलीं चार शतकें चाललेल्या दीर्घ उद्योगांत संघटनात्मक अथवा विधायक अशी एकहि वस्तु लाधली असल्याचें साऱ्या युरोपांत मला कोठें दिसत नाहीं. अलीकडे अगदीं नव्या काळांतल्या नव्या चिजा अमेरिकेंत पैदा होतात. त्या चिजा म्हणजे, मतें विकणें आणि महत्वाच्या जागा विकत घेणें या होत. मग अशा स्थितींत समाजाची घटना अंशतः तरी कशी कायम राहील ? त्याची पूर्ण पांगापांग कां झाली नाहीं, याचें कारण हेंच कीं, जुन्याकाळच्या धर्मतत्वांवर थोडाबहुत विश्वास, दिशाभिमान आणि जुन्या काळचीं नीतिबंधनें यांचे थोडेबहुत अवशेष सध्यांच्या युरोपीय समाजांत अद्यापिहि आहेत आणि तेवढ्याच्याच आधारावर समाज अद्यापि जीव धरून आहे; पण हा पायाहि हळूहळू ढिला पडत आहे. याच्यांतील दगड विस्कळीत होऊं लागले आहेत."

"सध्यां एकंदर जनसमूहाची स्थिति मोठी विलक्षण झाली आहे. चालू काळांतला जीवनक्रम म्हणजे परस्पर विरोधी वस्तूंची खिचडी होय. अंतर्गत वृत्तींची संगती नसतांहि मनुष्याला जगतां येतें, म्हणून तो अद्यापि जिवंत तरी राहिला आहे, नाहीं तर मनुष्याप्राणि यापूर्वीं कधींच नाहींसा झाला असता."

जवळ जवळ अशाच प्रकारचे विचार स्वतः टॉलस्टॉय यांनीं एका लेखांत प्रदर्शित केले आहेत.

तारीख २१ एप्रीलच्या पत्रांत स्ट्रहाप यानें जे विचार प्रदर्शित केले आहेत, ते टॉलस्टॉय यांच्या विचारांशीं पुष्कळ जुळते आहेत हें वाचकांच्या ध्यानीं येईल. स्ट्रहाप म्हणतो,

"खरा ख्रिस्तानुयायी काय म्हणतो? 'मला स्थावर मिळकतीची जरूर नाहीं. कोणावरहि अम्मल गाजविण्याची माझी इच्छा नाहीं, कोणाबद्दलहि बरें वाईट मत देत नाहीं. कोणाचाहि वध मी करूं इच्छित नाहीं आणि कोणालाहि मला कर द्यावयाचा नाहीं!' अशा प्रकारची इच्छा पवित्र आहे, हें उघड असल्यामुळें तिला दोष देणें शक्य नाहीं; पण अशाच प्रकारच्या गोष्टी नको म्हणणारांत दुसराहि एक वर्ग आहे आणि हा दुसरा वर्ग मी दूषणार्ह समजतों. तो काय म्हणतो पहा! 'मी कोणालाहि माझावर अम्मल गाजवूं देणार नाहीं. मला बरें वाईट म्हणण्याचा अधिकार कोणालाहि नाहीं, मजवर कोणीहि अस्त्र धरूं नये आणि मजपासून करहि मागूं नये.' या दोहोंत जो मोठा फरक आहे, तो कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखा नाहीं. तो फरक इतका स्पष्ट आहे कीं, या दोन मार्गांचीं स्वरूपें परस्परां-विरुद्ध झालेलीं आहेत. पहिल्या मार्गांत त्याग हा हेतु उघड दिसतो आणि दुसऱ्याचें मूळ शुद्ध अहंकार हें आहे. यामुळें पहिला मार्ग भूषणास्पद होतो आणि त्या इच्छा तृप्त होण्यासारख्याहि आहेत. कारण त्या इच्छा-तृप्तीचें साधन बाह्य वस्तूंवर अवलंबून नसून ज्याच्या त्याच्या मानसिक अवस्थेवर अवलंबून असतें. मानसिक अवस्थेंत अनुरूप बदल झाला म्हणजे त्यागमार्गाच्या इच्छा अवश्य पूर्ण होतील. पण अहंकारी इच्छा तृप्त होण्यास सारें बाह्यजग बदललें पाहिजे आणि हें होणें तर शक्य नाहीं."

आपलीं मतें प्रस्थापित करतांना टॉलस्टॉय कित्येक वेळां प्रतिपक्षाच्या मनोवृत्तीचा विचारहि करीत नसत, हें पूर्वी सांगितलेंच आहे आणि या त्यांच्या गुणामुळेंच त्यांना खरे मित्र फार थोडे मिळाले. त्यांच्या लेखांची वाहवा करणारे पुष्कळ होते, पुष्कळ लोकांचें त्यांजवर प्रेम जडलें होतें आणि पुष्कळांच्या ठिकाणीं त्यांच्याबद्दल आदर होता, इतकेंच नव्हे तर पुष्कळांच्या मानसिक स्थितींत टॉलस्टॉय यांनीं क्रांतीहि करून सोडली होती; तथापि इतक्या मंडळींत मित्र असे त्यांना फारच थोडे लाभले. खुद्द स्ट्रॅहाप यांशींहि त्यांचे तंटे थोडे झाले असें नाहीं आणि स्ट्रॅहाप हा इतक्या शांत स्वभावाचा, प्रेमळ मनाचा आणि टॉलस्टॉय यांची

भक्ति, करणारा मनुष्य नसता, तर या दोघांची मैत्री इतका काळ टिकली असती कीं नाहीं याची शंकाच आहे. आणखी एका पत्रांत स्टॅहाप म्हणतो.

"तुमची रजा घेऊन मी क्रिमियांत गेलों, तेव्हां तुमचे शब्द मला वारंवार आठवत होते. 'जो माझ्यातर्फेचा नाहीं, तो माझ्या विरुद्धच आहे, असें मी समजतों.' हे तुमचे शब्द होत. त्याचप्रमाणें आणखी एका पत्रांत तुम्ही मला शुद्ध धर्मलंड ठरविलें होतें; पण मी तरी काय करूं ? माझ्या मनाला जें खरें वाटतें, तें मी स्पष्ट बोलतों. माझ्या विचारांची दिशा बदलत नाहीं, आणि चित्ताला पटलेली गोष्ट मागें ठेवून तोंड देखलें बोलावयाचें ही इच्छा मला साधत नाहीं. असो, तुम्ही कांहीं म्हणा. तुमच्या बद्दलचा माझा स्नेहभाव कधींहि कमी होणार नाहीं. अशा मतभेदांतहि तुमच्याबद्दल खरें प्रेम असणें हा अपराध असेल, तर त्याबद्दल क्षमा करा. माझें भाषण तुम्हाला आवडत नसेल तर मी गप्प बसेन आणि मनांतल्या मनांत तुमच्यावर प्रेम करीन."

या वेळीं टॉलस्टॉय यांचें मन धर्मविचाराकडे बरेंच गुंतलें होतें, तरी त्यांचें अंतःकरण अष्टपैलू असल्यामुळें इतर गोष्टींतून तें अगदींच निघालें होतें असें नाहीं. इ. स. १८८२ च्या एप्रील महिन्यांत आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात,

"आज सकाळींच उठून मी बाहेर फिरावयास गेलों आणि त्या सुप्रभातींच्या शोभेनें माझें मन अगदीं बेहोष होऊन गेलें. हवेंत आतां चांगला उबारा आला आहे. झाडांवर कळ्या दिसूं लागल्या असून मधमाशा त्यांजभोंवतीं घिरट्या घालतांना दिसतात. पक्षांच्या गाण्याच्या लकेरीहि आतां कानावर येऊं लागल्या आहेत. पहावें तिकडे हिरवें चार गवत, पांखरें आणि मधमाशा यांचे थवे ! पोलिसाचें अशुभ दर्शन नाहीं. ठरलेल्या हद्दींत चालावयास लावणारे फुटपाथ नाहींत, गाडीवाल्यांचे हुकूमवजा कर्कश शब्द ऐकूं येत नाहींत आणि गटारांची घाणहि कोठें नाहीं. अशा स्थितींत आनंदाला काय तोटा ? तुला आणि धाकट्या मुलांना मास्कोंतच कोंडून घ्यावें लागतें, याबद्दल मला मनापसून वाईट

वाटतें. मुलांना घेऊन तूं लवकरच इकडे आलीस, तर वडील मुलांबरोबर मास्को येथें मी राहीन. मला मास्कोंत राहण्यांतहि विशेष कष्ट आहेत असें नाहीं. माझ्या मनांतले विचार जोंपर्यंत कोणीं काढून घेतले नाहींत, तोंपर्यंत मी कोठेंहि राहिलों तरी सारखेंच. शहरच्या हवेचा दुष्ट परिणाम माझ्या प्रकृतीवर फारसा होत नाहीं. पण धाकट्या मुलांना आणि तुला मात्र तो बराच जाणवतो, यांत शंका नाहीं."

वरील पत्रांत टॉलस्टॉय यांनीं सुचविल्याप्रमाणें धाकट्या मुलांना बरोबर घेऊन कौंटेसबाई यासनाया येथें गेल्या आणि टॉलस्टॉय मास्को येथें राहिले. या वेळीं 'कबुली जजाब' हें आपलें पुस्तक एका मासिकांत छापविण्याचा विचार टॉलस्टॉय यांच्या मनांत घोळत होता. या कारणा-मुळेंहि मास्को येथें राहणें या वेळीं त्यांना सोयीचें होतें. पण टॉलस्टॉय यांचा हा बेत सरकारी धर्मखात्याच्या परिक्षकानें सिद्धीस जाऊं दिला नाहीं. अशा रीतीनें हें पुस्तक उघडपणें प्रकाशांत आलें नाहीं, तरी त्याचीं हस्तलिखितें, चोरून मारून तयार केलेल्या शिळाछापाच्या प्रती आणि अन्य साधनांनीं केलेल्या प्रती यांचा प्रसार रशियांत अगोदरच झाला होता. आतां या प्रतींवर 'बे कायदेशीर' एवढा छाप मात्र होता. अखे-रीस हें पुस्तक जिनीव्हा येथील एका प्रकाशकानें रशियन भाषेंत छापलें आणि नंतर त्याचीं अनेक भाषांतील भाषांतरेंहि त्या मागून लवकरच प्रसिद्ध झालीं.

इ. स. १८८२ सालच्या आरंभापासूनच टूरजीनेफ याची प्रकृति फार बिघडली होती. याशिवाय त्याजवर अनेक आपत्तीहि आल्या होत्या. तथापि अशा स्थितींतहि टॉलस्टॉय यांस तो विसरला नव्हता. त्याचें टॉल-स्टॉय यांजवरील प्रेम अद्यापिहि कायम होतें. इ. स. १८८२ च्या मार्च महिन्यांत आपल्या एका स्नेह्याला लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो—'तुम्हीं आणि टॉलस्टॉय पुन्हां एकत्र जमलां याबद्दल मला आनंद वाटतो. टॉलस्टॉय हा गृहस्थ थोडासा तऱ्हेवाईक आहे खरा; पण तो मोठा बुद्धिवान् आणि सच्चा दिलाचा आहे, याबद्दल कोणीहि शंका घेणार नाहीं.'

आपल्या ‘ कबुली जबाब ’ या पुस्तकाची एक प्रत टॉलस्टॉय यांनीं टूरजीनेफकडे पाठवून ती शांत मनानें वाचण्याची शिफारस केली होती. त्या पत्राच्या उत्तरांत टूरर्जानेफ म्हणतो,

“ तुम्हीं म्हटल्याप्रमाणेंच तुमचें पुस्तक शुद्ध मनानें मी वाचीन. हा लेख एका सुबुद्ध, शहाण्या आणि खऱ्या अंतःकरणाच्या गृहस्थानें लिहिला आहे, हें मी विसरलों नाहीं. या गृहस्थाशीं माझा मतभेद असला, तरी त्याचें म्हणणें काय आहे, हें समजून घेण्याचा यत्न मी अवश्य करीन. त्याच्या स्वतःच्या मनःस्थितीशीं समता पावण्याची खटपट मी करीन. त्याच्या व माझ्या विचारांत फरक कोठें आहे, हें शोधीत बसण्यापेक्षां आमच्या दोघांचें जुळतें कोठें, हें पाहणें मला अधिक श्रेयस्कर वाटतें. ज्याच्याशीं आपला मतभेद आहे, त्यानें लिहिलेला ग्रंथ विकृत मनानें वाचणें हा मार्ग मला तर अगदीं त्याज्य वाटतो. असें करण्याचा विचार सुद्धां मला शिवत नाहीं. गरम रक्ताचे तरुण अशा गोष्टी करतात. त्यांना मतभेद सहन होत नाहीं. आपल्या खिडकींतूनच खरा प्रकाश दिसतो, आणि बाकीच्यांना त्यांच्या खिडक्यांतून तो दिसत नाहीं, असा भ्रम तरुणांच्या डोक्यांत मात्र असतो.”

या लेखाबद्दल आपल्या एका मित्राला लिलिलेल्या पत्रांत टूरजीनेफ यानें पुढील मत प्रदर्शित केलें आहे.

“ थोड्या दिवसांमागें सरकारी परिक्षकानें मना केलेलें ‘ कबुली जबाब ’ हें टॉलस्टॉय यांचें पुस्तक मास्को येथील एका स्त्रीच्या मार्फत मजकडे आलें. सारा लेख मीं फार काळजीपूर्वक वाचून पाहिला. त्यांत लेखकाची मनःपूर्वकता, स्वमताबद्दलची खात्री आणि सत्यान्वेषणाची जाज्वल्य इच्छा हीं ढळढळीत दिसून येतात; पण त्याचा मूळ पायाच चुकींच्या तत्वांवर रचला असल्यामुळें त्याची अखेर ‘ मानवी जीवित शून्यमय ’ अशी झाली आहे. हाहि एक प्रकारचा शून्यवाद अथवा निर्वाणवाद होय.”

“ साहित्य संगितादि कला मानवी जीविताच्या ध्येयाला पोषक नसल्यामुळे त्याज्य आहेत, असा निश्चित सिद्धांत टॉलस्टॉय सांगत असतां

स्वतःभोंवतीं मात्र साहित्यादि कलांच्या निर्माण कर्त्यांस ते गोळा करतात, याचें मला मोठें नवल वाटतें. अशा लोकांशीं केलेल्या संभाषणांतून त्यांच्या दृष्टीनें उपयुक्त असें त्यांना काय मिळणार हेंच मला समजत नाहीं. असो, माझ्याशीं त्यांचा मतभेद असला, तरी सांप्रतच्या रशियांत टॉलस्टॉय ही एक अद्वितीय व्यक्ति आहे यांत शंका नाहीं."

टॉलस्टॉय हे शून्यवादी अथवा निर्वाणवादी होते, असें मत आजपर्यंत पुष्कळांनीं दिलें आहे; पण टॉलस्टॉय यांच्या स्वतःच्या वागणुकींत या मताला यत्किंचितहि आधार सांपडत नाहीं. त्यांनीं आपल्या आयुष्यांत पुष्कळ कष्ट भोगले, संपत्ति त्याज्य मानली, ऐहिक सुखावर पाणी सोडलें, आणि स्वतःच्या मतांसाठीं इष्टमित्रहि सोडले, ही गोष्ट खरी; तथापि त्यावरून ते शुद्ध नैराश्यवादी अथवा निर्वाणवादी होते, असें म्हणतां येत नाहीं. पुष्कळांवर कडक टीका करून त्यांचीं मनें त्यांनीं दुखविलीं असलीं, तरी पुष्कळांवर त्यांनीं महदुपकार केले, हेंहि खरें. स्वभावानें ते अत्यंत दयाळू असत. सर्व मानव कुलांत परस्पर बंधुभाव कधीं ना कधीं वागूं लागेल, या आशावादाचे ते पाठीराखे होते. त्यांच्या संगतींत खोटें वैराग्य अथवा वैताग कोणालाहि उत्पन्न झाला नाहीं. त्यांच्या भोंवतालचें सर्व वातावरण आनंदानें दुमदुमत असल्याचा प्रत्यय अनेक वेळां पुष्कळांस आला. आतां आशावाद म्हणजे परार्थ हानि करून सुद्धां स्वार्थ साधावयाचा हाच असेल, तर हा वाद मात्र त्यांना कधींच मान्य नव्हता. त्यांचा वाद याच्या उलट होता. प्रसंगीं स्वार्थाचीहि हानि पत्करून परार्थ साधावा, असें त्यांचें मत होतें आणि तदनुसार त्यांची वागणुकहि होती. परार्थाकरतां केलेल्या श्रमांनीं स्वतःचा आनंद दुणावतो हा आपला अनुभव ते स्वतःच सांगत.

टॉलस्टॉय यांच्या घरच्या करमणुकींत 'टपाल पेटी'चा उल्लेख करणें अवश्य आहे. यासनाया येथें त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाशिवाय त्यांच्या पत्नीच्या माहेरची मंडळी व त्यांचे स्वतःचे कित्येक स्नेही सहपरिवार दोन अडीच महिन्यांच्या मुक्कामासाठीं येत असत. अशी मंडळी जमली म्हणजे घरांत तरुण मुलामुलींचा बराच मोठा तांडा जमे. या मंडळींत आपसांत

पुष्कळ थट्टामस्करी चाले व कित्येक वेळां त्यांतील विनोद लिहून ठेवण्या इतकाहि चांगला असे. या मंडळींनीं स्वतःच्या करमणुकीसाठीं एक ' टपाल पेटी ' सुरू केली होती. घरांतल्या मंडळींपैकीं वाटेल त्यानें वाटेल तो मजकूर लिहून या पेटींत टाकावा अशी मुभा सर्वांना होती. रविवारीं संध्याकाळीं ही पेटी उघडून आंतील सर्व लेखांचें मोठ्यानें वाचन होई. लेखाखालीं सही करावयाची अट नसल्यामुळें प्रत्येकाची मनोवृत्ति अगदीं मोकळेपणीं या लेखांतून वावरत असे. यांत कविताबद्ध मजकूरहि असे. कांहीं लेख शोकपूर्ण असत; तर कांहीं अत्यंत हास्यकारकहि असत. कित्येक लेख वर्तमानपत्री थाटाचे आणि वर्तमानपत्रांची चेष्टा करणारेहि होते. या टपालपेटींत टॉलस्टॉयहि कित्येक वेळां मजकूर लिहून टाकीत. वाचनाच्या वेळीं सर्व मजकूर ते फार लक्षपूर्वक ऐकत असत आणि त्यांत त्यांना मौजहि वाटे.

हिंवाळ्याच्या दिवसांत सर्व कुटुंब मास्को येथेंच राहणार, असें पक्कें ठरल्यानंतर भाड्याच्या बिनसोयीवार घरांत राहण्यापेक्षां स्वतःच्या मालकीचें घर असणें बरें, असा विचार करून टॉलस्टॉय यांनीं एक घर विकत घेतलें. हें घर जुन्या पद्धतीचें होतें. भोंवतीं बागबगीच्या बराच मोठा असून त्याच्या आवारांत एक चांगली विहीरहि होती. या घरांत कांहीं नवीन सुधारणा करून आपणास पाहिजे तशा सोयी टॉलस्टॉय यांनीं करून घेतल्या.

स्ट्रॉहाफ यानें आपल्या एका मित्राला तारीख ५ नोवेंबर रोजीं लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे.

"टॉलस्टॉय आनंदांत आहेत. मास्कोला त्यांनीं एक घर घेतलें आहे. सध्यां, हिब्रू भाषेचा अभ्यास ते करीत आहेत. त्यांची वृत्ति अत्यंत भावनामय असल्यामुळें त्यांच्या मनाची स्थिति कोणत्या वेळीं बिघडेल, याची मला धास्ती वाटते."

याच सुमारास टॉलस्टॉय यांनीं आलेक्झीएफ याला लिहिलेल्या पत्रांत आपल्या कुटुंबियांबद्दल पुढील हकीकत दिली आहे.

"घरांत कांहीं माणसें अजारी होतीं; पण आतां तीं बरींच सुधारलीं

असून कुटुंबाचा गाडा पूर्वीसारखा सुरळीत चालू झाला आहे. सर्जेसचा अभ्यास जोरानें चालला आहे. विश्वविद्यालय ज्ञानदान करतें, अशी त्याची अजून समजूत आहे. टाशियाना अद्यापि साऱ्याच बाबतींत अर्धीकच्ची आहे; तथापि ती अधिक बिघडत जात नसून सुधरत आहे, हें बरें. इलिया पक्का आळशी आहे, लियो आणि मेरी बरीं आहेत. माझ्या स्वभावांतला कडकपणा थोरल्या मुलानें जसा घेतला, तसें या दोघांनीं केलें नाहीं. यामुळें आपल्या वडील भावंडांपेक्षां हीं दोन मुलें अधिक कोमल स्वभावाचीं आहेत. माझी वृत्ति बरीच शांत आहे; तथापि आजूबाजूला चाललेल्या वेडेचारांचा जयजयकार होत असलेला पाहून मात्र मला वाईट वाटतें. आजूबाजूच्या मंडळीचा खुळेपणा मला स्पष्ट दिसावा आणि त्यांना तो मुळींच दिसूं नये आणि स्वतःच्या चुकाहि समजूं नयेत, अशी ईश्वराचीच योजना दिसते. अशा रीतीनें आम्हीं एकत्र रहात असूनहि आमची परस्पर ओळख पटेनाशी झाली आहे. त्यांनीं मला मूर्ख समजून हंसावें आणि मीं त्यांची गणना वेड्यांत करावी, असा प्रकार चालू आहे; पण तीं पडली खंडीभर आणि मी एकटा. यामुळें त्यांच्या वेडेचारांचाच जय होतो. बाह्यतः तीं आनंदी आहेत; आणि बाह्यतः मी दुःखी कष्टी दिसतों. सध्यां हिब्रू भाषेचा अभ्यास मी करीत असून त्या भाषेंत बरेंच प्राविण्य मीं मिळविलें आहे. माझ्या गुरूचें नांव मायनर असें असून तो फार सज्जन आहे. या नादीं मी लागलों हें माझ्या मनस्वास्थाच्या दृष्टीनें एकंदरींत फार चांगलें झालें. शरीरानें दिवसेंदिवस मी अधिक अशक्त होत आहें आणि आतां मरून जावें अशीहि इच्छा मला वारंवार होते. असली इच्छा फार वाईट आहे, हें मला कळतें; पण तसें मनांत आल्यावांचून मात्र रहात नाहीं. हा माझा जुना रोग पुन्हां परतला कीं काय कोण जाणे!"

"प्रिय मित्रा! राम, राम! आनंदाच्या वेळीं जें सुख मला होत असतें तें परमेश्वरानें तुला सदोदित द्यावें, इतकेंच मागणें मी त्याजपाशीं मागतों. अशा सुखाहून अधिक मोलवान् असें या जगांत दुसरें काय असणार?"

बायबलच्या ग्रंथाची मूळ संहिता वाचावी याच हेतूनें हिब्रू भाषेचा अभ्यास टॉलस्टॉय यांनीं सुरू केला होता. त्यांच्या नेहमींच्या संवयी-प्रमाणें हें कामहि फार मनःपूर्वक झाल्यामुळें हिब्रूंत लवकरच त्यांनीं चांगलें प्राविण्य संपादिलें. मूळ संहितेवर कित्येक ठिकाणीं त्यांनीं केलेली टीका त्यांच्या गुरुपेक्षांहि अधिक स्पष्टिकरणात्मक आणि अधिक अर्थवाहक असे, असें खुद्द मायनर यानेंच कबूल केलें आहे; पण या अभ्यासाच्या गर्दींत त्यांचें शरीर मात्र दिवसेंदिवस अधिक खंगत चाललें. कौंटेसबाई आपल्या बहिणीला लिहिलेल्या पत्रांत म्हणतात,

"हिब्रू भाषेचा अभ्यास लियो करीत आहेत, याबद्दल मला फार वाईट वाटतें. कित्येक वेळां एकाद्या क्षुद्र गोष्टीवरहि आपली सारी शक्ति ते खर्च करतात. हा अभ्यास सुरू झाल्यापासून त्यांचें शरीर आणि मन हीं दोन्हीहि क्षीण होत आहेत, हें पाहून मला फार वाईट वाटतें. माझें दुःख मनांत मावेनासेंहि झालें आहे. हिब्रूशिवाय त्यांना आतां दुसरें कांहींच सुचत नाहीं. त्यांचें ग्रंथकर्तृत्व पूर्ण अस्ताला गेलें असें दिसतें. खरोखर हा मोठाच घात झाला."

:

टॉलस्टॉय यांची वृत्ति व राहणी हीं या वेळीं सामान्यतः कशीं होतीं, हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

बोबोरिकिन म्हणतो, "या वेळीं टॉलस्टॉय यांची राहणी सामान्य जनसमूहाच्या अथवा त्यांच्या कुटुंबाच्याहि राहणीपासून बरीच वेगळी झाली होती. श्रीमंत कुटुंबांची वागणूक शुद्ध पापाची आहे, असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. एके दिवशीं आपल्या घरच्या बायकामाणसांना ते म्हणाले, 'अशा रीतीनें वागणें तुम्हांला आवडतें तरी कसें ? या वाग-णुकीची लाज तुम्हांला कांहींच वाटत नाहीं ? छातीचा जवळ जवळ अर्धा भाग उघडा पडणारा पोषाक घालून तुम्हीं भर थंडीच्या दिवसांत नाचाला जातां. नाचाच्या खोलींत शेगड्यांचा उबारा पुष्कळ असतो म्हणून त्या थंडीचें तुम्हांला कांहींच वाटत नसेल; पण तुमच्या गाडी-वाल्यांना पहांटे चार वाजेपर्यंत बर्फ पडत असतां उघड्या रस्त्यांत तिष्ठत

रहावें लागतें, याची तुम्हांला कांहींच शरम वाटत नाहीं. निदान त्याच्याशीं दोन शब्द तरी बोला.'

"त्यांचें हें भाषण मला मोठें चमत्कारिक वाटलें; तथापि त्यांच्या म्हणण्यांतील खरेपणा नाकबूल करतां येणें शक्य नव्हतें. आळसांत काळ घालविणाऱ्या श्रीमंत लोकांनीं केवळ स्वतःचे चोचले पुरविण्यापेक्षां गरीब लोकांना वाटेल त्या रीतीनें तुडवावें, ही गोष्ट अत्यंत गर्हणीय आहे, हें टॉलस्टॉय यांचें म्हणणें कोण नाकबूल करील? वरील शब्द ते उच्चारीत होते, तेव्हां त्यांच्या हृदयाला किती पीळ पडत होता, हें त्यांच्या मुद्रेवरून मला स्पष्ट दिसत होतें. स्वतःच्या घरच्या स्त्रियांची कानउघाडणी टॉलस्टॉय यांजसारख्या स्पष्ट वक्तयानें करावी, यांत मला कांहींच नवल वाटत नाहीं."

"तुम्हीं साहित्यकलेशीं फारकत केली, ही गोष्ट फार वाईट झाली, असें मीं त्यांना म्हटलें, तेव्हां ते म्हणाले, 'ही तुमची स्तुति कशासारखी आहे, हें ठाऊक आहे का? एकादी फ्रेंच नायकीण म्हातारी झाली म्हणजे तिचे चहाते तिच्या तारुण्याच्या दिवसांचें स्मरण करून तिला म्हणतात, 'त्या वेळीं झग्याचें टोंक उचलून तूं गाऊं लागलीस म्हणजे श्रोत्यांना आणि प्रेक्षकांना अगदीं बेभान करून टाकीत होतीस' तुमचीहि स्तुति अशीच आहे.' टॉलस्टॉय यांचें हें उत्तर ऐकून गप्प बसण्याखेरीज मला दुसरा मार्गच नव्हता."

टॉलस्टॉय यांची राहणी कशी बदलत गेली व श्रीमंतीचा बाह्य आचार त्यांनीं कसा सोडला, हें वरील उताऱ्यावरून लक्षांत येतें. श्रीमंतीच्या बाहेरच्या दिखाऊ भागाबरोबरच आपल्या पदवीचाहि त्याग या वेळीं त्यांनीं हळूच केला. आपण अमुक करणार, अशी सार्वजनिक जाहिरात त्यांनीं लावली नाहीं, अथवा आपल्या स्नेही मंडळीजवळ सुद्धां या गोष्टीचा उच्चार त्यांनीं केला नाहीं. एके दिवशीं एक शेतकरी त्यांना भेटावयास आला होता. 'कौंटसाहेब,' एवढे शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडतांच ते त्याच्याजवळ जाऊन म्हणाले, 'गड्या, आजपासून मी नुसता लियो निकोलिव्हिच आहें.' इतकें बोलून तावडतोब ते पुढील कामास लागले.

या वेळीं एंगलहार्ट या नांवाच्या एका गृहस्थाकडून धर्मविषयक बाबीचें एक पत्र टॉलस्टॉय यांस आलें. हा गृहस्थ धर्मक्रांति झाली पाहिजे, असें म्हणणारा होता. या गृहस्थाची ओळख टॉलस्टॉय यांस पूर्वी नव्हती. या पत्राचें बरेंच लांबलचक उत्तर टॉलस्टॉय यांनीं त्याला लिहिलें. अशा रीतीनें निबंधात्मक पत्रें लिहिण्याची सुरुवात या वेळेपासून झाली. यानंतर अशाच प्रकारच्या गंभीर विषयांवर बरींच पत्रें त्यांनीं लिहिलीं. या पत्रांच्या हस्तलिखित अथवा शिलालिखित प्रती होऊन त्यांच्या मतांचा प्रसार जारीनें होऊं लागला. हीं पत्रें आणि अशाच प्रकारचे लेख रशियांतून बाहेर गेले म्हणजे रशियन भाषेंत छापले जात व त्यांचीं भाषांतरें अनेक भाषांत प्रसिद्ध होत असत; पण मूळचा रशियन लेख अथवा त्याचें भाषांतर यांपैकीं कशावरच त्यांची स्वतःची नजर फिरली नसल्यामुळें पुष्कळ वेळां मजकुरांत विसंगतपणा होऊन वाचकांचा घोंटाळा होई. तथापि याची जबाबदारी टॉलस्टॉय यांजवर अर्थातच पडत नाहीं. टॉलस्टॉय यांची मनःस्थिति यावेळीं कशी होती, हें त्यांच्या एंगलहार्टच्या पत्रांतील पुढील उताऱ्यावरून ध्यानीं येईल.

"प्रिय एंगलहार्ट, मी तुम्हाला 'प्रिय' असें संबोधन योजिलें आहे. तें केवळ औपचारिक म्हणून नव्हे, तर तुमचीं दोन पत्रें पावल्यानंतर तुम्ही आम्ही खरोखरच एक हृदयी आहों अशी माझी भावना झाल्यावरून प्रिय हें संबोधन मीं तुम्हास योजिलें आहे. तुमच्याबद्दल माझ्या चित्तांत खरा स्नेहभाव उत्पन्न झाला आहे. तुमच्यावर प्रेम करण्यांत थोडासा माझा अहंकारहि कारणीभूत झाला आहे, हें स्पष्ट सांगितलेलें बरें. तुम्हांला कदाचित् असें वाटावयाचें नाहीं; पण तें खरोखरच तसें आहे. मी या अफाट जगांत अगदीं एकटा कसा पडलों आहें, आणि माझ्या आजूबाजूचे लोक माझा तिरस्कार किती करतात, याची कल्पनाहि तुम्हाला होणार नाहीं; पण जो अखेरपर्यंत सर्व आपत्तींना तोंड देतो त्याची पाठ परमेश्वर राखतो, अशी माझी खात्री आहे. मनुष्य अनेक प्रकारच्या हेतूंनीं प्रेरित होऊन अनेक उद्योग करतो. या साऱ्या उद्योगांपैकीं कांहींचें अल्पस्वल्प फळ मात्र त्याच्या पदरीं पडतें. फार काय; पण आपला उद्योग

फलद्रूप झाला आहे, इतकें पाहण्याचें नशिबसुद्धां त्याला क्वचित् प्राप्त होतें. ही सामान्य व्यवहाराची गोष्ट झाली. मग अनंत सत्यांच्या शोधामागें जो लागला, त्याला त्याच्या कार्याची फलद्रुपता स्वतःच्या हयातींत नजरेस पडूं नये यांत कांहींच आश्चर्य नाहीं. मनुष्याचें आयुष्य तें केवढें! आणि सत्यें तर अनंत आहेत. या सर्व गोष्टी मला कळतात; पण त्या कळून सुद्धां पुष्कळ वेळां माझें मन उदास झाल्याशिवाय रहात नाहीं. यामुळें तुमच्या सारख्यांची गांठ पडली म्हणजे आपल्या रस्त्यानें जाणारा वाटसरू आणखी एक तरी आहे, अशी खात्री पटते आणि यामुळेंच मला अननुभूत आनंद होतो."

या उताऱ्यावरून टॉलस्टॉय यांची एकाग्रता व हाल सोसण्याचें धैर्य हीं त्यांच्या आंगीं कशीं होतीं, हें दिसून येतें. आतां आणखी एका प्रश्नासंबंधीं टॉलस्टॉय यांनीं दिलेलें उत्तर विचार करण्यासारखें आहे. ते म्हणतात,

"ठीक आहे. तुमचें हें सारें म्हणणें आम्हीं कबूल केलें, तरी हे विचार व्यवहारांत कसे आणावयाचे, याचा कांहीं मार्ग तुम्ही सांगाल काय? असा प्रश्न पुष्कळांनीं मला पुष्कळ वेळां केला आहे."

"असा प्रश्न उपस्थित होणें अगदीं स्वाभाविक आहे. हा प्रश्न लोक मला करतात, तेव्हां आपण याच्यावर मात केली, आणि याचें तोंड बंद केलें, असें त्यांना वाटतें. लोकां सांगे ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडा पाषाण, असाच त्यांच्या म्हणण्याचा रोख असतो. यावर मी उत्तर देतों तें इतकेंच कीं, मी कोणालाहि उपदेश करीत नाहीं. कारण मला उपदेश करतांच येत नाहीं. लोकांना उपदेश करावा, अशी जाज्वल्य इच्छा माझ्या ठिकाणीं उत्पन्न होते; पण स्वतःची कृति पाहून माझें मन कचरतें. लोकांना उपदेश करणें, तर तोंडाच्या शब्दांनीं न करतां प्रत्यक्ष आचरणानें करावा, हीच माझी इच्छा आहे; पण माझी वर्तणूक पाहिली, तर ती अगदींच टाकाऊ आहे. मी जें कांहीं बोलतों, तें उपदेश म्हणून नव्हे, तर ख्रिस्तिधर्माबद्दल जे खोटे ग्रह लोकांमध्यें पसरले आहेत, त्यांचें निराकरण करावें, इतकाच माझा हेतु असतो. यावरून वाटेल तीं अनन्वित

कृत्यें करून सर्व समाजरचना पालथी करावी, असा माझा हेतु आहे, असें मात्र कोणीं समजूं नये. मानवी जीविताचा अंतिम हेतु काय ? हें ख्रिस्तिधर्मानें सांगितलें आहे आणि तेंच विषद करून लोकांना सांगावें; इतकाच माझा हेतु आहे. मानवी जीविताचा हेतु काय ? या प्रश्नाचें उत्तर पाहिजे असल्यास ख्रिस्ताच्या पांच आज्ञा प्रत्यक्ष व्यवहारांत आणा, म्हणजे तें उत्तर मिळेल. तुम्हांला ख्रिस्ताचे अनुयायी बनावयाचें असेल, तर त्याच्या अज्ञा पाळणें तुम्हास भाग आहे, त्या तुम्हास पाळावयाच्या नसतील, तर तसें स्पष्ट सांगा आणि स्वतःला ख्रिस्ती म्हणविण्याचेंहि बंद करा."

"यावर लोक मला म्हणतात, 'या आज्ञा पाळणें हें प्रत्येक ख्रिस्तानुयायाचें कर्तव्य आहे आणि त्या न पाळणें, म्हणजे जीवित हेतु विफल करणें होय, असें तुम्हाला खरोखरच वाटत असेल, तर अक्षरशः त्या तुम्ही कां पाळीत नाहीं ?' यावर माझें उत्तर असें. मी त्या पाळीत नाहीं, हा माझा दोष आहे आणि या गुन्हाबद्दल मी तिरस्कारासहि पात्र आहें. इतकें प्रथम कबूल करून पुढें मी एवढेंच म्हणतों कीं, सज्जनहो, माझ्या पहिल्या वागणुकीकडे पहा आणि आतांच्या वागणुकीकडे पहा, म्हणजे अशी खटपट तरी मी करतों कीं नाहीं, हें तुम्हाला दिसेल. त्या आज्ञांचा एक हजारांश भाग सुद्धां पुरा होत नाहीं, हें खरें आणि त्याबद्दल मला दोष देणेंहि वाजवी आहे; पण माझ्या हातून त्या आज्ञा पुऱ्या कां पडत नाहींत, याचाहि विचार केला पाहिजे. त्या आज्ञा पाळाव्या या इच्छेचा अभाव हें त्याचें कारण नव्हे, तर त्या तंतोतंत अमलांत कशा आणाव्यात हें मला समजत नाहीं, यामुळेंच मजकडून त्या पाळल्या जात नाहींत. माझ्या भोंवतीं अनेक मोहांचें अनिवार्य जाळें पडलें आहे, त्यांतून मोकळें कसें व्हावें, हें कोणीं सज्जनानें मला शिकवावें. या कामीं कोणाची मदत मला झाली, तर त्या आज्ञा मी अक्षरशः पाळून दाखवीन; पण कोणाची मदत न झाली, तरी सुद्धां त्या पाळण्याची इच्छा माझ्या ठिकाणीं आहे. आणि ही माझी इच्छा कधीं काळीं तरी तृप्त होईल, असा भरंवसाहि मला आहे. तुम्ही खुशाल दोष द्या; पण तो दोष मलाच द्या. मी दाख-

विलेल्या मार्गाला देऊं नका, एवढीच माझी प्रार्थना आहे. ज्या मार्गानें चालण्यासाठीं मीं धडपडतों, आणि कोणी विचारल्यास त्याला दाखवितों, तो मार्ग माझ्या वाईट वागणुकीमुळें दोषार्ह ठरत नाहीं, इतकेंच माझें म्हणणें आहे. मी दारू पिऊन झिंगलों आणि रस्त्यानें जातांना माझे पाय एकमेकांवर आपटूं लागले, तर तेवढ्यावरून तो रस्ता वांकडा तिकडा आणि उंच सखल आहे, असें अनुमान काढावयाचें काय ! आतां माझा मार्गच चुकला आहे, असें तुम्हास वाटत असेल, तर खरा मार्ग कोणता, हें मला दाखवा. मी चुकून भलत्याच मार्गानें जात आहें, आणि यामुळें खळग्यांत पडण्याची भीति मला आहे, असें तुम्हास वाटत असेल, तर मला हातीं धरून योग्य मार्गाला लावा. तुम्हाला हात देण्यास जसा मी तयार आहें, तसेंच मलाहि तुम्ही हात द्या. एकमेकांनीं एकमेकांचें सहाय्य करावें आणि सर्वांनीं मिळून सुपंथाला लागावें, हेंच इष्ट आहे. मी भलत्याच रस्त्याला गेलों, हें पाहून आनंद मानूं नका. 'पहा हा मूर्ख भलत्याच मार्गाला लागला आहे. घरीं न जातां हा खड्ड्यांत मात्र जाईल, असें म्हणून मजकडे बोट दाखवून हसूं नका. हा हंसण्याचा विषय नाहीं. तर हात देऊन मदत करण्याची ही गोष्ट आहे."

"तुम्ही स्वतःहि माझ्यासारखींच माणसें आहां कां, पिशाच-समंध आहां ! मला माझ्या घरीं जावयाचें आहे, त्याचप्रमाणें तुम्हांलाहि त्याच घरीं जावयाचें नाहीं काय ! होय. तुम्हीहि माणसें आहां. तुमचा आणि माझा अखेरचा मुक्काम एकच. मग मला असा एकटा दुकटा कां सोडतां ! खाड्यांत जाऊन पडावें अशी इच्छा मला नाहीं. याकरतां मला मदत करा. अरेरे ! आपण सारेच भलत्या मार्गाला लागून वणवण करीत फिरत आहों, हें पाहून माझें अंतःकरण दुभंगून जातें. आणि माझी सारी शक्ति एकवटून सन्मार्गाला लागण्यासाठीं भगीरथ प्रयत्न मी करीत असतां एकादें पाऊल वांकडें गेल्याबरोबर तुम्हाला आनंदाच्या उकळ्या फुटतात, आणि 'हा आमच्याबरोबरच खाड्यांत पडणार रे पडणार !' असें म्हणून तुम्ही नाचूं लागतां आणि वेड्यासारखे हातवारे करतां, हें आश्चर्य नव्हे काय ! वास्तविक आपल्याबरोबर दुसरा आणखी एक चुकत आहे, हें

पाहून त्याची तुम्हाला दया यावी., स्वतःला खरा मार्ग सांपडत नाहीं, याबद्दल तुमचें तुम्हालाच वाईट वाटावें; पण तसें कांहींच न घडतां उलट तुम्ही आनंदानें बेहोष मात्र होतां."

" मी बोलतों एक आणि करतों एक, याचें रहस्य काय ? हें तुम्हांस सांगितलें. सन्मार्गापासून केसभरहि ढळूं नये, म्हणून माझी धडपड सुरू असते; आणि माझें पाऊल फसलें, तर त्याबद्दल मला अत्यंत पश्चात्ताप होऊन दुसऱ्याच्या मदतीची याचनाहि मी करतों. माझ्या मार्गानें जाणारा दुसरा एकादा वाटसरू मला भेटला, तर त्याचा उपदेश ग्रहण करण्यास मी सर्वदां तयार आहें."

आपल्याच मार्गानें जाणारे दुसरे कांहीं वाटसरू तरी भेटतील, ही टॉलस्टॉय यांची आशा कधींच सफल झाली नाहीं. मागें सांगितलेल्या एंगलहार्टसारखा एकादा मनुष्य एकाद्या आडवाटेला भेटलाच, तरी लवकरच त्याची वाट वेगळी होऊन तो वेगळ्या मार्गानें चालूं लागे.

सामान्यतः पाहतां आध्यात्मिक जीवनाच्या दृष्टीनें इ. स. १८८२ हें साल टॉलस्टॉय यांस फारच कष्टप्रद गेलें. तारीख २२ दिसेंबरच्या रोजनिशींत पुढील उतारा आढळतो.

" माझे श्रम फलद्रूप झालेले पाहण्याचें माझ्या नशिबीं नाहीं, अशी जी शंका पूर्वी मला होती, ती आतां खरी ठरली. असें होणें शक्य नाहीं, हें मला आतां पक्कें कळून चुकलें; पण असें व्हावें, हेंहि रास्तच आहे. हें मनुष्याचें दुर्भाग्य नसून सौभाग्य आहे, आणि ही ईश्वरी योजना कल्याणप्रद व शहाणपणाची आहे, हेंहि मला आतां पक्कें कळलें. कोणत्याहि फळाची आशा न करतां अथवा चित्ताला कशाचीहि लालूच नसतां, केवळ प्रेमानें आणि भक्तीनें प्रेरीत होऊन जें काम मनुष्य करतो, तेंच खरें ईश्वरी कार्य होय. जमिनींत बीं टाका आणि मोकळे व्हा. ज्याच्यावर ईश्वराचें नांव असेल, तें अवश्य उगवेल. आणि तुम्हाला त्याचें फळहि मिळेल. ते फळ मनुष्य या नात्यानें तुम्हांला मिळणार नाहीं, तर तुमच्यांतल्या ज्या चिदंशानें त्या बीजाची पेरणी केली त्याला तें फळ मिळेल."

अशा रीतीनें निष्काम कर्माचें तत्त्व टॉलस्टॉय यांना या वेळीं पटलें.

हें तत्त्व पटल्यानंतर त्यांची कीर्तीची हांव आपोआप कमी होत चालली. पैशाची लालूच त्यांना फारशी कधींच नव्हती; पण मोठेपणाची आणि कीर्तीची आवड त्यांच्या ठिकाणीं विशेष होती, हें वाचकांना स्मरत असेलच. कीर्तीबद्दल आवड नसणें इतकेंच नव्हे, तर उलट तिजबद्दल भीति वाटणें, हा जो ज्ञान्यांचा गुण त्याचा उद्भव टॉलस्टॉय यांच्या ठिकाणीं या काळापासून होऊं लागला. जें कार्य परमेश्वराचें म्हणून हातीं घ्यावयाचें तें कीर्तिरूपानें मनुष्याच्या तोंडीं गेलें म्हणजे त्या कार्याचा विघात होतो, असें त्यांस वाटूं लागलें. यामुळें पूर्वीची कीर्तीची अपेक्षा त्यांच्या मनांतून पार नाहींशी झाली. कीर्तीचें त्यांना भय वाटूं लागलें.

आतां या ठिकाणीं वाचकांना आणखी एका पात्राची ओळख करून देणें जरूर आहे. म्याडम अॅना सुरोन या नांवाची एक फ्रेंच स्त्री मुलांची शिक्षकीण या नात्यानें टॉलस्टॉय यांजकडे राहिली होती. तिचा नवरा वारला तेव्हां तिच्या योगक्षेमाची चांगलीशी व्यवस्था त्यानें केलेली नव्हती. यामुळें तिला अशा प्रकारची नौकरी पहावी लागली. ही स्त्री टॉलस्टॉय यांच्या घरीं सहा वर्षें होती. फ्रेंचांच्या बाह्य औपरिक चालीरितींत ती पक्की मुरलेली होती. स्वभावानें ती आनंदी, प्रसंगीं फाजील चवकस, आकुंचित वृत्तीची आणि मागचें पुढचें धोरण न पाहणारी अशा प्रकारची होती. हिनें टॉलस्टॉय यांजबद्दल स्वतःच्या कांहीं आठवणी प्रसिद्ध केल्या आहेत. हिच्या गोष्टी कित्येक प्रसंगीं तंतोतंत खऱ्या नसल्या, तरी खुद्द टॉलस्टॉय यांच्या घराण्यांत ती सहा वर्षें सतत वावरत असल्यामुळें टॉलस्टॉय यांचा स्वभाव जाणण्यास तिच्या लेखांची पुष्कळ मदत होण्यासारखी आहे. तिच्याच पुस्तकाचा आधार घेऊन टॉलस्टॉय यांची किंमत कमी करण्याचा उद्योग कांहीं लेखकांनीं केला आहे. यांपैकीं बहुतेक लेखक टॉलस्टॉय यांस स्वतः ओळखीत नव्हते. म्याडम अॅना सुरोन हिनें फारसा विचार न करतां कित्येक गोष्टींचें स्वरूप आपल्या मताप्रमाणें विकृत केलें आहे खरें; तथापि टॉलस्टॉय यांच्या उदार चरिताचा उल्लेखहि वारंवार केला आहे. यावरून हा लेख तिनें द्वेषबुद्धीनें लिहिला होता, असें म्हणतां येत नाहीं. टॉलस्टॉय यांच्या विरुद्ध लिहिलेला मजकूर

अर्थातच चुकीच्या समजुतीचा परिणाम असावा आणि तिच्या चुकीच्या समजुतीचा फायदा टॉलस्टॉय यांच्या शत्रूंनीं घेतला आहे.

मास्को येथें टॉलस्टॉय यांच्या घराण्यांत तिनें पाऊल ठेवलें. त्या वेळीं स्वतः टॉलस्टॉय यांजबद्दल झालेला आपला ग्रह पुढीलप्रमाणें तिनें दाखल केला आहे.

" वयाच्या मानानें दिसावे तितके टॉलस्टॉय वृद्ध दिसत नसून ते बरेच कमी वयाचे दिसतात. मी दारांतून आंत गेल्याबरोबर ते पुढें आले आणि आपला हात त्यांनीं मजपुढें केला. त्यांचे डोळे बरेच बारीक होते; तथापि त्यांत चांगलेंच पाणी चमकत होतें. पहिल्या भेटीबरोबर मनुष्याकडे निरखून पाहण्याची संवय त्यांना होती. माझ्याकडे त्यांनीं अशी दृष्टि लावली कीं, आपल्या समोर फोटोचें यंत्र उभें केलें आहे कीं काय, असें मला वाटलें."

" वयाच्या मानानें कौंटेसबाईहि अद्यापि तरुण आणि सुंदर दिसत होती. बॉलसारख्या नाचाच्या प्रसंगीं किंवा इतर वेळीं चार थोर मंडळी एकत्र जमते, अशा वेळीं तेथें हजर रहाण्याची हौस कौंटेसबाईना बरीच होती. या वेळीं त्यांची थोरली मुलगी बरीच मोठी झाली असल्यामुळें अशा प्रसंगीं कौंटेसबाई तिलाहि आपल्याबरोबर नेत."

" अशा प्रकारच्या मंडळींत मिसळण्याची हौस स्वतः कौंट यांस मुळींच नव्हती. तथापि याबद्दल आपल्या पत्नीला त्यांनीं कधींहि मनाई केली नाहीं. साऱ्या ऐहिक वस्तु क्षणभंगुर आहेत, अशी त्यांची स्वतःची खात्री पटली होती आणि कुटुंबांतील मंडळी चार दिवस वेगळ्या पद्धतीनें वागली, तरी अखेरीस आपल्याच मार्गाला ती सारी येऊन मिळेल, अशी त्यांची खात्री असल्याचें दिसतें." कंगालखान्याबद्दल पुढील उल्लेख तिनें केला आहे. " कंगालखान्याचा नरकवास कसा असतो, हें स्वतःच्या दृष्टीनें पहाण्याची अनावर इच्छा टॉलस्टॉय यांस उद्भवली होती. केव्हां केव्हां सबंध रात्र त्या जागीं काढून ते घरीं येत, तेव्हां त्यांचें डोकें भयंकर दुखूं लागे. त्यांच्या डोक्यांत एकसारखे विचार घोळत रहात. काय

करावें, हा जप तासांचे तास चालू राही. 'तूं आपल्या निढळाच्या घामानें आपली भाकर मिळव' ही बायबलांतील आज्ञा ते वारंवार उच्चारीत."

"एके दिवशीं सकाळीं कौंटची स्वारी हातगाड्यावर पाण्याचें पीप ठेवून तो ओढीत बाहेर गेली. रहात्या घराच्या आवाराच्या भिंतीजवळ विहीर होती, तेथें कौंट गेले. तें पीप पाण्यानें भरून त्यांनीं तें हातगाडींत ठेवलें आणि गाडी पुढें ढकलीत ढकलीत कौंटची स्वारी स्वंपाकघराच्या दारापर्यंत आली. एके वेळीं विहिरीचें पाणी आटलें, तेव्हां फाटका तुटका पोषाक घालून रस्त्यावरील भिस्त्याप्रमाणें मोस्का नदींतून पाणी आणण्याचें काम टॉलस्टॉय यांनीं केल्याचें पुष्कळांच्या स्मरणांत अद्यापिहि असेल. मोस्का नदीपासून आमच्या घरापर्यंत जाण्या येण्याला पक्का एक तास लागतो. पाण्याचा गाडा घेऊन कौंट घरीं येत तेव्हां अगदीं थकून भागून गेल्यासारखे दिसत. या त्यांच्या करण्यांत कार्याचें महत्व पहावयाचें नसून त्यांचा हेतु जाणून घेण्यांत महत्व आहे. याच हेतूनें आपणां स्वतःस लागणारी शेकशेगडी ते आपल्या हातानें पेटवून घेत. स्वतःची खोली स्वतःच झाडीत आणि स्वतःचे बूटहि पुशीत."

टॉलस्टॉय यांच्या पोषाकाचें वर्णन ॲना सुरोननें पुढीलप्रमाणें केलें आहे, "भर थंडीच्या दिवसांत फाटका तुटका पोषाक घालून फिरण्यांत कौंट यांना कांहीं विशेष सुख होत असे. त्या वेळचा त्यांचा पोषाक थेट शेतकऱ्यासारखा असे. असा पोषाक करून कौंटसाहेबांची स्वारी आप्तेष्टांच्या भेटीसाठीं निघावयाची अथवा शहरभर हिंडावयाची."

"एके दिवशीं मी आजारी असतां माझ्या मुलाला शाळेंतून आणण्यासाठीं कौंटसाहेब स्वतः गेले. ही शाळा परगांवीं होती. मुलाला अगाऊ सूचना असावी म्हणून कौंटसाहेब तेथें येणार असल्याची खबर मीं त्याला तारेनें कळविली होती. योग्य वेळीं ती तार प्रिन्सिपॉल साहेबांच्या हातीं पडली आणि साऱ्या शिक्षक मंडळीला बरोबर घेऊन मुख्य अध्यापक कौंटसाहेबांचें स्वागत करण्याकरतां मुख्य दरवाजाजवळ येऊन उभे राहिले. कौंटसाहेब आले, तेव्हां अर्थातच त्यांना कोणीं ओळखलें नाहीं.

शाळेंतील कोणा मुलाचा हा नौकर आहे, असें समजून मुख्य अध्यापक त्यांना म्हणाले, ' म्हाताऱ्या, या शेजारच्या चाकरांच्या खोलींत बैस.'

" माझा मुलगा पोषाक करून खालीं आला व फ्रेंच भाषेंत कौंट-साहेबांचें स्वागत त्यानें केलें. या बुढ्या शेतकऱ्याला फ्रेंच भाषा येते, हें पाहून सर्व शिक्षक मंडळीला विलक्षण नवल वाटलें. अखेरीस ते दोघेहि जिना उतरून रस्त्यावर निघून गेल्यानंतर कौंट टॉलस्टॉय ते हेच, असावेत, ही गोष्ट शिक्षक मंडळीच्या ध्यानीं आली."

टॉलस्टॉय यांच्या पोषाकासंबंधीं ॲना सुरोन हिनें वारंवार उल्लेख केला आहे. केवळ लोकाचार म्हणून फाजील खर्चाचा आणि निरुपयोगी असा पोषाक करावयाचा नाहीं, असा टॉलस्टॉय यांचा निश्चय होता. त्यांची अशी वृत्ति बनण्यापूर्वीहि पोषाकाच्या बाबतींत लोकाचाराला त्यांनीं कधींच मान दिला नव्हता. त्या वेळीं सुद्धां स्वतःची आवड व सोय याचाच विचार ते करीत. ॲना सुरोन म्हणते, " त्यांच्या लहान मोठ्या टोप्यांना लोकरीतीचा आकार अथवा वळण हीं मुळींच नसत. अंगावरील पोषाकांत निरनिराळ्या कपड्यांचे रंग परस्परांशीं मिळते आहेत कीं नाहींत, याचाहि विचार ते करीत नसत. शहरांत असतांहि ते अशा तऱ्हेवाईक पोषाकांत फिरत. मग खेड्यांतली गोष्ट तर बोलावयासच नको."

" अर्धी छाती उघडी राहील असा पोषाक स्त्रियांनीं कधींच वापरूं नये, असा त्यांचा हट्ट असे. त्यांची मुलगी अशा प्रकारचा पोषाक करून बॉलला जाऊं लागली म्हणजे ही गोष्ट वडिलांस कळूं नये अशी खबरदारी घेत असे. परोपकाराच्या नांवाखालीं मीनाबाजारासारखे बाजार भरविणें, म्हणजे परोपकाराचा दुरुपयोग होय, असें ते म्हणत; तथापि अगदीं उतारवयाच्या स्त्रियांनीं अशा प्रकारें एकत्र जमून कांहीं परोपकाराचीं कामें केलीं, तर त्याला मात्र त्यांची हरकत नाहीं."

" सामान्यतः कौंटसाहेब गोड भाषण करणारे होते; पण एकाद्या मूर्खाशीं गांठ पडली, तर त्यांचें पित्त अतिशय खवळे. मग त्याची रजाहि न घेतां ताडकन् ते आपल्या खुर्चीवरून उठत आणि खोलीबाहेर चालते होत."

इ. स. १८८२–८३ सालच्या हिंवाळ्यांत टॉलस्टॉय यांनीं बरेच दिवस यासनाया येथें घालविले. शहराचा कंटाळा आला कीं, यासनायाला ते निघून जात. आतां त्यांची वृत्ति बरीच अंतरमुख होत चालली होती. आपल्या मताप्रमाणें आपणास वागतां येत नाहीं, अथवा आपल्या आजू-बाजूचीं माणसें आपलीं मतें ग्रहण करीत नाहींत, हें पाहून ज्याप्रमाणें त्यांचें मन पूर्वी बेताल होई, तसें तें आतां होईनासें झालें. अत्यंत लीनता आंगीं आणण्याची खटपट ते करूं लागले. आजूबाजूचे लोक कसेहि वागले, तरी त्यांजकडे पूर्वींप्रमाणें शत्रु-दृष्टीनें न पाहतां उपेक्षा-दृष्टीनें पाहण्याचा ते अभ्यास करूं लागले.

आपणां सभोंवतीं असलेल्या माणसांचीं मतें बदलण्याचा यत्न करण्यापासून आपणासच अधिक त्रास होण्याचा संभव आहे, ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवानें त्यांच्या ध्यानीं आली. त्याचप्रमाणें केवळ बाह्य देखाव्यावरून कोणीहि मनुष्य सुखी आहे कीं दुःखी आहे, हें अजमावितां येणें शक्य नाहीं, असाहि अनुभव त्यांस आला. प्रत्येकाची मनोघटना स्वतंत्र असून बाह्य उपाधीवर ती अवलंबून नसते. एकादा मनुष्य लक्षाधीश असला, तर तेवढ्यावरून तो आपमतलबी अथवा दुष्ट असलाच पाहिजे, असें अनुमान काढतां येत नाहीं. त्याचप्रमाणें सारे दरिद्री लोक साधू असले पाहिजेत असेंहि नाहीं. एका चुटकीसरसें अजमावतां येण्याजोगें मानव-जीवित नव्हे.

या वेळीं टॉलस्टॉय यांच्या मनःस्थितीबद्दल त्यांच्या पत्नीच्या पत्रांत पुढील उद्गार आढळतात.

ता. ३० जानेवारी १८८३.

" लियो हे सध्यां अगदीं शांत आहेत. कसला तरी लेख सध्यां ते लिहित आहेत. शहरांतील राहणी आणि श्रीमंतांचा जीवनक्रम यांजविरुद्ध प्रत्येक वेळां जहाल शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडतात. मलाहि फार वाईट वाटतें; पण या गोष्टीला त्यांचा उपायच नाहीं, असें दिसतें. सध्यां ते समाजधुरीण झाले आहेत, असें म्हटलें तरी चालेल. ते सामान्य जन-समूहाच्या पुढें चालत असून त्यांचे ते मार्गदर्शक बनले आहेत. मी स्वतः

या सामान्य माणसांपैकींच एक आहें. सामान्य प्रवाहाबरोबरच मीहि वहात आहें. लियोसारख्या वाटाड्याच्या हातीं असलेला दिवा आम्हांला दुरून दिसतो. तो दीप सत्यमार्गाचा दर्शक आहे, हेंहि आम्हांला कळतें; पण आमचे पाय याहून अधिक जलद उचलत नाहींत याला आम्हीं तरी काय करावें ? सभोंवतालचा लोकसमाज, आजूबाजूची परिस्थिति आणि जन्मापासून जडलेल्या संवयी यांच्या जाळ्यांत आमचे पाय पक्के गुंतलेले असल्यामुळें जलद चालणें आम्हांला शक्यच नाहीं. याला आमचा उपाय नाहीं."

टॉलस्टॉय यांचीं मतें अगदीं विक्षिप्त आणि शुद्ध अव्यवहार्य आहेत, असा आक्षेप आजपर्यंत पुष्कळांनीं घेतला आहे. उलट पक्षीं त्यांची पत्नी आणि त्यांचे कांहीं भक्त यांचें म्हणणें वेगळें पडतें. टॉलस्टॉय यांचीं मतें निःसंशय खरीं असतांहि आमच्या दौर्बल्यामुळें तीं आचरणांत आणण्याचें काम आमच्यानें होत नाहीं, असें या पक्षाचें म्हणणें आहे. या दोन्ही पक्षांच्या मतांत सत्याचा अंश आहे. केवळ तत्त्वदृष्ट्या टॉलस्टॉय यांचें म्हणणें निःसंशय बरोबर असलें, तरी त्यांचा व्यवहार करतांना त्यांच्या बाह्य स्वरूपांत परिस्थितीला अनुरूप असा फेरफार केला पाहिजे, हें उघड आहे. त्याचप्रमाणें त्यांचीं मतें खरीं आहेत, असें ज्याच्या बुद्धीला पटलें असेल, त्यानें तीं अमलांत आणण्याचा यत्न मनःपूर्वक केला पाहिजे, हेंहि खरें. टॉलस्टॉय यांचीं मतें जशींच्या तशींच व्यवहारांत आणण्याचा यत्न त्यांच्या भक्तांनीं केला, आणि त्यांत त्यांची फसगत झाली, असा प्रत्यक्ष अनुभव पुढें आला. त्यांचीं जीं मतें निसंशय खरीं आहेत, तीं आचरणांत आणण्यासाठीं कालावधीची वाट पाहण्याचें कारण नाहीं. जें आज सत्य आहे, तें कालांतरानें अधिक सत्य ठरणार आहे, असें नाहीं. त्याचप्रमाणें टॉलस्टॉय झाले तरी, मानवकोटींतलेच असल्यामुळें त्यांचीं सारींच मतें व्यवहार्य असतील, असें नाहीं. प्रत्यक्ष अनुभावानें जीं आज अव्यवहार्य ठरतील तीं कालांतरानेंहि अव्यवहार्यच राहतील. याकरतां कोणतेंहि मत प्रत्यक्ष व्यवहारांत आल्यावांचून त्याची खरी किंमत कळत नाहीं आणि त्याची कसोटीहि लागत नाहीं. अशा स्थितींत तें मत तत्व

या स्वरूपालाहि पोहोंचत नाहीं. ही गोष्ट टॉलस्टॉय यांच्या अंध भक्तांच्या लक्षांत न राहिल्यामुळें पुष्कळ वेळां त्यांची फजिती झाली. टॉलस्टॉय यांचा शब्द म्हणजे श्रुतिवाक्य असें त्यांना वाटे. प्रत्यक्ष अनुभवानें त्यांचें एकादें मत अव्यवहार्य ठरलें, तरी तें अव्यवहार्य म्हणणारावर हे भक्त तुटून पडत; पण धर्मवेड ज्याला म्हणतात, त्याचा हा प्रकार साऱ्या देशांत आणि सर्व काळीं असाच आढळतो. याकरतां टॉलस्टॉयपंथी लोक केवळ अपवादात्मक आहेत, असें म्हणण्याचें कारण नाहीं.

टॉलस्टॉय एप्रील महिन्यांत यासनाया येथें परत आले, तेव्हां आगीनें एकवीस घरें जळून गेल्याचें त्यांना समजलें. या रहात्या घरांशिवाय कांहीं गोठे आणि वारीकसारीक झोंपडीं किती तरी जळालीं होतीं. रशियांतील बहुतेक घरें लांकडी असल्यामुळें तेथें आगीपासून अपघात नेहमीं होतात. रशियन शेतकरी सुबत्तेच्या काळींसुद्धां अठरा विश्वे दरिद्री. मग त्यांत असली आपत्ति त्यांजवर कोसळली, म्हणजे तर बोलावयासच नको. रशियन शेतकरी विलक्षण दैववादी आहे. अशा सार्वजनिक आपत्तीच्या प्रसंगींहि तो नशिबाला हात लावून खुशाल स्वस्थ बसतो. 'आपलें घर जळावें, अशी देवाचीच मर्जी असेल, तर आपल्या घराचें रक्षण आपण कसें करणार? देवाची दया झाली, तर आग आपोआप विझेल,' असें म्हणून ती विझविण्याचा यत्न तो करावयाचा नाहीं.

या आगीची हकीकत पुढीलप्रमाणें टॉलस्टॉय यांनीं लिहिली आहे—

"शेतकऱ्यांची आपत्ति पाहून दगडालाहि पाझर फुटेल. या प्रसंगांत त्यांचे हाल किती झाले, याची कल्पनाहि करवणार नाहीं. पंधरा वीस हजार रुपयांचें नुसतें धान्यच जळून गेलें. आतां हें सारें नुकसान हे निराधार लोक कसे भरून काढणार? आणि तें भरून न निघालें, तर उपासमरीची पाळी त्यांच्यावर येणार!"

"या लोकांतून फिरून मी आतांच आलों. तो सारा देखावा अत्यंत करुणास्पद आणि भयोत्पादक आहे. तथापि एवढ्या आपत्तींतहि या शेतकऱ्यांची स्वावलंबी वृत्ति विलक्षण वाखाणण्यासारखी आहे. त्यांना पेरणी करतां ओट धान्याची फार जरूरी आहे. माझा भाऊ सिरोया याज-

पाशीं बराच ओट शिल्लक आहे. कांहीं दर पडला तरी तो देऊन त्याज-पासून बराच माल घेऊन ठेवावा. विकण्याची त्याची मर्जी नसली, तर मला तारेनें तसें कळवा म्हणजे दुसऱ्या कोठें मी तजवीज करीन."

शेतकऱ्यांच्या घरांना लागणारें सारें लांकूड टॉलस्टॉय यांनीं फुकट दिलें. यासनाया येथें एक शालागृह टॉलस्टॉय यांनीं बांधलें होतें, ही गोष्ट वाचकांस स्मरत असेलच. या आगींतून हें शालागृह मोठ्या चमत्कारानें बचावलें होतें.

गरीब लोकांना नुसत्या पैशाची मदत खरोखर कितपत उपयुक्त होते, हा वाद टॉलस्टॉय यांच्या डोक्यांत अद्यापांहि चालू होताच. त्यांच्या बुद्धीचा पक्का निश्चय अद्यापि झाला नसल्यामुळें त्यांची विवेकबुद्धि आणि दयाळू अंतःकरण यांचे झगडे होऊन त्यांच्या वागणुकीला कित्येक वेळां विलक्षण व हास्यास्पद रूप येई. ॲना सुरोन म्हणते—

"एके दिवशीं एक म्हातारी आपल्या शेतांतील बटाटे काटकीनें खणीत असल्याचें मीं पाहिलें. तेव्हां कुदळ घेऊन बटाटे खणण्याविषयीं तिला सांगितलें. ती मला म्हणाली, 'उभ्या गांवांत तीनच कुदळी आहेत, मग मी कुदळ कोठून आणूं ?' ही हकीकत कौंट-साहेबांस सांगून कांहीं कुदळी घेण्याविषयीं मी त्यांची विनंति केली. तेव्हां ते उसळून एकदम म्हणाले, 'छे ! छे ! कुदळी मुळीं नकोत. एकमेकांच्या गरजा भागाविणें भाग पडल्यानें शेतकऱ्यांना परस्पर प्रेमाचें वळण लागतें."

"त्यांचीं उच्चतत्वें लक्षांत घेतलीं आणि त्याबरोबर अंतःकरणाचा हा कठोरपणा दृष्टोस पडला, म्हणजे त्यांचीं उच्चतत्वें केवळ बोलण्यापुरतीं असून त्यांच्या व्यवहार्य स्वरूपाबद्दल खुद्द कौंटसाहेबांच्या डोक्यांत विलक्षण गोंधळ उडालेला आहे; असें अनुमान कोणीहि काढील."

"हातानें अशी निर्दय गोष्ट करीत असतां तोंडानें मात्र पर प्रेमाच्या आणि परोपकाराच्या गोष्टी ते हजारों सांगत. घराच्या बाहेरच्या बाजूस एक जुनाट म्यापल झाड आहे. या झाडावर वीज पडून त्याचा बराचसा भाग वठलेला होता. याच्या एका शाखेच्या खोडाला एक मोठी

घंटा बांधलेली आहे. ही घंटा वाजवून जेवण तयार असल्याची इषारत देण्याची चाल होती. कित्येक वेळां या घंटेखालीं पुष्कळ भिक्षेकरीहि जमलेले असत. असे लोक जमलेले पाहून पुष्कळ वेळां कौंटसाहेब एकदम अदृश्य होत. मग काय ते भुईत शिरत कीं आकाशांत उडत, हें सुद्धां समजत नसे. हे भिकारी आपणाजवळ कांहीं मागतील, अशी भीति त्यांना वाटे आणि याच घंटेच्या खालीं कौंटेसबाई क्षुधितांना अन्नदान करीत, अजाऱ्यांना औषधें देत आणि कोणाच्या जखमाहि बांधीत. कौंटसाहेबांच्या कुटुंबांतील सारीं माणसें आणि मुलेंबाळें सुद्धां आपापल्यापरी या आर्त लोकांचा समाचार घेत असत; पण इतकी हकीकत घडत असतां कौंटसाहेब स्वतः कोठेंहि दिसावयाचे नाहींत. एका बाजूनें इतका निर्दयपणा दाखवीत असतां कित्येक वेळां दुसऱ्याची विपत्ति ऐकून त्यांच्या हृदयांत विलक्षण कालवाकालव होत असल्याचेंहि त्यांच्या तोंडावरून दिसून येई."

ॲना सुरोन हिनें सांगितलेल्या सर्वच गोष्टी खऱ्या असतील, असें नाहीं आणि कित्येक प्रसंगीं टॉलस्टॉय यांच्या हातून घडलेल्या गोष्टींचा तिनें केलेला अर्थ बरोबर असेल, असेंहि नाहीं; तथापि टॉलस्टॉय यांची मनोवृत्ति या वेळीं द्विधा झाली असून हें सामाजिक कोडें कसें सोडवावें, याबद्दल त्यांच्या बुद्धीचा कोणताच निश्चय झाला नव्हता; इतकें म्हणण्यास हरकत नाहीं. टॉलस्टॉय यांच्या कद्रूपणाची निदर्शक म्हणून वरील हकीकत ॲना सुरोन हिनें सांगितली आहे; पण या विरुद्ध हकीकती दुसऱ्या शेकडों लोकांनीं शेकडों प्रसंगीं सांगितल्या आहेत. त्या म्यापल झाडाखालीं भिकाऱ्यांचे थवेच्या थवे जमून टॉलस्टॉय यांस चारी बाजूंनीं ते ओढीत असतां आपल्या चित्ताची शांति क्षणभरहि ढळूं न देतां सर्वांचें म्हणणें ऐकून घेऊन त्यांना ते योग्य मदत करीत, असा देखावा शेकडों लोकांनीं प्रत्यक्ष पाहिला आहे. आर्बुझाप नांवाचा दुसरा एक गृहस्थ म्हणतो,

"एकंदरीनें पाहतां उन्हाळ्याच्या दिवसांत टॉलस्टॉय यांच्या घरीं पुष्कळ लोक असत. यांत बरेच यात्रेकरू असत. या सर्व लोकांना कौंट

साहेब द्रव्याची मदत करीत आणि इतक्यांच्या भोजनाची तरतूद लावण्याचें काम मजकडे असे."

" आरंभीं प्रत्येक यात्रेकरूला चार पांच रुपयेपर्यंत टॉलस्टॉय देत असत. ही बातमी बाहेर फुटतांच त्यांच्या घरीं असंख्य यात्रेकरूंचे थवे लोटूं लागले यांत नवल नाहीं. पैसा उकळण्याकरितां वाटेल त्या थापा ते मारीत असत. ही गोष्ट टॉलस्टॉय यांच्या लक्षांत अखेरीस आली, तेव्हां दर यात्रेकरूस आणा दोन आण्यांचे पैसे व एकदां सुग्रास भोजन देण्याचा परिपाठ त्यांनीं घातला."

होतां होईतों पैशाचा व्यवहार करावयाचा नाहीं व हातीं पैसा धरावयाचा नाहीं, असा निश्चय या वेळीं टॉलस्टॉय यांनीं केला होता आणि या बाबीसंबंधींहि अनेक विचित्र गोष्टी ॲना सुरोन हिनें सांगितल्या आहेत. तिच्या सर्वत्र गोष्टी खऱ्या असतील असें नाहीं; तथापि तिच्या हकीकतीवरून टॉलस्टॉय यांच्या या वेळच्या मनःस्थितीचें परीक्षण थोडेंबहुत करतां येईल. ती म्हणते,

"टॉलस्टॉय यांच्या घरीं नानाप्रकारचे लोक येत, यांत कित्येक श्रीमंतहि असत. त्यांची संपत्तीच त्यांना जड झाली होती. त्यांना आळसाचा कंटाळा आला होता. उद्योगधंद्याच्या अभावीं वेळ कसा कंठावा, हें त्यांना ठाऊक नव्हतें, यामुळें त्यांना मनःशांति नव्हती. ही शांति टॉलस्टॉय याजकडे मिळेल अशा समजुतीनें ते त्यांजकडे येत असत. त्याचप्रमाणें श्रीमंत कुटुंबांतल्या कांहीं स्त्रियाहि येत असत. तारुणाच्या अव्वल काळांत अनेक ढंग करून आपले मार्दवादि स्त्री-गुण त्यांनीं नाहींसे करून टाकले होते. या मंडळींत कित्येक वेळां कांहीं विद्यार्थीहि असत. टॉलस्टॉय यांचें शिष्यत्व करावें या बुद्धीनें ते येत. सर्व बाबींत टॉलस्टॉय यांची नक्कल उठविण्याची त्यांची इच्छा होती; पण एकाचें जें अन्न तेंच दुसऱ्याचें विष होऊं शकतें, हें या बिचाऱ्यांना कसें कळणार ?"

" टॉलस्टॉय यांनीं पुष्कळ विद्यार्थी बिघडविले, असा आरोप कांहीं लोक त्यांजवर करीत असत; पण एकाचा मार्ग दुसऱ्याच्या उपयोगीं सर्वत्रैव पडतो, असें नाहीं, हा मुद्दा या आक्षेपकांच्या लक्षांत रहात नाहीं.

टॉलस्टॉय यांचा आचार पुष्कळअंशीं श्रीमंतांच्या मात्र उपयोगी पडण्यासारखा होता. टॉलस्टॉय हे स्वतःची खोली झाडीत आणि शेतांत नांगरहि धरीत. या गोष्टी एखाद्या श्रीमंतानें केल्या, तर त्यांजमुळें याची पचनक्रिया सुधारेल हें खरें; पण केवळ टॉलस्टॉय यांचा अनुयायी म्हणविण्याकरतां एकादा दरिद्री आपला जीव व्यर्थ शिणवूं लागला, तर त्याच्या प्रकृतीला उलट अपाय होईल."

"कित्येक श्रीमंत सरदार घराण्यांतलीं मुलें आपलें मिष्टान्न सोडून रानांत जाऊन पाळेंमुळें खात बसलीं. क्रोन्स्टाड येथील कित्येक श्रीमंत बाया यासनाया येथें येऊन शेतांत काम करूं लागल्या आणि आपलीं जाकिटें खराब करून घेऊं लागल्या. या साऱ्यांचे हेतु चांगले होते यांत संशय नाहीं; पण हीं माणसें भलत्याच मार्गाला लागल्यामुळें तीं पश्चात्तापांत मात्र पडलीं. अखेरीस यांतील कित्येक लोक टॉलस्टॉय यांचे द्वेष्टे बनून त्यांना शिव्यांची लाखोली वहात सुटले आणि कित्येक सांपळ्यांत सांपडलेल्या उंदरासारखे आंतल्या आंतच धडपडूं लागले."

सुरोन बाईनें केलेल्या या टीकेंत पुष्कळ तथ्य आहे, यांत संशय नाहीं. लोकांचें टीकास्त्र सहन करण्याची शक्ति आपल्या अंगांत किती आहे, हें न आजमावितां लोकरीति सोडून जे वागूं लागतात, त्यांची अशीच फसगत नेहमीं होत असते. आजूबाजूचे लोक शेकडों वर्षेंपर्यंत कांहीं विशिष्ट पद्धतीनें वागत आलेले असतात. त्या पद्धति नित्यक्रमाच्या होऊन बसल्यामुळें त्यांतील अडचणी त्यांस जाणवत नाहींत. आणि अशा प्रकारची समाजबंधनें कमकुवत मनुष्यास पुष्कळ अंशीं उपयुक्तच होत असतात. हीं बंधनें ज्याला तोडावयाचीं असतील, त्यानें लोकांचा उपहास गिळून घेण्याची तयारी ठेविली पाहिजे. तेवढी छाती नसेल, तर हुरळली शेळी आणि लागली लांडग्यापाठीं असें तरी करूं नये.

ॲना सुरोन पुढें म्हणते, "कौंटसाहेबांच्या खोलींत डेलफायाच्या देवळासारखा देखावा दिसे. डेलफायाच्या देवळांत जुनीं माणसें ज्याप्रमाणें आपल्या तक्रारींचा निकाल देवाकडून लावून घेत, त्याचप्रमाणें कौंटसाहेब आपल्या खुर्चीच्या सिंहासनावर विराजमान होऊन क्षुद्र मान-

यांच्या तकरारी ऐकत असत. आपल्या भक्तांचें सारें गाऱ्हाणें ते शांतपणें ऐकून घेत. एखाद्या भक्ताजवळ सोनें पुष्कळ जमलेलें असे, आणि त्याचें काय करावें, हें त्याला समजत नसे. आपली बायको अत्यंत उधळी, अशी तक्रार एक करी, तर दुसरा ती अत्यंत कंजुष असें म्हणे. तिसऱ्या एकाद्यानें यावें आणि आपल्या दुष्कृत्यांचा पाढा कौंट यांजपाशीं वाचावा. या प्रत्येकाला कौंटसाहेब उपदेशाचे दोन शब्द सांगत; पण त्यांच्या स्वतःच्याच हृदयांत कितपत प्रकाश होता, तें कोणीं सांगावें ! तथापि त्यांचा हा अंधुक संधिप्रकाशच त्यांच्या दर्शनासाठीं येणाऱ्या सुसंस्कृत यात्रेकरूंस पुरेसा होई. एकादा फोटोग्राफर त्या वेळीं तेथें असता, तर मनुष्य जातीचे नानाप्रकारचे नमुने चित्रित करून त्यानें आपलें नांव अजरामर करून टाकलें असतें. यासनायाच्या राजरस्त्यावर सर्व प्रकारचे लोक हिंडतांना आढळतात."

"यासनायांतील लोक कौंटसाहेबांवर फार प्रेम करीत असत; तथापि त्यांचें प्रेम निःसीम नव्हतें, असा माझा समज आहे. कारण, कौंटसाहेब आपल्या शेतकऱ्यांस जरी त्रास देत नसत, तरी त्यांच्या उपयोगीहि फारसे पडत नसत. त्यांचें मुख्य धर्ममत म्हटलें म्हणजे स्वावलंबन हें होय. कोणीं कोणापाशीं कसलीच याचना करूं नये आणि कोणीं कोणापाशीं कसलीहि मदत मागूं नये, हा त्यांचा मतांचा निष्कर्ष होता. तथापि, 'स्वतःप्रमाणेंच आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर' असाहि उपदेश प्रत्येकाला ते करीत."

"कौंटसाहेबांचीं खरीं धर्ममतें तरी कोणतीं, याबद्दल साऱ्या जगभर मोठमोठ्या पंडितांतहि रणें माजून त्याचा निकाल लागला नाहीं, मग तीं बरोबर समजण्याइतकें शहाणपण यासनायांतील गरीब शेतकऱ्यांत कोठून असणार ! कौंटसाहेब त्यांच्या बरोबर नांगर धरीत आणि इतर शेतकीचीं कामें करीत; पण एकादे वेळीं त्यांची मर्जी फिरलेली असली कीं, त्यांच्या पोटांत निजून राहिलेला सोळाव्या शतकांतील सर्फ लोकांचा धनी एकदम जागा होई. त्यांच्यापासून हातभर अंतरावर असलेल्या शेतकऱ्यालाहि ते एवढ्यानें ओरडून बोलत कीं, जणूं काय तो कोस दोन कोसांवर

असावा. त्यांच्या मनांत कोणाला कांहीं देण्याचें नसलें, म्हणजे एकाद्या भिकाऱ्याच्या अंगावर ते वस्कन् धांवून जात."

इ० स० १८८३ च्या मे महिन्यांत टॉलस्टॉय यांची प्रकृति थोडीशी नादुरुस्त झाली होती. आपला जुना क्षयरोगाचा विकार पुन्हां उद्भवत आहे, असें त्यांस वाटलें. तेव्हां कुमिस (घोडीचें ताक) पिण्याकरितां ते समारा प्रांतीं गेले. तेथून आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात,

"माझ्या चित्ताला सध्यां आनंद नाहीं, तथापि तें शांत आहे. कांहीं तरी काम करीत राहिल्याशिवाय मला बरें वाटत नाहीं. काल सारा दिवस मीं गप्पागोष्टींत घालविला; पण संध्याकाळीं मला अतिशयित पश्चात्ताप होऊं लागला."

"पुढें काय होणार, हें मला सांगतां येत नाहीं; पण जमीनदार या नात्यानें माझी आजची स्थिति फारशी सुखाची नाहीं. शेकडों गरीब लोक येऊन मजपाशीं मदतीची याचना करतात; पण इतक्यांना मी कोठवर पुरा पडूं ! माझ्या या सडक्या शरीराचा विचार सुद्धां मला असह्य होतो; तथापि घोडीचें ताक मला मानवेल असें दिसतें. माझें शरीर आणि मान हीं ताळ्यावर आलीं म्हणजे जिवंत असेपर्यंत कांहीं तरी सत्कार्य माझ्या हातून घडेल. केवळ एवढ्याच विचारानें मी सध्यां येथें राहिलों आहें."

टॉलस्टॉय यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें या खेपेलाहि अनेक पंथवाल्यांच्या भेटी घेऊन त्यांच्याशीं त्यांनीं संभाषण केलें. त्यांत विशेषेंकरून मोलोकान् पंथाच्या धर्मगुरूशीं त्यांचीं संभाषणें बरींच झालीं. आपलीं स्वतःचीं धर्ममतें काय आहेत, या गोष्टीचा खल टॉलस्टॉय अगदीं मोकळेपणीं करीत, 'तुमचीं हीं चालू पंथाविरुद्ध असलेलीं मतें सरकारच्या कानापर्यंत गेलीं, तर तुम्हास कदाचित् हद्दपार करतील. कदाचित् स्वतःच्या घराबाहेर तुम्ही पडूं नये, असाहि हुकूम तुम्हास येईल. अथवा याहून एकादी अमानुष शिक्षा तुम्हास देण्यास रशियन सरकार माघार घेणार नाहीं,' असें त्यांना त्यांची मित्रमंडळी म्हणाली, तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, "कांहीं हरकत नाहीं. माझ्या कृत्याची कागाळी सरकारपर्यंत जाईल आणि सरकार मला शिक्षा करील, या भीतीनें माझ्या मतांपासून मी परां-

उन्मुख होणार नाहीं अथवा त्यांचा उपदेश लोकांस करण्यासहि सोडणार नाहीं.”

या खेपेला दोन क्रांतिकारक पक्षाचीं माणसें टॉलस्टॉय यांस समाराप्रांतीं भेटलीं. इ० स० १८७८ सालीं १९३ लोकांवर जो खटला झाला होता, त्यांत हे दोन असामी होते. क्रांतिकारक पक्ष आणि टॉलस्टॉय यांचा एका बाबींत जबर मतभेद होता आणि हा मतभेद कधींच नाहींसा न झाल्यामुळें या पक्षाला टॉलस्टॉय यांचा पाठींबा कधींच मिळाला नाहीं. टॉलस्टॉय हे निःशस्त्र प्रतिकाराचे कट्टे पुरस्कर्ते होते. टॉलस्टॉय यांचें हें मत क्रांतिकारक पक्षाला कधींच मान्य झालें नाहीं; तथापि बाकीच्या बाबींत क्रांतिकारक पक्षाचें म्हणणें टॉलस्टॉय यांस मान्य होतें. प्रतिकाराच्या एका बाबीशिवाय बाकीच्या गोष्टींबद्दल या पक्षाच्या मनांत त्यांच्याविषयीं सहानुकंपा होती; पण प्रतिकाराच्या या तत्वावर ते इतक्या निकरानें बोलत कीं, हे खरोखर सरकारच्या बाजूचे आहेत कीं काय, असाहि संशय पुष्कळांस येई. एके वेळीं तर त्यांच्या स्नेह्यांपैकीं ह्या पक्षांत कोण आहेत, याची चवकशी करण्याकरतां एक गुप्त पोलिस कामदार यांजकडे आला होता. हीं नांवें टॉलस्टॉय मोठ्या खुषीनें आपल्या स्वाधीन करतील असा त्याचा समज झाला होता; पण हा प्रश्न करतांच संतापून टॉलस्टॉय त्याला म्हणाले, ‘भल्या माणसा, तुला सदसद्विवेकबुद्धि नाहीं आणि अब्रूची चाडहि नाहीं. दुसरे सारे लोक तुझ्यासारखेच आहेत, असें तुला वाटतें काय?’ एवढें उत्तर देऊन त्यांनीं आपल्या घराबाहेर त्याची एकदम रवानगी केली.

टॉलस्टॉय समाराप्रांतीं असतां टूरजीनेफ याजकडून पुढील पत्र त्यांस आलें. त्याचें हें अखेरचेंच पत्र होय. हें पत्र पेन्सलीनें लिहिलेलें असून त्याखालीं त्यानें सहीसुद्धां केलेली नाहीं.

ता. २८ जून १८८३.

“ प्रिय लियो निकोलिव्हिच, आज फार दिवसांत मी तुम्हास पत्र लिहिलें नाहीं. याचें कारण हेंच कीं, आज पुष्कळ दिवस मी आसन्नमरण स्थितींत आहें. यांतून मी बरा होईन असें मला दिसत नाहीं. आतां बरें

होण्याबद्दल बोलावयासच नको. आज हें पत्र लिहिण्यास एकच कारण आहे, तें हें कीं, तुमचा समकालीन असण्यांत मला किती आनंद होतो, हें तुमच्या कानीं घालावें आणि तुम्हाला एक अखेरची विनंतीहि करावी. साहित्यसेवेकडे आपलें मन पुन्हां वळवावें, इतकीच माझी अत्यंत अगत्याची मनःपूर्वक विनंति आहे. ज्या ठिकाणांतून सर्व मंगलमय वस्तूंची प्राप्ती होते, तेथूनच ही मोठी देणगी तुम्हास मिळाली आहे, माझी विनंति तुम्ही खचित मनास आणाल, अशी खात्री माझ्या चित्ताला वाटली असती, तर केवढा तरी आनंद मला झाला असता. माझें अवतारकार्य आतां समाप्त झालें. माझ्या रोगाला नांव काय द्यावें, याचें सुद्धां वैद्यांना मोठें कोडें पडलें आहे, माझ्यानें चालवत नाहीं. या दुखण्याचा पाढा तरी कोठवर वाचावा. लोकांना तें सांगण्याचा देखील मला कटाळा आला आहे. साहित्याचार्या, माझ्या मित्रा, माझ्या विनंतीचा अव्हेर तूं करूं नकोस. हें कागदाचें चिठोरें पोंचल्याचें उत्तर यावें. आतां येथूनच आणखी एकवार मी तुम्हास आलिंगन देतों, मी थकून गेल्यामुळें माझ्यानें आतां जास्त लिहवत नाहीं."

टूरजीनेफ आणि टॉलस्टॉय या दोन विख्यात साहित्यकारांचे पूर्वसंबंध लक्षांत घेतले, म्हणजे हें पत्र अधिकच करुणामय वाटूं लागतें. टूरजीनेफ याला राग येण्यासारख्या अनेक गोष्टी टॉलस्टॉय यांनीं केल्या होत्या. टूरजीनेफ याच्या हृदयाची परीक्षा टॉलस्टॉय यांस कधींच झाली नव्हती; पण अशा स्थितींतहि साऱ्या गतगोष्टी विसरून जाऊन केवळ साहित्यभक्तीनें वरील पत्र त्यानें टॉलस्टॉय यांस लिहिलें, यांत त्याच्या मनाचा मोठेपणा स्पष्ट दिसून येतो. त्याचप्रमाणें टॉलस्टॉय यांच्या मनःस्थितींत केवढी खळखळ उडाली होती आणि साहित्यसेवेपासून पराङ्मुख होण्यास त्यांना बलवत्तर कारणें कशीं घडलीं होतीं; याची गंधवार्ताहि टूरजीनेफ यास नव्हती, हेंहि दिसून येतें. यापुढें कादंबऱ्या लिहित बसणें टॉलस्टॉय यांस शक्य नव्हतें, ही गोष्ट त्याच्या ध्यानीमनींहि आली नाहीं. यापुढें टॉलस्टॉय यांनीं केलेला साहित्याचा उद्योग कादंबरी लेखनाच्या दृष्टीनें कमी मनोरंजक असला, तरी मानवजातीच्या हिताच्या दृष्टीनें तो

अत्यंत महत्वाचा आहे, यांत शंका नाहीं. 'आत्मनिवेदन' ( १८७९ ) या ग्रंथापासून तों 'मी गप बसणार नाहीं' ( १९०८ ) पर्यंत जे लेख त्यांनीं लिहिले, ते त्यांनीं लिहिले नसते, तर त्यांची जी ख्याती साऱ्या जगभर आणि सर्वतोमुखीं झाली आहे, ती झाली असती कीं नाहीं, याची बरीच शंका आहे. या अवधींत मानवी जीवितक्रमाला अत्यंत उपयुक्त, अशा अनेक प्रश्नांची चर्चा त्यांनीं केली. ते प्रश्न सोडवितांना आलेल्या अडचणींस मोठ्या धैर्यानें त्यांनीं तोंड दिलें. धर्ममार्ग म्हणजे काय, हें आपल्या प्रत्यक्ष उदाहरणानें त्यांनीं जगाला दाखविलें. ते स्वतः मोठे चतुर साहित्यकारागीर होते, हें खरें; पण ज्या गोष्टीसाठीं या आपल्या ईश्वरदत्त देणगीला आणि आवडत्या कलेला अखेरचा रामराम यांनीं ठोकला त्या गोष्टी साहित्यसेवेपेक्षां किती तरी पटीनें निःसंशय अधिक महत्वाच्या आहेत. या गोष्टींमुळेंच लक्षावधि स्त्रीपुरुषांचीं मनें त्यांच्या चरित्राकडे वळलीं. पुष्कळ पतित लोक सुमार्गास लागले. खरी लोकसेवा कशांत आहे. हें पुष्कळांस समजलें. रशियाची स्थिति सुधारण्याकरतां मोठमोठ्या श्रीमंत आणि खानदानीच्या घराण्यांतील तरुण मुलांमुलींनीं जो आत्मयज्ञ पेटविला, त्यालाहि टॉलस्टॉय यांचे हेच लेख पुष्कळ अंशीं कारण झाले. टॉलस्टॉय यांच्या जीवनक्रमास अगदीं निराळें वळण लागत असून त्याचा चिरपरिणाम साऱ्या रशियावर कादंबऱ्यांपेक्षां अधिक घडणार आहे, ह्या गोष्टींचें स्वप्नसुद्धां टूरजीनेफ यास पडलें नव्हतें. मानवहिताच्या दृष्टीनें साहित्यकलेपेक्षां अधिक उपयुक्त अशा धर्मसंशोधाच्या कामाकडे टॉलस्टॉय यांचें चित्त वळलें आहे, ही गोष्ट टूरजीनेफ यास कळली नव्हती.

टॉलस्टॉय यांच्या बुद्धिमत्तेबद्दल टूरजीनेफच्या मनांत जी कांहीं पूज्यबुद्धि होती, ती त्यांच्या कादंबरी लेखनामुळें मुख्यतः उत्पन्न झाली होती. कादंबरीलेखन सोडून टॉलस्टॉय यांची बुद्धि धर्म, तत्वज्ञान, नीतिसिद्धांत आणि समाज या विषयांकडे वळली, तेव्हां टूरजीनेफप्रमाणेंच आणखीहि पुष्कळांना फार वाईट वाटलें. पण यांत टॉलस्टॉय यांस कमीपणा येत नसून असें म्हणणाऱ्या लोकांच्या बुद्धीचा कोतेपणा मात्र दिसतो, असेंच म्हणणें भाग आहे. उत्तम प्रतीचे कादंबरीकार म्हणून जी टॉलस्टॉय

यांची ख्याति आहे तीहि रचनेच्या चमत्कृतीवर अथवा नुसत्या भाषा-सौष्टवावर नसून त्यांत जी सत्यशोधनाची लालसा आणि जें विचार-प्रागल्भ्य आहे, त्यावरच अवलंबून आहे. अगदीं पहिल्या कादंबरीपासून तों थेट अखेरच्या लेखापर्यंत टॉलस्टॉय यांच्या लेखांत त्यांच्या अंतः-करणाचा हा विशेष सर्वत्र वाढत्या प्रमाणावर दिसून येतो. त्यांच्या तत्त्व-प्रधान लेखांचें ग्रहण ज्यांची बुद्धि करूं शकेल, त्यांनाच त्यांच्या अनेक कादंबऱ्यांचें खरें स्वारस्य कळून येईल.

टूरजीनेफच्या वरील पत्राचें उत्तर टॉलस्टॉय यांनीं बरेच दिवस पाठ-विलें नाहीं आणि अखेरीस हें उत्तर जाण्यापूर्वींच टूरजीनेफ ता. २२ आगष्ट रोजीं मृत्यु पावला. या पत्राचें उत्तर देऊं नये अशी त्यांची इच्छा होती, पण अधिक स्थिर मनाच्या स्थितींत या पत्राचें उत्तर सवि-स्तरपणें लिहून टूरजीनेफचे आक्षेप दूर करावेत या हेतूनें त्याचें उत्तर त्यांनीं लवकर पाठविलें नाहीं आणि मध्यंतरींच टूरजीनेफ मरण पावल्यामुळें ही गोष्ट तशीच अर्धवट राहिली, याबद्दल टॉलस्टॉय यांस फार वाईट वाटलें.

इ. स. १८८३ सालच्या सप्टेंबर महिन्यांत टॉलस्टॉय यांचें कुटुंब मास्को येथें गेलें; पण ते स्वतः यासनायासच राहिले होते. यासनायाजव-ळील असलेल्या जिल्हाकचेरींतून ज्यूरीमन म्हणून हजर रहाण्याकरतां टॉलस्टॉय यांस बोलावणें झालें. याची हकीकत पुढील पत्रांत त्यांनीं लिहिली आहे.

" क्रापिवनीच्या कोर्टांतून ज्यूरीसाठीं आज मला बोलावणें आलें होतें. तीन वाजतां मी न्यायसभेला पोहोंचलों. कोर्टाचें काम अगोदरच सुरू झालें असल्यामुळें मला शंभर रुपये दंड झाला. पुढें ज्यूरीच्या कठड्यांत मला घालूं लागले, तेव्हां हें काम मला करतां येत नाहीं, असा जबाब मीं दिला. 'असें कां?' असा प्रश्न कोर्टानें केला, तेव्हां मीं म्हटलें, 'माझ्या धर्ममतांमुळें मला तसें करतां येत नाहीं.' असा जबाब मीं दिला. कोर्टानें पुन्हां एकवार मला विचार करण्यास सांगितलें; पण माझें मत बदलतां येत नाहीं, हाच जबाब देऊन मी तेथून बाहेर पडलों. आतां आज आणखी शेंदोनशें रुपये दंड मला होईल असें वाटतें आणि हें

प्रकरण एवढ्यावरच कदाचित् संपेल. मी केलें हें अगदीं बरोबर आहे, असेंच तुलाहि वाटेल, अशी माझी खात्री आहे. फार काय; पण कोर्टा-पर्यंत मी गेलों, ही सुद्धां माझी चूकच झाली असें वाटतें; पण झालें तेंहि एका अर्थी बरेंच म्हटलें पाहिजे. कारण माझें मत अशा रीतीनें एकदां स्पष्ट कळल्यावर असल्या कामासाठीं ते मला पुन्हां बोलावणार नाहींत, असें वाटतें."

मुलकी अथवा फौजदारी न्यायपद्धतीबद्दल टॉलस्टॉय यांच्या मनांत आदरबुद्धि केव्हांच नव्हती. त्याचप्रमाणें तुरुंगाच्या व हद्दपारीच्या शिक्षा देणें, हेंहि त्यांना पसंत नव्हतें. त्यांनीं जें अप्रतिकाराचें तत्त्व या वेळीं स्वीकारलें होतें, त्यालाहि त्यांचें हें वर्तन अनुरूप असें होतें. अप्रतिकाराचें तत्त्व खुद्द ख्रिस्तानें सांगितलें आहे, आणि तें तत्त्व योग्यहि आहे, अशी त्यांच्या चित्ताची पूर्ण भावना होती आणि तिला अनुसरूनच त्यांचें वर्तन होतें.

या वेळीं रशियन साहित्यमंडळ या नांवाची एक मंडळी स्थापन झाली होती. टूरजीनेफबद्दल एक स्मारकसभा बोलवावी असा विचार करून या ग्रंथकाराबद्दल एकादा लेख त्या प्रसंगीं तुम्ही स्वतः वाचावा असें पाचारण या मंडळीकडून टॉलस्टॉय यांस झालें होतें.

आक्टोबर महिन्यांत आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रांत याबद्दल पुढीलप्रमाणें टॉलस्टॉय लिहितात.

"माझें आयुष्य सध्यां किल्ली दिलेल्या घड्याळाप्रमाणें चाललें आहे. सकाळीं नऊ वाजतां उठून मी रानांत फिरण्यास जातों. फिरून आल्या-वर थोडी कॉफी घेऊन अकरा वाजतां मी कामाला लागतों आणि साडे-तीन वाजतां पुन्हां रानांत जातों. संध्याकाळीं परत येऊन टूरजीनेफचे ग्रंथ वाचीत बसतों. सध्यां मला टूरजीनेफाशिवाय दुसरा कसलाहि विचार सुचत नाहीं. सध्यां फक्त त्याच्याच ग्रंथांचें माझें वाचन सुरू आहे. त्याच्याबद्दल कांहीं तरी लेख लिहिण्याचा माझा निश्चय झाला आहे."

याच विषयाबद्दल आपल्या वहिणीला लिहिलेल्या पत्रांत कौंटेसबाई म्हणतात. "तारीख २३ आक्टोबर रोजीं टूरजीनेफबद्दल एक जाहीर

भाषण लिओ करणार आहेत. यामुळें साऱ्या शहरांत मोठी चळवळ झाली असून विश्वविद्यालयाच्या सभागृहांत त्या दिवशीं अतोनात गर्दी होणार असें दिसतें."

या सभेची हकीकत पुढें काय झाली, हें त्यांच्याच पत्रावरून समजेल,

"टूरजीनेफ यांची स्मारकसभा आणि त्याविषयीं होणारें लिओ यांचें भाषण या गोष्टींना सरकारांतून बंदी झाली, ही हकीकत वर्तमानपत्रांतून तुला कळली असेलच. या व्याख्यानांत कोणताहि राजकीय संबंध नव्हता अथवा तेथें शांतताभंग होईल असाहि संभव नव्हता. राजकीय बाबींचा उल्लेख करावा, हा विचारसुद्धां कोणाच्या मनांत नव्हता; पण प्रधानाच्या चाळ्यांपुढें कोण काय करणार ? या बंदीमुळें सारेच लोक अगदीं चकित होऊन गेले आहेत. ही सभा झाली असती, तर बादशाहीचें कोणतें नुकसान झालें असतें ? सरकार आपलें काम करून चुकलें आतां लोकांनीं वाटतील ते तर्कवितर्क खुशाल करावेत."

"सरकारच्या या कृतीबद्दल साऱ्याच लोकांना फार राग आला आहे; पण लियोना एका अर्थीं हेंहि बरेंच वाटतें. जाहीर सभांतून भाषणें करण्याची संवय त्यांना नाहीं, आणि तसें कांहीं करण्याची इच्छाहि त्यांना नाहीं. ते सदोदित कांहीं तरी लिहीत असतात; पण हे त्यांचे लेख छापण्याची परवानगी त्यांना मिळणार नाहीं, हें ठरलेलेंच आहे."

टॉलस्टॉय हे कोणत्याहि राजकीय पक्षाचे प्रवर्तक नव्हते. किंबहुना राजकीय विषयांत त्यांनीं कधींच मन घातलें नाहीं. त्यांच्यासारख्या साहित्याचार्यांनीं टूरजीनेफबद्दल चार शब्द सांगितले असते, तर एकंदर साहित्यसमूहांत कायमची भर पडली असती यांत शंका नाहीं; पण अशा प्रकारच्या निरुपद्रवी भाषणालाहि रशियन सरकारांतून बंदी झाली. यावरून तिसऱ्या आलेक्झांडर बादशहाची कारकीर्द कशी चालत असेल, याचें अनुमान कोणासहि करतां येईल. आपली गादी कायम ठेवावी या एकाच हेतूनें त्याचा सारा राज्यकारभार चालत होता. या हेतूनें त्यानें जीं जीं कृत्यें केलीं त्यामुळें चांगल्या विचारी लोकांचीं मनेंहि त्याच्या राज्यपद्धतीबद्दल अगदीं विटून गेलीं.

आतां हा सार्वजनिक विषय थोडासा बाजूस ठेवून त्यांच्या खाजगी चरित्राबद्दल सुरोनबाई काय म्हणते हें पाहूं.

"आज संध्याकाळीं कौंटसाहेबांना त्यांच्या तरुणपणांतील दिवसांची आठवण झाल्यासारखें दिसलें. आपल्या खोलींत एकाद्या तरुणाप्रमाणें ते आज नाचत होते. आणि खरें म्हणाल तर त्यांच्या चापल्यावरून त्यांच्या वयांतून वीस वर्षें तरी कमी झालीं असावींत, असें कोणासहि वाटलें असतें. कौंटसाहेबांच्या आंगीं एक मोठा विलक्षण गुण आहे. तो हा कीं, त्यांनीं कांहीं केलें तरी त्यांत पोरकटपणा कोणालाहि दिसत नाहीं. त्यांनीं कसलाहि विचित्र पोषाक केला आणि फाटक्या पायमोज्या-वर तुटके बूट घातले तरी त्यांजकडे पाहून थट्टेनें हंसण्याची इच्छा कोणा-लाहि होणार नाहीं."

त्या दिवशीं टॉलस्टॉय यांस जो इतका विलक्षण आनंद झाला होता, त्याचें कारण त्या दिवशीं ते बूट शिवण्यास शिकले हें होय. लोकांकडून शक्य तितकी कमी सेवा घेणें आणि लोकांची शक्य तितकी अधिक सेवा करणें, या त्यांच्या नीतितत्वाला अनुसरूनच ही नवी विद्या शिकण्यास त्यांनीं सुरुवात केली. त्यांनीं एकाद दुसरा बूट शिवला, त्या गोष्टीचें महत्त्व पैशाच्या अथवा धंद्याच्या दृष्टीनें ठरवावयाचें नसून त्याच्या पोटीं असलेल्या नीतितत्त्वावर त्याचें मोल ठरवावयाचें आहे. पुढें थोड्याच दिवसांनीं स्वतःच्या हातचे बूट घालून कौंटसाहेबांची स्वारी हिंडू लागली.

ॲना सुरोन पुढें म्हणते, "या त्यांच्या कामाबद्दल लोकांनीं केलेली स्तुति त्यांना आवडत असे. बूट शिवण्यांतहि किती अडचणी येतात, याचें वर्णन मोठ्या उत्साहानें ते करीत. अखेरीस स्वतःच्या हातानें त्यांनीं एक बूट तयार केला, तेव्हां स्वारी अगदीं खूष झाल्यासारखी दिसली."

या वेळीं 'माझीं मतें' हा ग्रंथ टॉलस्टॉय लिहीत होते. नेहमींच्या संवयीप्रमाणें हा लेखहि दोन तीन वेळ तपासून व पुनः पुन्हां शोध घालून तो इ. स. १८८३ च्या नोवेंबर महिन्यांत पुरा केला. ग्रंथ पुरा झाल्यावर विश्रांतीकरतां टॉलस्टॉय यासनाया येथें गेले. तेथून आपला मित्र स्ट्रॅहाफ

त्याला त्यांनीं एक पत्र लिहिलें. सुप्रसिद्ध रशियन कादंबरीकार डोस्टोयेस्की याचें चरित्र लिहिलें होतें. या ग्रंथासंबंधीं या पत्रांत पुढील उल्लेख आहे.

"तुमचें सर्व पुस्तक मीं वाचलें. डोस्टोयेस्कीसंबंधीं जो गैरसमज साऱ्या लोकसमुहांत आहे, तोच तुमच्या ठिकाणींहि आहे, असें मला दिसून आलें. डोस्टोयेस्की याचें फाजील स्तोम लोकांनीं माजविलें आहे. त्याला सत्पुरुषांच्या आणि अवताऱ्यांच्या मालिकेंत नेऊन बसविण्याचा यत्न पुष्कळ लोक करीत असतात, आणि तुम्हींहि तेंच केलें आहे; पण त्याच्या स्वतःच्या अंतःकरणांत सत् आणि असत् यांचें भांडण सतत सुरू होतें. हें भांडण निकालास लागण्याच्या पूर्वींच त्याला मरण आलें. त्याचे लेख फार सुंदर आहेत, आणि वाचकांचें हृदय हालवून सोडण्याची कला त्याजपाशीं उत्तम होती, ही गोष्ट खरी; पण तेवढ्यावरून देवघरांत बसण्याच्या योग्यतेचा तो होता, असें मात्र ठरत नाहीं. तुम्हीं त्याला भावी पिढीचा गुरु केलें आहे आणि ही तुमची चूक आहे. एखादा हजार दोन हजार किंमतीचा उत्तम घोडा असावा; पण त्याला मध्येंच बिचकण्याची खोड असावी, तसा तुमचा लेख आहे. त्या एका खोडी-मुळें त्याचा बाकीचा चांगुलपणा निष्फळ होतो. खुद्द डोस्टोयेस्कीच्या ठिकाणींहि हीच खोड होती, त्याची शारदा आपल्या मुक्कामाला सरळ-पणें केव्हांच पोहोंचत नाहीं. तिलाहि मध्येंच बिचकण्याची आणि थब-कण्याची संवय आहे. हा दोष टूरजीनेफच्या ठिकाणीं आढळावयाचा नाहीं. त्याचा विचारप्रवाह अव्वलपासून अखेरपर्यंत संथ आणि अस्ख-लित चालेल. डोस्टोयेस्कीपेक्षां टूरजीनेफचें नांव शारदामंदिरांत अधिक काळ राहील. टूरजीनेफची साहित्यकला अधिक श्रेष्ठ आहे, असें माझें म्हणणें नाहीं; पण त्याच्या ठिकाणीं हें अस्थैर्य नाहीं."

या वेळीं टॉलस्टॉय आगगाडीच्या स्टेशनावरून गाडींतून घरीं येत असतां त्यांचें एक पाकीट रस्त्यांत पडून गहाळ झालें. त्यांत त्यांचे कांहीं हस्तलेख व 'माझीं मतें' या पुस्तकाचेहि कांहीं भाग होते; पण त्या भागांतील विचार टॉलस्टॉय यांच्या चित्तांत इतके भरून गेलेले होते कीं, ते पुन्हां लिहून काढण्यांत त्यांस मुळींच श्रम वाटले नाहींत.

हा लेख सरकारी परीक्षकांकडे पाठवून कांहीं उपयोग होणार नाहीं, ही त्यांची खात्री होतीच. तेव्हां त्याच्या प्रथम पन्नासच प्रति परवानगी न घेतां छापाव्यात असा विचार त्यांनीं केला. एकाद्या लेखाच्या प्रती अगदीं थोड्या असल्या तर सरकारी परीक्षक फारसा विचार न करतां कित्येक वेळां त्या प्रसिद्ध होऊं देत. कारण त्यांचा प्रसार केवळ खाजगी मित्रमंडळींत होणार, असें त्याला वाटे. हा त्यांचा बेत फलद्रूप होणार अशीं चिन्हें आरंभीं दिसत होतीं. या बाबतींत ता. २९ जानेवारी सन १८८४ चें पुढील पत्र कौंटेसबाईनें लिहिलें आहे.

"आपलें पुस्तक धार्मिक लेखपरीक्षकांच्या हातीं गेलें आहे, अशी बातमी मला लागली आहे. 'या ग्रंथांत कांहीं उच्च सिद्धांत आहेत आणि ते प्रत्येकाला मान्य होण्यासारखे आहेत' असेहि उद्गार परीक्षक मंडळाच्या अध्यक्षानें काढल्याचें समजतें. पण या खात्याचे प्रधान तोंडपुजे असल्या-मुळें अखेरीस काय निकाल लावतील, हें सांगवत नाहीं. सध्यां तरी त्याचा निश्चित निकाल झालेला नाहीं."

कौंटेसबाईचा अजमास अखेरीस खरा ठरला. प्रधान साहेबांनीं पुस्त-काच्या प्रकाशनास मंजुरी दिली नाहीं. या साऱ्या हकीकतीची बातमी लोकांत पसरली असल्यामुळें यासंबंधीं मोठीच चळवळ उडाली. धार्मिक ग्रंथांच्या परीक्षक कमिटीनें नापसंत केलेले लेख जाळून टाकावेत असाहि कायदा होता; पण लोकांत बऱ्याच जोराची चळवळ झाल्यामुळें त्याची अंमलबजावणी मात्र झाली नाहीं. सरकारनें या साऱ्या प्रती आपल्या मोठ्या कामदार मंडळींत वांटून टाकल्या.

अशा रीतीनें या ग्रंथाला सरकारांतून बंदी झाली खरी; पण त्याच्या हस्तलिखित आणि शिलालिखित प्रती शेंकड्यांनीं तयार होऊन त्यांचा प्रसार जारीनें सुरू झाला. अखेरीस तें राजरोसपणें जिनीव्हा येथें प्रथम छापले गेलें आणि पुढें लवकरच बहुतेक युरोपीय भाषांत त्याचीं भाषांतरें-हि झालीं. इतकें झालें तरी रशियांत त्याला पुढें बराच काळ बंदी होती.

इ. स. १८८४ च्या सबंध सालांत टॉलस्टॉय यांनीं लिहिलेल्या डिसें-ब्रिस्ट या नांवाच्या कादंबरीचे कांहीं भाग एका साहित्यमंडळाच्या

मासिकातून प्रसिद्ध झाले. ही अर्धवट कादंबरी इ. स. १८८४ च्या अगोदर कित्येक वर्षं त्याजजवळ लिहून पडली होती. त्यांच्या एकंदर लेखांपैकीं अखेरीस एवढ्याच लेखाला प्रकाशनाची परवानगी सरकाराकडून मिळाली.

हें साहित्यमंडळ टॉलस्टॉय यांच्या मदतीनेंच इ. स १८५७ सालीं रौशिनीन् यानें प्रथम स्थापन केलें होतें. गरीब स्थितींतल्या साहित्य-सेवकांना पैशाची मदत करावी, हा या मंडळाचा हेतु होता.

टॉलस्टॉय यांच्या कांहीं तत्वांचें मनःपूर्वक ग्रहण करणारा एक शिष्य या वेळीं त्यांना भेटला. याचें नांव चरकॉफ असें होतें. हा गार्ड पलटणींत कप्तानाच्या हुद्यावर असून अप्रतिकार तत्वाच्या पाळनासाठीं त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला. याचा बाप सेनापतीच्या हुद्यापर्यंत चढला असून खुद्द बादशहाच्या दरबारांतहि त्याचें चांगलें वजन होते. चरकॉफ हा घरचा चां॰ ला श्रीमंत असून आपल्या बापाचा तो एकुलता एक मुलगा होता. त्याच्या आईची वग खुद्द राणीपर्यंत असून राणीचा व तिचा स्नेहहि होता. चरकॉफ घरचा चांगला श्रीमंत आणि त्यांतून एकुलता एक. यामुळें फाजील लाडानें तो बिघडला यांत नवल नाहीं. श्रीमंतांच्या व्यसनी मुलांना जितके छंद लागणें शक्य आहे, तितके सारे त्याला होते; तथापि त्याची बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारची असून खे'ट्याचा विलक्षण तिटकारा त्याला होता. त्याच्या मनाची वाढहि जवळ जवळ टॉलस्टॉय यांच्या पद्धतीनेंच होत होती. आतां टॉलस्टॉय वृद्ध व तो तरुण होता; तथापि तत्वदृष्ट्या दोघांची मानसिक स्थिति समसमान असल्यामुळे या वृद्ध-तरुणांत लवकरच चांगला स्नेह जमला. टॉलस्टॉय यांच्या लेखांवरून त्यांजबद्दलची बरीच माहिती चरकॉफ याला अगाऊ झाली होती. अखेरीस इ. स. १८८३ च्या डिसेंबर महिन्यांत टॉलस्टॉय मास्को येथे गेले असतां या दोघांचा प्रत्यक्ष परिचय झाला. पाहिल्या दृष्टिभेटीबरोबरच या दोघांत जो स्नेह जमला, तो टॉलस्टॉय यांच्या मृत्यूपर्यंत कायम राहिला. आपल्या मतांच्या बाबतींत टॉलस्टॉय कित्येक प्रसंगीं आतताई सुद्धां होतात, असा आक्षेप त्याच्या पुष्कळ स्नेह्यांनीं सुद्धां घेतला आहे. पण

चरकॉफ याचें मत याच्या विरुद्ध आहे. वस्तुतः जितक्या कठोरपणें आपल्या मतांचें प्रतिपादन करावयास पाहिजे होतें, तितकें त्यांनीं तें केलें नाहीं, असें चरकॉफचें मत आहे.

इ० स० १८८४ च्या जानेवारी महिन्यांत गे या नांवाचा सुप्रसिद्ध चित्रकार मास्को येथें आला होता. त्याची व टॉलस्टॉय यांची भेट टॉलस्टॉय यांच्याच घरीं झाली. या भेटीची हकीकत गे याच्या सुनेनें पुढीलप्रमाणें सांगितली आहे.:—

"संध्याकाळीं आम्हीं सारे टॉलस्टॉय यांच्या घरीं त्यांच्या भेटीसाठीं गेलों होतों. टॉलस्टॉय यांजसंबंधीं गे यांच्या मनांत विलक्षण पूज्यभाव होता. यामुळें टॉलस्टॉय दृष्टीस पडतांच गे यांच्या मनाची विलक्षण स्थिति होऊन बराच वेळपर्यंत ते त्यांच्या तोंडाकडे पहात राहिले. टॉलस्टॉय यांच्या तोंडून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द झेलण्यासाठीं ते विलक्षण आतुर असल्याचें दिसलें. टॉलस्टॉय यांनींहि त्यांना फार ममतेनें वागवून आपलें चित्र काढण्याची परवानगी त्यांना दिली. 'आतां आम्हीं काय केले पाहिजे' हा लेख लिहीत आहेत, अशा देखाव्याचें टॉलस्टॉय यांचें सुंदर चित्र गेनीं या वेळीं तयार केलें."

हें चित्र काढण्यासाठीं गे रोज ठरलेल्या वेळीं येत असे. या भेटीची हकीकत ॲना सुरोननें पुढीलप्रमाणें सांगितली आहे.:—

" लिहितां लिहितां कौंटसाहेबांना मध्येंच कंटाळा येऊन ते आपल्या जाग्यावरून उठत आणि जुने बूट दुरुस्त करीत बसत; एवढ्यानें त्यांचें मन पुन्हां ताजेंतवानें होई. अशा वेळीं चित्रकार गे एका कोचावर स्वस्थ पडून राही आणि विडी ओढतां ओढतां टॉलस्टॉय यांचें निरीक्षणहि करी. क्वचित् प्रसंगीं दोघेहि परस्परांशीं बोलूं लागत आणि बोलण्यांत एकादा हास्यकारक विषय निघाला म्हणजे दोघेहि लहान मुलांसारखे खिदळत."

हिंवाळ्याच्या दिवसांत मास्कोला रहावें व उन्हाळा यासनाया येथें काढावा, असा टॉलस्टॉय यांच्या कुटुंबाचा कित्येक वर्षांचा क्रम होता. टॉलस्टॉय हे स्वतः जरी कुटुंबाबरोबरच असत, तरी होतां होईतों यासनाया येथें आरंभीं कांहीं वर्षें ते जातीनें पुष्कळ शेतकाम करीत असत; पण पुढें

लेखनाचें काम बरेंच वाढल्यामुळें शेतकामाकडे लक्ष देण्यास फुरसत नसे. तथापि मधून मधून करमणुकीखातर शेतांत राबण्याचा नाद अगदीं वृद्धापकाळपर्यंत त्यांना होता.

चालू धर्मविधीसंबंधीं टॉलस्टॉय यांची पूर्ण अश्रद्धा बऱ्याच काळापासून झाली होती. बाप्तिस्माचा विधी, कांहीं विशिष्ट दिवशीं म्हणावयाचे मंत्रोपचार, मरणोत्तरचे विधी वगैरे गोष्टींचा संबंध खऱ्या धर्माशीं मुळींच येत नाहीं, अशी त्यांची खात्री होती. अशा स्थितींत स्वतःच्या कुटुंबांत हे सारे विधी चालू द्यावे कीं काय, हा प्रश्न त्यांच्या चित्तांत या वेळीं घोळत होता. मोठ्या मुलासंबंधीं विचार करण्याचें कांहीं प्रयोजन त्यांस वाटत नव्हतें. या गोष्टी आपल्या इच्छेप्रमाणें त्यानें कराव्या अथवा न कराव्या; पण लहान मुलांची गोष्ट तशी नव्हती. जन्माच्या वेळचे संस्कार आणि अत्यंसंस्कार हे शुद्ध दांभिकपणाचे आहेत, असें त्यांना स्वतःला कितीहि खात्रीपूर्वक वाटलें, तरी त्यांची पत्नी जुन्या मताची असल्यामुळें ते सारे विधी झाले पाहिजेत, असा तिचा आग्रह असे. शिवाय या गोष्टी केल्यावांचून कायदेशीर हक्कहि मिळत नसत. यामुळें आपल्या मनाविरुद्ध टॉलस्टॉय यांस या बाबतींत रुकार द्यावा लागे.

इ० स० १८८४ च्या जून महिन्याचा १८ व्या तारखेस टॉलस्टॉय यांस मुलगी झाली. या वेळीं टॉलस्टॉय यांची मनःस्थिति फारच चमत्कारिक झाली होती. त्यांच्या एका जुन्या विकारानें या वेळीं त्यांना चांगलेंच पछाडलें होतें. लक्षावधि गोरगरीब उपाशी मरत असतां आपण अशा चैनींत राहणें, हें मोठें पातक आहे, या विचारानें त्यांच्या मनांत या वेळीं फार जोराची उसळी उठली होती. एके दिवशीं संध्याकाळीं कौंटेसबाईकडे ते आले आणि म्हणाले, 'थोडे दिवस मी कोठें तरी बाहेर जाऊन येतों. आतां ही चैन मला अगदीं असह्य झाली आहे.' इतके शब्द बोलून ते तडक घराबाहेर पडले. आतां हे परत येतात कीं नाहीं, याचीहि शंका कौंटेसला वाटूं लागली. आपणास कांहीं बोलण्यासहि फुरसत न देतां लियो तडक घराच्या बाहेर गेले, या गोष्टीचें तिला अत्यंत दुःख झालें. ती तशीच उठून बागेंत गेली आणि एका झाडाखालीं रडत बसली. इत-

क्यांत प्रसूतिवेदना सुरू झाल्या. अशा प्रकारच्या दुहेरी वेदनांनीं तिची स्थिति अगदीं केंविलवाणी होऊन गेली. खोलींत स्वस्थ पडण्याबद्दल पुष्कळ माणसांनीं तिची परोपरीनें विनवणी केली; तथापि कांहीं केल्या ती तेथून हलेना. अखेरीस पहांटे पांच वाजतां कौंटसाहेब परत आल्याची खबर त्यांना कळली, तेव्हां तेथून उठून त्या तडक टॉलस्टॉय यांच्या खोलींत गेल्या आणि म्हणाल्या, 'एवढी शिक्षा करण्यासारखा माझ्या हातून अपराध तरी कोणता घडला ? माझा अपराध इतकाच कीं, आपल्या चित्ताला जशी उपरती झाली, तशी मला अजून झालेली नाहीं !'

टॉलस्टॉय हे अत्यंत खिन्न आणि उदास होऊन बसले होते. ते आपल्या पत्नीचें नुसतें समाधान करण्यापुरते सुद्धां चार शब्द बोलले नाहींत. थोड्या वेळानें कौंटेसबाई आपल्या खोलींत गेल्या आणि ती नवी मुलगी जन्मास आली.

या मुलीच्या बाप्तिस्माच्या विधीची हकीकत ॲना सुरोनबाईनें पुढील-प्रमाणें दिलेली आहे.

" स्वतः कौंटसाहेबांनीं या विधीबद्दल विलक्षण अनादर दाखविला. उपाध्येबोवा आले, तेव्हां आगाऊ तयारी कांहींच नसल्यामुळें ते मोठ्या बुचकळ्यांत पडले. घरांतल्या कुटुंबियांपैकीं चिटपाखरूं सुद्धा हजर नव्हतें. कौंटसाहेब शेतांत निघून गेले होते. कौंटेसबाई आपल्या खोलींत शिवीत बसल्या होत्या. तान्ह्या मुलाची दायी, मी स्वतः आणि माझा मुलगा इतकीं माणसें तेथें होतीं. या प्रसंगासाठीं टिनेटका पोषाक न केल्यास अगदींच वावगें दिसेल म्हणून मीं मात्र आपला सणावाराचा पोषाक केला होता. सारा विधि पांच दहा मिनिटांत आटपून आणि पांच रुपयांची दक्षणा खिशांत टाकून उपाध्येबोवा निघून गेल."

" पुढच्याच हिंवाळ्यांत ही मुलगी मरण पावली, तेव्हां या माणसांच्या अधार्मिकपणाबद्दल ही शिक्षाच परमेश्वरानें त्यांना केली, असें माझ्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं."

या काळापर्यंत टॉलस्टॉय यांचा संसारप्रवाह बहुधा अखंड चालू होता. कुटुंबाच्या मंडळींत मतभेदाचा व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या कुरबुरीचा

प्रवेश फारसा झाला नव्हता; पण या काळापासून स्वतः टॉलस्टॉय आपल्या कुटुंबापासून देहानें नसले, तरी मनानें विभक्त होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. हा विभक्तपणा त्यांच्या, त्यांच्या पत्नीच्या अथवा त्यांच्या मुलांच्या स्वार्थीपणामुळें उद्भवलेला नसून तो केवळ टॉलस्टॉय यांच्या मतांचा परिणाम होता. सामान्य चालू मतांपासून टॉलस्टॉय पुरे विभक्त होऊं पहात होते आणि त्यांच्या कुटुंबांतील मंडळी 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयं' या धोपट मार्गाला पक्की चिकटून होती. यामुळें या दोघांचा बेबनाव केव्हांतरी घडणार, हें निश्चित ठरल्यासारखेंच होतें. टॉलस्टॉय यांस कांहीं शिष्यहि मिळाले होते. या शिष्यांचा रोजचा व्यवहार टॉलस्टॉय यांच्या मताप्रमाणें होऊं लागला, तेव्हां त्यांच्याहि कुटुंबांत अशाच प्रकारच्या बेबनावाचें बीजारोपण होऊं लागलें.

वर सांगितलेला चित्रकार गे हा टॉलस्टॉय यांचा पक्का शिष्य बनला होता. हा गृहस्थ स्वभावानें फार सात्विक आणि अगदीं निरुपद्रवी होता. कसल्याहि बाबींत स्वकीयांशीं अथवा परकीयांशीं त्याचें भांडण झाल्याचें कोणीं एकलें नव्हतें. तारीख १५ जुलई सन १८८४ च्या एका पत्रांत गे म्हणतो,

"तुम्हांला पत्र लिहावें असा विचार आज किती तरी दिवस माझ्या मनांत घोळत होता; पण तुमची नाजुक कौटुंबिक स्थिति मला माहीत असल्यामुळें कांहीं अधिक उणें लिहून अशा स्थितींत आणखी भर घालावी, असें मला वाटेना. मी पूर्वीसारखाच दुराचारी राहिलों असतों, तर माझ्या कुटुंबांतील मंडळीलाहि या माझ्या वागणुकी पाहून आनंदच झाला असता. पण मनुष्य आपली संसाराची दिशा बदलून ईश्वराभिमुख होऊं लागला आणि आपलें आचरण तदनुरूप तो ठेवूं लागला कीं, भांडणांच्या गडगडाटाला सुरुवात होते. कुटुंबियांचें म्हणणें इतकेंच कीं, तोंडानें वाटतील तीं मतें तुम्हीं खुशाल बोलून दाखवा; पण तीं प्रत्यक्ष आचरणांत आणूं नका. या मार्गांत मीं पाऊल ठेवलें, तेव्हां असा प्रकार घडणार हें स्वप्न मला आगाऊच पडलें होतें, तेव्हां तो घडला याबद्दल मला नवल वाटत नाहीं आणि रागहि येत नाहीं. इतके दिवस या गोष्टी

मीं तुम्हांला कळविल्या नाहींत, याचें कारण हेंच कीं, आजपर्यंत माझें मन पुरें थंडावलेलें होतें."

इ. स. १८८४ च्या आक्टोबर महिन्यांत गे याच्या घरीं टॉलस्टॉय पाहुणचारासाठीं गेले होते. रशियाच्या दक्षिण भागांत शरनिगॉफ नांवाच्या परगण्याच्या हद्दींत गे याची शेतवाडी होती. थोडे दिवस या ठिकाणीं राहून टॉलस्टॉय यासनाया येथें परत आले. त्या वेळीं कुटुंबांतील सर्व मंडळी मास्को येथें गेलेली होती. यासनाया येथून पुढील पत्र त्यांनीं आपल्या पत्नीला लिहिलें.

" गेच्या वाडीवर चार दिवस मोठ्या मौजेचे गेले. तेथें असतांना एक विचार माझ्या मनांत आला, तो आतांच सांगून टाकतों. माझ्या भावी आयुष्याची दिशा आतां बहुतेक निश्चित झाल्यासारखीच आहे. माझीं मतें आतां ठाम बनलीं आहेत. तेव्हां मी जिवंत आहें, तोंपर्यंतच त्या मता-प्रमाणेंच पुढील विल्हेवाट करावी, असा माझा बेत आहे. हा बेत असा— प्रथम यासनायाची व्यवस्था करावयाची. हें काम जड जाणार हें मला ठाऊक आहे; पण तसें असलें तरी तें केलेंच पाहिजे. खाजगी मालमत्ता जवळ बाळगणें हें पातक आहे, अशी माझ्या चित्ताची पुरी खात्री झाली आहे आणि खाजगी मालमत्ता बाळगण्याच्या मूळ पायावर ज्या ज्या इमारती उठतात, त्या अर्थातच पापमूलक होत. आतां अशा प्रकारचा खोटा व्यवहार करण्यावांचून गत्यंतरच नाहीं, असा पक्ष प्राप्त झाला असेल, तर किमानपक्ष या व्यवहारापासून दुसऱ्याला तरी उपसर्ग पोहों-चणार नाहीं, इतकी खबरदारी घेणें अवश्य आहे. माझीं जीं कांहीं मतें बनलीं आहेत आणि त्याप्रमाणें मला जें कांहीं सत्य वाटतें, तें प्रत्यक्ष व्यवहारांत आणावयाचें असेल, तर त्या गोष्टीला माझ्या सारख्यानेंच आरंभ केला पाहिजे. मी आज श्रीमंत आहें आणि माझ्या हातीं थोडी-बहुत सत्ताहि आहे आणि या गोष्टीला श्रीमंत आणि सत्ताधाऱ्यांनींच आरंभ केल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें मला उघड दिसत आहे. आपली श्रीमंती आणि आपली सत्ता या दोहोंवरहि त्यांनीं प्रथम पाणी सोडलें पाहिजे. एवढें झालें म्हणजे पुढच्या कार्याच्या आरंभाचा पाया तयार

होईल. या सर्व गोष्टी एकाच दिवसांत सिद्ध होतील, असें माझें म्हणणें नाहीं, त्या हळू हळूच होतील; पण त्या करण्यास त्यांनीं आरंभ केला पाहिजे. याला आरंभ करावयाचा म्हणजे प्रथम आपलीं सारीं कामें स्वतः करण्याची सुरुवात करावयाची. स्वतःच्या शेतकऱ्यांच्या खांद्याशीं खांदा लावून त्यांच्या बरोबरीनें आपण राबलें पाहिजे. मीं अशाच रीतीनें आरंभ करण्याचा बेत केला आहे. यासनाया येथें शेतकीचीं सारीं कामें मी स्वतः हातीं घेणार आहें. यांत कांहीं फारसें नुकसान होईल, असें मला वाटत नाहीं. नुकसान तर नाहींच; पण कदाचित् थोडाबहुत फायदाच होईल. या सर्व गोष्टी लिहून सांगतां येण्यासारख्या नाहींत. यासाठीं येथें अधिक पाल्हाळ मी करीत नाहीं सध्यां आपला व्यवस्थापक जीं कामें पाहतो तीं मी स्वतः हातीं घेणार आहें. हिंवाळ्यांत मी येथें मधून मधून येईन; पण उन्हाळ्याच्या आरंभापासून पावसाळा अखेरपर्यंत मला येथेंच कायमचें राहिलें पाहिजे. इतके दिवस हें काम मीं लोकांवर सोंपविलें यामुळें माझ्या आयुष्याला वांकडें वळण लागलें, असा माझा समज आहे. यामुळें माझा चरित्रक्रम भलत्याच दिशेला वाहवला, इतकेंच नव्हे, तर हें काम माझ्या निश्चितमताप्रमाणें न होतां तेंहि भलत्याच दिशेनें चाललें आहे. हा विषय माझ्या प्रत्यक्ष आत्म्याशीं अत्यंत संलग्न आहे, हें ध्यानांत आणून या माझ्या वर्तनाबद्दल मला दोष देण्याची घाई करूं नये. सर्व गोष्टींचा नीट विचार केला म्हणजे माझ्या या मुद्याचें महत्व मला किती आहे, हें घ्यानीं येईल. यापासून दुसऱ्या कोणाचें काडीभरहि नुकसान होणार नाहीं आणि कदाचित् माझ्या बरोबर त्यांनाहि महत्वाचा फायदा मात्र मिळेल.

"आज थोरल्या राजरस्त्यावर दोन यात्रेकरू मला भेटले, हे सख्खे भाऊ असून येथास्गिरीची व यरुसलेमची यात्रा करून तेथून सैबेरियाकडे जाऊन ते परत येतांना मला भेटले. दोघेहि अगदीं वृद्ध झाले आहेत आणि ही सारी यात्रा खिशांत दमडी सुद्धां न घेतां त्यांनीं पार पाडली. ते मांसाला स्पर्श देखील करीत नाहींत. घरीं तीन चार हजारांपर्यंत वतनवाडी आहे. ते यात्रेला निघून गेल्यानंतर दोघांच्याहि मृत्यूची कंडी गांवांत

पसरली. तेव्हां सरकारनें त्यांची मालमत्ता एका वहिवाटदाराच्या हवालीं केली. वहिवाटदारानें घरांतली सारी चीजवस्त लांबविली. ते परत आल्यानंतर या नुकसानीबद्दल त्यांनीं कायदेशीर दावा मांडला. इतक्यांत एक साधु त्यांना भेटला आणि म्हणाला, 'यःकश्चित् ऐहिक विषयासाठीं लोकांना तुम्हीं तुरुंगांत घालूं पाहतां, तर मग यरुसलेमची यात्रा केल्याचें फळ तरी काय?' साधूचा हा उपदेश त्यांना पटला आणि त्यांनीं आपली फिर्याद काढून घेतली. दोघेहि भाऊ मोठे सतेज आणि रुबाबदार असे मला दिसले. त्यांच्याशीं बोलतां बोलतां चवदा पंधरा मैल मी कसा चालत गेलों, हेंच मला समजलें नाहीं."

यानंतर पुढें थोड्याच दिवसांनीं लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात— "आतां एक मोठी कठीण गोष्ट मी हातीं घेणार आहें. शेतकी करावयाची ती स्वतःच्या नफ्याच्या दृष्टीनें न करतां सामान्य जनांशीं आप्तपणा वाढविण्याच्या दृष्टीनें करावयाची, असा निश्चय मीं केला आहे. लोकांचा आप्तपणा आणि स्वतःचा फायदा या दोन गोष्टींत विरोध उत्पन्न होण्याचे प्रसंग पुष्कळ येतात. अशा वेळीं स्वतःच्या फायद्यावर पाणी सोडावयाचें असा माझा निश्चय आहे. आतां माझें मन दुबळें असल्यामुळें माझ्या हातून ही क्रिया प्रत्यक्ष घडेल कीं नाहीं, असा माझा मलाच संशय येतो; पण कांहीं झालें तरी त्या दिशेनें धडपड करणें मला प्राप्त आहे."

"आज सकाळींच उठून घोड्यावर बसून मी शेतावर गेलों. बरोबर येण्यासाठीं घरांतलीं कुत्रीं धडपडूं लागलीं; तेव्हां त्यानाहि बरोबर घेतलें. शिकारीसंबंधीं माझी वृत्ति काय आहे, हें अजमावण्याचा बेत मीं केला. शिकारीची सवय चाळीस वर्षे आंगवळणीं पडलेली असल्यामुळें रानांत शिरतांच आरंभीं मला मोठी मौज वाटली; पण इतक्यांत एक ससा दिसल्याबराबर 'देवा, याला कुत्र्यांच्या तावडींतून सोडव, अशी प्रार्थना माझ्या मुखांतून निघाली. माझ्या कृत्याची मला लाज वाटूं लागली आणि तेथून मी तसाच तडक परत फिरलों."

"पैशाचे हिशेब ठेवण्याकडे माझें लक्ष लागत नाहीं, याबद्दल माझ्यावर रागावूं नको. या गोष्टीचें महत्त्वच माझ्या चित्ताला वाटत नाहीं.

दुखणीबहाणीं, जन्ममृत्यु, ज्ञानप्राप्ती अथवा पापपुण्यादि कृत्यें या गोष्टींप्रमाणें पैशाला कांहीं महत्त्व आहे, असें मला वाटत नाहीं. केवळ आपल्या सोयीसाठीं पैसा आणि हिशेब हीं आपण निर्माण केलीं आहेत. आज ही आंकडेमोडी कांहीं विशिष्ट प्रकारची आपण—सोयीसाठीं ठरविलेली आहे. मग ही सोडून देऊन दुसरीच एकादी पद्धत उद्यां आपण काढली, तर त्यांत बिघडलें काय? आज चार पैशांचा 'आणा' आपण म्हणतों, पण उद्यां सहा पैशांचा म्हटला, तर त्यांत काय बिघडलें? मी अशा गोष्टी बोलतों म्हणजे तुम्हाला त्या आवडत नाहींत, हें मला ठाऊक आहे. पण आपलें सुख बाह्य संपत्तीच्या कमी जास्त प्रमाणावर कमी जास्त होत नसून तें आपल्या अंतरंगाच्या भावनांवर अवलंबून असतें. हा सिद्धांत तुमच्या गळीं उतरविण्यासाठीं या शिळया विषयाचें चर्वित-चर्वण मला पुनः पुन्हां करावें लागतें. एकाद्या वेड्या भिकाऱ्याला उद्यां लाख रुपयांची दौलत कोणीं दिली, तर तेवढ्यानें तो सुखी होईल काय? आपलें जीवित नीरस आणि कंटाळवाणें होऊं नये अशी इच्छा असेल तर आपल्या मनाचें क्षेत्र अधिक विस्तृत केलें पाहिजे आणि अधिक खोलहि केलें पाहिजे. आपल्या सुखाचीं खरीं साधनें काय होतीं, तीं आपल्या प्रत्यक्ष आचरणानें आपल्या मुलांस आपण सांगितलीं पाहिजेत. त्यांना खरा बोध अशानेंच होईल. दुःख कशापासून होतें, हा मुद्दा त्यांच्या लक्षांत आला म्हणजे, तशा गोष्टींचा त्याग तीं आपोआपच करतील. आपण पुष्कळ भाषा शिकलों, पुष्कळ पदव्या आणि सुवर्णपदकें मिळविलीं, पुष्कळ मंडळींत बसलों उठलों अथवा पुष्कळ पैसा मिळविला, तरी या जिनसांनीं आपलीं सुखें अथवा दुःखें निर्माण केलीं नाहींत, ही गोष्ट त्यांच्या ध्यानीं आणून दिली पाहिजे. याकरतां उद्यां आपल्या उत्पन्नांत शंभराचे ऐंशी झाले, तरी त्या हिशोबाकडे लक्ष देणें मला शक्य नाहीं. कारण या गोष्टीकडे आपलें लक्ष गुंतलें म्हणजे खऱ्या महत्त्वाच्या विषयांना तें पाठमोरें होतें."

टॉलस्टॉय यांच्या या वेळच्या आयुष्यक्रमाबद्दल त्यांच्या पत्नीचें काय मत होतें, हें पुढील पत्रावरून लक्षांत येईल.

"आपलें पत्र काल मिळालें, आणि तें वाचून मला फार वाईट वाटलें. यासनाया येथें राहून कांहीं तरी उच्च प्रतीची साहित्यसेवा करावी, अथवा स्वतःची मानसिक वृद्धि करावी, असा आपला बेत असेल असें मला वाटलें होतें; पण आतां आपण रॉबिनसन् क्रुसो बनणार, हें पाहून मला फारच वाईट वाटतें. आतां घरचा गडीहि तुम्हीं घालवून दिला आणि आचाऱ्याला रजा दिली. यावरून रोजचें सारें घरकाम स्वतःच करण्याचा आपला बेत आहे, असें दिसतें. असले श्रम करण्यांत फायदा काय आहे, हें मला तरी समजत नाहीं. शेतकरी लोकांतसुद्धां म्हातारपणीं असलीं कामें कोणी करीत नाहींत. आतां असें करणें आपल्या स्वतःच्या मतांस अनुसरून आहे, असें उत्तर आपण द्याल, हें मला माहीत आहे, तेव्हां त्याजसंबंधीं अधिक वाद करण्यांत कांहीं फायदा नाहीं.तथापि आपल्यासारख्याच्या असामान्य बुद्धिमत्तेचा उपयोग चूल पेटविण्यांत, केर काढण्यांत आणि बूट शिवण्यांत होणार, हें पाहून मला फार वाईट वाटतें. वास्तविक इतकेंसुद्धां मीं लिहूं नये; पण या गोष्टी मीं लिहिल्या नसत्या तर माझ्या मनांत त्या डांचत राहिल्या असत्या. तेव्हां हें लिहून टाकून माझें मन मीं आतां मोकळें केलें आहे."

"आपली मूर्ति चित्तांत आल्याबरोबर माझें अंतःकरण उचंबळूं लागतें. शहाणपण, दया, साधेपणा आणि हट्ट यांचें विलक्षण मिश्रण आपल्या ठिकाणीं आहे आणि त्यालाच परहितबुद्धीची जोड मिळाली आहे. परक्यांच्या कल्याणाची इतकी चिंता वाहणारा मनुष्य मला तरी दुसरा कोणीं आढळणार नाहीं. यामुळें आपली आठवण झाल्याबरोबर माझें हृदय प्रेमानें भरून यावें यांत नवल नाहीं."

टॉलस्टॉय आणि त्यांची पत्नी यांच्यांत बेबनावाचें जें बीज येथें रुजलें त्याचाच मोठा वृक्ष पुढें कसा झाला आणि कोणत्या गोष्टींनीं तो पोसला गेला, याचा इतिहास यथाक्रम पुढें येईलच. त्या काळापर्यंत जीं मतें टॉलस्टॉय यांनीं प्रसिद्ध केलीं होतीं, तीं प्रत्यक्ष आचरण्यांत आणण्यासाठीं त्यांची धडपड या काळापासून सुरू झाली, एवढें सध्यां सांगितलें म्हणजे पुरे. 'आई बाप, बायको आणि मुलें यांचा त्याग ज्यांच्यानें करवत नाहीं.

तो माझा शिष्य होऊं शकत नाहीं.' हें ख्रिस्ताचें वचन अनेकेंवार मनांत येऊन टॉलस्टॉय घर सोडण्यासहि उद्युक्त झाले. केवळ स्वतःसाठीं म्हणून कोणताहि उद्योग करावयाचा नाहीं, व उरलेलें आयुष्य केवळ परसेवेला वहावयाचें असा बेत करून कित्येक वेळां ते घराच्या बाहेरसुद्धां पडले. पण ते फारसे दूर गेले नाहींत तोंच स्वतःच्या मुलांच्या दुःखाचा विचार त्यांच्या मनांत येई आणि त्यांचें हृदय कळवळून ते पुन्हां घराचा रस्ता सुधारीत. आपलें सर्व वतन सोडून द्यावें असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें होतें. या म्हणण्याला कौंटेसबाईनीं अनुमति दिली असती, तर सारीं मुलेंबाळें अगदीं निर्धन होऊन उघडीं पडलीं असतीं. आणि ज्यांच्या हातांत ती वतनवाडी गेली असती, त्यांचा फायदा तरी खरोखर कितपत झाला असता, याची शंकाच आहे. ही वतनवाडी एकाद्या विशिष्ट व्यक्तीच्या अथवा एकाद्या विशिष्ट समूहाच्या स्वाधीन करावी, असा कोणताहि निश्चित बेत टॉलस्टॉय यांनीं केला नव्हता. ती आपणाला नको, इतकेंच त्यांना वाटे. त्यांचीं आर्थिक आणि सामाजिक मतें अद्यापि बाल्यावस्थेंत होतीं. त्यांत बहुतेक भाग फक्त निषेधक स्वरूपाचा होता. चालू वहिवाट आहे, ती नसावी, इतकाच त्यांच्या मताचा थोडक्यांत निष्कर्ष होता; पण चालू रचना मोडली, तर तिच्या जागीं नवी रचना कोणत्या प्रकारची असावी, याची रूपरेषा देखील त्यांच्या चित्तांत नव्हती. यामुळें त्यांचीं मतें फक्त निषेधक असून त्यांना कोणतेंहि विधायक स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. अशा स्थितींत त्यांच्या म्हणण्याला त्यांच्या पत्नीनें अनुमोदन दिलें नाहीं, याबद्दल तिला फारसा दोष देतां येत नाहीं. पूर्वजांचें वारसदारीचें वतन चोरापोरी घालवून स्वतःच्या मुलांस दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावयास लावणें, कौंटेसबाईला पसंत पडलें नाहीं, यांत दोष देण्यासारखें तरी काय आहे ? चालू वहिवाटींत मोडतोड करणें, हें काम केव्हांहि सोपें असतें; पण गैरव्यवस्थेंतून व्यवस्था निर्माण करणें आणि तिला शिस्त लावणें या गोष्टी करणें फार कठीण आहे. केवळ स्वार्थमूलक हेतूनें कांहीं वतनवाडी आपली आहे असें म्हणणें म्हणजे नसती जबाबदारी आपल्या शिरावर घेणें आहे, हें टॉलस्टॉय यांचें मत खरें असेल, तर तीच वतन-

वाडी कोणाहि रस्त्यावरील भुरट्याच्या स्वाधीन करून अपात्रीं दान केल्याचें पातक पदरीं घेणें हें कर्म तरी चांगलें आहे काय ? अशा स्थितींत कौंटेसबाई टॉलस्टॉय यांच्या मताप्रमाणें वागली नाहीं, ' याबद्दल तिला दोष देणें वाजवी होणार नाहीं. आतां यांत दुःखाची गोष्ट इतकीच कीं, आपलीं हीं मतें प्रचारांत आणल्यास प्रत्यक्ष परिणाम काय घडेल याचा जो अनुभव टॉलस्टॉय यांस प्रत्यक्ष मिळाला असता, तो टॉलस्टॉय यांस मिळाला नाहीं. तसा अनुभव त्यांना आला असता, तर त्यांना चांगला धडा मिळून त्यांचे विचारहि बदलले असते.

जमिनीच्या वांटणीसंबंधीं आपलीं तत्वें म्हणून ज्या गोष्टी आपण उराशीं बाळगल्या, त्यामुळें हा भानगडीचा प्रश्न सुटत नसून अधिक घोंटाळा मात्र उत्पन्न होतो, असा अनुभव त्यांस आला असता. गत-पिढ्यांनीं जी कांहीं समाजरचना करून ठेवली, ती सरसहा धुळीस मिळ-विल्यानें समाजाला काडीचाहि फायदा होत नाहीं. समाजरचनेला नेहमीं-दोन अंगें असतात. ज्या मूल तत्वांवर समाजाची रचना होते, तीं तत्वें म्हणजे समाजाचें प्रधानअंग होय. याशिवाय कालानुरोधानें उत्पन्न झालेल्या बऱ्यावाईट चालीरीति आणि बंधनें हें समाजाचें दुसरें; पण गौण अंग होय. या दुसऱ्या अंगांत कालमानाप्रमाणें बदल होणें अवश्य असतें आणि प्रत्येक समाज त्याप्रमाणें तो बदल करतो; पण दुसरें जें प्रधानअंग त्यांत बदल करूं म्हणें, म्हणजे समाजाच्या पायालाच कुदळ लावण्या-सारखें होय याकरतां कोणतीहि सामाजिक सुधारणा करूं पहाणारानें आपलें शस्त्र कोणत्या अंगावर चालत आहे, याचा अगाऊ विचार करणें अवश्य आहे.

वतनवाडी आणि पैसा यांचें स्वामित्व म्हणजे एक भयंकर जूं आहे, ही टॉलस्टॉय यांची भावना दिवसेंदिवस अधिक बळावत चालली. अखे-रीस आपली सर्व वतनवाडी आणि ग्रंथांचें स्वामित्व वगैरे सर्व हक्क आपल्या पत्नीच्या नांवानें करून द्यावेत, अशी इच्छा होऊन त्या बाबींत त्यांनीं तिची संमति विचारली. 'तुमच्यासारख्या बुद्धिमंताला जें ओझें

जड वाटतें, तें माझ्यासारख्या सामान्य स्त्रीला कसें सहन होईल?' असें उत्तर देऊन त्यांचें म्हणणें तिनें नाकारलें.

टॉलस्टॉय यांच्या म्हणण्यास कौंटेसबाईनें जो नकार दिला, त्यामुळें पुढें फायद्यापेक्षां नुकसानच अधिक झालें. हीच गोष्ट टॉलस्टॉय यांच्या मनांत एकसारखी डांचत राहिली आणि अखेरीस इ. स. १८९१ सालीं आपली सर्व दौलत आपल्या मुलाबाळांस व पत्नीस समप्रमाणानें त्यांनीं वांटून दिली. कांहीं मुलांनीं आपली दौलत गमावली आणि अखेरीस तीं बऱ्याच कमी प्रतीला येऊन पोहोंचलीं. अल्पवयामुळें आपल्या मालमत्तेचें नीटसें संरक्षण त्यांना करतां आलें नाहीं. याकरतां सारीं मुलें चांगलीं जाणतीं होईपर्यंत सारी दौलत एकट्या कौंटेसबाईच्या हातीं असती, तर असा प्रकार घडला नसता.

इ. स. १८८४ सालाच्या अखेरीस बिरुकॉफ या नांवाच्या एका तरुण गृहस्थाशीं टॉलस्टॉय यांची मुलाखत झाली. याचें आरमारी विद्यालयांतलें शिक्षण पुरें झालें होतें. पुढें सरकारी अरमारांत हुद्याची जागा याला लवकरच मिळणार होती. पण युद्ध करणें हें पापमूलक आहे, हें टॉलस्टॉय यांचें मत त्याला पटून आरमारी खात्यांत तो शिरला नाहीं. हा पुढें टॉलस्टॉय यांचा पक्का चेला बनला. बिरुकॉफ यानें रशियन भाषेंत टॉलस्टॉय यांचें एक सुंदर चरित्रहि लिहिलें आहे.

बिरुकॉफ टॉलस्टॉय यांस भेटला, त्या वेळीं त्याच्या मनाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. आजपर्यंत गेलेलें आपलें सारें आयुष्य निव्वळ पापांत गेलें, असें त्याला वाटे. धर्मविचारांकडे ज्याची प्रथमच प्रवृत्ति होते, त्याची मनःप्रवृत्ति नेहमींच अशा प्रकारची असते. त्यानें टॉलस्टॉय यांस पत्र लिहून आपल्या अंतःकरणाचा सारा नकाशा त्यांजपुढें ठेवला. त्याला टॉलस्टॉय यांनीं पुढील उत्तर दिलें आहे.

"स्वतःच्या बुद्धिवाद ऐकणें यांत कांहीं पाप नाहीं. पूर्वीपासून चालत आलेल्या धर्मविचारांवरील विश्वास डळमळीत होतो आणि असें होणें, हें धर्मलंडपणाचें लक्षण आहे, असें तुम्हांस वाटतें; पण तसें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या शुद्ध बुद्धीचा संदेह आपणास कधींच फस-

वीत नाहीं. आपल्या बुद्धीचें म्हणणें ऐकून घेऊन तिच्याशीं नित्य संभाषण करण्याचा क्रम आपण सुरू ठेवला, तर अखेरीस सारे संशय निघून जाऊन आपलें अंतःकरण ज्ञानाच्या प्रकाशानें उज्वल होईल. केवळ लोकांच्या बुजगावण्याला भिऊन आपण आपल्या बुद्धीवर दडपण घातलें तर तीहि मूकवृत्ति स्वीकारते आणि आपल्याशीं बोलेनाशी होते. असें झालें म्हणजे पूर्वीचें संशय नाहींसे होण्याऐवजीं पूर्वीच्यांत आणखी नव्यांची मात्र भर पडते आणि अखेरीस आपलें मन दुभंग होऊन दोन प्रवाहानें वाहूं लागतें. ही स्थिति अत्यंत भयंकर आहे. मनुष्याच्या मनाला जर कोणता मोठा रोग असेल, तर तो हाच. हा रोग अशा स्वरूपाचा आहे कीं, वयोमानानें तो वाढत जातो आणि तो बरा करण्यास कोणी वैद्यहि भेटत नाहीं. 'न्यायानें आणि तर्कशास्त्रानें जें खरें वाटतें, तेंच आपली बुद्धि आपणास सांगत असतें. ती विश्वकायद्यांना अनुसरून वागत असते. हे कायदे कधींहि बदलावयाचें नाहींत. या कायद्यांना सोडून वागण्याचा यत्न करणें भयावह आहे. हे कायदे मोडण्याचा यत्न मनुष्यजातीनें जेव्हां जेव्हां केला, तेव्हां तेव्हां रक्ताच्या नद्या कशा वाहिल्या हें इतिहास आपणास सांगत आहे. अशा स्थितींत आपल्या विवेचक बुद्धीला अनुसरून वागणें वेडेपणाचें आहे, असें कसें म्हणतां येईल ? स्वतःची बुद्धि गुंडाळून ठेवून केवळ दुसऱ्याच्या तंत्रानें वागणें, हें बालिशपणाचें आहे अशा रीतीनें वागून आपलें आध्यात्मिक कल्याण होईल, अशी आशा बाळगणें फुकट आहे. संस्कृतीचे आणि कार्यकारणाचे नियम बाजूला ठेवून वागणें आपणास कधींहि सुखकर होणार नाहीं. शास्त्रांनीं निर्माण केलेल्या शस्त्रास्त्रांनीं आपली विवेचकबुद्धि सज्ज करून या अफाट जगाचें आकलन आपण केलें पाहिजे. सृष्टीचे कायदे उल्लंघन करण्याची कल्पना सुद्धां आपल्या मनांत येतां उपयोगी नाहीं. ज्या कायद्यांच्या बळावर ही सारी सृष्टि अव्याहत चालली आहे, त्या कायद्यांचा योग्य उपयोग करून घेऊन स्वतःचें व दुसऱ्यांचें हित साधणें, आपल्या हातचें आहे. माझी ही विचारसरणी स्पष्ट शब्दांनीं मीं तुमच्या समोर मांडली आहे आणि तुमची बुद्धिहि तुम्हांस हेंच सांगत असेल. तिचा हा संदेश वेडेपणाचा आहे,

असें तुम्हीं कां म्हणतां ? बाकी साऱ्या गोष्टी बाजूला ठेवून याच ध्वनीच्या मार्गानें चालणें श्रेयस्कर आहे, असें मला वाटतें."

बिरुकॉफ यालाहि टॉलस्टॉय यांची ही विचारसरणी पटली आणि तो त्यांचा कट्टा शिष्य बनला. त्याचा हा शिष्यसंबंध अखेरपर्यंत एकसारखा कायम होता.

या वेळच्या टॉलस्टॉय यांच्या कौटुंबिक स्थितीचें सामान्य वर्णन ॲना सुरोन हिनें पुढीलप्रमाणें केलें आहे.:—

इ. स. १८८४ सालीं टॉलस्टॉय यांचा सर्वांत वडील मुलगा विश्व-विद्यालयाचें शिक्षण घेत होता. त्याचे खालचे दोन मुलगे शाळेंत शिकत होते आणि त्यांच्याहून धाकटीं मुलें घरींच शिकत होतीं. कित्येक वेळां फेट, गार्शिन वगैरे साहित्याचार्य संध्याकाळीं शिळोप्याच्या वेळीं आमच्या घरीं येत असत, तेव्हां साहित्याच्या अनेक अंगांवर मोठ्या मौजेची चर्चा चालत असे. कित्येक वेळां एकादा गवई येऊन गाण्याच्या बैठकीहि होत. याशिवाय कित्येक प्रोफेसर आणि प्रांतोप्रांतींचे गव्हरनराहि कौंटसाहेबांच्या भेटीसाठीं येत असत."

टॉलस्टॉय यांचें लक्ष वतनवाडीकडे नव्हतें, तरी तेवढ्यानें पैशाच्या दृष्टीनें त्यांचें नुकसान विशेषसें झालें नाहीं. उत्पन्न कमी झालें म्हणून खर्च कमी करण्याची आवश्यकता त्यांच्या कुटुंबाला केव्हांच भासली नाहीं. तथापि स्वतः टॉलस्टॉय यांचें जिवंत उदाहरण त्यांच्या कौटुंबियांच्या समोर असल्यामुळें त्यांच्या आयुष्य क्रमालाहि अधिक साधें वळण लागत चाललें यांत नवल नाहीं. इ. स. १८८२–८३ सालापासून टॉलस्टॉय यांच्या ग्रंथांचें प्रकाशन कौंटेसबाई करूं लागल्या. यासंबंधाची हकीकत ॲना सुरोन हिनें अशी दिली आहे.

"या वेळीं कौंटसाहेबांच्या ग्रंथांच्या विक्रींतून उत्पन्न वाढविण्याचें नवें साधन कौंटेसबाईच्या हातीं आलें. हा धंदा विलक्षण झपाट्यानें वाढला. आवृत्तींमागें आवृत्ति निघूं लागल्या आणि कित्येक प्रसंगीं लोकांकडून अगाऊ पैसेहि येऊं लागले. प्रुफें तपासण्याचें काम कौंटेसबाई स्वतःच करीत आणि त्याकरतां कित्येक वेळां मध्यरात्रीपुढेंहि त्यांना

जागरणें करावीं लागत. कित्येक वेळां ग्रथासंबंधीं दुकानदाराशींहि कटकटी होऊन त्यांना फार त्रास होई. कौंटेसबाईंचें करणें कायद्याच्या दृष्टीनें बरोबर असलें, तरी तें आपल्या रूढीच्या विरुद्ध आहे, असें म्हणून दुकानदार तकरार घालीत."

"पैसा बाळगणें हें पाप आहे असें कौंटसाहेबांचें ठाम मत होतें. ग्रंथकर्तृत्वांत इतका पैसा मिळतो, याची कल्पना आजपर्यंत त्यांना नव्हती. कौंटेसबाईंनीं हा धंदा हातीं घेतला, तेव्हां ही कल्पना त्यांना आली. अशा रीतीनें हा उद्योग केवळ पैशाशाठीं करावयाचा अशी गोष्ट कौंटेसबाईंनीं प्रथम काढली, तेव्हां टॉलस्टॉय यांनीं आपले कान आपल्या हातांनीं घट्ट दाबून धरले. त्यांना कांहीं तरी भयंकर यातना होत असाव्या, असें त्यांच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें. तथापि कौंटेसबाईंनीं आपलें म्हणणें सोडलें नाहीं. दिवसेंदिवस प्रपंच वाढत होता आणि टॉलस्टॉय यांच्या निष्काळजीपणामुळें उत्पन्न कमी होत होतें. अशा स्थितींत कुटुंबदंड योग्य रीतीनें चालविण्यासाठीं कांहीं तरी पैशाचें नवें साधन शोधून काढणें अत्यावश्यक झालें होतें. याच सुमारास देशोदेशींच्या प्रकाशकांकडून भाषांतराच्या परवानगीसाठीं पत्रांवर पत्रें येऊं लागलीं, पण त्या बिचाऱ्यांना सरळ जबाब कधींच मिळाला नाहीं. हीं पत्रें टॉलस्टॉय यांजकडे गेलीं म्हणजे 'यांना कांहींच उत्तर मी देत नाहीं आणि कोणालाहि मी कसलीच मनाई करीत नाहीं' असें ते म्हणत."

पुस्तक-प्रकाशनासंबंधीं रशिया आणि युरोपांतील इतर देश या दोहोंत कोणत्याहि प्रकारचे करारमदार ठरलेले नाहींत. यामुळें स्वतःच्या ग्रंथांच्या भाषांतराला टॉलस्टॉय यांनीं मनाई केली असती, तरी तिचा कांहीं उपयोग झाला नसता. कायद्याचें कोणतेंहि बंधन नसल्यामुळें कोणत्याहि प्रकाशकानें त्यांच्या कोणत्याहि ग्रंथाचें वाटेल तसें चुकीचें भाषांतर करून हव्या त्या नावाखालीं तें छापलें असतें तरी, त्यास कसलाहि अडथळा होण्याचा संभव नव्हता. या वेळीं साहित्याचार्य या नात्यानें टॉलस्टॉय यांची कीर्ति सर्वतोमुखीं झाली होती आणि त्यांतून कवडीहि खर्च न करतां त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध करण्यास मिळाल्यामुळें अनेक भाषांतरकार

व प्रकाशक या बिनमोल संधीचा लाभ घेण्यास अहमहमिकेनें पुढें सरसावले. वाटेल त्यानें उठावें आणि टॉलस्टॉय यांचा ग्रंथ म्हणून वाटेल तसलें चोपडें प्रसिद्ध करीत सुटावें, असा प्रकार घडूं लागला. यामुळें एकाच भाषेंत एकाच ग्रंथाचीं दहादहा भाषांतरें प्रसिद्ध होऊन वाचकांचा आणि प्रकाशकांचाहि मोठा गोंधळ उडाला.

टॉलस्टॉय यांच्या मतांसंबंधीं जे अनेक प्रकारचे गैरसमज निरनिराळ्या देशांत पसरले, त्यांच्या मुळाशीं हींच अर्धीबोबडीं भाषांतरें होत. यापेक्षां चांगल्या रशियन भाषाभिज्ञांकडून एकाद्या सर्वमान्य प्रकाशकानें चांगलीं भाषांतरें करविलीं असतीं, तर असलें भलतेच गैरसमज न पसरतां टॉल-स्टॉय यांची खरी किंमत लोकांस अधिक चांगली कळली असती; पण हें करावयाचें म्हणजे पुस्तक प्रकाशनाचा सारा अधिकार कोणातरी एकाच जबाबदार व्यक्तीच्या हातीं द्यावा लागला असता आणि असें करणें तर टॉलस्टॉय यांच्या निश्चित सिद्धांताविरुद्ध होतें. स्वतःची मिळकत म्हणून कसल्याहि प्रकारच्या उत्पन्नाची बाब आपल्या हातीं ठेवणें हें पापमूलक आहे, असा टॉलस्टॉय यांचा सिद्धांत असल्यामुळें या बाबीकडेहि त्यांनीं सर्वथा दुर्लक्ष केलें. कोणताहि धरबंध न राहिल्यामुळें अर्थाचा अनर्थ कर-णारीं भाषांतरें प्रसिद्ध होऊन एकंदरीनें नफ्यापेक्षां नुकसान अधिक झालें. टॉलस्टॉय यांच्या सिद्धांतांच्या प्रत्यक्ष व्यवहाराचा हा एक मासला होय.

टॉलस्टॉय यांचे ग्रंथ प्रकाशित करण्याचा धंदा कौंटेसबाईनीं हातीं घेतला; तेव्हां भांडवलाकरतां सुमारें तीस हजार रुपयांची रक्कम त्यांनीं कर्ज म्हणून घेतली. एका वर्षाच्या अवधींत ही रक्कम सुमारें तिप्पट झाली. पुस्तकांची विक्री कल्पनेपलीकडे मोठी झाल्यामुळें या उद्योगांत त्यांना चांगला फायदा होई व कुटुंबाच्या खर्चाची ददात बऱ्याच प्रकारें मिटली.

टॉलस्टॉय यांची मानसिक स्थिति अद्यापीहि कांहीं अंशीं अनिश्चित असल्यासारखीच होती. अनेक विचारांचें व विकारांचे तुमूल युद्ध त्यांच्या मानसिक क्षेत्रांत जरी पहिल्याप्रमाणें निकरानें चाललेलें नव्हतें, तरी त्याचे मंदध्वनी अद्यापीहि तेथें उमटत होते. या काळापासून पुढें आपल्या आयु-ष्यक्रमाचें धोरण ते अधिक निश्चित करूं लागले. आपल्या आयुष्याचा

अंतिम हेतु काय हें ठरवून तो सिद्ध करण्याकरतां अधिक निश्चित योजनाहि ते करूं लागले.

या वेळीं टॉलस्टॉय यांच्या मानसिक आवडीनावडी कोणत्या प्रकारच्या होत्या, हें त्यांच्या पुढील पत्रावरून दिसून येतें.

दिसेंबर १८८४.

"काल संध्याकाळीं मी आगगाडींतून उतरलों आणि गाडींतून घराकडे जाऊं लागलों, तेव्हां जो हर्ष मला झाला, तो सांगतां पुरवत नाहीं. आतां हर्षातिरेक होतो कीं काय, असेंहि मला वाटूं लागलें. जमिनीवर बर्फाचा थर वीत वीत जाड पडला होता आणि त्यावर माझी गाडी मोठ्या सपाट्यानें घसरून जात होती; पण गाडीला गति पुष्कळ असतांहि शांततेचा भंग होत नव्हता. डोक्यावर तारकायम आकाश पसरलें होतें, दिवस ऐन थंडीचे, यामुळें ढगांचा मागमूसहि कोठें नव्हता. या रम्य देखाव्यानें माझें मन आनंदसागरांत पोहूं लागलें. हा माझा आनंद शतगुणित होण्यास आणखीहि एक कारण होतें. आगगाडीच्या डब्यांत माझ्या शेजारीं एक श्रीमंत जमीनदारीण होती. आपलें शरीर दागदागिन्यांनीं मढवून मोठ्या ऐटीनें विड्यांचे झुरके ती घेत होती. समोरच्या बाजूस एक विद्वान् डाक्तर होते; फाशीची शिक्षा अवश्य आहे, या मताचें प्रतिपादन ते जोरानें करीत होते. त्यांच्या पलीकडे एक स्त्री आकंठ दारू पिऊन बेभान होऊन अस्ताव्यस्त पडली होती. तिच्या शेजारीं दुसरे गृहस्थ हातांत दारूची बाटली घेऊन बसले होते. आणखी पलीकडच्या बाजूस एक क्षयी विद्यार्थी चिमट्याचा चष्मा घालून बसला होता. इतक्यांत गार्ड साहेबांची स्वारी आंत शिरली आणि जातां जातां सहज मला धक्का मारून पलीकडे गेली. माझ्या अंगावर जडजवाहीर नव्हतें आणि माझा पोषाकहि शेतकऱ्याचा होता, मग मला धक्का मारण्यास काय हरकत होती? असल्या जिवंत नरकांतून बाहेर पडून सप्तर्षींच्या आणि गुरुशुक्रांच्या सान्निध्यांत मी आलों, तेव्हां मला हर्षातिरेक झाला, यांत नवल काय? माझ्या आजुबाजूला सुंदर आणि प्रशांत वनराजी, खालीं शुभ्र रस्ता,

आजूबाजूला उत्कृष्ट वातावरण, माझ्यावर प्रेम करणारा नौकर आणि माझा परमेश्वर यांच्या सान्निध्यांत आगगाडींतल्या साऱ्या यातना मी विसरलों."

प्रकरण पाचवें.

## नवजीवन.

टॉलस्टॉय यांच्या एकंदर आयुष्यक्रमांत अनेक स्थित्यंतरें झालीं; तथापि तीं इतक्या हळूहळू आणि अशा क्रमानें होत गेलीं कीं, त्यांचा प्रत्येकीं स्वतंत्र विचार करावयाचा म्हटलें, तर तसें करणें फार करून शक्य नाहीं. इ० स० १८८५ सालच्या सुमारास त्यांच्या जीवनक्रमांत आणखी एक स्थित्यंतर घडून त्याला नवें वळण लागलें आणि स्वतः स्वीकारलेला हा नवा मार्ग ते बऱ्याच चिकाटीनें आक्रमूं लागले. त्यांचा जीवनक्रम पूर्वीहून अधिक साधा झाला. गतायुष्यांत लागलेले श्रीमंती थाटाचे आचार या काळापासून त्यांनीं सोडून दिले. ते अधिक देहकष्ट करूं लागले आणि नैतिक आचरणासंबंधीं मनुष्याच्या सामान्य आचरणांत ज्या अडचणी उद्भवतात, त्या नाहींशा करण्याकडे त्यांची मनःप्रवृत्ति वळूं लागली. या वेळच्या त्यांच्या आयुष्यक्रमाची ही सामान्य रूपरेषा आहे; तथापि असें असलें तरी गतचरित्रांतील त्यांच्या संवयी व त्यांची मनःप्रवृत्ति हीं मधून मधून डोकावत नसत असें नाहीं. या नव्या रूपरेषेप्रमाणें चालण्याचा अट्टाहास ते करीत असतां त्यांचें मन कित्येक वेळां एकदम उलट खाई.

त्यांचा मित्र प्रिन्स ओरुसॉफ हा या वेळीं बराच आजारी होता. टॉलस्टॉय यांनीं लिहिलेल्या एका ग्रंथाचें भाषांतर फ्रेंच भाषेंत त्यानें केलें होतें. हवा फेर करण्यासाठीं क्रिमियांत जावयाचा सल्ला त्याच्या वैद्यानें त्याला दिला. बरोबर जाण्यासारखा दुसरा कोणीहि मित्र त्याला न मिळाल्यामुळें टॉलस्टॉय यांस आपणाबरोबर येण्याची त्यानें विनंति केली आणि त्यांनींहि त्यास संमति दिली.

क्रिमियन युद्धांत टॉलस्टॉय हे एका तोफखान्याचे अम्मलदार होते, ही गोष्ट वाचकांस आठवत असेलच. सेव्हास्टोपोलच्या मोर्चेबंदींत चवथ्या नंबरचा मोर्चा त्या वेळीं सर्वतोमुखीं झाला होता. शत्रूच्या तोफांचा प्रचंड मार या मोर्चावर पडत असल्यामुळें तो केवळ मृत्यूचें घर बनला होता. याच मोर्चांत टॉलस्टॉय यांचा तोफखाना असून त्यांना येथें जातीनें हजर रहावें लागत असे. या युद्धाच्या वर्णनाचा एक लेख टॉलस्टॉय यांनीं त्या वेळीं लिहिला होता व खुद्द झार बादशाहासहि तो फार आवडला होता. अशा प्रकारच्या लेखकाच्या जिवाला कांहीं अपाय होऊ नये म्हणून त्याला चवथ्या मोर्चांतून काढून त्याची बदली बेलबेक येथील सुरक्षित ठाण्यावर बादशहांनीं केली होती, हेंहि वाचकांस आठवत असेलच. बेलबेकचें ठाणें शत्रूच्या तोफांच्या माऱ्यांत नव्हतें. एके दिवशीं शत्रूच्या घोडेस्वारांची एक लहानशी टोळी आपणावर चाल करून येत आहे, असें पाहून तोफ डागण्यास टॉलस्टॉय यांनीं हुकूम दिला. व निशाणाची दिशाहि बोटानें दाखविली. त्यांच्या हुकुमाप्रमाणें खलाशानें तोफ डागली; पण तोफेंतून निघालेला गोळा कोठें गेला व त्याचें पुढें काय झालें, हें टॉलस्टॉय यांस त्या जागेवरून दिसलें नाहीं. तो गोळा फुटल्याचेंहि चिन्ह त्यांच्या पाहण्यांत आलें नाहीं. तथापि शत्रूच्या तोफांच्या माऱ्यांत आपण सांपडलों आहों, एवढी इषारत त्या स्वारांस मिळून त्यांनीं त्वरेनें तेथून पाय काढला.

या हकीकतीला सुमारें तीस वर्षांचा काळ आतां लोटून गेला होता. सेव्हास्टोपोल येथें पोहोंचल्यानंतर टॉलस्टॉय या लढाईच्या जागीं पुन्हां एकवार गेले होते. ज्या जागीं इंग्रज-फ्रेंच लष्कराच्या उजव्या बगलेचा तळ पडला होता, त्या जागीं फिरत असतां जमिनींत घुसून बसलेला एक गोळा टॉलस्टॉय यांस आढळला. त्या वेळीं जवळच एक लष्करी कामगार उभा होता. त्याला तो गोळा टॉलस्टॉय यांनीं दाखविला. हा कामगार वेढ्याच्या व तोफखान्याच्या कामांत फार पटाईत म्हणून नांवाजलेला होता. आजूबाजूची पहाणी करून तो कामगार म्हणाला, ' बेलबेकच्या ठाण्यावरील तोफखान्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि जाग्यावरून या जागीं

तोफ लागणें शक्य नाहीं. कामगाराचे एवढे शब्द ऐकतांच टॉलस्टॉय यांच्या चित्तांत त्या वेळच्या साऱ्या आठवणी एकदम उभ्या राहिल्या. बेलबेकच्या ठाण्यांतून आपण फक्त एकदां आणि एकच गोळा सोडला होता, ही गोष्टहि त्यांस आठवली. अशा रीतीनें तीस वर्षांनंतर त्या गोळ्याचें दर्शन टॉलस्टॉय यांस मोठ्या चमत्कारानें घडलें. क्रिमियांतील आपला प्रवास लवकरच संपवून टॉलस्टॉय सुखरूप घरीं परत आले.

इ. स. १८८५ सालीं टॉलस्टॉय यांच्या प्रोत्साहनानें चरकॉफ, बिरुकॉफ आणि दुसरी कांहीं मंडळी यांनीं एक प्रकाशनाचा नवा धंदा सुरू केला. हा धंदा पुढें चांगलाच उर्जितदशेस येऊन रशियन साहित्याच्या एका अंगांत या मंडळीनें चांगलीच भर घातली.

सामान्य मनुष्याला उपयुक्त अशा प्रकारचें चांगलें वाङ्मय रशियन भाषेंत या काळापर्यंत नव्हतें. कांहीं दंतकथा आणि चमत्कारांच्या अतिशयोक्तीनें फुगविलेलीं संतचरित्रें याखेरीज सामान्य जनतेच्या मनाला पोषक अशीं पुस्तकें मुळींच अस्तित्वांत नव्हतीं. संतचरित्रांशिवाय प्रसिद्ध होणारीं चोपडीं इतकीं टाकाऊ होतीं कीं, कोणत्याहि सद्गृहस्थाला त्यांजकडे ढुंकून पाहण्याचीहि इच्छा होऊं नये.

ही संस्था केवळ नफा मिळविण्याच्या व्यापारी दृष्टीनें स्थापलेली नव्हती. साध्या आणि सोप्या भाषेंत लिहिलेले उत्तमोत्तम ग्रंथ लोकांस शक्य तितक्या सवलतीनें पुरवावेत, हा या संस्थेचा हेतु होता. ग्रंथकारांनीं दोन वेळां सुखानें भोजन झोडून कांहीं तरी पुस्तकें खरडणें, युक्त असेल तर किमान पक्ष चांगले ग्रंथ तरी त्यांनीं लोकांस पुरविले पाहिजेत, असें टॉलस्टॉय म्हणत. ग्रंथकार जें अन्न खातात, जो कपडा ते वापरतात, व ज्या घरांत ते राहतात, ते घर सुद्धां लोकांच्या अंगबळानें उत्पन्न झालेलें असतें. या वस्तूंपैकीं कशासाठींहि अंगमेहनत न करतां या साऱ्यांचा उपयोग ज्या अर्थी ग्रंथकाराला मिळतो, त्या अर्थी या ऋणाची फेड निदान चांगल्या ग्रंथांच्या द्वारें तरी त्यानें केली पाहिजे. केवळ चैनी आणि श्रीमंत लोकांसाठीं ग्रंथकार लेख लिहूं लागले आणि सामान्य जनतेची वास्तपुस्त सुद्धां त्यांनीं केली नाहीं, तर समाजानें ही निरर्थक वोंड

आपल्या उरावर कां बाळगावी ? असल्या प्रकारचे लेखक निरर्थक आणि समाजाला अपकारक होत.

एके प्रसंगीं आपल्या एका स्नेह्याशीं बोलत असतां टॉलस्टॉय म्हणाले, " आज या गोष्टीला तीस वर्षें झालीं. त्या वेळीं मी आणि माझे इतर लेखक बंधू जे लेख लिहीत असूं, त्यांना आमच्या साऱ्या दहा कोट प्रजेंत पराकाष्ठा दहा हजार तरी वाचक असत कीं नाहीं, याची शंकाच आहे. त्यानंतर अलीकडे शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यापर्यंत झाला आहे. आणि आतां किमान पक्ष दहा लाख लोक तरी कांहीं वाचावयास मिळावें म्हणून आ करून बसले आहेत. ते म्हणतात, 'अहो सरस्वतीभक्त, कांहीं आमच्याकडे लक्ष द्या. तुमच्या कीर्तीला साजेल आणि आमच्या पचनीं पडेल, असलें अन्न आम्हांला द्या. गांवाळ चोपड्यांचा जो रोग आज आमच्या माना धरून बसला आहे, त्यापासून आम्हांला सोडवा.' रशियन शेतकरी साधाभोळा आणि प्रामाणिक प्राणी आहे. त्याच्या हांकेला ओ देणें आम्हांला युक्त आहे. या बाबतींत मीं पुष्कळ विचार करून पाहिला आणि आतां तसे ग्रंथ लिहिण्याचा यत्न मी करणार आहें."

वर सांगितलेल्या साहित्यमंडळानें याच दिशेनें प्रयत्न करून पुष्कळच महत्वाची कामगिरी बजावली आहे. या उद्योगांत अनेक प्रकारच्या अडचणींशीं या मंडळीला झगडावें लागलें. ती जन्माला येते न येते तोंच सरकारी परीक्षकांची झांप तिच्यावर पडली. नव्या विचारांची पेरणी समाजाच्या तळापर्यंत ही मंडळी करीत आहे. असें या सरकारी परीक्षकांना वाटूं लागलें. त्यांतून टॉलस्टॉय यांचें पाठबळ या मंडळीला आहे. ही गोष्ट सरकारला समजली तेव्हां हा प्रयत्न उलथून पाडण्याकरतां अनेक प्रकारच्या अडचणी तिच्या मार्गांत सरकारकडून येऊं लागल्या. 'ख्रिस्ताचा डोंगरावरील उपदेश' असल्या प्रकारच्या धार्मिक ग्रंथांतहि सरकारला अनर्थकारक वाक्यें दिसूं लागलीं आणि असा मजकूर वगळल्या-शिवाय असलीं धार्मिक पुस्तकेंहि छापण्याची परवानगी सरकारकडून मिळत नसे. या कामीं रशियांतील अनेक ग्रंथकार या मंडळाला मदत

करीत. सरकारी परीक्षकांच्या तावडींतून आपले लेख हातींपायीं नीट सुटावेत म्हणून या ग्रंथकारांना ज्या अनेक युक्त्या योजाव्या लागत, त्या साऱ्या सांगावयाचें म्हटलें, तर तें एक रामायणच होईल. मास्को आणि पिटर्स्बर्ग येथील परीक्षक फार कडक तपासणी करतात, असें दिसलें म्हणजे एकाद्या दूरच्या प्रांतीं जाऊन भोळसर परीक्षकाकडे लेख पाठवून तेथून परवाना मिळवावा, असा क्रम या मंडळानें स्वीकारला होता. या कामीं चरकॉफ व बिरुकॉफ या दोघांनीं विलक्षण मेहनत केली. चांगल्या लेखकाकडून लेख मिळविणें, परीक्षकाकडून तो पास करून घेणें, आणि पैशाची तूट येईल ती भरून काढणें हीं कामें चरकॉफ करीत असे, आणि प्रकाशनासंबंधीं बाकीची सर्व कामगिरी बिरुकॉफकडे असे. या कामगिरी-बद्दल बिरुकॉफला सरकारकडून हद्दपारीचें बक्षीस मिळालें. त्याची जागा पुढें गोर्बुनॉफ नांवाच्या गृहस्थानें भरून काढली असून हा उद्योग या नव्या गृहस्थाने विशेष जोरानें चालवून चांगल्या नांवारूपास आणला आहे. या मंडळाचें काम विशेष जोरांत होतें, त्या वेळीं लहान लहान तीस चाळीस लक्ष पुस्तकांची विक्री प्रतिवर्षी होत असे. कित्येक वेळां टॉल्स्टॉयहि या मंडळाकरतां पुस्तकें लिहीत. ज्या गोष्टी विशेष चांगल्या नाहींत, असें त्यांना वाटे, त्या दुसऱ्या एका प्रकाशकाला ते देत असत. कसल्याहि प्रकारचें भलेंबुरें साहित्य प्रसिद्ध करून आपले खिसे भरावेत. हा या प्रकाशकाचा धंदा होता. पुढें या मंडळानें त्याला आपलासा करून घेऊन त्याजकडून चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध करविलीं.

या मंडळानें चालविलेल्या या स्तुत्य उद्योगाचा परिणाम यूरोपांतील बहुधा सर्व देशांवर थोडाबहुत तरी झाला आहे. इंग्लंडांतील सुप्रसिद्ध संपादक डब्ल्यू. टी. स्टेड हे इ. स. १८८८ सालीं यासनोया येथें गेले असतां अशाच प्रकारची ग्रंथमाला तुम्ही सुरू करा, असा आग्रह टॉलस्टॉय यांनीं त्यांना केला. त्याप्रमाणें अशी माला स्टेड यांनीं सुरू केली व सध्यां ती आक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस या संस्थेच्या हातीं आली आहे. याच मालेच्या अनुषंगानें इंग्लंडांत आणखीहि कित्येक स्वस्त माला निघाल्या व यामुळें चांगले चांगले ग्रंथ पुष्कळ लोकांच्या अव_

लोकनांत येऊं लागले आहेत. आरंभीं आरंभीं टॉलस्टॉय यांनीं लिहिलेल्या छोट्या गोष्टी रशियन-साहित्य-मंडळ प्रसिद्ध करीत असे. पुढें त्यांच्या पुष्कळशा गोष्टी परीक्षकांस नापसंत होऊं लागल्या व कांहीं कांहीं एक-दोन आवृत्तींनंतर परीक्षकांनीं बंद केल्या. इ. स. १८८५ सालीं टॉलस्टॉय यांनीं उद्योग आणि आळस अशा मथळ्याचा एक निबंध लिहिला होता. बोंड्यारेफ या नांवाच्या एका शेतकऱ्यानें लिहिलेल्या एका पुस्तकाला उपोद्घात म्हणून हा निबंध टॉलस्टॉय यांनीं जोडला. शेतकीच्या कामांत पूर्ण निष्णात म्हणून बोंड्यारेफची प्रसिद्धी होती. केवळ श्रीमंत म्हणून हातानें कोणतेंहि काम न करतां शेतांत राबणाऱ्या शेतकऱ्यांचा उपहास करणाऱ्या श्रीमंतांचा तो मोठा द्वेष्टा होता. बोंड्यारेफ यानें एक नवाच धर्मपंथ सुरु केला होता व आपल्या पंथाचीं तत्त्वें त्यानें इतक्या विषदपणें स्पष्ट केलीं होतीं कीं, त्याचें पुस्तक वाचून टॉलस्टॉय यांस मोठें कौतुक वाटलें. इ.स. १८९७ सालीं रशियन साहित्य-सेवकांचीं अल्प चरित्रें टॉलस्टॉय यांनीं प्रसिद्ध केलीं. या पुस्तकांत ते म्हणतात.

" या मालेंत ज्या अनेक पुस्तकांचा उल्लेख आला आहे, त्या सर्वांत बोंड्यारेफचें पुस्तक फार महत्वाचें असून सर्वांहून तें अधिक काळ टिकेल आणि लोकांच्या मनावर तें अधिक परिणामहि करील यांत संशय नाहीं. शारीरिक कष्टांसंबंधीं अनेकांनीं अनेक प्रकारें लिहिलें आहे. प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं शारीरिक उद्योग अवश्य आहेत, असें कोणी म्हणतात, तर दुसरे कोणी या गोष्टीचा विचार आर्थिकदृष्ट्या करून अंगमेहनतीची योग्यता प्रस्थापित करतात. दुसरे कित्येक नैतिकदृष्ट्या विचार करणारे असून अंगमेहनत मनाच्या वाढीला पोषक आहे, असेंहि प्रतिपादन करतात. रस्कीन म्हणतो, जो वर्ग आपल्या स्वतःच्या पोटासाठीं स्वतःच्या हातानें काम करीत नाहीं, त्या वर्गांत धर्मज्ञान अथवा शुद्ध नीति यांचें अस्तित्व असणें सर्वथा अशक्य आहे."

तृतीय खण्ड संपूर्ण.

महाराष्ट्रवाङ्मय भांडारांत अत्यंत उपयुक्त, सर्वोत्कृष्ट
सर्वांगसुंदर व सर्वतोपरी नवीन पुस्तकांची भर घालणारी

# भारत-गौरव-ग्रंथमाला.



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते.

## नवें माहितीपत्रक.

( सन १९२० )

## मालेचे उद्देश व कार्य.

महाराष्ट्र-वाङ्मयांत सर्वोत्कृष्ट पुस्तकांची भर घालून राष्ट्र, समाज व साहित्य यांची सद्धेतुपूर्वक एकनिष्ठपण यथाशक्ति सेवा करावी, या हेतूनें ही ग्रथमाला इ. स. १९११ च्या जानेवारी महिन्यांत आम्हीं चालू केली. ज्या वाङ्मयाची महाराष्ट्रीयांना आज फार आवश्यकता आहे, असल्याच विषयांचीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा ग्रंथमालेनें प्रयत्न चालविला असून

त्यांत तिला, बरेंच यशहि मिळालें आहे. ज्ञान ही दैवीशक्ति असून ती प्राप्त करून घेणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य होय. असल्या दैवीशक्तीचें चैतन्यामृत ज्यांत सामावलेलें आहे, अशा ग्रंथांची हल्लींच्या परिस्थितींत किती आवश्यकता आहे, हें कोणास सांगावयाला नको. दरिद्री देश, क्षुधाग्रस्त जनता, विस्कळित समाज, शिथिल झालेलीं धर्मबंधनें वगैरे अनेक संकट परंपरांच्या दाट अंधकारानें आमची दिशाभूल झाली आहे, आमचे मार्ग चुकले आहेत, कोणत्या दिशेनें जावें, हें आम्हांस कळेनासें झालें आहे, अशा वेळीं ज्या ज्ञानप्रदीपांनीं आम्हास आमचे खरे मार्ग दृग्गोचर होतील, असे ज्ञानदीप पाहिजे आहेत. हे ग्रंथरूपी अक्षय प्रज्वलित ज्ञानदीप निर्माण करण्याचें पवित्र कार्य जर एकादी ग्रंथमाला महाराष्ट्रांत करीत असेल, तर ती भारत गौरव-ग्रंथमाला हीच एक होय. कोणतीं पुस्तकें राष्ट्राचा, समाजाचा व वाङ्मयाचा अभ्युदय घडवून आणतील, कोणतीं पुस्तकें समाजाची संस्कृति अधिक उज्वल करतील, कोणत्या पुस्तकांमुळें तरुणांचीं मनें खंबीर होऊन राष्ट्रसेवा करण्यास ते आतुर होतील, कोणत्या पुस्तकामुळे गृहिणींना आपल्या कर्तव्याची ओळख पटून त्यांचें नैतिक तेज वाढेल आणि मुख्यतः कोणतीं पुस्तकें भरतखंडाच्या गौरवाभिवृद्धीस कारण होतील; याकडे ग्रंथमालेनें विशेष लक्ष पुरविलें आहे. केवळ जगाच्या कल्याणासाठीं निःस्वार्थ वृत्तीनें ज्या महात्म्यांनीं आपलें अगाध व अमूल्य ज्ञान ज्या निरनिराळ्या भाषांतून सांठवून ठेवलें आहे, त्यांपैकीं शक्य तितकें महाराष्ट्र साहित्यभांडारांत आणून सांठविण्याचा ग्रंथमालेचा शक्य तो प्रयत्न चालू असून महाराष्ट्रांतल्या प्रतिभासंपन्न लेखकांच्या ओजस्वी लेखणींतून बाहेर पडलेलीं स्वतंत्र पुस्तकेंहि ग्रंथमालेंतून प्रसिद्ध होत आहेत. ज्यांतील पवित्रता व रमणीयता हीं केव्हांहि नाहींशीं होत नाहींत, ज्यांतील विचारांची जाणीवता कोणत्याहि काळीं अपुरी भासत नाहीं, ज्यांतील चैतन्य केव्हांहि लुप्त होत नाहीं, ज्यांतील काव्यरस केव्हांहि आल्हादकच वाटतो, सर्व मानव जातीचें कल्याण साधणें हाच ज्याचा उद्देश आणि जें केवळ जगाच्या संस्कृतीसाठींच निर्माण केलें जातें; तेंच खरें साहित्य होय;

अशी या ग्रंथमालेची पक्की भावना आहे व हाच उच्च हेतु पुढें ठेवून ग्रंथमालेनें आपलें कार्य चालविलें आहे.

शक्य तितक्या स्वस्त आणि एकाच किंमतीनें सर्वोत्कृष्ट व उपयुक्त पुस्तकें साधारण वाचकवर्गाच्या हातीं देऊन त्यांच्या मनोभूमिकेवर ज्ञानबीज पेरावयाचें, ही मूळची कल्पना सुप्रसिद्ध रशियन साहित्य-रथी व साधुवर्य कौंट टॉलस्टॉय यांची. आपल्या कांहीं स्नेह्यांची मदत घेऊन त्यांनीं इ. स. १८८५ सालीं the Mediator या नांवाची ग्रंथमाला चालू केली. तिचें कार्य करीत असतां पुष्कळ लेखकांना अंदमानसारख्या सैबेरियाची हवा खावी लागली. पुढें रीव्ह्यू ऑफ रीव्ह्यू मासिकाचे संपादक सुप्रसिद्ध डब्ल्यू. टी. स्टेड, हे टॉलस्टॉय यांच्या भेटीसाठीं गेलें असतां, तेथें या ग्रंथमालेचें अनुकरण करावें असें त्यांना वाटलें व इंग्लंडांत परत आल्यावर त्यांनीं the worlds classics या नांवाची ग्रंथमाला चालू केली. हल्लीं या ग्रंथमालेचें नेतृत्व आक्सफोर्ड युनिव्हरसिटी प्रेसकडे असून सुमारें दोनशें पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. हाच कित्ता समोर ठेवून भारत-गौरव-ग्रंथमालेनें आपलें कार्य चालविलें आहे. युरोपांत व अमेरिकेंत अशा ग्रंथमाला पुष्कळ असून त्यामुळें उत्कृष्ट वाङ्मयाच्या संग्रहाची तिकडील सर्वसाधारण वाचकांची मोठी सोय झाली आहे. कोणतेंहि उपयुक्त पुस्तक प्रसिद्ध करावयाचें झाल्यास किंमत, छपाई, आकार व बांधणी या बाबतींत सारखेपणा ठेवावयाचा हा या ग्रंथमालेंतील विशेष होय. याच धोरणानें आम्ही जेव्हां या ग्रंथमालेस आरंभ केला, तेव्हां आमचा हा प्रयत्न कितपत यशस्वी होईल याची आम्हास साहजिकच काळजी होती. पहिल्या पुस्तकाच्या प्रती भीत भीत अवघ्या दोन हजार काढल्या होत्या; परंतु हळूहळू हा प्रयत्न महाराष्ट्रीयांस आवडल्यामुळें हल्लीं ग्रंथमालेस आपल्या प्रत्येक पुस्तकाच्या सहा-हजार प्रती काढाव्या लागत आहेत. आणि ग्रंथमालेस अशी उमेद आहे कीं, लोकाश्रय असाच वाढत जाऊन लवकरच दहा हजार प्रती काढाव्या लागतील. पोस्टखात्याकडे थोड्या दिवसांपूर्वी चवकशी केल्यावर असें समजलें कीं, केसरी व चित्रमयजगत हीं शिवाय करून महाराष्ट्रांतल्या

कोणत्याहि वर्तमानपत्रापेक्षां, मासिक पुस्तकापेक्षां व मालेपेक्षां भारत-गौरव-ग्रंथमालेचाच खप अधिक आहे. तथापि ग्रंथमालेस हल्लीं जो लोकाश्रय आहे, तो मालेचें कार्य अधिक जोमानें चालण्यास अपुरा आहे, असें आम्ही नम्रपणें महाराष्ट्रीयांच्या लक्षांत आणून देत आहों. युरोपांतील व अमेरिकेंतील अशा प्रकारच्या ग्रंथमालांची जी विलक्षण उन्नति आज आपणांस दिसत आहे, त्याचें कारण त्यांचा भयंकर खप होय. खप पुष्कळ असल्यामुळें कागद, छपाई, बांधणी, चित्रें वगैरे बाबतींत सढळ हातानें खर्च करतां येतो व लेखकांना त्यांच्या श्रमाचा मोबदला चांगला मिळाल्यामुळें उत्तम मजकुराच्या पुस्तकांची त्यांना केव्हांहि वाण पडत नाहीं. महाराष्ट्राची स्थिति याच्या अगदीं उलट आहे. इकडील विद्वान-वर्ग म्हणजे बृहस्पतीतुल्य ! स्वतः शिवाय दुसऱ्यांच्या पुस्तकांना हात लावण्याची त्यांना प्रेरणाच होत नाहीं आणि झालीच तर ती केवळ लहरीप्रमाणें अभिप्राय देण्यासाठीं ! श्रीमंतांना अनेक करमणुकी असल्यामुळें चांगलीं पुस्तकें वाचण्यास त्यांना फुरसद नाहीं, कनिष्ठ वर्ग साक्षर नाहीं आणि मध्यम वर्गाजवळ पैसा नाहीं ! अशा अडचणींतून महाराष्ट्रवाङ्मयाच्या उन्नतीचा मार्ग शोधून काढणें किती कठिण आहे, याचा महाराष्ट्रीयांनींच शांतपणें विचार करावा. साधारणतः सद्ग्रंथांच्या संग्रहाची इकडे आवड कमी आणि मोठ्या कष्टानें आश्रय दिलाच, तर मध्येंच केव्हां तरी व्ही. पी. परत करून ग्रंथमालेस चिमटा घेण्याची आवडहि दांडगी. यांत त्यांचाहि कांहीं दोष नाहीं. पुरुषार्थ गाजविण्यास कोठेंच जागा न राहिल्यामुळें गरीब बिचाऱ्या ग्रंथमालारूपी गायीवर त्यांनीं सुरी घेऊन धांवावें हें त्यांच्या सौजन्यास शोभेसेंच आहे. अशा नानाप्रकारच्या अडचणी असतांहि यांतून योग्य तो मार्ग काढून भारत-गौरव-ग्रंथमाला यशस्वी झाली आहे. एवढेंच नव्हे, तर सगळ्या हिंदुस्थानांत या ग्रंथमालेला तिच्या उत्कृष्टपणाबद्दल अग्रस्थान मिळालें आहे. या यशाचें कारण राष्ट्राची गरज ओळखून ग्रंथमालेनें आपल्या प्रयत्नांची दिशा निश्चित केली हें होय. महाराष्ट्रीयांची वाचनाभिरुचि ओळखून ग्रंथमालेनें कादंबरी, चरित्र व प्रवासवर्णन या मनोरंजक वाङ्मयानें आपले

हेतू साध्य करण्याचा प्रयत्न चालविला आहे. कादंबरी म्हटली कीं, तींत विशेष उदात्तपणा नसावयाचा असा पुष्कळांचा समज झालेला आहे. आणि हा समज इतर ग्रंथमालांच्या पाणचट, प्रणयी व भिकार कादंबऱ्यांमुळें दृढ झाला आहे; पण तेवढ्यावरून भारत गौरव-ग्रंथमालेच्या कादंबऱ्याहि अशाच असतात, असें कोणीं अनुमान करूं नये. लेखक कुशल असला म्हणजे त्याला कादंबरींत वाटेल ते उपयुक्त विषय गोंवितां येतात. इतकेंच नव्हे, तर साधारण वाचकांना गहन विषय समजावून सांगण्यास कादंबरीसारखें दुसरें साधन नाहीं. या बाबतींत भारत-गौरव ग्रंथमालेनें केवढें सुयश संपादन केलें आहे, हें आतां सर्वांना विदित झालें आहे. आश्रयदात्यांच्या इच्छेप्रमाणें ग्रंथमालेनें कांहीं चरित्रें प्रसिद्ध केलीं आहेत व जसजसा मालेचा लोकाश्रय वाढत जाईल, तसतशी पुस्तकांत विविधता सहजच येईल. छत्रपति शिवाजी महाराजांच्या चरित्राचें कार्य ग्रंथमालेनें नुकतेंच हातीं घेतलें आहे व महाराष्ट्रीयांच्या उत्साहपूर्ण मदतीनें या ग्रंथांत ग्रंथमाला चांगलें यश मिळवील अशी आम्हास उमेद आहे.

ग्रंथमालेचें प्रत्येक पुस्तक स्वतंत्र बांधलेलें असून प्रत्येकांतील विषय निराळा असतो. प्रत्येकांतील कल्पना नव्या व उदात्त, विचार प्रगमनशील व प्रगतिकारक, कथानक मनोहर व सुबोधक, विवेचन काव्यमय व सुरस आणि भाषा सोपी, गोड व भारदस्त असते. वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें यांच्यापेक्षां पुस्तकांचें आयुष्य जास्त असावें; इतकेंच नव्हे, तर तीं काळजीपूर्वक जपून ठेवण्यासाठीं आदर उत्पन्न व्हावा, इकडे लक्ष देऊन ग्रंथमालेचें प्रत्येक पुस्तक शक्य तितकें उपयुक्त व सुंदर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतों. सारांश, महाराष्ट्रवाङ्मय ज्यामुळें अपूर्ण आहे, ज्याची अत्यंत आवश्यकता आहे आणि महाराष्ट्र जनता ज्याची मोठ्या उत्कंठेनें वाट पहात आहे, अशाच प्रकारचें उदात्त मनोरम, ओजपूर्ण, सुबोधक व नवीन महाराष्ट्र साहित्य निर्माण करणें, हेंच ग्रंथमालेनें आपलें ध्येय निश्चित करून त्यासाठीं ग्रंथमाला शक्य तो प्रयत्न करीत आहे. ग्रंथमालेचा प्रयत्न असा सात्विक, शुद्ध व उपयुक्त असल्यामुळेंच सर्व

महाराष्ट्रीय तिची एकवाक्यतेनें स्तुति करीत आहेत. परभाषेंतील विद्वानांसहि ग्रंथमालेचा प्रयत्न अत्यंत प्रशंसनीय वाटत असून ग्रंथमालेच्या कांहीं पुस्तकांचीं हिंदींत, गुजराथींत व कानडींत भाषांतरें झालीं आहेत.

पुस्तकासाठीं खर्च केलेला पैसा फुकट गेला, असा अनुताप करण्याची पाळी मालेच्या आश्रयदात्यांवर येऊं नये, अशी खबरदारी आजवर आम्हीं घेतली असून पुढेंहि वाढत्या लोकाश्रयाचा फायदा पुस्तकांत जास्त जास्त सुधारणा करून आश्रयदात्यानांच देण्याचा मालेचा संकल्प आहे. आश्रयदात्यांना त्यांच्या पैशाचा पूर्ण संतोषदायक मोबदला मिळावा म्हणून ग्रंथमालेनें हा उद्योग स्वार्थाला मर्यादा ठेवून चालविला आहे व युद्धजन्य महागाईत तर ग्रंथमालेनें बरेंचसें नुकसानहि सोसलें आहे. दहावीस रुपये महिन्याच्या कांठीं मिळविणाऱ्या गृहस्थांसहि सोयीसोयीनें आमच्या पुस्तकांचा सहज संग्रह करतां यावा, इकडे लक्ष देऊन पुस्तकांच्या किंमती शक्य तितक्या कमी ठेवलेल्या आहेत. मातृभाषा; जन्मभूमि व स्वसमाज यांविषयीं वात्सल्य, आदर व अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक सुशिक्षित महाराष्ट्रीयास आमची नम्रपणें अशी विनंति आहे कीं, त्यांनीं या विनंतिपत्राचा शांतपणें विचार करावा आणि शक्य असल्यास या ग्रंथमालेला आश्रय देऊन तिला आधिक कार्यक्षम करावें. ग्रंथप्रकाशन हा केवळ लोकाश्रयानें चालणारा व्यवसाय आहे, याचा विचार करून आणि सद्ग्रंथाचा संग्रह करणें हें गृहस्थांचें कर्तव्य आहे, हें लक्षांत आणून प्रत्येक महाराष्ट्रीयानें या ग्रंथमालेस आश्रय दिल्यास मराठी साहित्याची सर्व प्रकारची उन्नति या ग्रंथमालेकडून खचित होईल. ग्रंथमालेस ज्यांनीं आश्रय दिला नाहीं, त्यांच्यावर आम्ही कृतघ्नतेचा आरोप करीत नाहीं; परंतु मायदेश, स्वसमाज व मातृभाषा यांविषयीं ज्यांच्या अंतःकरणांत कृतज्ञता असेल, त्यांनीं आपला आश्रय देण्यास आळस व हयगय करूं नये एवढीच त्यांना नम्र विनंति आहे.

## ग्रंथमालेचे नियम.

ग्रंथमालेच्या आश्रयदात्यांचे दोन वर्ग आहेत. एकदम एका रकमेनें

नियोजित रक्कम देऊन आश्रय देणाऱ्यांचा पहिला वर्ग व प्रत्येक पुस्तकाची व्ही. पी. स्वीकारून आश्रय देणाऱ्यांचा दुसरा वर्ग. सदरहू ग्रंथमाला व तदंगभूत आणखी कांहीं उपयुक्त कार्यें यांसाठीं पैशाची फार आवश्यकता आहे. ज्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असेल त्यांनीं पहिल्या वर्गांत आपलीं नांवें दाखल करावींत, अशी त्यांना आमची विनंति आहे. ही संस्था सतत व जोमानें चालू रहावी, नव्याजुन्या लेखकांना स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याच्या कामीं येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात, केवळ लेखकांना उपयोगी पडेल, अशा अनेक भाषांतील नानाविध पुस्तकांचा संग्रह करावा, ग्रंथमालेचीं पुस्तकें छापण्यास कसली अडचण पडूं नये, म्हणून मालेच्या मालकीचा छापखाना घालावा आणि या सर्वांसाठीं मध्यवर्ती अशी ग्रंथमंदिर नांवाची संस्था असावी, एवढयासाठीं पैशाची जरूर आहे व म्हणून साहित्याभिमानी श्रीमानांनीं याच वर्गांत नांवें दाखल करावींत.

१ एकदम शंभर रुपयांची ग्रंथमालेस देणगी देऊन जे आश्रयदाते होतील, त्यांना ग्रंथमालेकडून प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाच्या कापडी बांधणीच्या व सोनेरी नांवाच्या दोन प्रती ग्रंथमालेकडून सतत पुरविल्या जातील.

२ एकदम पन्नास रुपयांची ग्रंथमालेस देणगी देऊन जे आश्रयदाते होतील, त्यांना ग्रंथमालेकडून प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाची कापडी बांधणीची व सोनेरी नांवाची एक प्रत ग्रंथमालेकडून सतत पुरविली जाईल.

३ एकदम पंचवीस रुपयांची ग्रंथमालेस देणगी देऊन जे आश्रयदाते होतील त्यांना ग्रंथमालेकडून प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाची एक साध्या बांधणीची प्रत ग्रंथमालेकडून सतत पुरविली जाईल.

४ वरील आश्रयदात्यांना टपालवगैरे कोणताहि खर्च द्यावा लागणार नाहीं.

# साधारण आश्रयदात्यांच्या वर्गाचे नियम.

१ आश्रयदात्यांत केव्हांहि नांव दाखल करतां येतें. नांव दाखल झाल्या तारखेपासून पुढें प्रसिद्ध होणारें प्रत्येक पुस्तक आश्रयदात्यांनीं घेतलें पाहिजे. त्यांतील अमुक नको, अमुक तेवढें पाठवा, असें म्हणतां येणार नाहीं. मागें प्रसिद्ध झालेलीं जीं पुस्तकें शिल्लक असतील त्यांतील —ोणतींहि इच्छित पुस्तकें आश्रयदात्यांत नांव दाखल करतांना वाटल्यास यावींत अथवा घेऊं नयेत.

२ आश्रयदात्यांत नांव दाखल करण्यास एक रुपया प्रवेश फी द्यावी लागते. ही प्रवेश फी केव्हांहि परत मिळत नाहीं. नजरचुकीनें व्ही. पी. परत झाल्यास आणि तो पोस्टखर्च दिल्यास पुन्हां नांव चालू करण्यांत येईल.

३ प्रवेश फीचा एक रुपया अगाऊ मनीआर्डरीनें पाठवावा किंवा पहिल्या व्ही. पीं. त आकारण्यास लिहावें. या व्ही. पी. चा स्वीकार झाल्यावर आश्रयदात्यांत नांव दाखल करण्यांत येतें व पुढील प्रत्येक पुस्तक सवलतीच्या किंमतीनें व्ही. पी नें पाठविण्यांत येतें.

४ ग्रंथमालेच्या पुस्तकाची किंमत कितीहि अधिक असली, तरी आश्रयदात्यांना प्रत्येक साध्या बांधणीचें पुस्तक दहा आण्यास व कापडी पुस्तक एक रुपयास दिलें जाईल. साध्या पुस्तकास दोन आणे व कापडी पुस्तकास तीन आणे टपाल खर्च अधिक द्यावा लागेल. मागील पुस्तकेंहि याच किमतीनें मिळतील.

५ प्रत्येक पुस्तक दोन तीन महिन्यांच्या मुदतीनें तयार होतें.

६ प्रत्येक आश्रयदात्यास प्रकाशित पुस्तकाची एकच प्रत वरील सवलतीच्या किंमतीनें मिळेल. जीं पुस्तकें शिल्लक नाहींत, तीं देण्याची जबाबदारी ग्रंथमालेवर नाहीं.

# ग्रंथमालेचीं प्रकाशित झालेलीं पुस्तकें.

**१–२ समाजकंटक.** समाजांत कटंक स्वरूप पसरलेले कांहीं लोक

समाजाच्या अधोगतीसाठीं कसा प्रयत्न करीत असतात आणि कर्तव्य-परायण सत्याग्रही सज्जन या कंटकांचा त्रास सोसूनहि आपलें उद्दिष्ट कसें सिद्धीस नेतात, हें एका कुशल लेखकानें या कादंबरींत अगदींच नव्या पद्धतीनें व कुशलतेनें दाखविलें आहे. कादंबरी अत्यंत मनोरंजक व उप-देशपूर्ण असून तींत समाजाच्या अवनतीचीं कारणें व उन्नतीचे उपाय निरनिराळ्या पात्रांकडून फारच बहारीनें सांगितले आहेत. समाजाच्या सद्यःस्थितीचें इतकें सुंदर व यथातथ्य चित्र दुसऱ्या कादंबरींत क्वचितच दृष्टीस पडेल. थोडक्याच दिवसांच्या अवधींत या कादंबरीची ही द्विती-यावृत्ति प्रसिद्ध झाली आहे, यावरून ती किती लोकप्रिय आहे, हें सहज दिसून येईल. या कादंबरीचे प्रथम व द्वितीय असे दोन स्वतंत्र खंड असून चार चित्रें आहेत. दोन्ही खंडांची किं. दीड रुपया.

३ **दैवलीला.** महाराष्ट्र–वाङ्मय–भांडारांत जीं कांहीं थोडीं रत्नें आहेत, त्यांपैकींच दैवलीला हें एक रत्न होय. केवळ दैवगतीमुळें संसार-समुद्रांतील तरंगांचें आंदोलन कसें होतें, केव्हां सुखशय्येवर तर केव्हां विपत्पंकांत मनुष्य कसा पडतो आणि उदार वृत्तीचीं माणसें संकटांना कसें धैर्यानें तोंड देत असतात, हें या कादंबरींत इंदिरा नांवाच्या दुर्दैवी स्त्रीनें आपलें आत्मचरित्र गोंवून अत्यंत मार्मिकपणें दाखविलें आहे. हें स्वतःचें संसारचित्र रंगाविण्यांत लेखिकेनें जें अपूर्व हस्तनैपुण्य दाखविलें आहे, तें पाहून कोणीहि मुग्ध झाल्यावांचून राहणार नाहीं. कादंबरी वाचीत असतां चित्तवृत्ती उचंबळून येतात. केवळ दुर्दैवामुळें आपदा विपदा भोगणाऱ्या इंदिरेची प्रतिमूर्ति पाहून अश्रुधारा वाहूं लागतात. द्वितीयावृत्ति. किं. १२ आणे

४ **सावित्री–सत्यवान.** ( पौराणिक कादंबरी.) शिल्लक नाहीं.

५ **प्रवासिनी.** ( एका सुधारक स्त्रीची आत्मकथा. ) शिल्लक नाहीं.

६ **महत्मा–परिचय.** ( कांहीं महात्म्यांचीं चरित्रें. ) शिल्लक नाहीं.

७ **महात्मा–गौतम.** ( बुद्ध चरित्र. ) शिल्लक नाहीं.

८ व १० **जाईचा मंडप.** ( ऐतिहासिक कादंबरी ) शिल्लक नाहीं.

९ **जहांगीर.** ( बादशहा जहांगीरचें आत्मचरित्र. ) शिल्लक नाहीं.

११ **समाजरहस्य.** ( सामाजिक कादंबरी. ) शिल्लक नाहीं.

१२–१३ **जन्मभूमि.** ( ऐतिहासिक कादंबरी.) शिल्लक नाहीं.

१४ **प्रेममंदिर.** ( सामाजिक कादंबरी. ) शिल्लक नाहीं.

१५ **शिवाजीचा उजवा हात.** ( ऐतिहासिक कादंबरी.) शि. नाहीं.

१६ **रजनी.** सुप्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार व्हिक्टर ह्यूगो व वंगकादंबरीकार बांकिमचंद्र या उभयतांच्या दोन कादंबऱ्यांवरून ही कादंबरी तयार केली असून ती मराठींत सर्व प्रकारें नवीन आहे. एका अनाथ अंध स्त्रीच्या अंध जीवनाचा विलक्षण इतिहास या कादंबरींत मोठ्या बहारीनें ग्रथित केला आहे. अंधजीवन किती चमत्कृतिपूर्ण असतं, अंधळ्याची अवस्था किती करुणास्पद असते आणि या विश्वसंसाराच्या दृष्टिसुखाला मुकल्यामुळें अंध अंतःकरण कसें करपून गेलेलें असतें हें या कादंबरींत फारच मार्मिकपणें चित्रित केलें आहे. सचित्र कापडी प्रत. किं. एक रुपया.

१७ **जर्मनीचें पाताळयंत्र.** या सुंदर व मननीय पुस्तकांत जर्मनीच्या कुटिल राजनीतीची खरी हकीकत फार प्रयासानें मिळवून दिली आहे. युद्धाची तयारी जर्मनी किती वर्षांपासून करीत होता, व युद्धापूर्वीं निरनिराळ्या राष्ट्रांत जर्मनीनें आपले कावेदावे कसे सुरू केले होते, ही अत्यंत मनोरंजक हकीकत या पुस्तकांत आहे. जगांतल्या प्रत्येक ठिकाणीं जर्मनीचे धाडशी हेर कसे जातात, व तेथील सात कुलुपांत ठेवलेली बातमी हे हेर कसे काढतात, लहानमोठ्या राष्ट्रांतील बदललेल्या वातावरणाचा फायदा घेण्यासाठीं जर्मनी कसा डोळ्यांत तेल घालून दक्ष असतो वगैरे अनेक रहस्यें या पुस्तकांत सुसंगत रीतीनें दिलीं आहेत.

१८ **केसरची प्रभावळ.** जर्मनीचे माजी बादशहा व त्यांचे मंत्रिमंडळ यांविषयीं साद्यंत व खरी माहिती मिळावी म्हणून प्रत्येकास विलक्षण जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. ही जिज्ञासा पुरी करावी, या उद्देशानें हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. लहानसें जर्मनराष्ट्र थोडक्या अवधींत उदयास कसें आलें व ही जर्मनराष्ट्राची संघटना जर्मनींतल्या कोणत्या मुत्सद्यांनीं घडवून आणली, हें या पुस्तकावरून कोणासहि स्पष्ट कळून येईल.

**सूचना.** वरील १७ व १८ या पुस्तकांची ही नुकतीच द्वितीयावृत्ति प्रसिद्ध केली असून दोन्ही पुस्तकें एकत्र बांधलेलीं आहेत. पुस्तकांत सात चित्रें असून मजबूत जाड बांधणी केली आहे. किं. सव्वा रुपया.

१९ **स्वप्नमय आयुष्य.** ( प्रती शिल्लक नाहींत. )

२० **मातृमूर्ति.** कृषिकर्माच्या सुधारणेस वाहून घेतलेल्या एका दुर्दैवी महाराष्ट्र तरुणाची अत्यंत रहस्यमय आत्मकहाणी या कादंबरींत ग्रथित केली आहे. त्याच्या उद्देशाचा विपर्यास करून त्याच्यावर कित्येकांनीं जी सकंटपरंपरा कोसळविली आहे, ती पाहून कोणाचेंहि हृदय थरारूनच जाईल. या कादंबरींतील तरुण नायकाची सदुद्यमशीलता पाहून कोणीहि धन्योद्गार काढल्यावांचून राहणार नाहीं. किंमत चवदा आणे.

२१ **कर्मफल.** विलक्षण पण अत्यंत सदुपदेशक कादंबरी. एका मृत व्यक्तीचें पुन्हां जगांत आगमन. जगाचें पुनर्दर्शन झाल्यावर या व्यक्तीला जगाचा जो अनुभव आला, तोच त्यानें आपल्या आत्मचरित्रांत वर्णिला आहे. स्वतःची परमप्रिय स्त्री आणि जीवाला जीव देणारा दोस्त या दोघांच्या वर्तनाचें जें चित्र फिरून सृष्टींत आल्यावर या मृत व्यक्तीला दिसलें, तें अत्यंत रमणीय, उद्वेगजनक व सदुपदेशक आहे. किंमत चवदा आणे.

२२–२३–२४ **प्रिन्स बिस्मार्क.** ज्या असामान्य बुद्धिमत्तेच्या पुरुषानें लहान लहान विस्काळित जर्मन संस्थानांचें प्रचंड, प्रबळ व सुसंघटित असें जर्मनराष्ट्र निर्माण केलें, ज्यानें आपल्या राजकारणाच्या चमत्कारानें सगळ्या जगाला थक्क करून सोडलें, आणि पितृभूमीच्या कल्याणासाठीं आपलें सगळें आयुष्य खर्च केलें, त्या लोकोत्तर पुरुषाचें हें विस्तृत, विशेष मननीय व अत्यंत मनोरंजक असें चरित्र असून तें वाचीत असतां, जर्मनराष्ट्राच्या संघटनेचा सगळा इतिहास सहज अवगत होतो. २१० पृष्ठांचा एक याप्रमाणें तीन स्वतंत्र भागांत चरित्र पुरें झालें असून तिन्ही भागां मिळून चवदा चित्रें आहेत. किंमत अडीच रुपये.

२५ **पूर्व आणि पश्चिम.** पौर्वात्य संस्कृति आणि पाश्चात्य संस्कृति या दोहोंचीं उठावदार चित्रें या कादंबरींत कुशलतेनें रेखाटलीं असून

दोन्ही संस्कृतींची तुलना फार मनोरमतेनें केली आहे. या कादंबरींतील प्रत्येक पात्राचें वृत्तिचित्र अगदीं नवीन असें असून जुनी, वाचलेलीच कादंबरी आपण वाचीत आहों, हा जो दोष अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या नवीन कादंबऱ्यांतून आढळतो, तो या कादंबरीच्या एका पानावरहि आढळून येत नाहीं. सगळें नवें; पण चित्ताकर्षक, आरंभापासून अखेर-पर्यंत रहस्यमय, पण अत्यंत सुबोधक आणि काव्यमय; असून परिणाम-कारक अशी ही कादंबरी आहे. किंमत चवदा आणे.

२६ **सुखाचा शोध.** सुखाचा शोध कोण करीत नाहीं? प्रत्येकाची धडपड सुखाच्या प्राप्तीसाठींच चाललेली आहे; परंतु सुखाच्या प्राप्तीसाठीं प्रत्येकानें आंखलेला मार्ग आणि त्या मार्गानें जाऊनहि अखेरीस पहावें तों ' जगीं सर्व सूखी असा कोण आहे, ' हा प्रश्न पुन्हां तसाच कायम राहिलेला दिसतो. हेंच सत्य रहस्य उकलण्याचा या सामाजिक कादंबरींत प्रयत्न केला आहे. या कादंबरीइतकी उच्च प्रशंसा मराठींत दुसऱ्या कोण-त्याच कादंबरीची झाली नाहीं. किंमत चवदा आणे.

२७ **विद्वज्जनसभा.** कांहीं महाराष्ट्रीय साहित्यसेवकांचें वृत्तिचित्र या कादंबरींत चित्रित करण्याचा एका लेखकानें अत्यंत दक्षतेनें प्रयत्न केला आहे. असल्या प्रकारची कादंबरी मराठींत हीच पहिली असून ती हृदय हालवून सोडणारी आहे. अलीकडील कांहीं नामधारी विद्वा-नांच्या सभा, त्यांच्या संस्था, त्यांचे उद्योग, यांची अत्यंत विलक्षण; पण तितकीच खरी व मनोरंजक माहिती या कादंबरींत फारच कुशलतेनें दिली आहे. समाजसेवेच्या मनोहर पडद्यामागें एका वृत्तपत्राच्या संपा-दकानें केलेलें मित्रकपट, एका सुखरूप शिक्षित तरुणीवर टाकलेली मोहिनी, आणि एका सदाचरणी तरुणाची केलेली दुर्दशा, वगैरे प्रकार पाहून अत्यंत उद्वेग उत्पन्न होतो व संतापहि येतो. केव्हां केव्हां डोळेहि अश्रूंनीं भरून येतात. विद्वानांचे वेडेचार पाहून हंसूंहि येतें. किंमत बारा आणे.

२८–२९ व ३२. **कौंट टॉलस्टॉय.** या साधुश्रेष्ठ पुरुषाचें चरित्र अत्यंत सदुपदेशक व हल्लींच्या परिस्थितींत अत्यंत उपकारक असें असून

कादंबरीपेक्षांहि त्यांत अधिक मनोरंजकपणा आहे. 'जें कां रंजलें गांजलें, त्यासी म्हणे जो आपुलें ॥ तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा" या काव्यवचनाचे टॉलस्टॉय हे मूर्तरूप होत. रशियांतले ते एक बडे जहागिरदार व श्रीमान् होते; परंतु जुलूम आणि दरिद्रयांनीं गांजलेल्या आपल्या रशियन बांधवांसाठीं व अखिल मानवजातीसाठीं त्यांनीं अनेक आपत्ति भोगल्या, अनेक कष्ट सोसले आणि स्वानुभवानें देशाच्या दारिद्र्याचें व आपत्तींचें मूळ शोधून काढून सर्व मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग जगाच्या पुढें स्पष्टपणें ठेवला. सुमारें दोनशें सव्वा दोनशें पानांचा एक याप्रमाणें तीन खंड प्रसिद्ध झाले असून आणखी दोन खंड प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. प्रत्येक खंडांत दोन चित्रें. किंमत प्रत्येक खंडास चवदा आणे.

३० **देशाचें दुर्दैव.** दुष्काळ आणि युद्धजन्य महागाईनें आमच्या देशाची किती चमत्कारिक व अनुकंपनीय स्थिति झाली आहे, अन्न आणि वस्त्र यांच्या अभावामुळें दीनदुबळ्यांची कोण भयंकर स्थिति झाली आहे आणि या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठीं निर्दय धनकोवगैरेंचा वर्ग गरिबांशीं कसा स्नेहशून्यतेनें वागत आहे, धान्याचा व्यापार करणारे व्यापारी आपल्याच बांधवांशीं किती कृतघ्नतेनें वागत आहेत, वगैरे हल्लींच्या परिस्थितीचें अत्यंत करुणास्पद, परंतु फारच मनोवेधक चित्र या कादंबरींत रेखाटलें आहे. कादंबरींत दुष्काळाचें व महर्गतेचें नुसतें भेसूर स्वरूपच नाहीं, तर उपाययोजनाहि आहे आणि तीहि प्रत्येकाच्या हातांतली अशी आहे. प्रत्येक लिहितां वाचतां येणाऱ्या तरुणानें ही कादंबरी वाचून आपली मनोभूमिका या नव्या ज्ञानबीजानें अलंकृत करून घ्यावी, असें आम्ही आग्रहानें म्हणतों. सचित्र. किंमत चवदा आणे.

३१ **विजया.** सामाजिक कादंबऱ्यांत हें एक विलक्षण तेजस्वी रत्न आहे. महाराष्ट्र साहित्यांत वाङ्मय या दृष्टीनें जीं अत्यंत उत्कृष्ट अशीं पुस्तकें आहेत, त्यांत या पुस्तकाचा नंबर पहिला लागेल. असें आम्ही निःशंकपणें म्हणतों. मनुष्याच्या मनोभूमीचें चित्र तेथील एकहि वस्तु न

वगळतां कुशलतेनें रेखाटणें किती काठिण आहे, हें कोणास सांगावयास नको. ही कादंबरी वाचतांना असें वाटतें कीं; जणूं काय प्रत्येक पात्राच्या हृदयांत शिरून तेथील मनोविकारांचें तुमुल रणकंदन प्रत्यक्षच पहात आहों. गोष्ट अगदीं साधी; पण लेखकाच्या कुशलतेनें इतकी चित्ताकर्षक झाली आहे कीं, एकदां वाचली, तरी पुन्हां एकदां वाचून पहावी असें वाटतें. किंमत चवदा आणे.

३३ **प्रवृत्ति आणि निवृत्ति.** सामाजिक कादंबरी. जगांत कांहीं प्रवृत्तीचे दास असतात व कांहीं निवृत्तीचे दास असतात. हीच गोष्ट या कादंबरींत निरनिराळ्या पात्रांकडून सिद्ध केली आहे. निवृत्ति व प्रवृत्तीच्या मनोव्यापारांचें युद्ध सर्वांच्याच अंतःकरणांत चालत असतें; परंतु या युद्धाचें छायाचित्र कागदावर उठविणें खरोखरच फार कठिण आहे. हृदयकपाटांतील कानाकोंपरा देखील शोधून तेथील झाडून साऱ्या बारीक सारीक वस्तु देखील वाचकांपुढें ठेवण्यास अत्यंत कुशल शस्त्रवैद्याप्रमाणें लेखकाची लेखणीहि किती तरबेज पाहिजे, याचें अनुमान सहज करतां येईल. एका शिकल्या-सवरलेल्या स्त्रीवर ऐन तारुण्यांत वैधव्य कोसळून पुढें तिला तिच्या मनोविकारानें केव्हां इकडे, तर केव्हां तिकडे असे जे गोते दिले आहेत, ते खरोखरच विचित्र आहेत. एका तरुणाच्या मनाचा गोंधळहि असाच चमत्कारिक झाला आहे. एकंदरींत ही कादंबरी मराठींत नवीन व अत्यंत उपदेशक अशी आहे. ( छापत आहे. ) किंमत चवदा आणे.

**छत्रपति शिवाजीमहाराज.** अगोदरच मराठी भाषेंत शिवाजी महाराजांचें विश्वसनीय असें चरित्र अद्यापपर्यंत प्रसिद्ध झालें नाहीं. त्यात आतां आणखी विपुल जुनी ऐतिहासिक माहिती उपलब्ध झाल्यामुळें या असामान्य वीरश्रेष्ठ नरपुंगवाच्या चरित्राची सारें महाराष्ट्र अत्यंत उत्कंठेनें वाट पहात आहे. महाराष्ट्रीयांची ही इच्छा ओळखून व त्यांच्याच आशेनें हें अत्यंत जबाबदारीचें कार्य ग्रंथमालेनें आपल्या शिरावर घेतलें आहे. महाराजांचें हें चरित्र सर्वांगांनीं परिपूर्ण करण्याचा शक्य तो प्रयत्न करणार आहों. त्यांत यश देणार भगवंत आहे. कार्य अत्यंत

कठीण आहे, परंतु महाराष्ट्रीयांच्या उत्साहपूर्ण आशीर्वादानें त्यांत ग्रंथमाला यशस्वी होईल, अशी उमेद आहे. उपलब्ध झालेली सर्व माहिती आधारभूत घेऊन हें चरित्र लिहावयाचें असल्यामुळें तें बरेंच मोठें होणार आहे. तसेंच या चरित्रांत अनेक ऐतिहासिक चित्रें देण्यासाठींहि आम्हीं पुष्कळ खर्च करण्याचें योजिलें आहे. प्रत्येक स्वराष्ट्रभक्त महाराष्ट्रीय या कार्यांत आम्हास मुक्त हस्तानें सहाय्य करील, असा भरंवसा आहे.

याशिवाय अनेक सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्या आणि चरित्रें प्रकाशित करण्याचें ग्रंथमालेनें योजिलें आहे. त्यासंबंधानें पुढें वेळोवेळीं माहिती देण्यांत येईल. सर्व पत्रव्यवहार खालीं दिलेल्या पत्त्यावर करावा.

प्रभाकर श्रीपत भसे.

व्यवस्थापकः—भारत-गौरव-ग्रंथमाला.

गिरगांव-मुंबई.

# लेखकांस विनंति.

भारत-गौरव-ग्रंथमालेस नवीन सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्यांची, प्रतिभावान् अशा श्रेष्ठपुरुषांच्या चरित्रांची व अनेक प्रकारच्या प्रवासवर्णनांची, वगैरे उपयुक्त पुस्तकांची आवश्यकता आहे. लेखकांना त्यांच्या श्रमाचा योग्य तो मोबदला देण्यांत येईल. पुस्तक होतां होईतों स्वतंत्र असावें. तें भाषांतर अथवा रूपांतर असल्यास पुस्तक पाठवितांना मूळ पुस्तकाचा उल्लेख अवश्य करावा. सामाजिक सुधारणेसंबंधानें लेखकाचे विचार नव्या जुन्या मंडळीस आवडणारे असोत वा नावडणारे असोत, केवळ मतभेद म्हणून पुस्तक नापसंत केलें जाणार नाहीं. मात्र आपापल्या मतानुसार विषयाची मांडणी अत्यंत मनोज्ञ अशी असावी. विशेषतः ऐतिहासिक कादंबऱ्यांची हल्लीं फार आवश्यकता आहे. आणि त्यापेक्षांहि अधिक अशी आवश्यकता सांप्रतच्या भयंकर दारिद्र्याच्या पर्यालोचनाच्या कादंबऱ्यांची आहे. दहावीस विधवांचीं कपाळें कुंकुम तिलकानें सुशोभित होण्यांत कांहीं राष्ट्राचें आडलें नसून खेड्यापाड्यांची

स्थिति स्वावलंबनाच्या मार्गानें कशी सुधारेल व लक्षावधि अर्धपोटीं राहणाऱ्या गरिबांना पोटभर अन्न कसें मिळेल, ही आज खरोखर राष्ट्राची गरज आहे. तेव्हां हा प्रश्न सोडविण्यासाठीं जे लेखक उत्कृष्ट कादंबऱ्या लिहितील, त्यांचे राष्ट्रावर मोठे उपकार होणार आहेत, हें लक्षांत आणून नवीन लेखकांनीं त्या दृष्टीनें प्रयत्न करावा, अशी त्यांना आमची अत्यंत कळकळीची विनंति आहे. राष्ट्राला सध्यां ज्या वाङ्मयाची गरज आहे, अशा प्रकारचीं पुस्तकें लेखकांकडून लिहून मिळाल्यास केवळ ग्रंथमालेवरच नव्हे, तर साहित्य, समाज व स्वराष्ट्र या सर्वांवरच त्यांचे उपकार होणार आहेत. पुस्तक छापून दोनशें पृष्ठांचें होईल इतकें मोठें असावें. अथवा चारशें पृष्ठांचें झाल्यासहि घेण्यांत येईल. हस्तलिखित मजकूर कागदाच्या एका बाजूवर लिहिलेला असावा व तो सुवाच्य असावा. लेखी प्रत पाठवितांना ती रजिस्टर करून पाठवावी.

व्यवस्थापक, भारत-गौरव-ग्रंथमाला,
गिरगांव-मुंबई.

REFBK-0001761

क्र. १७६१

'जगद्धितेच्छु प्रेस,' ५०७ शनवार, पुणें.